**प्रकरण चौथे**

# मराठी कथेतील माणदेशाचे चित्रण


| अ.क्र. | तपशील | पृष्ठांक |
|---|---|---|
| ४.१. : | प्रास्ताविक | १०७ ते १०७ |
| ४.२. : | मराठी कथेचे स्वरुप आणि तिची वाटचाल | १०७ ते ११० |
| ४.३. : | ग. दि. माडगूळकरांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण | ११० ते १३४ |
| ४.४. : | व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण | १३४ ते १६८ |
| ४.५. : | शंकरराव खरातांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण | १६८ ते १९६ |
| ४.६. : | द. ता. भोसल्यांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण | १९६ ते २१५ |
| ४.७. : | उत्तम बंडू तुपे ह्यांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण | २१५ ते २२० |
| ४.८. : | माणदेशातील अन्य कथाकारांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण | २२० ते २२१ |
| ४.९. : | निष्कर्ष व निरीक्षणे | २२२ ते २२३ |
| ४.१०. : | समारोप | २२३ ते २२३ |
| ४.११. : | संदर्भसूची | २२४ ते २२८ |

# प्रकरण चौथे

# मराठी कथेतील माणदेशाचे चित्रण

## ४.१. प्रास्ताविक :

आतापर्यंत आपण 'माणदेश' ही संकल्पना सूक्ष्मपणे व सविस्तरपणे जाणून घेतली आहे. आता ह्या चौथ्या प्रकरणात आपण मराठी कथेतील माणदेशाचे चित्रण जाणून घेणार आहोत. ह्या चित्रणातून माणदेश हा इतर प्रदेशांपेक्षा वेगळा कसा जाणवतो, मराठी कथावाङ्मयात ह्या माणदेशचित्रणामुळे काही फरक पडला आहे काय, स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद ह्या कथेतून दिसून येतो का, इत्यादी प्रश्नांचा शोध घेणार आहोत. हा शोध घेताना प्रामुख्याने ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात व द. ता. भोसले ह्या माणदेशातील चार कथाकारांच्या कथालेखनावर आपण अधिक भर देणार आहोत. तत्पूर्वी मराठी कथेचे स्वरुप व मराठी कथेची वाटचाल थोडक्यात पाहू.

## ४.२. मराठी कथेचे स्वरुप आणि तिची वाटचाल :

'कथा' हा वाङ्मयप्रकार कथनाच्या माध्यमातून फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे. इंग्रजी राजवटीमध्ये छापण्याची कला अस्तित्त्वात आली. 'करमणूक', 'मनोरंजन', 'रत्नाकर' ह्यासारख्या नियतकालिकांमधून हळूहळू लघुकथा छापल्या जाऊ लागल्या. इ. स. १८९० ते १९१५ पर्यंत मराठी कथेवर हरिभाऊ आपट्यांचे राज्य होते. ह्या काळात कथेच्या गंभीर स्वरुपाला वि.सी. गुर्जरांनी रंजकतेचे स्वरुप प्राप्त करुन दिले.

इ.स. १९२६ ते १९३३ हा कालखंड मराठी लघुकथेच्या दृष्टीने भरभराटीचा काळ होय. ह्याच काळात फडके-खांडेकर लिहीत होते. त्यांनी कथेला एका ठराविक तंत्रामध्ये बसवण्याचा प्रयत्न केला. इ.स. १९३४-३५ च्या दरम्यान य. गो. जोशी ह्यांनी कथेला तंत्राच्या चौकटीतून बाहेर काढले.

इ.स. १९४०-४१ च्या दरम्यान कथावाङ्मयावर दुसऱ्या महायुद्धाचा विलक्षण परिणाम झालेला दिसतो. त्यातून कथा मुळापासून बदललेली दिसते. मानवी मनाची होरपळ, लोकशाही तत्त्वज्ञानाची पीछेहाट, नैतिकतेवरील व चांगुलपणावरील विश्वास संपला, त्यामुळे विफलता, नैराश्य, उद्ध्वस्तता, विकृतता ह्यांचे चित्रण साहित्यातून येऊ लागले. ह्याच दरम्यान 'नवकथे'चा उदय झाला. नवकथा ही पूर्णपणे व्यक्तिकेंद्रित दिसते. स्वातंत्र्यपूर्व

काळात श्री. म. माटे, ग. ल. ठोकळ, र.वा.दिघे ह्यांनी ग्रामीण कथा समृद्ध केल्याचे जाणवते, तर नवकथेच्या उदयाबरोबर अनेक कथाकारांनी ग्रामीण कथेच्या तंत्राचा व आशयाचा विकास केल्याचे जाणवते. ह्यामध्ये व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, आनंद यादव, चारुता सागर हे कथाकार आघाडीवर असल्याचे दिसते.

नवकथेने जुन्या कथाकारांनी जपलेले सगळे संकेत झुगारुन दिले व प्रतीकात्मक भाषेचा वापर सुरु केला. कथेतून ललित्यपूर्ण आणि पाल्हाळिक वर्णने बंद केली. कथेला वेगळा घाट देण्यासाठी कथावस्तूकडे कधी अलिप्ततेने, कधी आत्मीयतेने, कधी भावनाकुलतेने नवकथा पाहू लागली. परिणामतः कथावाङ्मयात अपेक्षित परिणाम साधणाऱ्या सुंदर कलाकृती निर्माण होऊ लागल्या.

मराठी कथात्मक साहित्यात मनोविश्लेषण हा घटक खूप महत्त्वाचा आहे. कथन परिणामकारक होण्याच्या दृष्टीने मनोदर्शनाची आवश्यकता आहे. आपण ज्या व्यक्तीविषयी लिहीत आहोत, तिच्याविषयी थोडीशी ओळख वाचकांना करुन दिल्याशिवाय वाचक त्या व्यक्तिरेखेमध्ये रमणार नाही. हरिभाऊ आपट्यांपासून मराठीतील कथात्मक वाङ्मयाला खरीखुरी सुरुवात झाली. हरिभाऊ आपट्यांपासून व्यंकटेश माडगूळकर ह्यांच्यापर्यंतच्या कथालेखनाच्या प्रवासात मनोदर्शनाचे महत्त्व वाढत गेल्याचे निदर्शनास येते.

व्यंकटेश माडगूळकर ह्यांच्या कथावाङ्मयामधून देवा सटवा महार, झेल्या, रामा मैलकुली, दत्ताराम ह्या व्यक्तिरेखा आपल्या परिचयाच्या झाल्या आहेत. त्यांनी ह्या व्यक्तींच्या जीवनात घडलेल्या विविध प्रसंगांचे चित्र रेखाटत असताना त्यांचे अचूक मनोदर्शनही घडविले आहे. त्यामुळे ह्या व्यक्तिरेखा आपल्या ओळखीच्या माणसापेक्षाही अधिक परिचयाच्या झाल्या आहेत. सारांश, मनोविश्लेषणाचा उपयोग व्यक्तिरेखांच्या स्वभावदर्शनाकरिता आणि कथानकाच्या गुंफणीला मदत व्हावी, ह्यासाठी केला गेलेला आढळतो. म्हणजेच मराठी कथा घटनाप्रधान न राहता मनोविश्लेषणात्मक बनत गेल्याचे दिसते. त्यामुळे कथेची कलात्मक पातळी व कथेचे जीवनदर्शनाचे सामर्थ्य हे दोन्ही वाढल्याचे जाणवते. ही कलात्मकता व जीवनदर्शनाचे हे सामर्थ्य व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेत मोठ्या प्रमाणात आढळते.

मराठी ग्रामीण कथेचा विचार करावयाचा झाल्यास खऱ्या अर्थाने अस्सल मराठी ग्रामीण कथा ही व्यंकटेश माडगूळकरांच्यापासूनच सुरु झालेली दिसते. त्यापूर्वीच्या कथेचा घाट घटनाप्रधानता ह्या स्वरूपात मोडणारा वाटतो. कारण मराठी समाज अनेक लहान-मोठ्या

भौगोलिक विभागांमध्ये विभागलेला आहे. त्यातील कोणतीही ग्रामीण जीवनाची अनुभूती दुसऱ्या विभागातील अनुभूतींशी जुळणारी नसते. प्रत्येक ठिकाणचे सामाजिक संकेत वेगवेगळे असतात. तेथील माणसांचे स्वभावधर्म, जीवनधर्म वेगवेगळे असतात. त्यामुळे प्रत्येक भागातील कथाकारही वेगवेगळे असल्याचे जाणवते. माणदेशात त्यामुळेच गदिमा व व्यंकटेश ह्या माडगूळकर बंधूंना महत्त्व प्राप्त होते.

बदल हा कोणत्याही समाजाचा स्थायिभाव असतो. परंतु विसाव्या शतकातील ग्रामीण भागातील बदल हा लक्षणीय स्वरुपाचा आहे. हा बदल सन १९३० च्या आसपास सुरु झाला. समाजातील तरुणवर्ग हा राजकीय व सामाजिक चळवळीकडे आकर्षित झाला. तो नव्या वैचारिक प्रवाहात सामील झाला. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ह्या आधुनिक जीवनमूल्यांचे बीजारोपण ग्रामीण तरुणवर्गामध्ये झाले. त्यातूनच स्वातंत्र्यसंग्रामाचा यज्ञकुंड पेटलेला दिसतो.

ग्रामीण माणूस हा खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य चळवळीमुळे जागृत झाला. स्वातंत्र्य मिळाले आणि शेकडो वर्षे परकीय सत्तेखाली दबलेला, पिचलेला ग्रामीण माणूस मोकळा श्वास घेऊ लागला. सामाजिक चळवळीमुळे शैक्षणिक क्षेत्रात प्रगती झाली. पर्यायाने, ग्रामीण समाज हा सर्वांच्याच कुतूहलाचा विषय बनला. ह्यातील बऱ्या-वाईट गोष्टींना मनापासून हातभार लावण्याचे काम साहित्यिकांनी केलेले दिसते.

सुसंस्कृत समाजाचे जीवनच फक्त साहित्याचा विषय होऊ शकते, असा समज एकेकाळी होता. मराठी साहित्यिकही त्याला अपवाद नव्हते. सामान्य ग्रामीण माणसाच्या जीवनात सांगण्यासारखे काय आहे, असे शहरी लोकांना वाटत होते. ग्रामीण माणूस गावंढळ, अशिक्षित, अडाणी, अंधश्रद्धा जोपासणारा असा समजला जात होता. म्हणूनच 'ग्रामीणांनी निर्मिलेली कला ही कला न ठरता 'लोककला' ठरली, असे शिवाजीराव चव्हाण म्हणतात.'[१] एकंदरीत, ह्या कालखंडातील मराठी कथा ही ग्रामीण जीवनाकडे नागर लेखकांचे लक्ष वेधून घेणारी होती, असे म्हणावे लागेल. परंतु सर्वच कथावाङ्मय ह्या स्वरुपाचे नव्हते. श्री.म. माटे ह्यांच्यासारखे कसदार लेखन करणारे कथाकारही त्या काळात होते. त्यांनी आपल्या कथांमधून कृषिप्रधान संस्कृतीचा व ग्रामीण जीवनाचा अल्पसा का होईना, परिचय करुन दिलेला आहे.

इ.स. १९४०-४५ पासून अनेक ग्रामीण कथाकार उदयास आले. त्यात प्रामुख्याने ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, उद्धव ज. शेळके, द. मा. मिरासदार, वामन चोरघडे,

शंकरराव खरात, रणजित देसाई आदींचा अंतर्भाव होतो. ह्या काळात हे कथाकार नुसतेच संख्येने जास्त नव्हते, तर ते ग्रामीण जीवनातील अनेक अनुभव ताकदीने, प्रसंगी वेगळ्या घाटाचा विचार करुन मांडत होते. आघाडीच्या नवकथाकारांमध्ये व्यंकटेश माडगूळकरांचे नांव घेतले जाते.

श्री. म. माटे ह्यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' (१९४१) लिहून मराठी कथेला सुरुवात केली होती. त्यात जिव्हाळा, उत्कटता, वेदना होती. जीवनविषयक उदात्त जाणीव होती. माटे हे उत्कट अभिनिवेशाने कथा लिहीत होते, तर ग. दि. माडगूळकर ह्यांच्याकडे कलात्मक तटस्थता होती. ह्याचमुळे माडगूळकरांच्या कथा सुंदर झाल्याचे दिसते. व्यंकटेश माडगूळकरांनी केलेले माणदेशी माणसांचे, मानवी स्वभावाचे, निसर्गाबद्दलचे, प्राणिमात्रासंबंधीचे, नियतीच्या खेळाचे, वेगवेगळ्या जमातींचे आकलन आश्चर्यकारक आहे. शंकरराव खरात ह्यांनी दलित व ग्रामीण जीवनातील भावभावनांचे चित्रित केलेले कंगोरे लक्षवेधी आहेत. ह्या सर्व पार्श्वभूमीवर ग.दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात व द.ता.भोसले ह्या चार माणदेशी कथाकारांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण अभ्यासावयाचे आहे. वरील सर्व पार्श्वभूमीचा विचार केल्यास स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी वाङ्मयातून अर्थातच कथावाङ्मयातूनही माणदेशाचे चित्रण आढळत नाही. स्वातंत्र्यानंतर मात्र ते खऱ्या अर्थाने ग.दि. माडगूळकर ह्यांच्या कथेतून दृष्टीस पडते.

## ४.३. ग. दि. माडगूळकरांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण :

माणदेशातील निसर्गाची प्रतिकूलता लाभलेल्या शेटफळे (ता. आटपाडी, जि. सांगली) येथे १ ऑक्टोबर १९१९ साली ग. दि. माडगूळकर ह्यांचा जन्म झाला. तेथून पाचसहा मैलांवर माडगूळकरांचे 'माडगूळ' हे गाव आहे. माडगूळकरांचे वडील दिगंबरपंत औंध संस्थानात श्रीमंत भवानराव पंडित पंतप्रतिनिधी ह्यांच्याकडे लेखनाच्या कामासाठी होते. त्यांच्या बदलीनुसार माडगूळकरांना आटपाडी, औंध, किन्हई, कुंडल ह्या संस्थानाच्या गावात बालपणी राहण्यास मिळाले. त्यामुळे तेथील रणरणती दुपार, धनगरांची गाणी, सण, वनस्पतीची फुले ह्यांचे संस्कार माडगूळकरांच्यावरती झालेले दिसून येतात. 'श्रीभवानी श्रीनिवास विद्यालय, औंध' ह्याठिकाणी त्यांचे शिक्षण झाले. कुमारावस्थाच माणसाच्या आयुष्याला वळण लावते. अत्र्यांच्या 'गुरुदक्षिणा' ह्या नाटकात वक्रदंताची भूमिका केल्यामुळे आणि तो प्रयोग स्वत: भवानराव पंतप्रतिनिधींनी पाहिल्यामुळे बक्षीस समारंभाच्यावेळी ते

म्हणाले, "तू टाकीत जा, पुढे शिकला नाहीस तरी चालेल" योगायोगाने त्यावर्षी माडगूळकर मॅट्रिकच्या परीक्षेत नापास झाले. त्यानंतर वयाच्या सतराव्या वर्षी स्वातंत्र्य संग्रामात ते सामील झाले. परंतु त्याचवेळी घरचीही संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली.

औंधच्या शाळेत असतानाच त्यांनी शाळेच्या 'विनय' मासिकात 'आपटबार' नावाची पहिली कथा लिहिली, तीच त्यांच्या लेखनाची प्रेरणा असल्याचे दिसून येते. कारण त्यावेळची सामाजिक विषमता, लोकाचार, महारवाड्यात पाहिलेली दैन्यावस्था, तुकड्यासाठी महाग असणारे स्वत:चे कळाहीन जीवन हे सर्व त्यांच्या लेखनात दिसते. घरच्या कठीण परिस्थितीला तोंड देण्यासाठी त्यांनी खूप कष्ट केले. घरात ते सर्वात मोठे होते. वडिलांची नोकरी गेली होती. त्यामुळे स्वत: ग. दि. माडगूळकरांनी उदबत्या, खादी विकण्याचा व्यवसाय करुन कुटूंब चालविले. परंतु त्याठिकाणी खूप हाल होऊ लागले, म्हणून चित्रपटाच्या मोहमयी जगात एक्स्ट्रा म्हणून काम करु लागले. त्या काळात त्यांनी अनेक माणसे (मा. विनायक, वि. स. खांडेकर, आचार्य अत्रे, सुधीर फडके, व्ही. शांताराम, भालजी पेंढारकर) जोडली. पुढे त्यांना स्थिर होण्यासाठी ह्या माणसांची मदत झाली. दारिद्रय, भूक, मत्सर, टीका ह्यांच्याशी झुंज देत माडगूळकर केवळ महत्त्वाकांक्षेच्या बळावर पुढे गेलेले दिसतात. भालजींनी महिना ५० रु. पगाराची त्यांना नोकरी दिली.

ग. दि. माडगूळकरांचा 'लपलेला ओघ' (१९५२) हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यावरुन माडगूळकरांनी खऱ्या अर्थाने साहित्यसेवा उशिरा सुरु केल्याचे दिसते. त्यांचे एकूण दहा कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. ह्याच दरम्यान त्यांना मान-सन्मान मिळण्यास प्रारंभ झालेला दिसतो. ते मान-सन्मान असे: 'संगीत नाटक अकादमी अॅवॉर्ड'(१९५७), 'महाराष्ट्र राज्य विधान परिषद, नामनियुक्त सदस्य'(१९६२), 'उपाध्यक्ष, मराठी चित्रपट महामंडळ'(१९६४), 'अध्यक्ष, गोमंतक मराठी साहित्य संमेलन, म्हापसा'(१९६५), 'अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन, ग्वाल्हेर'(१९६९), 'पद्मश्री किताब'(१९६९), 'अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, यवतमाळ'(१९७३), 'अध्यक्ष, मराठी साहित्य परिषद, पुणे' (१९७६) अशा ह्या थोर साहित्यिकाची पुणे येथे १४ डिसेंबर १९७७ रोजी प्राणज्योत मालवली.

आधी म्हटल्याप्रमाणे माडगूळकरांचे दहा कथासंग्रह प्रसिद्ध झाले, ते पुढीलप्रमाणे : 'लपलेला ओघ' (१९५२), 'वेग आणि इतर कथा'(१९५७), 'बोलका शंख'(१९६०), 'कृष्णाची करंगळी' (१९६२), 'मंतरलेले दिवस'(१९६२), 'बांधावरच्या बाभळी'(१९६३),

'थोरली पाती'(१९६३), 'तुपाचा नंदादीप' (१९६६), 'चंदनी उदबत्ती'(१९६७), 'भाताचे फूल'(१९७१), 'सोने आणि माती'(१९७३) ह्या सर्व संग्रहबद्ध कथांची संख्या ११३ भरते. त्यापैकी ७३ कथांमध्ये माणदेशाचे चित्रण आलेले दिसते. ते एकवीस वर्षे कथालेखन करीत होते. ह्याचाच अर्थ नवकथेच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत त्यांनी कथालेखन केलेले आहे. ग्रामीण नागर सरमिसळ असणाऱ्या कथा, चित्रकथासदृश कथा, चमत्कृतिजन्य कथा, व्यक्तिचित्रप्रधान कथा, प्रेमकथा, लोककथा-नवलकथा, प्राणिकथा, आत्मवृत्तपर कथा आणि ग्रामीण कथा अशी त्यांची विभागणी करता येईल. गदिमांना प्रामुख्याने व्यक्तिप्रधान कथेचे आकर्षण दिसते. कथेतील व्यक्ती प्रामुख्याने ग्रामीण भागातील म्हणजे त्यांच्याच 'माडगूळ' च्या परिसरातील आहेत. त्यांच्या कथेतून येणाऱ्या व्यक्तिरेखा ह्या उदात्ततेसाठी वापरल्या जातात. गदिमांनी खास ग्रामीण अशा फारच कमी कथा लिहिल्या आहेत. त्यांची 'वीज' ही निखळ माणदेशी ग्रामीण कथा म्हणावी लागेल. त्यांच्या कथेतून लोकसमजुती, अडाणीपणा, लोकाचार आणि सध्याच्या लोकशाहीची अवस्था हे विषय प्रामुख्याने आलेले दिसतात. 'प्रेम' ह्या विषयावरील कथासुद्धा प्रौढ प्रेम, शारीरिक आसक्ती न ठेवता जीवन जगण्याचा एक सुंदर मार्ग म्हणजे प्रेम, ह्या उर्मीतून आलेल्या दिसतात.

ग. दि. माडगूळकरांच्या कथेचे निवेदन पसरल्यासारखे वाटते, तरी ते कंटाळवाणे मात्र वाटत नाही. 'लपलेला ओघ' (१९५२) व 'कृष्णाची करंगळी'(१९६२) ह्या दोन कथासंग्रहांमधून हे जाणवते. 'लपलेला ओघ'(१९५२) मधील 'मावशी परत आल्या' व 'वीज' ह्या दोन कथा ह्यादृष्टीने पाहता येतील. गदिमांच्या बऱ्याचशा कथांना आत्मनिवेदनाचा पदर असल्याचे जाणवते. त्याचबरोबर त्यांना भक्कम कथानकाची जोड आहे. माडगूळकरांच्या 'कृष्णाची करंगळी' (१९६२) ह्या संग्रहात नवकथेचा आणि ग्रामीण कथेचा साचा टाळून, किंबहुना त्याला विरोध म्हणूनच की काय, भक्कम कथानक असलेल्या व जुन्या शैलीत सांगितलेल्या निवेदनात्मक कथा आहेत, हे इंदुमती शेवडे ह्यांचे मत अर्थपूर्ण वाटते.[२] 'घर आपलंच आहे' (बोलका शंख) ही कथा पुष्कळ अैसपैस आहे, पण ती निवेदनशैलीमुळे रोचक झालेली आहे.

ग. दि. माडगूळकरांच्या निवेदनाचे आणखी एक वैशिष्ट्य सांगता येईल. ते म्हणजे त्याला एक प्रवाहीपण आहे. ह्याबाबत वामनराव चोरघडे म्हणतात, ''कित्येकदा असे वाटते की, गदिमा लेखणीऐवजी कुंचला वापरतात व चित्र काढतात. टिपण साधण्याची किंवा शोधण्याची हातोटी इतकी मातबर की कॅमेरा घ्यावा व नुसती कळ दाबली की चित्र तयार ! ही

सिद्धी गदिमांना लाभली आहे."[३] ह्यावरुन त्यांच्या चित्रपटकथांचा परिणाम लघुकथेच्या निवेदनावर होत असल्याचे जाणवते. तसेच कथेची बांधणीही घट्ट होत नसल्याचे जाणवते.

गदिमांच्या पुष्कळ कथांचा प्रारंभ प्रथम पुरुषी एकवचनाने होतो. त्यातूनच ते आपल्या पूर्वजीवनाचा धागा गुंफताना दिसतात. ह्यावर गदिमा स्वतः म्हणतात, "धनलाभासाठी काय काय म्हणून सोडायचे! विसंगत दिसणाऱ्या वस्तुंची अेकसंघता मुकाट्याने का मान्य करायची? तेल व पाणी अगदी एकरुप झाले असल्याचा निर्वाळा कशासाठी द्यायचा? किंमत येते म्हणून काय काय विकायचे!"[४] त्यामुळे कथा लिहिताना त्यांचा स्वतःचा स्वभावधर्म अुदात्त असल्याचे जाणवते.

ग. दि. माडगूळकर ह्यांच्या कथेत बिरोबाचे देऊळ, फोंडा माळ, ऊन हे तपशील येतात. माणदेशातील माडगूळच्या संस्काराचा हा परिपाक असावा. सुरुवातीची माडगूळकरांची कथा मात्र फडके तंत्राची वाटते. वाचकांना सहज आकर्षित करील, अशी त्यांच्या कथांची सुरुवात असते.'लपलेला ओघ' (१९५२) ह्या कथासंग्रहातील 'वीज' ह्या कथेची सुरुवात पहा: "आमच्या गावाचा तात्या गुरव मुलखाचा पिसारी. एवढ्यातेवढ्याने ताबडतोब चिडायचा आणि जानवे तोडून लिंबाजीबुवा व्हायचा. तिरसट माणसाला 'तात्या गुरव' म्हणायची पद्धत अजूनही आमच्या गावात आहे. तात्याला मरुन बरीच वर्षे झाली, पण गावात त्याचे नाव राहिले आहे." (पृ. ५२)

माडगूळकरांच्या कथेत विविध प्रकाराची माणसे येतात. त्यांची ठेवण, त्यांचा वावर, त्यांची लकब, त्यांचे वर्तन हे सर्व सूक्ष्मपणाने गदिमा टिपतात. ह्या माणसांचा कथेतील प्रवेश सहजपणे झालेला असतो. 'भाताचे फूल' (इ.स. १९७१) ह्या कथासंग्रहातील 'भाताचे फूल' ह्या कथेतील पुढील उतारा पहा: "माझे लग्न होऊन दोन वर्षे झाली आहेत. मी एका छकुल्याचा बाप झालो आहे. मध्या गेल्या मार्गशीर्षातच पिवळा झाला. त्याची सुशिक्षित पत्नी त्याच्या आईबरोबर रानात जाते. कामकरी बायकांच्या बरोबरीने काम करते. मध्याच्या आईने मंजूवैनीला अद्याप रानात जायला बंदी केलेली नाही. त्याअर्थी त्याला पितृत्व यायला अजून अवकाश आहे." (पृ.३)

माडगूळकरांच्या कथेतील भावनात्मक संघर्ष अनेक वेळा उदात्ततेत पर्यवसित होतो. 'निर्वाण' (बोलका शंख, १९६०),'सजा' (बांधावरच्या बाभळी, १९६३), 'कृष्णाची करंगळी' (कृष्णाची करंगळी, १९६२ ) ह्या कथामध्ये असा संघर्ष आहे. 'औषधि'

(बांधावरच्या बाभळी, १९६३) ह्या कथेतील शामराव शिर्केला त्याच्या बायकोने पाठविलेले औषध 'वीष देखील असेल' असे ठेवलेली बाई शामरावांना म्हणते, तेव्हा वाचकांची अपेक्षा नाट्याची असते. तेथे शामराव निमूटपणे आपल्या घरी येतो, असे दाखविलेले आहे. ज्याठिकाणी नाट्य उभा करता येण्याची व संघर्ष होण्याची शक्यता आहे, तिथेच कथा नेमकी संपते, ह्याचे कारण उघड आहे. माडगूळकर आपल्या कथेतील संघर्ष हा माणदेशी वातावरणाचे संस्कार मनावर असल्यामुळे विकसित करु शकत नाहीत.

### ४.३.१. माणदेशाचे भौगोलिक चित्रण :

ग. दि. माडगूळकरांच्या जीवनावर व व्यक्तिमत्त्वावर माडगूळच्या प्रदेशाचा मोठा प्रभाव असलेला दिसतो. 'मोहोरलेला कडुनिंब' ह्या कथेत ते स्वत: म्हणतात, "माझं खेडेगाव, ह्या खेड्यातील चालीरीती, तिथलं वातावरण,तिथला झाड-झाडोरा, माती-पाषण असेच माझ्या स्मरणात टिकून राहिले आहेत."[५]

गदिमांच्या 'लपलेला ओघ' (१९५२) ह्या कथासंग्रहातील 'मुकेप्रेम' ह्या पहिल्या कथेतच प्रदेशाचे दर्शन कथेच्या सुरुवातीला पुढीप्रमाणे : "दिवसाचा देव अगदी माथ्यावर आला होता. कृष्णेच्या विस्तीर्ण पात्रातील वाळू तापून रणरण करीत होती. गावाकडील बाजूच्या गुडघाभर धारेलादेखील कढ आला होता." (पृ. १) (कथेतील कृष्णा, पण प्रत्यक्ष डोळ्यांपुढील माणगंगाच !)

माडगूळकरांच्या कथेत येणारा माळ त्यांच्या गावचा खंडोबाचा माळ असतो. नेपताड, लिंब, बाभूळ, फोफाटा हे सारे अभावानेच दिसणारे वैभव गदिमांच्या माडगूळ परिसरातील आहे. त्यांची कथा गावापासून ते थेट मुंबईपर्यंत प्रवास करताना दिसते. परंतु कथेचे बीज मात्र खास माणदेशी असल्याचे पदोपदी जाणवते. त्यातून त्या प्रदेशाच्या प्रभावाने कथेला व्यापलेले दिसते, रणरणत्या उन्हाचे दर्शन, पडकी देवळे, फोफाटा, दारिद्र्याने गांजलेली माणसे ही प्रादेशिक वैशिष्ट्ये खास माणदेशातील आहेत. त्यांच्या 'वीज' ह्या कथेतील पुढील वर्णन पहा:

"दुपार नुसती जळत होती. खंडोबाच्या माळावरच्या चिमखड्यांच्या फुलून लाह्या होतील इतके ऊन तावत होते. नेप्ती-बोराड्यांच्या फांद्या चित्रासारख्या स्तब्ध होत्या. बघताच डोळ्याला अंधारी येऊन उन्हात चित्रविचित्र रंगांच्या उलट्यापालट्या रेघोट्या सरपटत होत्या.

सारा माळ निर्मनुष्य, भकास होता. खंडोबाच्या देवळाच्या पडक्या भिंतीला टीचभर सावलीत देवाचा रेडा अंग दाटून बसला होता - बाकी सारा शुकशुकाट.'' (पृ. ५३)

अशाप्रकारे गदिमांच्या कथेत माणदेशातील देवळे, महारवाडा, माळरान, तक्क्या (अस्पृश्य समाजाची एकत्रित बसण्याची जागा), बाभळी, बोरी, बाजार, रिकामे ओढे, नदीची कोरडी पात्रे ही सर्व प्रादेशिक वैशिष्ट्य येतात. 'बामणाचा पत्रा' ह्या आत्मपर निबंधातून गदिमांनी आपल्या निर्मितीच्या प्रेरणा स्पष्ट केल्या आहेत. माडगूळकरांच्या १९६३ नंतरच्या कथालेखनात सूक्ष्मता आल्याचे जाणवते. प्रदेशाचे चित्रण ते प्रत्ययकारी करताना दिसतात. त्यांच्या 'मोहोरलेला कडुनिंब' ह्या कथेतील पुढील वर्णन पहा: ''एके साली गावात अवर्षण झाले. दिवसाचा देव धारेवर पोचला. पाटावरच्या जुनाट लिंबाने आपले शेंडे लाल रंगात रंगवून घेतले. दुपार नुसती जळत होती. खंडोबाच्या शिखरामागून दिवस कासराभर तो गाव मारूतीच्या देवळापुढे आला. दूर दीपमाळेच्या कट्ट्यावर त्यांची काही खलबते चालली होती; कुस्त्याचे खेळ, वाघ्या-मुरळ्यांचे नाच, तंबूतला सिनेमा, कनातीआडच्या गोऱ्यापान लावण्या, जमिनीच्या भेगा, माथ्यावर आभाळ जळणारे, वैशाखी दुपार, गावदरीचा जिराईत तुकडा आवंदा राजागत पिकला होता.'' (पृ. १) हे सर्व मनोहारी वर्णन माडगूळचा परिसर समोर उभे करते. माडगूळकर आपल्या आत्मपर लेखात हे मान्य करताना म्हणतात, ''माझा पिंड जसा माझ्या गावच्या वातावरणानं घडला आहे. तसेच माझे लेखन माझ्या गावच्या संस्कारानं मढलेलं आहे.''[६]

ग. दि. माडगूळकरांचे 'माडगुळे' हे गाव दुष्काळी आहे. त्याठिकाणी असलेले दारिद्र्य स्वत: माडगूळकरांनी अनुभवले आहे. त्यामुळे तेथील संस्कार त्यांच्यावर झालेले दिसतात. तेथील माणसे, त्यांची गरिबी, निसर्ग, डोंगर त्यांच्या कथेत येतात. माडगूळकर आपल्या गावाकडे सतत जायचे. गावाविषयी त्यांना आकर्षण होते. रात्रीच्या वेळी अनेक गावकरी त्यांना वस्तीवर येऊन भेटायचे. त्यातूनच कथेची बीजे त्यांना मिळालेली दिसतात. म्हणूनच दारिद्र्य, उन्हाळा ही माणदेशाची प्रादेशिक वैशिष्ट्ये त्यांच्या कथेत आलेली दिसतात.

### ४.३.२. माणदेशाचे सामाजिक - सांस्कृतिक चित्रण :

ग. दि. माडगूळकर ह्यांनी स्वातंत्र्योत्तर सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन घडविणाऱ्या माणदेशी कथाही लिहिल्या आहेत. 'बोलका शंख' (१९६०) ह्या कथासंग्रहातील 'निर्वाण' ह्या कथेत बावऱ्या नावाचा महार माणूस जातीभेद संपविण्याचा प्रयत्न करतो. परंतु माडगूळकरांनी ही कथा तीस वर्षांपूर्वी लिहिली आहे. ज्यावेळी माणदेशात जीतीपातीची बंधने खूपच घट्ट होती. खरे तर ह्यावर १९७७ च्या साहित्य संमेलनावेळी दया पवार ह्यांनी टीका केली होती. ते म्हणतात, "ग. दि. माडगूळकरांची 'निर्वाण' नावाची कथा आहे. महारवाड्यातील एक वारकरी म्हातारा असतो. बाकी इतर मंडळीबरोबर हा काही बौद्ध होत नाही. त्यामुळे बौद्ध मंडळी याचा छळ करतात. तो मरतो, तेव्हा त्याच्या प्रेताला कुणी शिवत नाही. गावातील सवर्ण मंडळी टाळ-मृदुंग लावून त्याची प्रेतयात्रा काढतात. हे चित्र खरेच वस्तुनिष्ठ आहे काय ? दलित मंडळी जिंदगीभर एकमेकांवर काढ्या घालतील, पण तोरणादारी आणि मरणादारी उत्साहाने ओघळतील, हे सत्य आहे. आजही दलितांचा वेगळा मसणवाटा आळंदीसारख्या ठिकाणी आहे. दलित वारकऱ्यांची ही शोकांतिका ! हे सारे आज अखेर असताना असे विकृत चित्रण माडगूळकरांनी का बरे करावे ?"[७]

माणदेशात आजही जातीपातीचे चित्रण ठळकपणे पहावयास मिळते. तसेच सवर्ण जातीतील लोकांना खालच्या जातीतील लोकांनी मान दिला पाहिजे, ही संस्कृती तेथे असल्याचे प्रत्ययास येते. त्यांच्या 'कृष्णाची करंगळी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'कृष्णाची करंगळी' ह्या कथेत माडगूळकरांना त्यांची आई एक गोष्ट सांगते, ती पुढीलप्रमाणे : "तुमचे पणजोबा होते कृष्णराव तात्या म्हणून. कुलकर्णीच होता माणूस. काही कोणी राजा-प्रधान नव्हता. सारा गाव भ्यायचा त्याला. गांवचे रामोशी आणि मांग अगदी अट्टल अवलादीचे - तात्यांच्या तोंडातल्या तोंडात पुटपुटण्यापुढे देखील त्यांची नांगी भुईसपाट व्हावयाची. अति करडा माणूस. त्याची चावडीवर जायची वेळ आली की, बायका जागच्या जागी थांबायच्या. पदराचा फलकारा घेत बाई समोरुन गेलेली त्यांना आवडायची नाही. देवाच्या पाया पडतात तसे लोक अनवाणी होऊन त्यांना मुजरा करायचे. आपलं संस्थान ब्राह्मणी होतं." (पृ. ६)

ह्यावरुन माणदेशातील समाजाच्या संस्कृतीचा वेगळा प्रत्यय आपणाला येतो. माणदेशात ब्राह्मणाला देवाइतके महत्त्वाचे स्थान दिले जाते. तसेच ब्राह्मण हा इतरांपेक्षा हुशार असतो, त्यांना मानाचे स्थान दिले पाहिजे, ही रुढी ह्या माणदेशी चित्रणातून व्यक्त होते.

माणदेशातील प्रत्येकवर्षी पडणारा दुष्काळ हा तेथील लोकांच्या अंगवळणी पडलेला दिसतो. दुष्काळामुळे प्रत्येक गावातील सत्ताकेंद्रे श्रीमंत व जमीनदारांच्या हातात गेलेली दिसतात. गोरगरिबांना दररोजची भाजीभाकरी गावातील श्रीमंताचा आश्रित म्हणूनच काम करुन मिळवावी लागते. त्यामुळे मालक जे काही सांगेल, ते खरे, अशीच भूमिका त्यांना घ्यावी लागते. 'बांधावरच्या बाभळी' (१९६३) ह्या कथासंग्रहातील 'बांधावरच्या बाभळी' ह्या माणदेशी कथेत देशमुख आणि गावातीलच रामा ह्यांच्यातील शेतीचा प्रसंग पुढीलप्रमाणे येतो,

नाना, मोजणीदार, रामा आखणीचे काम उरकून बांध उतरतात, तोच दोन रामोशांची पोरे गांवाकडून आली . त्यांनी ते नवे शींवधोंडे बघितले. त्यातला एक मोजणीदारापुढे आला आणि नुसते तोंडानेच म्हणाला,

"रामराम मोजणीदारसाहेब !"
मोजणीदाराने हात छाताडापर्यंत उचलला.
"नवी आखणी केली का?," रामोशाने विचारले,
"हो, कां ? ", मोजणीदार म्हणाला.
"नकाशापरमानं ?"
"तू कोण विचारणार?"
"मी पंच आहे गांवचा !"
"हो, नकाशाबरहुकूम केली."
"चुकल्यालं हाय तुमचं!"

त्या गड्याचा आविर्भाव आणि बोलीतला उर्मटपणा लुकड्या मोजणीदाराला सोसवेना झाला: त्याचे त-त-प-प होऊ लागले, तसा दुसरा रामोशी झपाट्याने पुढे आला आणि तिखटजाळ आवाजांत आपल्या जोडीदाराला म्हणाला, "निसतं तोडानं काय इच्चारतोस, ईस्वरा ? टोलं हान की दोन त्या मोजणीदाराला ! तेच्या बानं आखणी केलीती का अशी ? ह्या गांवाचं नांव नव्याने ऐकल्यालं दिसतंय ह्या नरपुड्यानं." (पृ. १३-१४)

ह्यावरुन माणदेशातील गरीब माणूस हा श्रीमंत माणसाच्या हातातील बाहुले असतो, ह्या गोष्टीची प्रचीती येते. तसेच हा संघर्ष सर्वसामान्य पातळीवरील वाटतो. माडगूळकरांनी दारिद्र्य, रुक्ष परिसर, माणसांची लाचारी हे सर्व माडगूळमध्येच अनुभवले आहे. म्हणूनच

त्यांच्या कथेत सतत माणदेशी वर्णने (माणसे, झाडाझडोरा, डोंगर, देऊळ, गरिबी) आलेली दिसतात. शिवाय जीवनातील कठीण कालखंड ज्याठिकाणी जातो, तेथील स्मृती माणसाला सतत ताज्या असतात. अशा पद्धतीने विचार केल्यास माडगूळकरांच्या बऱ्याचशा माणदेशी कथांना आपल्या प्रदेशाने कथाबीज पुरविले आहे, असे दिसते.

माणदेशातील रिवाज, संस्कार, आपल्या जुन्या ठेव्याचा अभिमान ह्यातून माडगूळकरांचा पिंड सनातनी मूल्यांची जोपासना करणारा झालेला दिसतो. त्यामुळेच त्यांच्या माणदेशी कथांमधून सण, उत्सव, यात्रा हेही सांस्कृतिक चित्रण दिसून येते. 'बांधावरच्या बाभळी' (१९६३) ह्या कथासंग्रहामध्ये 'सजा' ह्या कथेत यात्रेतील परंपरा आणि रिवाजांविषयीचे वर्णन पुढीलप्रमाणे येते,

"तुळशीराम पाटलाने परंपरा पाळली. दगडी शिळेला बांधलेल्या भल्या मोठ्या पोलादी साखळदंडाला त्याने हळदीकुंकू वाहिले. फुले वाहिली. सारी जत्रा गरजली, "यळकोट, यळकोट घेऽ खंडेराया ! "

निळू वाघ्यानं त्या लंगराला हात घातला. तो साखळदंड वाघ्याच्या हिसक्याने तुटला, तर गांवावर खंडोबाची कृपा आहे म्हणायचे. नाही तुटला, तर देवाला कौल लावायचा. त्याची भाकणूक करीत रात्र जागवायची. हा कैक पिढ्यांचा रिवाज होता." (पृ. ८५)

ह्यावरुन माणदेशातील ग्रामीण माणसांची उत्सवप्रियता लक्षात येते. यात्रा हे त्याचे प्रतीक आहे. माणदेशातील भजन, सप्ताह, कीर्तन, पोथ्या - पुराणे हे त्यांच्या श्रद्धाळू मनाचीच द्योतक वाटतात. ग्रामीण जीवनातील मांगल्य, पावित्र्य इ. बाबी प्रकट करणे, ही माडगूळकरांची माणदेशी कथालेखनामागील प्रेरणा आहे. 'भाताचे फूल' (१९७१) ह्या कथासंग्रहातील 'भाताचे फूल' ह्या कथेत कांचनच्या पावित्र्याबद्दलचे चित्रण येते, ते असे :

"साऱ्या बायका नाचत होत्या. गात होत्या. टेंभे तेवत होते. सगळ्यांनी आग्रह केला म्हणून कांचन फुगडी खेळायला उभी राहिली. तिच्याबरोबर खेळायला सगळ्यांनाच पाहिजे होतं. जी ती 'मी मी' करायला लागली. तवर एक धटिंगण आभाळातनं पडल्यासारखा आला. कुणीकडून आला कळलं देखील नाही.

'मी खेळतो' म्हणत त्यानं कांचनचा हात धरला. ती साप डसल्यासारखी ओरडली. साऱ्या बायका उठल्या. त्यांनी त्या मेल्याला धरला. लाथाबुक्क्या घातल्या. तुडवला. त्याला

झेंडू फुटला. झाडीत आणखी दोघं चौघं होते, ते पसार झाले. आम्ही त्यांच्या मागं धावणार - एवढ्यांत मधूची बायको म्हणाली - कांचनबाईला झीट आली." (पृ. १८)

ह्यावरुन माडगूळकरांच्या माणदेशी संस्कृतीचे चित्रण समोर येते. माणदेशी खेडेगांवातील माणसांचे वागणे, बोलणे, चालणे, अनुभव घेण्याची पद्धत निश्चित वेगळी असल्याची जाणीव होते.

माणदेशात जातीयतेची सामाजिक स्तराची जाणीवही जागृत असल्याचे दिसते. ग्रामीण भागात प्रत्येक माणूस एकमेकांशी, समाज-घटकांशी निगडित असतो. तरीही तो त्याच्या त्याच्या समाजगटात, जातिगटात बंदिस्त असल्याचे जाणवते. तो माणूस गावपांढरीच्या नियत परिधान बंदिस्त असतो. सामाजिक स्वरुपाच्या नियमांनी, रीतिरिवाजांनी त्याला जखडून टाकलेले असते. त्यातूनच माणदेशात एकमेकांमध्ये परस्पर सहकार्याची, आत्मीयतेची भावना वाढीस लागल्याचे जाणवते. 'सोने आणि माती' (१९७३) ह्या कथासंग्रहातील 'सोने आणि माती' ह्या कथेत येणाऱ्या जातीयतेतून सामाजिक आत्मीयता वाढीस लावणारे वर्णन पुढीलप्रमाणे येते,

"त्या बामनाच्या काकी लइंदी सांगत्यात. वाकोबाच्या माळा पल्याडली पांढरीची माती तेवढी आना चार पाट्या. त्यास्नी भित्ती सारवायच्या हाईत.'

'आयला, उगं कशाला डोक्शीवर घेत असतीस असली फुकटची कामं ?'
'अवो, फुकटचं का म्हन्ता ?'
'मंग काय पैका मोजणार हाय ती मास्तरीन.'
'पैका नसंना, काय तर कोरड्याशाला तर दील. म्या व्ह्य म्हणून सांगटलंय् त्यास्नी....'
'तू अजून गावकी बलुत्याच्याच काळात हाईस बग !-'
'असू द्या. तेवडं काम करा माज्यासाठी." (पृ. २-३)

ह्यावरुन माणदेशातील प्रत्येक माणूस ह्या मायेच्या धाग्याने बांधलेला असतो, ह्याची जाणीव होते.

'निवडक कथा - १' ह्या कथासंग्रहातील 'वीज' ह्या कथेत संस्कृतीचे चित्रण येते. ते पुढीलप्रमाणे : "आजच्या उन्हाच्या माऱ्यात तो नाइलाजाने सापडला होता. पाटलांच्या घरी सत्यनारायण होता, आणि रात्री शंभर पान उठणार होते. तात्या गुरव शेरडी घेऊन बाजाराला

गेला होता. पाटलांची मागणी पुरवण्याचे काम अर्थातच गीता आणि तुक्या यांच्यावर पडले होते.''(पृ. ६२)

ह्यावरुन माणदेशात गुरवाने पाटलांच्या व सर्व सवर्णांच्या घरात कार्यक्रमाच्यावेळी पत्रावळ्या तयार करुन दिल्या पाहिजेत, ही पद्धत रुढ असल्याचे चित्रण येते. अशा स्वरुपाच्या सामाजिक सांस्कृतिक चित्रण करणाऱ्या 'म्हाताऱ्याची काठी', 'सोन पितळ', 'बैरागी कलावंत' (कृष्णाची करंगळी - १९६२), 'तांबडी आजी', 'काशीयात्रा' (बांधावरच्या बाभळी - १९६३), 'धुण्याचा दगड तोचि आहे' (भाताचे फूल - १९७१), 'या कानापासून त्या कानापर्यंत' (सोने आणि माती - १९७३) इ. कथा सांगता येतील.

ग. दि. माडगूळकरांच्या बऱ्याचशा कथांमधून त्यांच्यावर झालेले संस्कार हे व्यक्तिरेखांच्या रुपाने व्यक्त झालेल्या श्रद्धा आणि निष्ठा ह्यांच्यामधून व्यक्त होताना दिसतात. कारण कोणताही साहित्यिक आपल्या समाजाची किंवा प्रदेशाची नाळ सहजासहजी तोडू शकत नाही. गदिमांच्या कथेत प्रामुख्याने जीवनमूल्यांचे दर्शन घडते. कोणत्याही माणसाची जात, धर्म न पाहता त्याला समानतेची वागणूक दिली पाहिजे, हा आपल्या देशात नेहमीच मांडला जाणारा विचार आहे. परंतु शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात हा विचार पाठीमागे राहिलेला दिसतो. दोन तरुण मने जातीच्या बंधनामुळे एकमेकांशी संवाद साधू शकत नाहीत. गदिमांच्या 'मुके प्रेम' मधील रोहिदास हा राधेशी संवाद करु शकत नाही. ''बैस, रोहिदास अगदी शेजारी बैस. प्रेमाच्या राज्यात चांभार, मराठा हा भेद नाही,'' असे राधा स्वप्नातच रोहिदासला सांगते, हा विचार स्वप्नातील असला, तरी खरा सामाजिक समतेचा विचारही असाच मनामध्ये स्वप्नवतच राहणार की काय, असे वाटते.

गदिमांच्या कथेतील व्यक्तिरेखा स्वत: जळताना, झिजताना, मरताना दिसतात. माणदेशी माणसाच्या स्वभावाचे वैशिष्ट्यच ह्यातून प्रकर्षाने जाणवते. 'थोरली पाती' (१९६३) ह्या कथासंग्रहातील 'नागूदेव' ही एकच कथा येथे प्रातिनिधिक स्वरुपात पाहिली , तरी हे लक्षात येते. एक चांगली माणदेशी ग्रामीण कथा म्हणून ह्या कथेकडे पहावे लागते. नागूदेव हा याज्ञिकी करणारा ब्राह्मण आहे. चांगल्या मूल्यांचा आदर करुन नीतीने वागणारा नागूदेव असे त्याचे वर्तन कथेतून दिसते. सुमासारख्या दुसऱ्याच्या मुलीचा तो सांभाळ करतो. ती वयात येताच एका सिंधी डॉक्टराच्या प्रेमपाशात ती अडकते आणि तिला त्या डॉक्टरपासून गर्भ राहतो. त्यात नागूदेव हा कडक शिस्तीचा, धर्माने वागणारा, नीतिनियम पाळणारा असूनही ह्याठिकाणी तो सर्व धर्माचरण बाजूला ठेवतो आणि सुमाची बाजू घेतो. पुढे सुमा एका मुलाला

जन्म देते. नागूदेव पूर्णपणे ह्या सर्व परिस्थितीला शरण जातो. नीतिमत्तेचे अध:पात तो एका विशिष्ट अवस्थेपर्यंत सहन करतो. परंतु ज्यावेळेस सुमाचेच वडील एका मुलाला घेऊन येतात आणि हा मुलगा तिच्याशी लग्न करण्यास तयार आहे, असे सांगतात; तेव्हा नागूदेव भडकतो. समाजाचे अध:पतन पाहून तो म्हणतो,

"वा, रे समाज! सांभाळा तुमचा समाज आणि तुम्ही. आम्ही चाललो, आमच्या सारख्यांना आता जागा नाही इथे." (पृ. १८५)

आणि नागूदेव सरळ वाऱ्यासारखा पळत विठ्ठल - रखुमाईच्या देवळात येतात, देवाला दंडवत घालतात, ते परत उठतच नाहीत. म्हणजेच आपण जपलेल्या श्रद्धा आणि नीतीच्या संकल्पनेला तडा जाताना हे पारंपरिक लोक ते पहात बसण्यापेक्षा मृत्यूला कवटाळताना दिसतात. ह्यावरून माणदेशासारख्या ग्रामीण भागातील चित्र गदिमांनी वास्तवरीतीने उभे केलेले दिसते.

लहानपणापासून चांगले संस्कार, धार्मिक वातावरण, जुन्या परंपरांचा अभिमान, संतचरित्राचे वाचन ह्यातून गदिमांचा पिंड सनातनी मूल्यांची जोपासना करणारा बनलेला दिसतो. त्यांच्या माणदेशी कथेतून हेच लक्षात येते.

"रामदासी झालेला आपला पुत्र एका संन्यासी तरुणीच्या (प्रयागा) सानिध्याने घसरलेला दिसताच काशीयात्रा सोडून राधाबाई परत येतात, ते कायमचे अंथरुण धरतात."[८] आपल्या निष्ठांना धक्का पोहोचताच माडगूळकरांच्या माणदेशी व्यक्तिरेखा मरण स्वीकारतात. अशा अनेक कथा आहेत. 'व्यथा' ('भाताचे फूल - १९७१'), 'कृष्णाची करंगळी' ('कृष्णाची करंगळी'- १९६२), 'औषधि'('बांधावरच्या बाभळी' - १९६३), 'गुरुचरित्राचा ग्रंथ'('सोने आणि माती' - १९७३) इ. कथांमधून पारंपरिक माणदेशी निष्ठांचे वर्चस्व दिसून येते.

### ४.३.३. माणदेशातील व्यक्तिंचे व्यक्तिचित्रण:

गदिमांच्या कथेतील व्यक्ती अफाट, विक्षिप्त व विलक्षण असतात. ह्या व्यक्ती आपल्या लकबींनी, वर्तनाने वाचकांना थक्क करतात. 'म्हाताऱ्याची काठी'('कृष्णाची करंगळी' - १९६२) मध्ये काठीत सोने ठेवून यात्रेला जाणारा व परत येताच ती काठी जळाली, हे ऐकून वेडा होणारा म्हातारा आहे. 'चोळी'('कृष्णाची करंगळी' - १९६२) मधील

मिलर, 'वीज'('लपलेला ओघ - १९५२') मधील तुका, 'वय'('वेग आणि इतर कथा' - १९५७) मधील रामा, 'वेग' ('वेग आणि इतर कथा' - १९५७) मधील शोभा असा अनेक विलक्षण व विक्षिप्त व्यक्ती दाखविता येतील.

गदिमांच्या कथेतील काही व्यक्ती गरज म्हणूनही आल्यासारख्या वाटतात. 'चोळी' कथेतील कॅप्टन मिलर व वडार समाजाची रामव्वा ह्या व्यक्तिरेखा विकसित होत नाहीत. मिलर हा रामव्वाची उघडी छाती बघतो, तीही दाखवते आणि निळ्या डोळ्याच्या मिलरला तिचे वेड लागते. रामव्वा अबोलच आहे. आशयाच्या स्पष्टीकरणासाठीच ह्या व्यक्तीरेखेचा जन्म आहे, असे वाटते. 'धुण्याचा दगड तोचि आहे'('भाताचे फूल'-१९७१) मधील अण्णास्वामी लांब कुठे असतो. त्याने लिहिलेले अभंग सर्वदूर पसरतात. पण मुळात अण्णास्वामी नावापुरताच कथेत असतो.

गदिमांच्या कथेतील व्यक्ती जीवनाकडे सात्त्विकतेने पाहतात. सुष्ट व्यक्तिरेखा जास्त आढळतात. त्यामुळेच त्यांचे वर्तनही संयमी असल्याचे जाणवते. दु:खातून मार्ग काढण्याऱ्या व्यक्तीच कथेत जाणवतात. 'तुपाचा नंदादीप' ('कृष्णाची करंगळी'-१९६२) मध्ये सदू सानेवर अनेक वाईट प्रसंग येतात, तरीही त्यातून तो संयमाने बाहेर पडण्याचा प्रयत्न करताना दिसतो. गदिमांच्या बहुतांशी कथांमधून माणसाचे माणूसपण जाणवते. 'तांबडी आजी' ('बांधावरच्या बाभळी'- १९६३) मधील मायलेकी एकमेकींना बोलतात की, 'आपण एक पुरुष ठेवून घेऊ या !' त्यांच्या कथेत व्यभिचारी स्त्रियाही भेटतात. पुरुष व्यभिचार करताना घरातील स्त्रिया मूकपणाने त्याला साथ देतात, असे दिसते. ह्यादृष्टीने 'सजा', 'औषधि', 'काशीयात्रा' ('बांधावरच्या बाभळी'-१९६३) ह्या कथा पाहण्यासारख्या आहेत. ह्यातून माणदेशाचे चित्र समोर उभे राहते. माणूस परिस्थितीने गंजून गेल्यानंतर लाचारीने जीवन जगतो. कोणताही अन्याय दिसत असताना तो सहन करु लागतो. म्हणजेच गदिमांच्या कथेतील माणूस माणदेशातील परिस्थितीमुळे संयमी व सोशीक झाल्यासारखा वाटतो.

माणदेशात मुळातच दुष्काळ असल्यामुळे आणि पुरुषप्रधान संस्कृतीमुळे पुरुष हाच घराचे नेतृत्व करतो. त्यामुळे स्त्री ही पुरुषाची सावली होऊनच जीवन जगताना दिसते. तिला कसलेही अधिकार नाहीत. फक्त तिने 'चूल आणि मूल' ह्यासाठीच जगायचे, असे दिसते. 'मावशी परत आल्या' ('लपलेला ओघ' - १९५२) ह्या कथेत वात्सल्यरुपात ही स्त्री भेटते. काही कथांमध्ये व्यभिचारी स्त्रीही आढळते. 'नागूदेव' ('थोरली पाती'-१९६३) ह्या कथेतील सुमा ऐन तारुण्यात वाममार्गाला लागते. सुमा तरुण सिंधी डॉक्टरची शिकार बनते, तर 'सद्या

हेकणे' ('लपलेला ओघ' - १९५२ ) मधील पारु सद्या हेकणेवरील प्रेमामुळे नवऱ्याच्या मुस्काटात मारते. कुमारी माता बनलेली सुमा ('नागूदेव) अशी स्त्रीची विविधरुपे गदिमांच्या कथेत पहावयास मिळतात.

माडगूळकरांच्या कथेतील स्त्री ही परंपरेला व चरित्र्याला महत्त्व देणारी आहे. पुरुषांच्या बरोबरीने ती वागताना दिसते. ढोराची चांगी रुपाने देखणी, पण रहिम ह्या विवाहित माणसावर प्रेम करते आणि म्हणते, "चल मुंबअीला, चल धुळ्याला, चल मोर्चापूरला, तुज्या मागची कुत्री मी ! कुठं भागानगरला नेणार असलास तकडं यीन." (पृ. ८७)

अशी ही स्त्री प्रेमाने वेडी होणारी आहे. ती नंतर सर्व गावाचा मार खाते. पण रहिमशी एकनिष्ठ राहते. अशाप्रकारे माणदेशातील स्त्रीचे वेगवेगळे नमुने गदिमांच्या कथेत दिसतात. म्हणजेच कधी व्यभिचारी स्त्री, कधी प्रेमाने वेडी झालेली स्त्री, परंपरेला सांभाळून पतीशी निष्ठा जपणारी स्त्री अशा अनेक स्त्रिया भेटत राहतात. त्यामुळेच माडगूळकरांची कथा अस्वस्थतेच्या पातळीवर जाते व वाचकांना अंतर्मुख करते.

माणसाच्या जीवनात अनेक चांगले - वाईट प्रसंग येतात. माणूस आलेल्या प्रसंगाला धैर्याने तोंड देण्याचा प्रयत्न करतो. परंतु माणसाच्या काही मर्यादा असतात. त्यालाच आपण 'नियती' म्हणतो. माणूस हा नियतीच्या हातातील बाहुले आहे, ह्याचे मनोवेधक चित्रण गदिमांच्या कथेत येते. 'कृष्णाची करंगळी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'माणूस अखेर माणूस आहे' ही कथा नियतीचा खेळ दाखविणारी आहे. कथेची नायिका यमुना एकाक्षणी विसावा घेत असलेल्या साधूच्या मोहात पडते. त्यांचे मीलन होते आणि आपल्या ब्रह्मचर्याचा भंग झाला म्हणून साधू झाडाला फास घेतो. यमुना सर्व हकीगत आपल्या वडिलांना सांगते. वडील अखेर शेवटी 'माणूस अखेर माणूस आहे' असे म्हणतात. म्हणजेच हे सर्व नियतीचे भोग आहेत. 'तुपाचा नंदादीप'('कृष्णाची करंगळी' - १९६२), 'बोगदा'('सोने आणि माती'-१९७३), 'मद्यालयाची वाट'('बोलका शंख'-१९६०), 'अरे दिवा लावा कोणीतरी'('थोरली पाती'-१९६३) ह्या कथा ह्यादृष्टीने पाहण्याजोग्या आहेत.

एकंदरीत, गदिमांच्या कथेतील माणसे परंपरेने चालत आलेल्या आपल्या श्रद्धा, निष्ठा सोडायला तयार नाहीत, असे दिसते. नवीन विचारसरणीनुसार सामाजिक संकेत बदलून त्याठिकाणी नवीन परंपरा निर्माण झाली पाहिजे, असाही विचार त्यांच्या कथेतून व्यक्त होतो.

सर्वांगाने त्यांच्या कथेचा विचार करता, उदात्तता हे त्यांच्या कथेचे एक अंग असल्याचे लक्षात येते.

### ४.३.४. माणदेशाचे आर्थिक चित्रण :

माणदेशातील कृषिजीवनातील सामान्य शेतकऱ्याच्या इच्छा आणि कामकाजाचे चित्रण पाहिले, तर त्यात सण-उत्सवाच्या निमित्ताने होणारी भांडणे , भानगडी, टगेगिरी ह्यापेक्षा दारिद्रयामुळे त्यांच्या जीवनात येणाऱ्या सततच्या दुःखाला कथेतून महत्त्व दिलेले दिसते. गदिमांनी ज्या माणसांची व्यक्तिचित्रे माणदेशी कथेतून रेखाटली आहेत, त्यांच्या जीवनात दारिद्रयाने थैमान घातलेले असते. भूक, सर्व थरावरची उपेक्षा, अगतिकता, दास्य ह्यामुळे व्याकुळ झालेल्या जिवांना आपले पोट भरण्यासाठी वणवण भटकावे लागते. मात्र ही माणसे माणसांवर प्रेम करणारी, जिवाला जीव देणारी, शब्दाला जागणारी आहेत. पैसा प्रत्येकाला हवा असतो. माणदेशी माणसाला तर दरिद्री अवस्थेमुळे पैसा बघायला मिळत नाही. 'सोनं पितळं'('कृष्णाची करंगळी'-१९६२) ह्या कथेत नाना नानीला विचारतो,

" 'किती आले पैशे ?'
'आले मस्त - काय करायचं आहे ?'
'सांगशील तरी.'
दोन हजार !'

नानाच्या कानांना डोळे फुटले दोन हजाराच्या रकमेचा आवाज ऐकण्यासाठी त्याची दिठी अधीर झाली. एखाद्या लहान पोराने धरावा, तसा त्याने बायकोजवळ हट्ट धरला. मला दाखव ते पैशे !" (पृ. १३१)

ह्यावरुन माणदेशात कधीतरी बघायला मिळणारे पैसे माणसाची उत्सुकता वाढवतात. परंतु त्याचबरोबर माणदेशाची परिस्थितीही समोर उभी करतात. अशाप्रकारचे माणदेशाचे आर्थिक चित्रण दिसून येते.

माणदेशातील दुष्काळी परिस्थितीने सर्वसामान्य माणसांना जीवन जगणे अवघड बनलेले दिसते. नित्याच्या दैनंदिन गरजाही भागवण्यासाठी वेळेवर पैसे मिळत नाहीत. 'सोने आणि माती' ('सोने आणि माती', १९७३) ह्या कथेतील दसऱ्या मांग आपल्या बायकोच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करतो व स्वतःच पुढीलप्रमाणे विचार करीत बसतो, "गणपतीच्या

निमित्ताने चार-पाच दिवसांनी त्याला शेजारच्या खेड्याकडे जायचे होते. देवापुढे मुरळी नाचवायची होती. परगावला जायचे, तर पोशाख चांगला पाहिजे. दसरथाजवळ चांगला खमीज नव्हता, पटका नव्हता . वीसेक रुपयांत ह्या दोन्ही वस्तू मिळण्यासारख्या होत्या, पण पैक्याची पार वानवाच होती. पाच पंचकड्यादेखील त्याच्या कनवटीला नव्हत्या. सारजाही 'रिकामी'च होती, गावात यासाठी काही रोजगार मिळत नव्हता. कुणाच्याच रानात बी पडले नव्हते. ज्यांनी अट्टाहासानं पेरले होते, त्यांचे बियाणे धरित्रीनेच गिळून टाकले होते. दसरथाला दुष्काळी काम मिळाले होते. तीन रुपये हजेरी मिळत होती. त्यात काही भागत नव्हते." (पृ. १-२)

ह्यावरुन माणदेशातील आर्थिक चित्रण तीव्रतेने समोर येते. सततच्या ओढाताणीमुळे माणसाच्या दैनंदिन गरजा भागवण्याइतपतसुद्धा आर्थिक व्यवहार सुरळीतपणे पार पडत नाहीत, ह्याची जाणीव ह्या आर्थिक चित्रणातून दिसून येते.

गदिमांच्या माणदेशी कथेत माणूस माणसाला उदात्ततेच्या भावनेतून मदत करताना दिसतो. 'थोरली पाती' (१९६३) ह्या कथासंग्रहातील 'सिनेमातला माणूस' ह्या कथेत काशीनाथ मोहनला पैसे देतो, तो प्रसंग : "गावाकडून भावाने पैशाची मागणी केली. तेव्हा माझ्याकडे पैसे नव्हते. मी खर्च अति करतो. पैशांचा सूड घेतो. शिल्लक टाकण्याइतके भान मला राहत नाही. एके काळी पैशांनी माझा फार छळ केला आहे. मी त्यांची पत्रास ठेवीत नाही. पर्वा करीत नाही. भावाला जमिनीच्या कामासाठी पैसे हवे होते. करणपूर आमच्या गावाला तालुका होता. मी भावाला लिहिले, 'मोहन अभ्यंकरकडे पैसे आहेत ते घे. माझे पत्र दाखव.' भावाने तसे केले; पण मोहनने त्याला काही दाद दिली नाही. पण माझा भाऊ खमंग खेड्यात वाढलेला ब्राह्मण तो. भावाने मोहनच्या दुकानातले कापड-गठ्ठे उचलले आणि घेऊन गेला. पण मोहनही वस्ताद ! त्याने भावावर फौजदारी केली." (पृ. २२९)

ह्यावरुन माणदेशातील आर्थिक परिस्थितीचे विदारक चित्रण दिसून येते. माणदेशातील आर्थिक चित्रण हे वेगवेगळ्या यात्रा, जत्रा ह्यांच्या रुपाने समोर येते. दारिद्र्यामुळे मनात असूनसूद्धा शिक्षण घेता येत नाही.

### ४.३.५. माणदेशाचे आध्यात्मिक धार्मिक चित्रण :

गदिमांच्या माणदेशी कथेतील एकमेकांच्या सहकार्याने जगणारी ही माणसे विलक्षण धार्मिक वृत्तीची आणि परमेश्वरावर श्रद्धा असणारी आहेत. त्याचे मूळ कारण जसे अज्ञान आहे,

तसेच त्यांचे निसर्गावर अवलंबून असणे, हेही आहे. ह्याशिवाय माणदेशातील मंदिरातून साजरे होणारे सप्ताह, भजन, नामसंकीर्तन हेही त्यांच्या श्रद्धाळू मनाचीच पावती आहे. विज्ञानाने कितीही प्रगती केली, तरी माणसाला अजून निसर्गावर मात करता आलेली नाही. म्हणून आजही निसर्गाच्या सानिध्यात असणारे ग्रामजीवन बहुतांशी निसर्गावरच अवलंबून आहे. ऊन, वारा, पाऊस ह्यावर हा माणदेशी ग्रामीण माणूस कालच्या इतकाच आजही विसंबून आहे. ह्यातून आलेली हतबलता, दिशाहीनता माणदेशी ग्रामीण माणसाला पुन्हा परमेश्वराच्या श्रद्धेकडे आणि अंधश्रद्धांकडेही नेत असलेली दिसून येते. त्यामुळे ग्रामीण जीवनातील मांगल्य, पावित्र्य इ. बाबी प्रकट करणे, ही गदिमांच्या माणदेशी ग्रामीण कथालेखनामागील प्रेरणा असल्याचे दिसून येते.

गदिमांच्या कथालेखनातून साकार झालेल्या व्यक्तीचे चित्रणही एका पांढरपेशा मध्यमवर्गीय लेखक मनाने केलेले चित्रण आहे. त्यामुळे त्यातून वास्तवापेक्षा भावुकताच जास्त प्रकट होताना दिसते, 'कृष्णाची करंगळी'(१९६२) ह्या कथासंग्रहातील 'माणूस अखेर माणूस आहे' ह्या कथेत एक विरक्त वारकरी व यमना ह्यांचा संवाद पुढीलप्रमाणे :

"पंधरवड्याची वारी करता ?" यमनाने विचारले.
"नाही. आखाडी, कार्तिकी आणि माही. सालातून तीनंदा."

यमनाच्या मनी आले, त्याला विचारावे, इतक्या तरुणपणी वारी कशासाठी धरली, पण तिने तसे विचारले नाही. वारकऱ्यानेच तिला विचारले.

"मळा आपला वाटतं ?"
"हं"
"हे सावरगाव नाही कां ?"
"हं"
"सासर आपलं ?"
"नाही. माहेर. आबा देशपांड्यांची मी लेक." (पृ. ११६-११७)

ह्यावरुन माणदेशातील आध्यात्मिक चित्रण स्पष्ट होते. माणदेशातील स्त्री ही कणखर मनाची व संयमी असल्याचे दिसते. माणदेशातील भौगोलिक परिस्थितीमुळे स्त्रियाही धार्मिकतेचा छंद जोपासताना दिसतात. 'बांधावरच्या बाभळी' (१९६३) ह्या कथासंग्रहातील 'तांबडी आजी' ही कथा पाहण्यासारखी आहे. त्यात एका साधूचे वर्णन येते, ते असे :

"मारुतीच्या देवळात कुणी सत्पुरुष, उतरले होते. ते नित्य नियमाने ज्ञानेश्वरीवर निरुपण करीत. एकदा एका ओवीवर ते अडले. त्यांचा त्यांनाच अर्थ विषद करुन सांगता येईना. तांबडी आजी पुढे झाली. देवळापुढचे सारे पटांगण माणसांनी फुललेले होते. म्हातारीने त्या साऱ्यांना थक्क करुन टाकले. त्या ओवीचा अर्थ इतक्या सोप्या भाषेत समजावून सांगितला तिने की, त्या सत्पुरुषाने 'माऊली' म्हणून सर्वासमक्ष तिला दंडवत घातला..." (पृ. २१)

ह्यावरुन माणदेशातील स्त्रियाही धार्मिकतेच्या बाबतीत पुरुषांच्या बरोबरीने अध्यात्माची जोपासना करताना दिसतात. तरीही स्त्री आणि पुरुष अध्यात्माच्या नावाखाली एकत्र आली, तरी निसर्गनिर्मित भावना सर्वांनाच वश करते, ह्याचेही माणदेशी चित्रण 'बांधावरच्या बाभळी' (१९६३) ह्या कथासंग्रहातील 'काशीयात्रा' ह्या कथेत आलेले दिसते. दिगंबराबरोबर प्रयागा काशीयात्रेला जाण्याचा मनोदय राधाबाईजवळ व्यक्त करते. त्यावेळचा संवाद पुढीलप्रमाणे...

"स्वामींना?", उल्हासित होऊन प्रयागाने प्रश्न केला.

आपल्या दिगंबरचा उल्लेख "स्वामी" म्हणून झाल्याचे ऐकून राधाबाई उगीचच बावरल्या. कसल्यातरी अभिमानाने तो बावरेपणा हिरीरीने बाजूला सारला. अभिमानी, पण करुण स्वरांत त्यांनी निःशब्द वचन देऊन टाकले :
"हं -"

प्रयागाने तारांकित आभाळाला हात जोडले. डोळे मिटले . भावपूर्ण आवाजांत ती म्हणाली - "त्या सत्पुरुषाच्या बरोबर काशीयात्रा घडली म्हणजे कुडीचं सार्थक झालं. काशीविश्वेश्वरानं करावं एवढं !"
"फार उशीरा सांगितलंस -"
"त्यात काय ! एक दिवसांत तयारी होईल. तुम्ही विचारलंत, तर नाही म्हणणारच नाहीत स्वामी -" (पृ.१३१)

ह्यावरुन स्त्रीच्या मनातील भावना वयाबरोबर कशा बाहेर पडतात, ह्याचे वास्तव चित्रण दिसते. त्यानंतर वाण्याची विधवा प्रयागा प्रत्यक्ष यात्रेला निघते, तेव्हाचे माणदेशी चित्रण पुढीलप्रमाणे :

"सारे गांवकरी वाड्यापुढे जमा झाले होते. सारे आप्तस्वकीय अंगणांत गोळा झाले होते. शिष्यांनी रामरायाची पालखी उचलली होती. अयोध्यानाथाच्या नावाचा जयजयकार

चालविला होता. रामनामाच्या गाड्या चालू झाल्या. दिगंबर स्वामींनी पाऊल उचलले. सत्पुरुषाची धन्य माता होऊन राधाबाई ही काशीयात्रेला निघाल्या. चारी धामे आटोपून त्या तीन महिन्यानंतर परत येणार होत्या. भावकीतल्या वडिलधाऱ्यांच्या पायांची धूळ त्यांनी कपाळावर घेतली. काशिनाथपंतांना लवून नमस्कार केला. डोळे मुळीच न ओलावता हंसऱ्या मुद्रेने त्यांनी सर्वांचा निरोप घेतला.'' (पृ. १३२)

ह्यावरुन माणदेशात पाळल्या जाणाऱ्या रुढी, संकेत ह्यांचे सविस्तर चित्रण दिसून येते. अशाप्रकारच्या 'शेवटचा दिस गोड व्हावा'('वेग आणि इतर कथा'-१९५७), 'म्हाताऱ्याची काठी'('कृष्णाची करंगळी'-१९६२), 'मावशी परत आल्या'('लपलेला ओघ'-१९५२), 'नागूदेव'('बोलका शंख'-१९६०), 'चंदनी उदबत्ती'('चंदनी उदबत्ती'-१९६७), 'ह्या कथा माणदेशाचे आध्यात्मिक व धार्मिक चित्रण करणाऱ्या म्हणून सांगता येतील.

### ४.३.६. माणदेशी भाषिक चित्रण :

भाषिक दृष्टीने विचार केल्यास महाराष्ट्रातील माणदेशी समाज एक आगळावेगळा घटक आहे. ग्रामीण कथेच्याच नव्हे, तर ग्रामीण वाङ्मयाच्या आविष्कारात भाषेला अतिशय महत्त्वाचे स्थान असते. भाषा हा सामुहिक आविष्कार असल्यामुळे तेथील परिसर, त्या परिसरातील देवदेवता, संस्कृती, त्या प्रदेशातील वेगवेगळे वाक्प्रचार, म्हणी ह्याचा समावेश होतो. ह्या संदर्भात डॉ. आनंद यादव म्हणतात, ''साहित्य - कलेशी निगडीत असलेले भाषा हे माध्यम मोठे वैशिष्ट्यपूर्ण आहे. ही वैशिष्ट्यपूर्णता ती भाषा ज्या समाजात बोलली जाते, ज्या संस्कृतीचा तिला सततचा संदर्भ असतो. ज्या स्त्री - पुरुषांच्या वापरात ती नेहमी असते, त्या सर्वांचे सत्त्व तिला लाभलेले असते. साहित्यिक कलावंत जेव्हा तिला वापरु लागतो, तेव्हा कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाचा संस्कार होतोच; पण तीही आपले हे सत्त्व आणि व्यक्तित्व सोडायला तयार नसते.''[९]

गदिमांच्या ग्रामीण माणदेशी कथेत वास्तवता निर्माण करण्यासाठी भाषा आणि शैलीमध्ये बदल घडवलेला दिसतो. त्यांच्या ''कृष्णाची करंगळी'' (१९६२) ह्या कथासंग्रहातील ''रामा बालिष्टर'' ह्या कथेत भाषाशैलीतील बदल तपासून बघता येईल.

''काय झालंय् हो नाकाला ?'' मी न राहून विचारले.

तो पाव्हणा बोलला, 'जखम झालीय् नाकाला'. त्याचा आवाज घोगरा होता.

'कशानं?' - मी.

'शेवऱ्या छाटत होतो बैलासाठी. ते खसकन् नाकावरच आला इळा.' - पाव्हणा.
'अरेरे, डॉक्टरकडं तरी जायचं तालुक्याच्या !'
'एळ कुटं गांवतोय, मालक ? पोटासाठी कष्ट उपसावं लागत्यात बारा तास. खपली धरली हुती, ती काय की लागून पुन: झडली. आपुन आल्याचं कळलं म्हणून आल्तो. गेल्या साली बी गांठ घेनं जमलं नव्हतं. आज आवर्जून आलो.'
'ते ठीक केलंत. पण कसली तरी पट्टी लावा नाकावर. नुसत्या धुळीनं - देखील चिडेल ती जखम. सेप्टि-बिप्टिक झालं, तर पंचायत होईल. उद्या जा डॉक्टरकडे. मी चिठ्ठी देईन हवीतर.'
'जी,' त्या पाव्हण्याने परत आपले तोंड झाकले आणि तो उठून उभा राहिला.
'मग येतो. रामराम. जुदळा काडाला जायाचं हाय उद्यां पाटेचं.' (पृ. २०-२१)

ह्या परिच्छेदात पाहुण्याला सल्ला देताना तो त्याच्याच ग्रामीण ढंगात दिलेला दिसतो: 'खसकन् नाकावरच', 'इळा', 'काडाला जायाचं' ह्या शब्दांनी भाषेचे ग्रामीणत्वाकडे झुकणे लक्षात येते.

गदिमांनी ग्रामीण बोली वापरावयाची म्हणून वापरलेली नाही, तर साहित्यकृतीच्या निर्मितीला आवश्यक तेथे, आवश्यक तितकाच तिचा वापर केलेला दिसतो. त्यांच्या 'बांधावरच्या बाभळी' (१९६३) ह्या कथासंग्रहातील 'दृष्टि' ह्या कथेतील एक शेतकरी स्त्री आपल्या नवऱ्याला म्हणते,

"कारभारी ह्यऽऽऽ"
"काय गं ? त्याने तितक्याच मोठ्यांदा आवाज दिला. किनऱ्या आवाजांत कारभारीण दुरुनच बोलली, भावाकडं जाया होवं."
"कशाला ?"
"प्वार म्हागारी आल्यालं न्हाई....!"
"साळंतनं?"
"न्हवंऽ?"
"मंग ?"
"शिकारीला गेलंय् गावांतल्या पोरासंगती. लोटंवाडीच्या कुरनांत !"
"जाईन हऽ ह मगच्यानंऽ "
"तेच म्हनलं. गांवात वाजाय लागलंय्, शिकार आली जनू. त्ये ततंच बसंल. रातचं वस्तीकडं याला भ्या वाटतं तेला !" (पृ. ३३)

ह्यावरून माणदेशातील इतर भाषेपेक्षा खास वेगळी अशी स्वर लांबवून बोलण्याची पद्धती आणि नवऱ्याला नाव न घेता 'कारभारी' म्हणण्याची जुनी ग्रामीण संस्कृती वेगळी असल्याचे दिसून येते.

गदिमा निवेदनासाठी जी भाषा वापरतात, ती ग्रामीण भाषेचेच एक प्रमाण भाषेत तयार झालेले रुप दिसून येते. 'बांधावरच्या बाभळी' (१९६३) ह्या कथासंग्रहात 'बांधावरच्या बाभळी' ह्या कथेत गावांतील पाटील शेतीचा वाद मिटविण्यासाठी आलेल्या कमिशनला बोलतात,

"ऐसपैस मान डोलावीत पाटील बोलले, "हातच्या कांकनाला ऐना कशाला ? पडल्यात फाटं हे खरंच हाईत की ! "
"हे देशमुखाच्या गड्यांनी तोडले, खरं की नाही ?"
"तोडलं म्हंजे तोडावंच लागल्यात," पाटील म्हणाला.
"म्हणजे ?" कमिशनवाला तिरसटला.
"म्हंजे असं ! कावू नगा साएब. मी आपनास्नी इच्चारतो, आपुन ही कापडं घालतां, हे कवा काडतां कां न्हाई ?"
"म्हणजे काय? रात्रंदिवस काय कपडे अंगावर ठेवतं कुणी ?"
"हंग असं ! ठेवलं, तर काय हुईल?"
"घाणेरडे होतील. दुर्गंधी सुटेल त्यांची !"
"भले. तसंच हाय झाडांचं बी. मानसाच्या अंगावरचा कपडा, तसाच झाडाच्या अंगावर ह्यो झाडपाला ; त्यो उतरावा लागतो. त्यांत गुन्ना न्हाई." (पृ. १२)

गदिमांनी बऱ्याचशा कथांमध्ये नागर आणि ग्रामीण अशी दोन प्रकारची भाषा वापरलेली दिसते. त्यांची भाषा प्रसादपूर्ण आहे. ती माणसाच्या मनाला आपल्या ललित्याने बांधून ठेवणारी आहे. मं. वि. राजाध्यक्ष गदिमांच्या भाषेबद्दल म्हणतात, "गेल्या पिढीचे अर्ध्याहून अधिक साहित्य शैलीने गारद केले आहे, हे ध्यानात घेता माडगूळकरांसारख्या नव्या लेखकाची साहित्याला वाचविण्याची ही धडपड पाहून आनंद वाटतो."[१०]

गदिमांच्या कथेतील उपमा, रुपके, प्रतिमा माणदेशी असल्याचे स्पष्टपणे जाणवते. ह्या संदर्भातील काही निरीक्षणे अशी :

- "वणव्यातून वाचलेले पाखरु पुन्हा आपल्या घरटयाच्या दिशेने उडाले." ('औषधि', 'बांधावरच्या बाभळी' - पृ. १११ )
- "दिवसाचे फळ आभाळाच्या देठापासून तुटले." ('माणूस अखेर माणूस आहे', 'थोरली पाती' - पृ. ६ )
- "डोक्यात जाळ घेऊनच तो धुमकेतूसारखा फिरत राहिला." ('बोलका शंख', 'निवडक कथा - २' - पृ. ५१ )
- "दोन वर्षात माझा संसार गुलमोहराच्या झाडासारखा बहराला आला." ('सिनेमातला माणूस', 'थोरली पाती' - पृ. २२४ )
- "ती ओली नागीण आपली हिरवीगार झाडी परड्याच्या कुपावर वाळत घालत होती." ('वीज', 'थोरली पाती' - पृ. ५७ )

माडगुळे परिसरातील कितीतरी उपमाने त्यांनी सहज वापरलेली दिसतात. ते सर्व त्यांना त्यांच्या जन्मभूमीने मुक्त हस्ताने दिल्यासारखे वाटते. 'एखादा पेटलेला काजवा अंधारातून द्रूतगतीने जावा, तसा तुकाराम जात होता' ('वीज' पृ. ६०) येथे तुकारामला 'काजवा' म्हटलेले आहे आणि 'पेटलेला' ह्या शब्दातून त्याची कामवासना जागृत झालेली आहे, हे यथार्थपणे व्यक्त केलेले आहे. मुळचे कवी असलेल्या माडगूळकरांची शैली थोड्या ठिकाणी काव्यात्म बनल्याचे दिसते. 'माणूस अखेर माणूस आहे' ह्या कथेत यमनाचे वैधव्य, एकटेपणा व्यक्त करताना शैली काव्यात्म बनल्याचे दिसते. पहा : वारकऱ्याची विरक्ती डळमळल्यासारखी झाली. संधिप्रकाश विरळ होत गेला. अंधाराचे धागे भराभर एकमेकांत गुंतू लागले. (पृ. ६) ह्याठिकाणी गदिमा वारकरी आणि यमना यांचे पतन पुढील शब्दांनी व्यक्त करतात : 'अनिच्छेने, असहायपणे, त्या काळ्या वावरात एक काळीकुट्ट घटना घडून गेली. विरक्तीचा अध:पात झाला - सतीत्व विटाळले.'[११] यात सूचकता, संयम असल्याचे जाणवते. म्हणजेच भाषेची परिपक्वता ह्याठिकाणी जाणवते. माडगूळकरांच्या ह्या भाषासामर्थ्याबद्दल पु. भा. भावे म्हणतात, "हत्तीची झूल हत्तीला शोभेल अशीच लागते. जिवंत भावना व्यक्त करण्यासाठी जातिवंत शब्द लागतात. हे शब्द - भांडार माडगूळकरांपाशी चांगले समृद्ध आहे. शब्दाच्या मंत्राने माडगूळकरांनी एरवीचा रूक्ष माणदेशही पाहता-पाहता जिवंत केला आहे."[१२]

माडगूळकरांची शैली ही खास त्यांचीच आहे. मायभूमीतील पूर्व-संस्कारांनी त्यांची शैली विकसित झालेली दिसते. तिच्यावर कोणाचाही प्रभाव जाणवत नाही. ह्याविषयी मं. वि.

राजाध्यक्ष म्हणतात, "एच्. ई. बेटस् काय म्हणतो हे ठाऊक नसल्यामुळे माडगूळकरांच्या लघुकथा शंभर टक्के माडगूळकरी झाल्या आहेत."[१३]

## ४.३.७. गदिमांच्या माणदेशी कथेचे सामर्थ्य आणि मर्यादा :

माडगूळकरांच्या कथेला उदात्तता हा गुण मूल्यात्मक उंचीवर घेऊन जातो. तोच गुण त्यांना कथाकार म्हणून मान्यता देतो. मात्र ह्याच उदात्ततेच्या अतिहव्यासामुळे त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा निर्जीव झाल्यासारख्या वाटतात. त्यांच्या कथेची बीजे चांगली असूनही उदात्ततेमुळे त्यांच्या कथेची हानी झालेली आहे, असे वाटते. अनेक समीक्षकांनी माडगूळकरांच्या ज्या कथांचा उल्लेख केलेला आहे, त्यात 'माणूस अखेर माणूस आहे' ('कृष्णाची करंगळी' १९६२) ही कथा पाहण्यासारखी आहे. ह्या कथेतील आबा देशमुख हे सावरगावच्या काटवनाचे मालक आहेत. यमना ही त्यांची तरुण मुलगी विधवा आहे. एक दिवस यमना काटवनात एकटीच असताना तिला काटवनात वडाच्या झाडाखाली बसलेला पंढरपूरला जाणारा एक तरुण वारकरी दिसतो. डोळ्यांची भाषा डोळ्याला कळते. प्राथमिक गप्पागोष्टीनंतर गदिमांनी मोठ्या सूचकतेने त्यांचे मिलन सूचित केले आहे. पण त्यांच्या मानवी वृत्तीचे काय ? ही दोन मने क्षणार्धात एक कशी होऊ शकतात? तसेच, यमना घरी आल्यानंतर घडलेला सर्व प्रसंग आपल्या वडिलांना सांगते. त्यावेळेस स्त्रीसुलभ संकोचाचे काय? हे सर्व माणदेशासारख्या ग्रामीण भागात अशक्य वाटते. तसेच आबा देशपांडे ह्यांच्यासारखा रागीट माणूस हे सर्व लगेच मान्य करतो आणि म्हणतो, "घडलं ते अनपेक्षित घडलं. पण ते अपरिहार्य होतं. दोष कुणाचाच नाही" (पृ.६) एका बापाची स्वतःच्या मुलीबद्दल अशी भूमिका राहील काय ? त्यामुळेच गदिमांनी माणसाला उदात्त दाखविण्याच्या हव्यासापोटी चांगल्या कथाबीजाचे कलम केल्यासारखे वाटते. हीच त्यांच्या कथेची मर्यादा आहे, असे म्हणावे लागेल. उदात्ततेसाठी माडगूळकर माणसाची वाढ कथेत स्वाभाविकपणे होऊ देत नाहीत, असे वाटते. गदिमांनी चांगल्या प्रकारचे कथाबीज वाया घालविले, असेच म्हणावे लागेल. ह्याविषयी पु. भा. भावे ह्यांनीही खंत व्यक्त केलेली आहे. ते म्हणतात, "माडगूळकरांचे प्रमाण चुकते आहे, तंत्र चुकते आहे, म्हणून परिणामही चुकतो आहे, चांगले कथाबीज वाया जाते आहे, असे मला वाटत होते."[१४] ह्यातील प्रमाण म्हणजे उदात्ततेपोटी माणसाचे सच्चे दर्शन घडवण्यात ते कमी पडतात, हीही त्यांच्या कथेची मर्यादाच म्हणावी लागेल. हा सर्व माणदेशाचा सांस्कृतिक परिणाम म्हणावा लागेल.

ग. दि. माडगूळकर हे नवकथेच्या कालखंडात कथालेखन करीत होते. ते चमत्कृतिप्रधान, आत्मवृत्तपर, व्यक्तिचित्रप्रधान कथा लिहित होते. त्यांची कथा स्पष्टीकरण जास्त देते. त्यामुळे ते कथेपेक्षा 'गोष्ट' सांगत आहेत, असे वाटते. ह्या संदर्भात 'कहाणी गट्टसोंड्याची' ('निवडक कथा-२' १९८०), 'औषधि '('बांधावरच्या बाभळी'-१९६३), 'भावाला झाल्या लेकी' ('निवडक कथा - २' १९८०) ह्या कथा पाहण्यासारख्या आहेत. ह्यामध्ये गोष्टीरुपता असल्याचे जाणवते. 'अनुत्तरित'('सोने आणि माती'-१९७३) ह्या कथेची पुढील सुरुवात ह्यासंदर्भात पाहण्यासारखी आहे,

"एका वर्षाच्या काळातील गोष्टी आहेत... या. कोरड्या डोळ्यांनी आणि गलबलत्या काळजाने मी प्रत्यक्ष पाहतो आहे. घटनास्थळ देखील दूरचे नाही. खुद्द माझ्या घरात घडल्या आहेत या घटना. हकीगतीला वाङ्मयाचे मोल नसते म्हणतात, तरी मला त्याच्याशी काही कर्तव्य नाही. ऊरी राहणे अशक्य होते, त्याला तोंडावाटे वाट करुन द्यावी लागते." (पृ. ९९)

ह्यावरुन माडगूळकरांच्या कथेची भाषा ही गोष्टीची भाषा आहे, असेच म्हणावे लागते. असे असले , तरी माणदेशाचे चित्रण करणारी कथा म्हणून त्यांच्या कथेची उंची कमी होत नाही, तर ती वाढतच जाते.

गदिमांची कथा नवकथेच्या काळात उदयाला आलेली असली, तरी ह्या कथेने नवकथेचे अनुकरण केलेले नाही. कथेची मांडणी साधी वाटते. वाङ्मयीन जंजाळात न अडकता स्वतंत्रपणे ती लिहिलेली असल्यामुळे तिची उंची वाढल्यासारखी वाटते. स्त्री - पुरुषांचे संबंध रेखाटण्याची माडगूळकरांची धाटणी खासच अनुकरणीय आहे, असे वाटते. ह्याविषयी पु. भा. भावे म्हणतात,"विकृतीची लक्तरे ते कथेतून टांगून ठेवत नाहीत; की सोवळे नेसून शृंगार झाकण्याचाही प्रयत्न करीत नाहीत. पण विकृती ही प्रकृती नाही, याचे त्यांना भान आहे. म्हणूनच माडगूळकरांचा शब्द नितळ, स्वच्छ असतो. पहाटेच्या वेळी डोंगरातून वहात येणाऱ्या निर्झराच्या निवळ शंख पाण्याप्रमाणे माडगूळकरांच्या भाषेचे रुप आहे. इतकी पारदर्शक व स्वच्छ भाषा आज वाचावयास मिळणेही कठीण झाले आहे."[१५]

गदिमांच्या माणदेशाचे चित्रण करणाऱ्या कथेला कोणताही एक शिक्का मारुन तिचे मूल्यमापन करता येणार नाही किंवा तिचे वर्गीकरण करता येणार नाही. प्रत्येक कथेचे नवेपण आणि अभिव्यक्तीभिन्नता त्यांच्या माणदेशी संस्कारामुळे त्यांच्या कथेमध्ये जाणवताना दिसते. एखादा पुरुष किंवा स्त्री दिसायला सुंदर असेल, पण त्याचे आंतरिक मन सुंदर असेलच, ह्याची

ग्वाही देता येत नाही. परंतु एखादा पुरुष सुंदरही असतो आणि त्याचे मनही सुसंस्कृत (सुंदर) असते. सुंदर शरीरापेक्षा सुंदर विचार कधीही चांगले असतात. कथेचेही तसेच आहे. कथाकार जितका चांगला असेल, तितका वाचकही परिपक्व असावयास हवा. नाहीतर 'थोरली पाती' (१९६३) ह्या कथासंग्रहातील 'अरे, दिवा लावा कोणीतरी' सारखी कथाही अरण्यरूदन ठरते. चांगल्या कथाकाराचे सर्व गुण ह्या कथेत आहेत. माडगूळकर जीवनाकडे उदात्त हेतूने पाहतात. त्यांनी माणदेशाचे चित्रण करणाऱ्या आपल्या कथेला सात्त्विकता, संयमीपणा व प्रौढता दिलेली आहे.

माडगूळकरांची कथा वाचनीय आहे. कथेला वाचनीय बनविण्यासाठी त्यांना वाङ्मयीन कसरती करण्याची गरज लागली नाही. ह्याविषयी पु. भा. भावे म्हणतात, "चार सामान्य मराठी लेखकांपेक्षा माडगूळकरांचे अनुभवांचे विश्व अधिक मोठे आहे. माणदेशातल्या धूळ-मातीपासून, धुंद - रजत सृष्टिपर्यंत आयुष्याचे अनेक प्रकार त्यांनी पाहिले आहेत."[१६] म्हणजेच माडगूळकरांनी लहानपणी माणदेशात जे दारिद्र्य अनुभवले व पाहिले, तेच त्यांच्या कथांमधून साकार झालेले दिसते. म्हणून त्यांच्या कथेत विविधता जाणवते. जीवनाचा घेतलेला सखोल अनुभव, पाहिलेल्या नाना तऱ्हा ह्या कारणांमुळे गदिमांची माणदेशाचे चित्रण करणारी कथा उंचीवर जाताना दिसते.

ग. दि. माडगूळकरांच्या मनाचे दर्शन माणदेशाचे चित्रण करणाऱ्या त्यांच्या कथेतून सर्वात जास्त जाणवते. शोकपर्यवसायी प्रेम किंवा अवखळ प्रेमचित्रण त्यांच्या ह्या कथेत दिसत नाही, तर त्यांचा कल जीवनाच्या गंभीर आशयाकडे, कारुण्याकडे आहे, असे दिसते.

एकंदरीत, निवेदनातील गतिमानता, कथानकावरील पकड, संवादाची अचूक जाण, जातिवंत शब्दकळा आणि जीवनातील शाश्वताचा शोध ह्यामुळे माणदेशाचे चित्रण करणाऱ्या कथेच्या दालनात गदिमांचे वेगळे स्थान आहे, हे मान्य करावेच लागते.

## ४.४. व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण :

माणदेशाच्या उजाड माळरानावर उदयास आलेले सोनेरी स्वप्न म्हणजे व्यंकटेश दिगंबर माडगूळकर होत. त्यांचा जन्म माडगूळ (ता. आटपाडी, जि. सांगली) येथे ६ जुलै १९२७ रोजी झाला. माडगूळकरांचें वडील दिगंबरपंत औंध संस्थानात श्रीमंत भवानराव पंडित पंतप्रतिनिधी ह्यांच्याकडे लेखनाच्या कामासाठी होते. त्यावेळी माडगूळकरांच्या घरची परिस्थिती हलाखीची होती. व्यंकटेश माडगूळकरांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कुंडल

येथे झाले. ते जुनी इंग्रजी सहावीपर्यंत शिकले. घरच्या गरीब परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण मध्येच सोडून द्यावे लागले.

माणदेशातील प्रतिकूल परिस्थिती आणि घरातील अठराविश्व दारिद्र्य ह्यामुळे त्यांना वेगवेगळे व्यवसाय करावे लागले. इ.स. १९४८ साली 'सकाळ' वृत्तपत्रामध्ये रविवार आवृत्तीचे उपसंपादक म्हणून काम सुरु केले. त्याचवर्षी त्यांचे लग्नही झाले. नंतर त्यांनी १९५० मध्ये फेमस पिक्चर्स, मुंबई येथे चित्रपट पटकथालेखक म्हणून काम केले. खऱ्या अर्थाने १९५५ साली आकाशवाणी, पुणे येथे निर्माता, ग्रामीण विभाग म्हणून नोकरी सुरु केली. १९८५ मध्ये आकाशवाणी, पुणे येथून 'वरिष्ठ निर्माता' म्हणून ते निवृत्त झाले.

व्यंकटेश माडगूळकर ह्यांनी १९४२ च्या 'छोडो भारत' ह्या आंदोनलात भाग घेतला होता. त्यावेळी काही काळ ते भूमिगत होते. दरम्यानच्या काळात वेगवेगळ्या क्षेत्रांमधील लोकांशी, त्यांचा संपर्क आला. त्यातनूच त्यांची साहित्यिक जाणीव विकसित झालेली दिसते. १९४६ साली त्यांची 'काळ्या तोंडाची' ही पहिली कथा 'अभिरुची' ह्या मासिकामध्ये प्रकाशित झाली. १९४९ साली 'माणदेशी माणसे' हे त्यांचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले, तर १९५५ मध्ये 'बनगरवाडी' ही त्यांची पहिली कादंबरी प्रकाशित झाली. लेखनाबरोबर त्यांनी चित्रकला, शिकार, निसर्गप्रेम हे छंदही जोपासलेले दिसतात. त्यांनी नाटक, कथा, कादंबरी, व्यक्तिचित्रे, आत्मचरित्रे, प्रवासवर्णन, ललित, संकलन, अनुवाद, रेखाचित्र, चित्रपट अशा बहुविध क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवलेला दिसतो. त्यांचे सोळा कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. 'माणदेशी माणसे'(१९४९), 'गावाकडच्या गोष्टी'(१९५९),'गोष्टी घराकडील' (१९५९), 'उंबरठा'(१९६०),'जांभळाचे दिवस'(१९६१), 'कांगारुचे चांगभले' (१९६२), 'वारी' (१९६२), 'काळी आई'(१९६२),'हस्ताचा पाऊस'(१९६५), 'सीताराम एकनाथ' (१९६६), 'डोहातील सावल्या' (१९७५), 'वाटा'(१९७६), 'वाळूचा किल्ला' (१९७६), 'बाजार' (१९७७),'रानमेवा'(१९७८), 'परवचा'(१९९४) ह्या सर्व कथासंग्रहांमधील कथांची संख्या २१६ भरते. त्यापैकी १७७ कथांमध्ये माणदेशाचे चित्रण पहावायास मिळते.

व्यंकटेश माडगूळकरांचा 'माणदेशी माणसे'(१९४९) हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाल्यानंतर खऱ्या अर्थाने समाजात लेखक म्हणून त्यांना स्थान मिळालेले दिसते. पुढे त्यांना वेगवेगळे मानसन्मान प्राप्त झालेले दिसतात. त्यातील काही महत्त्वाचे मान-सन्मान पुढीलप्रमाणे :

१. १९५८ - अध्यक्ष, सोलापूर जिल्हा साहित्य संमेलन, मंगळवेढा.
२. १९७४ - अध्यक्ष, औदुंबर साहित्य संमेलन, औदुबर.
३. १९७४ - अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रंथ पुरस्कार समिती.
४. १९७५ - सदस्य, मराठी विभाग, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.
५. १९७९ - अध्यक्ष, ग्रामीण साहित्य संमेलन, विटा.
६. १९८१ - आंतरराष्ट्रीय नाट्य संमेलनामध्ये 'सती' ह्या नाटकाची निवड.
७. १९८१ - सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
८. १९८३ - अध्यक्ष, ५७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, अंबेजोगाई.
९. १९८५ - सन्माननीय प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.
१०. १९८६ - ग. दि. माडगूळकर पुरस्कार.
११. १९८९ - सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

त्याचप्रमाणे माडगूळरांना वेगवेगळी पारितोषिकेही मिळालेली दिसतात. ती पुढीलप्रमाणे :

१. १९५८ - 'बनगरवाडी' कादंबरीस महाराष्ट्र शासन पुरस्कार.
२. १९५९ - 'जांभळाचे दिवस' कथासंग्रहास महाराष्ट्र शासन पारितोषिक.
३. १९५९ - 'घरदार' ग्रंथास महाराष्ट्र शासन पारितोषिक.
४. १९६१ - 'उंबरठा' कथासंग्रहास महाराष्ट्र शासन पारितोषिक.
५. १९६८ - 'सती' नाटकास महाराष्ट्र शासन पारितोषिक.
६. १९८३ - 'करुणाष्टक' कादंबरीस कै. न. चि. केळकर पुरस्कार .
७. १९८३ - 'सत्तांतर' कादंबरीस साहित्य अकादमी पारितोषिक.

ह्याशिवाय व्यंकटेश माडगूळकरांनी ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका ह्या देशांचा प्रवासही केलेला दिसतो. अशा ह्या थोर साहित्यिकाची प्राणज्योत पुणे येथे २८ ऑगस्ट २००१ रोजी मालवली.

व्यंकटेश माडगूळकर ह्यांना मराठीतील थोर ग्रामीण कथाकार म्हणून ओळखले जाते. आपल्या कथालेखनामधून त्यांनी ग्रामीण जीवनाचे, तेथील शेतकऱ्यांचे, स्पृश्यास्पृश्य जातींमधील लोकांचे अर्थपूर्ण आणि वास्तव चित्रण केलेले आहे. त्यांचे नाव नवकथाकारांमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांनी ज्या भागाचे चित्रण केलेले आहे, तो ग्रामीण

भाग म्हणजेच 'माणदेश' होय. ग्रामजीवनातील परंपरा, शेतकऱ्यांचे जीवन, त्यांच्या मनाची जडणघडण, रुढी, जातिव्यवस्था ह्यां सर्वांचे अनेक पदर उलगडणारे कथालेखन माडगूळकरांनी केले. दलित समाजाचे जीवन जवळून पाहणे, हा व्यंकटेश माडगूळकरांच्या आस्थेचा विषय होता. दलितांना गावात मिळणारी वागणूक, गावाबरोबर दलित कसे वागतात ह्या संदर्भातील चित्रणामधील सर्व बाजू त्यांच्या कथांमधून व्यक्त झालेल्या आहेत.

व्यंकटेश माडगूळकर आपल्या ग्रामीण संवेदशीलतेच्या आधारे सर्व अनुभव घेताना दिसतात. खेडेगावातील समाज हा समूह म्हणून कसे वर्तन करतो, त्यांच्या श्रद्धा-अंधश्रद्धा कोणत्या प्रकारच्या असतात, ह्याचे 'मारुतराया' सारख्या कथेतून; तर शेतकरी स्त्री-पुरुषांच्या अंत:करणातील भावबंध कोणत्या प्रकारचे असतात, ह्याचे 'नामा सुढाळाचे सुख-दु:ख' ह्यासारख्या कथेतून मनाला भिडणारे चित्रण त्यांनी केले आहे. येथे माडगूळकरांची अवलोकनाची शक्ती तीव्र असल्याचा प्रत्यय येतो. दुसऱ्या कोणत्याही लेखकाचे अनुकरण करावे लागणार नाही, एवढी विलक्षण शक्ती त्यांना निसर्गत: प्राप्त झालेली होती.

माडगुळे ह्या स्वत:च्या मायभूमीतच माडगूळकरांना वेगवेगळ्या जातींमधील मित्रांकडून शिकारीचे प्राथमिक स्वरुपाचे शिक्षण प्राप्त झालेले होते. त्यामूधन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत गेला. अनेक जातीजमातींमधील मित्रांच्या संपर्कामुळे त्यांची माणसाबद्दलची जाण आणि समंजसपणा वाढलेला दिसतो. घरातील प्रतिकूल परिस्थितीमुळे ते जगण्यासाठी म्हणून मुंबईसारख्या शहरात आले आणि 'लिहिणे' हेच त्यांचे जगणे बनले.

वयाच्या सतराव्या वर्षी त्यांनी 'देवा सटवा महार' ही 'अभिरुची' ह्या नियतकालिकासाठी लिहिलेली कथाच पुरुषांच्या जीवनावरील त्यांची पहिली कथा होय. त्यानंतर त्यांनी 'माणदेशी माणसां'चे चित्रण केलेले दिसते. ही 'माणदेशी माणसे' माणदेशातील समाजव्यवस्थेची प्रातिनिधिक रुपे म्हणून आलेली आहेत. ती आपल्या मातीशी एकनिष्ठ राहणारी असल्यामुळे त्यातून माणदेशी परंपरा, प्रदेश, पर्यावरण ह्या सर्व गोष्टी शब्दांमध्ये जिवंत झाल्या. येथून पुढे खऱ्या अर्थाने माडगूळकरांमधील प्रतिभा ही इतर कथाकारांपेक्षा वेगळी असल्याची जाणीव होण्यास सुरुवात झाली. खऱ्या अर्थाने माणदेशाला, पर्यायाने मराठी साहित्यसृष्टीला व्यंकटेश माडगूळकरांच्या रुपाने एक मौल्यवान रत्नच प्राप्त झाले. ओघवती शब्दकळा प्राप्त करण्यासाठी माडगूळकरांना खूप मेहनत घ्यावी लागली होती. नुसती शब्दसंपत्तीच नाही, तर विशिष्ट वासाचेही ज्ञान त्यांनी अचूक प्राप्त केले होते, ह्याचीही जाणीव त्यांच्या कथेतून होते. लिहिताना आपल्याला त्या वातावरणाचे वास येतात,

असे त्यांनी 'आपल्या लेखनामागची कळसूत्रे' (गावाकडच्या गोष्टी - १९५९) सांगताना स्पष्ट केलेले आहे. रसगंधाचाही अनुभव त्यांची कथा वाचताना येतो. ह्याविषयी अरविंद गोखले म्हणतात, "ज्वारीच्या पानावरची साखर ओरबडून खाताना त्यांच्या कथेतला 'मी' जातो, तेव्हा वाचताना जिभेवर एक गोड थर जमा होतो. मारुतीच्या देवळापुढे गावकरी जमीन सारवू लागले की, शेणामुताचा वास वाचकांना येऊ लागतो. आई मामलेदारणीच्या तोंडात मारते, तेव्हा वाचक बसल्या जागी चमकतो. माळावर झेल्या एकाकी उभा राहिला की, वाचनालयात अंधारून येते. कुठली ही त्यांची कथा उघडली की, न पाहिलेला वैराण माणदेश नकाशा उलगडल्यासारखा समोर येतो."[१७]

व्यंकटेश माडगूळकर हे शहरामध्ये राहण्यासाठी गेले, तरी त्यांची नाळ त्यांच्या मातीशीच एकनिष्ठ राहिल्याचे प्रत्ययास येते. त्यांच्या पहिल्या कथेपासून त्यांनी माणदेशातील दारिद्रय, समाजव्यवस्था, निसर्ग ह्यांचे एकात्म चित्रण केलेले दिसते. ह्याविषयी प्र. न. जोशी म्हणतात, "माणदेशी वैराण माळावर दारिद्र्याची, दु:खाची, अज्ञानाची जी स्पंदने त्यांना जाणवली, ती त्यांनी 'माणदेशी माणसां'त चित्रित केली. माणसाच्या मनाचे अनेक कंगोरे जे आजवर कथासृष्टीत आले नव्हते, ते माडगूळकरांमुळे मराठी कथेत प्रकट झाले."[१८] त्यांनी कथेला स्वत:चे असे वेगळेपण प्राप्त करुन दिले. कथा व्यक्तिप्रधान असल्याने केवळ व्यक्तीच नव्हे, तर त्यापाठीमागील माणदेशातील निसर्गही व्यक्ती बनून त्यांच्या कथेत येतो.

### ४.४.१. माणदेशाचे भौगोलिक चित्रण :

व्यंकटेश माडगूळकरांचे बालपण माडगूळला गेले. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर त्या प्रदेशाचा मोठा प्रभाव दिसून येतो. त्यांच्या 'बाजार' (१९७७) ह्या कथासंग्रहातील 'दुष्काळ' ह्या कथेत माणदेशाचे वर्णन येते ते असे :

"दिवसभर धोधाट वारा घरांच्या भिंतींवर धडक्या मारी. पिसाळल्या जनावरासारखी त्याची गुरगुर सारखी ऐकू येई. कायधुळी, वावटळीसारख्या गिरगिरत. दिवसा सुम्म ऊन, आणि रात्री दाट अंधार. गावाची रयाच गेली होती." (पृ. ४३)

ह्यावरुन व्यंकटेश माडगूळकरांनी सूक्ष्मपणे केलेले माणदेशाचे चित्रण वेगळे असल्याचे जाणवते. त्यांच्या कथेत येणारे मारुतीचे मंदिर 'घोंगडं', 'जोंधळ्याची ताटं', 'बाभुळ', 'कडबा', 'लहान टेकडया', 'झाडेझुडपे', 'गढुळ पाणी' हे सारे खास माणदेशी परिसरातील वेगळेपण असल्याचे दिसते. माडगूळकरांच्या कथेला माणदेशी परिसराने व्यापलेले दिसते.

अनेक प्रादेशिक वैशिष्ट्ये बरोबर घेऊन त्यांची कथा चित्रित होते. निसर्ग आणि माणूस ह्यांना त्यांच्या कथेतून वेगळे काढता येत नाही. त्यांच्या 'सीताराम एकनाथ' (१९६६) ह्या कथासंग्रहातील 'भले नामूदादा' ह्या कथेत प्रदेशाचे वर्णन असे येते :

"हिवऱ्याच्या अलीकडे मैलभराच्या अंतरावर खंडोबाचं एक जुनाट देऊळ आहे. त्या देवळाजवळ एक भला मोठा वड आहे. वाटेवर मध्ये झाडझुडूप अगदी क्वचित. सारा कुसळानं भरलेला उजाड माळ ! असले तर एखादं बाभळीबोरीचं खुरटं झुडूप. तापलेला फुफोटा टापानं उडवीत घोडं रेंरें करत चाललं होतं आणि वर बसलेल्या नामूच्या अंगाला चैत्राचं ऊन गांधिलमाशासारखं डसत होतं." (पृ. १२३)

अशाप्रकारे व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेत माणदेशी कथाबीज,जागोजागी सापडते. त्यावरुनच त्यांची कथा ही खास माणदेशी कथा म्हणता येईल. तसेच माणदेशाचे म्हणून असलेले भौगोलिक महत्त्व म्हणजे माळरान व कोरडी हवा म्हणूनच तेथील प्रदेश वेगळा असल्याचे जाणवते. "माणदेशी माणसे" (१९४९) ह्या कथासंग्रहांतील 'मुलाण्याचा बकस' ह्या कथेतील वर्णन पहा :

"आजुबाजूला सारा बोडका माळ आहे. पाच मैलांच्या प्रवासात तहान लागली, तर वाटेला कुठं पाणी मिळत नाही. झाडंसुद्धा सावलीला होतील अशी नाहीत. नेपती - बोरीची बारीकसारीक झुडपं आहेत. दुपारच्या वेळी निघालं म्हणजे सगळ्या वाटेत माणूस क्वचितच दृष्टीस पडतं. चुकून माकून एखादा मेंढक्या आणि मुंड्या खाली घालून गवत खाणारी त्याची मेंढरं जवळपास दिसतात. एरवी सारा शुकशुकाट." (पृ. ४१)

ह्यावरुन माणदेशातील भौगोलिक चित्रणाची स्पष्टपणे जाणीव होते. माणदेशातील प्रादेशिकता स्पष्टपणे माडगूळकरांच्या कथेतून जाणवते. त्यांनी ह्या प्रदेशाचे लहान-सहान प्रसंगासह सूक्ष्मपणे वर्णन केल्याचे लक्षात येते. त्यातूनच साक्षात माणदेश डोळ्यासमोर उभा राहतो. माडगूळकरांच्या लेखणीतील शब्दांची आवाहकता येथे स्पष्टपणे जाणवते. त्यांच्या 'सीताराम एकनाथ' (१९६६) ह्या कथासंग्रहातील 'बावा' ह्या कथेत माणदेशातील भौगोलिकतेचे वर्णन पुढीलप्रमाणे येते:

"वैशाखातील दुपार खंजिरासारखी तळपत होती. उन्हाच्या सणक्यानं सगळं गाव निपचित पडलं होतं. वारा वाहात नव्हता. झाडं हालत नव्हती. लिंबाच्या डहाळ्यात बसलेल्या

साळुंक्या बोलत नव्हत्या. कुत्री राडीत बसून ल्हाल्हा करीत होती. सारं खेडं उन्हाच्या तापानं मरगळून गेलं होतं." (पृ. १३७)

ह्यावरुन माडगूळकरांचे कथाविश्व हे विशिष्ट प्रदेशातील जीवनसंस्कृतीचे चित्रण करणारे ह्या अर्थाने प्रादेशिक आहे. माणदेशाच्या भूमीत बराच काळ त्यांनी घालविल्यामुळे तेथील निसर्ग जणू त्यांचा मित्रच बनला आहे, असे दिसते. ते स्वत: शिकारीसाठी बाहेर पडल्यानंतर त्यांना तेथील निसर्ग कसा दिसला, ह्याचे वर्णन 'उंबरठा' (१९६०) ह्या कथासंग्रहातील 'घरापाठीमागची लोभा' ह्या कथेत त्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे. 'पकुड्यां खुल्या आभाळातून भिंगरीसारख्या चालल्या होत्या. आभाळावर रांगोळी घातल्यासारखे दिसणारे ठिपके कधी जवळ येते होते, तर कधी दूर जात होते. दिसेनासे होत होते. सुरेख वारा सुटला होता आणि मीही भिंगरीसारखा रानामागून राने तुडवीत चाललो होतो. श्रावणमास होता. चोहोकडे हिरवळ दाटली होती आणि माझ्या मनामध्ये हर्ष दाटला होता. कलख करीत पकुड्यांचे थवे आभाळातून भरारत होते. घरटी विणता विणता सुग्रण पाखरे गाणी गात होती." (पृ. ५०-५१)

ह्यावरुन माडगूळकरांच्या माणदेशातील संवेदनाशील निसर्गाचे वर्णन माणदेशाविषयीचे आकर्षण निर्माण करते. माडगूळकारांच्या माणदेशी भूप्रदेशातील सृष्टी ही पशुपक्षी, वृक्ष, वेली ह्यांनी भरलेली त्यांच्या कथेतून दिसते. कथांमधील व्यक्तींबद्दल त्यांच्या मनात जशी अपार माया आहे, तशीच काळ्या बरड जमिनी, बाभळी बोराटीची झाडे, गायीबैलं ह्यांच्याबद्दलही माया आहे. त्यामुळे त्यांच्या 'तळ्याच्या पाळी' ह्या कथेतील रस्त्यावरील पांढऱ्या शुभ्र दगडाला रामराम म्हणावेसे वाटते, पावातल्या बाभळी, नेपती, रुई ह्या मंडळींना पाहावेसे वाटते.

व्यंकटेश माडगूळकरांनी माडगूळच्या जीवनात आढळणाऱ्या लोकांचं दु:ख जवळून पाहिले आणि अनुभवले असल्यामुळेच माणदेशाचा भौगोलिक विस्तार ते आत्मीयतेने प्रकट करु शकलेले आहेत, असे वाटते. त्यांच्या 'घरदार'(१९५९) ह्या कथासंग्रहात येणारी सर्व माणसे ही त्यांच्या वैयक्तिक जीवनातील आहेत. पार, देऊळ, शाळा, ओढा, बिटाकाका, पशुपक्षीदेखील वैयक्तिक दु:खाची साक्ष देतात. त्यामुळे ती फक्त माणदेशाची कहाणी न राहता तुम्हा आम्हा सर्वांचेच ते दु:ख बनते. म्हणून ह्या भौगोलिक चित्रणातील दु:खाविषयीचे व एकूणच माणदेशातील जीवनचित्रणाविषयीचे मत व्यक्त करताना रा. ग. जाधव म्हणतात, "ग्रामीण पीडित जीवनाची जी एक विस्मयजनक वास्तवता आहे. ती अविकृतपणे जशीच्या

तशी शब्दांतून व्यक्त करणे, हे त्यांचे यश मराठीतून प्रथमच 'ओसाडीतील मुके स्वर' प्रकट झाले."[११]

## ४.४.२. माणदेशाचे सामाजिक - सांस्कृतिक चित्रण :

व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या कथासंग्रहांमधून माणदेशी शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेवर भर दिलेला आहे. कारण माणदेशात सतत दुष्काळ पडतो. त्याला तोंड देता - देता शेतकरी हैराण होऊन जातो. "सता कुणाच्या अध्यात ना मध्यात, हाडाची काडं करुन, रक्ताचं पाणी करुन त्यानं पिकवलेलं धन असं चोरापोरी का जावं ? जोंधळा दृष्टीस पडत नाही, कडब्याचा भाव सोन्याइतका चढलेला; अशा स्थितीत सात - आठ पायलीचं नुकसान झाल्यावर मालकाला काय वाटेल?" 'न्याय' ('गावाकडच्या गोष्टी' - १९५१, पृ. ७९) ह्या कथेतील वर्णनावरुन माणदेशातील शेतकऱ्याच्या दारिद्री अवस्थेचे चित्रण नजरेसमोर उभे राहते. प्राप्त परिस्थितीशी झगडत झगडत माणदेशातील शेतकरी स्वतःचे अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करताना दिसतो. पोट भरण्यासाठी म्हणून तो बाहेरगावी जातो आणि पावसाळ्यात परत गावाकडे येतो. परंतु माणदेशावर सतत निसर्गाची अवकृपाच झालेली दिसते. त्यामुळे गावात कसेतरी टिकून असलेले शेतकरी पूर्णपणे दैवाधीन बनलेले दिसतात. 'सीताराम एकनाथ'(१९६६) ह्या कथासंग्रहातील 'गावाकडं' ह्या कथेत 'आपला मुलूख कसला ! बारमाही तकडं पावसाची बोबं'! ह्या साली तरी पाऊस न्हाई ! रानात मोलमजुरी करुन पायलीअडशिरी मिळायचं, तेबी मिळनासं झालं. घरात खानारी चार तोंडं. भागावं कसं? करावं काय ?' (पृ. ९०-९१) अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या वाईट परिस्थितीचे वर्णन आलेले आहे. माडगूळकरांच्या 'बोजा'('गावाकडच्या गोष्टी'-१९५१), 'असंच'('हस्ताचा पाऊस'-१९५३), 'काळी आई'('काळी आई'-१९६२), 'हे पाप कुठं फेडू'('वारी'-१९६२) ह्या कथांमधूनही माणदेशातील शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेचे वर्णन आलेले आहे.

- चारित्र्याला महत्त्व देणाऱ्या स्त्रिया :

माडगूळकरांच्या कथेतून स्त्रीचित्रण तसे खूपच कमी आलेले दिसते. ज्या स्त्रियांचे चित्रण आलेले आहे, त्यावरुन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास पूर्णपणे कथेतून झाल्याचे दिसत नाही. परंतु माणदेशी वातावरणाचा परिणाम आणि माडगूळकरांवर झालेले संस्कार ह्यातून हे चित्रण माणदेशातील स्त्रियांची अवस्था काय होती, हे समजण्यासाठी पुरेसे आहे. ग्रामीण भागात आजही स्त्रियांवर अनेक बंधने लादली जातात. त्यांना स्वच्छंदपणे जीवन जगता येत

नाही. चारित्र्य ही गोष्ट स्त्रियांच्या बाबतीत ग्रामीण समाजात खूप महत्त्वाची मानली जाते. स्त्री कितीही गरीब असली, तरी ती स्वत:च्या चारित्र्याचे, शीलाचे रक्षण करण्याचा प्रयत्न करते. माडगूळकरांच्या 'उंबरठा'(१९६०) ह्या कथासंग्रहातील 'ओझं' ह्या कथेत सोमाची बायको लाडाबाई म्हणते, ''मी झाडाच्या आडुशाला बाळांत हुईन, आन् नदीच्या पाण्यात पोरगं धुईन, पर झेलात न्हाई जायाची. परान गेला, तरी न्हाई जायाची.'' (पृ. १४६) ह्यावरून माणदेशातील सामान्य ग्रामीण स्त्रीसुद्धा आपल्या चारित्र्याला किती महत्त्व देत होती, ह्याची प्रचिती येते.

माडगूळकरांनी चित्रीत केलेल्या माणदेशातील जवळजवळ सर्व व्यक्तिरेखांकडे पाहिले की, त्या दु:खाने किंवा मनात काहीतरी सल घेऊन जगणाऱ्या वाटतात. 'उंबरठा'(१९६०) ह्या कथासंग्रहातील 'दुबळा' ह्या कथेतील पवित्रा आपल्या नवऱ्याला (नामूला) म्हणते, ''माज्यावर कशाला राग काढतोस ? मी काय केलंय ? तुझ्यासाठी काय करायचं ठेवलंय?... तूं नावाचा नवरा...कधी सुख दिलंस ?...कधी चार गोड घास खाऊ घातलंस ? माजी हौस कधी केलीस ?.... आज पंधरा वर्स वनवास भोगतीय तुझ्यासंगं... गुरासारखी राबतेय.... काय धन लावलीस तूं ? ....अरं, तू मला एकांदं पोर तरी दिलंस का?'' (पृ. १२२) ह्यातून माणदेशातील स्त्री ही स्वत:च्या संसारासाठी कशी झिजते, हे जाणवते. परंतु स्वत:च्या चारित्र्याचा ती ऱ्हास होऊ देत नाही.

माडगूळकरांच्या कथेतील स्त्री ही पारंपरिक पद्धतीने जीवन जगणारी आहे. आधुनिक विचारसरणीचा स्पर्श माणदेशातील स्त्रियांना झालेला दिसत नाही. ग्रामीण रूढी-परंपरा ह्यांचे जतन करण्यात माणदेशी स्त्रीला धन्यता वाटते. 'उंबरठा'(१९६०) ह्या कथासंग्रहातील 'घरापाठीमागची लोभा' ह्या कथेत लोभाच्या हाताला स्वत: कथाकार व्यंकटेश माडगूळकर स्पर्श करतात. परंतु लोभा कथाकारावर रागावते, हे चांगले नाही, असे सांगते. लोभाचे लग्न झाल्यावर कथाकार शिकारीच्या निमित्ताने बाहेर पडलेला असतो. पाऊस आल्यामुळे तो शेजारी असणाऱ्या गावी आश्रयासाठी जातो. ज्या घरामध्ये तो जातो, त्याच घरामध्ये लोभाचे लग्न झालेले असते. त्यावेळी लोभा कथाकाराला ओळखते व सासुरवाशी स्त्री ज्या पद्धतीने परपुरुषाचे स्वागत करते, तसे ती करते. ह्यावरून माणदेशातील ग्रामीण स्त्रीचे लोभा ही प्रतीक वाटते. 'उंबरठा'('उंबरठा'),'ओझं'('उंबरठा'),'धार'('काळी आई') ह्या कथाही अशाच स्वरुपाच्या आहेत.

* परिस्थितीला वैतागून वाईट मार्गाला लागणाऱ्या स्त्रिया :

माडगूळकरांच्या माणदेशी कथेत सतत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत असताना काही स्त्रियांचा अध:पात होताना दिसतो. कारण दुष्काळामुळे जीवन जगण्यासाठी वेळच्या वेळी गरजा पूर्ण होत नाहीत. त्यातूनच व्यभिचाराचा मार्ग स्वीकारला जातो. म्हणजे बारकाईने विचार केल्यास ह्या स्त्रियांवर अन्याय होताना दिसतो. त्यांना फसवून ह्या मार्गाला लावले जाते - किंवा दुसऱ्यावर सूड उगवण्याच्या नादात स्वत:च्या आयुष्याची राखरांगोळी ह्या स्त्रिया करुन घेतात. स्त्रीच्या जीवनातील दु:ख आणि एकाकीपण, तिची असाहाय्यता ह्यांचे चित्रण येते. 'गावाकडच्या गोष्टी'(१९५१) ह्या कथासंग्रहातील 'फक्कड गोष्ट' ह्या कथेत वाणी गावी सोडून जाणार असतो. तो दुबळा असतो. वाणीण जाताना दरवाज्याला लावण्याचा धोंडा बरोबर घेते. तेव्हा वाण्याला राग येतो व तो म्हणतो , "रांडे ! दाराला लावण्याचा धोंडा इथून तिकडे न्यायला तिथं काय धोंडे नाहीत?" त्यावर एक हात पुढं करुन वाणिनीनं स्वच्छ उत्तर दिलं, "आणि मुडद्या, ह्या गावात सोदे आहेत म्हणून मला त्या गावात नेतोस. तिथं काय सोदे नाहीत?" (पृ. १२८) ह्यावरून दारिद्रयाने गांजलेल्या नवऱ्यापुढेसुद्धा स्त्री व्यभिचाराचे स्पष्टपणे कसे समर्थन करते, हे निदर्शनास येते.

माणदेशाच्या ग्रामीण भागात स्त्रीवर अनेक बंधने आजही आहेत. स्त्रीने घराचा उंबरठा ओलांडू नये, हे त्यांपैकी एक बंधन होय. त्यामुळे स्त्रीच्या मनाची घुमसट होते. 'येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची वाट पहात दारात उभी राहणारी 'उंबरठा' मधील विठा', 'मन बसलं तिथं दान देऊन मोकळी होणारी गोकुळा' (गोकुळा), 'सीताराम एकनाथ' मधील वरुन शांत दिसणारी परंतु आतून काळ्या मनाची गोदा वाणीण, ह्या नव्याकोर शालूची घडी त्या उमेदवार जवानानं मोडावी, अशी इपरित वासना मनाला झाली, असे म्हणणारी 'विपरीत घडले नाही' मधील मुरळी असणारी महाराची बहिणा, ह्या स्त्रिया येथे उदाहरणादाखल नमूद करता येतील. थोडक्यात, स्त्रीलाही मन असते. परंतु ग्रामीण भागातील काही सामाजिक संकेतांमुळे ते तिला उघडे करता येत नाही. 'हस्ताचा पाऊस'(१९५३) ह्या कथासंग्रहातील 'वडरवाडीच्या वस्तीत' ह्या कथेतील लक्षीची अवस्था अशीच झालेली दिसते. लक्षी ही शरीराने खंडकासारखी कठीण होती. परंतु बाप मेल्यावर तिला एकटे एकटे वाटायला लागते आणि ती दुसऱ्या पुरुषाचा आधार शोधते. पहा: 'कडुसे पडले आणि रानातली चटसारी गुरेढोरे घराकडे गेली, तरी लक्षी आणि तिचा मैतर तालीवरच होती.' (पृ. ३०) 'बळीची गोष्ट' ('काळी आई'-१९६२),

‘गावाकडं’(‘जांभळाचे दिवस’-१९५७), ‘लोणी आणि विस्तू’(‘रानमेवा’-१९६४) ह्या कथा अशास्वरुपाच्या आहेत.

- नीतिभ्रष्टता :

माणदेशाच्या ग्रामीण भागात राहणारे लोक हे जरी परिस्थितीने गरीब असले, तरी ते सर्वजण आपापले व्यवहार रूढी, परंपरा, जात ह्या गोष्टींच्या आधीन राहूनच करीत असतात. स्पृश्य - अस्पृश्य ह्यांच्यात दरी होती, पण ती जीवघेण्या स्वरुपाची नव्हती. एकमेकांना धरुन राहिले, तरच टिकून राहू, नाहीतर संपून जाऊ, ही जाणीव सर्वांनाच होती, हे स्पष्टपणे दिसते. ‘उंबरठा’(१९६०) ह्या कथासंग्रहातील ‘गोडेपाणी’ ह्या कथेत खाऱ्या पाण्याच्या विहिरी असलेल्या गावात महारांसाठी पाण्याची सोय नसते. म्हणून महार लोक एकत्र येऊन रीतसर परवानगी घेऊन स्वकष्टाने आपल्यासाठी विहीर खोदतात. तिला गोडे पाणी लागलेले पाहून सवर्ण ती विहीर दम देऊन बळकावतात. त्या गावातील वाणी उलट महारांनाच म्हणतो, “मग, लेकानू, तुमच्यावर फिर्याद केली पायजेल. दुसऱ्याची जागा दांडगाव्यानं घेऊन त्यात हीर काढली तुमी. ही काय मोगलाई हाय व्हयू रं ? तुम्ही चढ झाला गावाला !” (पृ. २२) अशा पद्धतीने माणदेशात नीतिभ्रष्टता जाणवते. ह्याठिकाणी नीतीने परवानगी घेऊन महारांनी विहीर खोदलेली असताना सवर्ण मात्र अनीतीने वागतात, असे चित्रण माणदेशातील जातीय संघर्ष चित्रित करणारेच आहे. येथे माणदेशातील सामाजिक अन्यायाचे, भीषण विषमतेचे चित्रण ध्वनित होते.

‘वारी’(१९६२) ह्या कथासंग्रहातील ‘हे पाप कुठं फेडू’ ह्या कथेतील उमा रामोशी रत्नी नावाची गाय पाळत असतो. त्याची बायको गोकुळा हिचाही गाईवर फार जीव असतो. उमा रामोशी हा सरळमार्गी, नीतीने वागणारा माणूस असतो. मात्र एकेदिवशी तो भरपूर दारु पिऊन रत्नीला बडवायला सुरूवात करतो. त्यात ती मरते. अशाप्रकारची वेगळी नीतिभ्रष्टताही माडगूळकरांच्या माणदेशी कथेतून जाणवते. कारण माडगूळकर माणूस आणि प्राणी ह्यांचे एकच जग कल्पितात.

- अंधश्रद्धा:

माडगूळकरांच्या माणदेशी कथेत अंधश्रद्धाही मोठ्या प्रमाणावर जाणवतात. सततच्या दुष्काळामुळे व अनियमित पावसामुळे तेथील माणूस दैववादी बनलेला आहे. ह्या दैववादातून

अंधश्रद्धेला खतपाणी मिळालेले दिसते. देव, देवर्षी, नवस ह्या गोष्टींच्या आहारी माणदेशातील बहुसंख्य वर्ग गेलेला दिसतो. 'उंबरठा'(१९६०) ह्या कथासंग्रहातील 'खेळ' ह्या कथेतील टोपा महार हा गरीब माणूस आहे. त्यांची मुलगी तापाने आजारी पडते, तेव्हा त्याच महारवाड्यातील रामा महाराची बायको देवऋषीपण करीत असते. तिचे ऐकून टोपाची बायको म्हणते, "रामा म्हाराच्या बायकूनं बघितलं मघाशी. ती म्हणाली - कोंबडा कापा तीन रस्त्यावर...गून येतोय. मी म्हणते करावं बगून.' (पृ. ४०) येथे माणदेशातील लोक अंधश्रद्धेच्या आहारी कसे गेलेले आहेत, हे लक्षात येते.

व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेत वेगवेगळ्या जातीजमातींमधील व्यक्ती येतात. त्या सर्वांच्या रूढी - परंपरा, चालीरीती वेगवेगळ्या आहेत. काही जाती गावकुसाच्या बाहेर रहात असल्यामुळे त्यांच्यात मागासलेपण आढळते. जुन्याच गोष्टी उराशी बाळगून ते आपला जीवनव्यवहार चालवण्याचा प्रयत्न करतात. त्यातूनच अशा लोकांमध्ये मोठ्या प्रमाणावर अंधश्रद्धांचे जतनही केले जाते. पारधी समाजात अशा अनेक अंधश्रद्धा आढळतात. 'व्यंकटेश माडगूळकर यांची कथा ' - १९६४ ह्या कथासंग्रहातील 'पारधी' ह्या कथेत हे दिसून येते. माडगूळकर त्यांच्या गावी  असतात. तेव्हा पारध्यांची पाले गावाजवळ पडलेली असतात. एकदा मिठू पारध्याचा मुलगा रात्री आजारी पडतो, तेव्हा तो त्या रात्री देवाची आळवणी करण्याकरिता रडल्यासारखा आवाज काढतो. ह्यासंदर्भात माडगूळकरांना मिठू म्हणतो, "मग देवीला बोलवत होतो, दादा, माज्या अंगात देवी आली भवानी. तिनं सांगितलं, काय धोका न्हाई. समदं खुशाल होईल, म्हणून."(पृ.२३५) माडगूळकरांनी माणदेशातील सर्व अल्पसंख्य समाजाचे चित्रण केले आहे. त्यातून त्या ठिकाणच्या अंधश्रद्धा माणदेशी स्वरुपात व्यक्त झालेल्या दिसतात.

माणदेशात सर्वच जातिधर्माचे लोक असल्यामुळे तेथे जीवनव्यवहाराच्या प्रथाही वेगवेगळ्या स्वरुपात पहावयास मिळतात. माडगूळकरांची निरीक्षणशक्ती तीव्र असल्यामुळे लहानसहान गोष्टींचे आकलनही त्यांना होते, ह्याची जाणीव त्यांच्या कथेतून होते. 'कांगारुचे चांगभलं' (१९७७) ह्या कथासंग्रहातील 'गंगाराम' ह्या कथेतून माकडवाले जातीच्या रूढी व अंधश्रद्धा पहायला मिळतात. ज्यावेळेस स्वत: माडगूळकर गंगारामला विचारतात की, "इकडं हरणं आहेत का? "त्यावर गंगाराम मान हालवून म्हणतो, "काय न्हाई दादा, सगळी  हरणं तिकडं मोगलाईत गेली. फार मागिंदी एक बाबा आलावता, त्येनं मंतर घालून तिकडं न्हेली. आता आपल्या भागात काय ऱ्हायलं न्हाई." (पृ. २०४) ह्यावरुन मंत्र-तंत्रावर माणदेशी

माणसांचा कसा विश्वास होता, ते लक्षात येते. अशास्वरुपाच्या 'गुप्तधन', 'करणी', 'मारुतराया', 'भुताचा पदर' ('गावाकडच्या गोष्टी' - १९५१) अशा बऱ्याच कथा उदाहरणादाखल सांगता येतील.

- भाऊबंदकी :

माडगूळकरांनी रेखाटलेले कथाविश्व हे विशिष्ट प्रदेशातील जीवनसंस्कृतीचे चित्रण करणारे असल्यामुळे त्याठिकाणी असलेली भाऊबंदकी पाहावी लागते. ग्रामीण भागातील लोक वेषाने अडाणी वाटत असले, तरी विचाराने ते अडाणी नसतात. त्यांना स्वतःचा स्वार्थ बरोबर समजतो व त्याच पद्धतीने ते आपल्या जीवनाची वाट चोखाळत असतात. जातीतल्या जातीत ही भाऊबंदकी पहावयास मिळते. 'गावाकडच्या गोष्टी' (१९५१) ह्या कथासंग्रहातील 'भुताचा पदर' ह्या कथेत कुलकर्ण्याची पाळी नाना बामणाला मिळण्याअगोदर तो खूप गरीब असतो. ती पाळी मिळाल्यानंतर तो श्रीमंत बनतो. ह्यावर बंडा बामण म्हणतो, "गड्या, या बोलण्यात चव नाही ! तुझ्यासारखी कुलकर्णीपणाची पाळी आम्हांलाही आली; पण दहा तोळे सोनंच काय, पण लोखंडसुद्धा नाही सापडायचं आमच्या घरांत तुला!" (पृ. ५६) ह्या संवादावरुन एकमेकांविरुद्धची असणारी मनातील जळजळ व्यक्त होते. माणदेशात ही भाऊबंदकी बऱ्याच प्रमाणात पहावयास मिळते.

माणदेशात असलेली गावगाड्याची चौकट आणि तेथील पारंपरिक जीवनमूल्ये माडगूळकरांच्या कथेतून दिसतात. त्यांच्या 'काळी आई'(१९६२) ह्या कथासंग्रहातील 'काळी आई' ह्या कथेतील आप्पांना वारसदार कोणीही नसतो. म्हणून त्यांच्या भावकीतील लोक आप्पांना स्वार्थी हेतूने जपत. त्यांची जमीन मिळावी म्हणून सर्वजण मनापासून प्रयत्न करीत. घराशेजारी असणारा काळा भावड्या आप्पांची कपडे मळली म्हणजे म्हणायचा, "आप्पा, द्या तो तुमचा कुडता इकडे. आणील धुऊन तुमची सून !" (पृ. २९) पण तो हे नाते का जोडतो आहे, हे आप्पांना बरोबर माहीत होते. हा धूर्त माणूस आपल्याशी चांगुलपणाने का वागतो आहे, हे त्यांना पक्के ठाऊक होते. म्हाताऱ्याने आपल्याला दत्तक घ्यावे आणि ही सर्व इस्टेट आपल्याला मिळावी, हा त्याचा कावा जाणून ते त्याचे उपकार घेत नव्हते. "बाबा रे, माझे हात चालत आहेत. माझी काळी आई माझ्या पोटापुरतं देते आहे. तुमच्यावर काय म्हणून मी भार टाकू ? असे म्हणून ते उडवून लावीत." (पृ. २९) ह्या प्रसंगावरुन माणदेशात

भावकी-भावकीत एकमेकाची संपत्ती हडप करण्यासाठी कशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला जातो, हे स्पष्ट होते.

माणदेशातील बहुतेक लोक हे परंपरेनुसार वागताना दिसतात. गावगाड्याचे विविध स्तर त्यातील वैचित्र्यासह माणदेशी कथेतून व्यक्त होतात. 'हस्ताचा पाऊस' (१९५३) ह्या कथासंग्रहातील 'पडकं खोपट' ह्या कथेत राव्या आणि भाव्या ह्या दोन भावा-भावात निर्माण झालेले वैर दिसते. राव्या एके दिवशी आपल्या मुलाला (मार्तंडाला) म्हणतो, "पोरा, सांभाळ. तुझ्या चुलत्याच्या पोटात मळ हाय, त्याचा वस खुटला. माजा वाढीला लागलेला त्याच्या डोळ्यांना बघवंना, जपून वाग. एखाद्यावेळी दगाफटका करायला तो कमी करणार न्हाई. काळीज न्हाई त्याला !" बापाचे हे बोल ऐकताच मार्तंडा म्हणतो, "मला ठावं हाय. पण तू काय बी घोर करु नगंस. हाकडंतकडं कराय लागला, तर कच्चा खाईन त्येला !" (पृ. ४०) ह्या संवादावरुन ग्रामीण भागातील लोक एकमेकांविरुद्ध अविश्वास दाखवून भाऊबंदकी जोपासताना दिसतात. अशा स्वरुपाच्या 'सोबत', 'जत्रा'('वारी'-१९६२), 'शमसू मुलाण्याला हरण सापडते'('बाजार'-१९७७), 'लढत'('उंबरठा'-१९६०) ह्या कथा माणदेशातील भाऊबंदकी दर्शविणाऱ्या म्हणून सांगता येतात.

- माणुसकी :

माडगूळकर हे माणसांकडे सूज्ञतेने व सहानुभूतीने पहातात.ह्याचा परिणाम त्यांच्या साहित्यातील समग्र जीवनचित्रणावर झालेला दिसतो. मानवी समाज आणि त्याभोवतालचा परिसर, निसर्ग, प्राणी ह्या सर्वांकडे माडगूळकर एकात्मतेने पाहतात. त्यांच्या मते, माणूस आणि निसर्ग ह्यात द्वैवभाव नाही, तर अभिन्नता आहे. माणूस हा निसर्गाचाच एक घटक आहे. जसे झाड, हरीण; तसाच माणूस. तो निसार्गापेक्षा कोणी वेगळा नाही, ही त्यांची प्रतीती आहे.[२०]

'माणदेशी माणसे' (१९४९) ह्या कथासंग्रहातील 'बन्याबापू' ह्या कथेतील बापू हा गावातील प्रत्येकाला मदत करतो, प्रत्येकाची खुशाली विचारतो, बोलताना आदरार्थी बोलतो. बापूची माणुसकी दर्शविणारे हे सर्व वर्णन आहे. गावातील साठ वर्षाचा म्हातारा असला, तरी 'अरे ए गोंदा, इकडं ये.... त्या संभा पाटलाच्या बागेत जा आणि चांगली पिवळी जर्द लिबं घेऊन ये चाळीस पन्नास. बापूंनी मागितली आहेत म्हणावं !' (पृ. ५४) ह्यावरुन बापूंना

स्वत:बद्दलचा आत्मविश्वास किती प्रबळ होता, हे दिसते. कारण आपण दुसऱ्याला नि:स्वार्थीपणे मदत केली, तर आपला ही शब्द लोक मोडू शकत नाहीत, हेच स्पष्ट होते.

माणदेशातील माणूस हा प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेतो, हाही गुण त्याची माणुसकी दर्शविणाराच म्हणावा लागेल. 'माणदेशी माणसे'(१९४९) ह्या कथासंग्रहातील 'रामा मैलकुली' ह्या कथेत रामाला स्वत: कथाकार व्यंकटेश माडगूळकर त्याच्या बायकोविषयी विचारतात. त्यावेळी रामा म्हणतो, "मी न्हाई केली वासपुस ! आपल्याजवळ ऱ्हान्याची तिची जर विच्या न्हाई, तर कशाला जोरा करायचा ? जाऊंदेल म्हनालो, कुटं बी सुकांत असली म्हंजे झालं !" (पृ. २६) ह्यावरुन माणदेशातील परिस्थितीने गांजलेला माणूस आपल्या बायकोविषयीची मानवतेची भावना अशी व्यक्त करतो, ह्याचे रामा हे प्रतिनिधीक उदाहरण मानावे लागते. 'गावाकडच्या गोष्टी'(१९५१) ह्या कथासंग्रहातील 'भुताचा पदर' मध्ये नाना बामणाचे दुकानदाराने केलेले आदरातिथ्य हा माणुसकीचाच एक भाग आहे. 'माणदेशी माणसे' (१९४९) ह्या कथासंग्रहातील 'बिटाकाका' ह्या कथेतील बिटाकाका हे आटपाडी ते कुंडल हे साठ ते पासष्ट मैलांचे अंतर आपल्या पुतण्याला भेटण्यासाठी पायी कापतात, येथेही माणुसकी हीच प्रामुख्याने जाणवते, 'देवा सटवा म्हार' ('हस्ताचा पाऊस' - १९५३), 'गंगाराम'('व्यंकटेश माडगूळकरांच्या निवडक कथा'-१९६४), 'वारी'('वारी'-१९६२) ह्या कथा उदाहरणादाखल सांगता येतील.

- रुढी व परंपरा सांभाळणारे लोक :

व्यंकटेश माडगूळकरांचे माणदेशी जग हे आधुनिक युगाच्या जाणिवा, नव्या औद्योगिक नागर संस्कृतीतील ताणतणाव ह्यांच्यापासून दूर असलेले जग आहे. त्यांच्या कथेतून व्यक्त झालेले माणदेशी माणसांचे, त्यांच्या जगण्याचे, परंपरांचे आकलन हे त्यांच्या स्वत:च्या आकलनातून निर्माण झालेले आहे. म्हणून त्यांच्या कथेत रुढी-परंपरा सांभाळणारे लोकही मोठ्या प्रमाणावर दिसतात. माणदेशातील परंपरा समजून घेताना तेथील ग्रामजीवनही समजून घ्यावे लागते. माडगूळकरांच्या कथेतील माणसे ही सर्वसामान्य माणसे आहेत. ह्या सामान्य माणसांची सुखदु:खे, रुढी-परंपरा ह्यामधूनच त्यांचे माणदेशी कथाविश्व उभारलेले दिसते.

'ओझं' १९८७ ह्या कथासंग्रहातील 'गंगाराम' ह्या कथेतील गंगाराम हा आपल्या माकडवाला जमातीबद्दल कथाकाराला म्हणजे व्यंकटेश माडगूळकरांना सांगत असतो. लग्न

ह्या परंपरेबद्दल तो म्हणतो, "आमच्या जातीत मावळ्याला पैका द्यावा लागतो. आई -बापाचा काय हक्क न्हाई पोरीवर. दाल्ला मेला ; तर तिचा संबाळ दिरानं करायचा. " (पृ. २०३) ह्या ठिकाणी माकडवाला जमातीमधील ही रूढी - परंपरा माणदेशातील वैशिष्ट्यपूर्ण अशीच म्हणावी लागेल.

'उंबरठा'(१९६०) ह्या कथासंग्रहातील 'ओझं' ह्या कथेतील सोमा व त्याची बायको लाडाबाई दारिद्र्याने गंजून गेले आहेत. बाळंतपण ही स्त्रीच्या आयुष्यातील महत्त्वाची घटना आहे. ते व्यवस्थितपणे आपल्या घरातच व्हायला पाहिजे, अशी रूढी ग्रामीण भागात पाहवयास मिळते. परंतु सोमा आपल्या गरिबीमुळे लाडाबाईला ' चोरी कर म्हणजे तुला तुरुंगवास होईल. मग तेथे बाळांतपण सुखरुप होईल,' असे सांगतो. त्यावर लाडाबाई म्हणते, "मी झाडाच्या आडुशाला बाळंत हुईन, आन् नदीच्या पाण्यात पोरगं धुईन; पर झेलात न्हाई जायाची. परान गेला. तरी न्हाई जायाची." (पृ. १४६) येथे ह्या माणदेशी स्त्रीने आपली रूढी सांभाळलेली दिसते.

माणदेशातील अस्पृश्य जातीतील लोक आपल्या जुन्या रूढी - परंपरा मनापासून सांभाळताना दिसतात. 'हस्ताचा पाऊस' (१९५३) ह्या कथासंग्रहातील 'देवा सटवा महार' ह्या कथेत स्पृश्यांच्या आशिर्वादाने अस्पृश्य लोक जीवन जगत असतात, अशी रूढी आहे. ह्यासंदर्भात देवा म्हणतो, "पाटलाचं काम एगळे, त्येंच्या खरकाट्यावर जगलुया. ते दोन जोडं मारत्याली आन् पुना पोटाशीबी धरत्याल." (पृ. २४) ह्यातून रूढी - परंपरांचे जतन माणदेशी कथेतून जाणवते. अस्पृश्य समाजातील लोकांना मंदिरात प्रवेश नाकारला जातो, ह्या रूढीबद्दल 'वारी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'वारी' ह्या कथेतील अर्जुना म्हणतो, "देवा, मी आत येनं खरं न्हवं. मी म्हार. वंगाळ जातीचा. हे हाड पयलंच बाटलेलं हाय ते घिऊन मी तुझ्यापाशी कसा येऊं ! देवा, माज्याच्यानं व्हनार न्हाई. सरकारनं आमा लोकास्नी तुज्यापाशी जान्यास परवानगी दिली, हे खरं , पन जानारे जातील ! देवा, मी मातूर येनार न्हाई ! मी माजी पायरी सोडनार न्हाई. वाडवडील वागत आलं, तसाच मी बी वागंन. देवा इटुबाराया, ह्यो बाटलेला धी घेऊन तुज्या देवळात येनार न्हाई. देवा, आपली लायखी न्हाई."(पृ. ८) येथे ही रूढी परंपरा माणदेशात सांभाळल्या जातात, हेच स्पष्ट होते. 'नगरी'('वारी'-१९६२), 'दुष्काळ'('बाजार'-१९७७), 'विपरीत घडले नाही'('हस्ताचा पाऊस'- १९५३), 'बेत'('गावाकडच्या गोष्टी'- १९५१), 'गुणाआई'('काळी आई'-१९६२) ह्या कथा अजून उदाहरणादाखल सांगता येतील.

● माणदेशी स्त्रीचे दु:ख आणि एकाकीपण :

व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेतील स्त्री ही मागास वाटते. पुरूषांच्या बरोबरीने तिला स्थान नसल्याचे निदर्शनास येते. स्त्री ही एक उपभोगाची वस्तू आहे, असेच थोडेसे चित्रण येते. माडगूळकर स्त्रियांपासून दूर राहिल्याचे लक्षात येते. त्यांच्यावरील संस्काराचाही हा भाग आहे. परंतु त्यामुळे त्यांच्या कथेतून येणारे स्त्रीचित्रण हे तोकडे वाटते. माणदेशी स्त्रीचा विकास झाल्याचे त्यांच्या कथेतून जाणवत नाही. तरीही माडगूळकरांनी रेखाटलेल्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा ह्या एका साच्यातील नाहीत, हे लक्षात येते. दैन्यदारिद्र्यातून निर्माण होणाऱ्या दु:खाच्या विविध छटा त्यांनी साकारल्या आहेत.

'जांभळाचे दिवस' (१९५७) ह्या कथासंग्रहातील 'बाई' ह्या कथेतून माडगूळकरांनी बालविधवा शिक्षकेची मानसिक घुसमट व्यक्त केलेली आहे. सर्वजण आपल्याकडे वाईट नजरेने बघतात. आपल्या शीलाच्या संरक्षणासाठी गल्लीतील सर्वांनी यावे, असे बाईंना वाटते. त्यांच्याच शाळेतील वाळिंबेमास्तर वयस्करपणाचा एकमेकांना आधार शोधण्यासाठी बाईकडे बघतात, तेव्हा बाईंना विचित्र वाटते. त्यामुळे बाई म्हणतात, "तुम्ही यापुढे माझ्याशी मुळीच बोलत जाऊ नका. मला फार त्रास होतो. वरचेवर मी तुम्हाला सांगितलं, तरी पुन्हा तुम्ही माझ्यांशी का बोलता ? मी अशातली नाही, हे तुम्हांला ठाऊक नाही का? आजपर्यंत माझ्या हातून काहीहि घडलं नाही. धुतल्या तांदळासारखी मी राहिले आहे. तुम्ही मला का डाग लावता ? आज मी शेवटचं सांगते, याउप्पर आपले संबंध तुटले. तुम्ही माझ्याशी बोलत जाऊ नका, मला नमस्कार करु नका, मी तुम्हाला करणार नाही !"(पृ. २४८) ह्यामधून बाईंचे एकाकीपण व दु:ख व्यक्त झालेले दिसते. 'उंबरठा'(१९६०) ह्या कथासंग्रहातील 'दुबळा' ह्या कथेतील नामाची बायको पवित्रा ही आपल्या नवऱ्याला म्हणते, " माज्यावर कशाला राम काडतोस ?... मी काय केलंय? तुझ्यासाठी काय करायचं ठेवलंय ?... तू नावाचा नवरा... कधी - सुख दिलंस?... कधी चार गोड घास खाऊ घातलंस ? माजी हौस कधी केलीस?... आज पंधरा वर्सं वनवास भोगतीय तुझ्यासगं गुरासारखी राबतेय... काय धनं लावलीस तू... ? अरं, तू मला एकांदं पोर तरी दिलंस का ?" (पृ. १२२) 'हस्ताचा पाऊस' (१९५३) ह्या कथासंग्रहातील 'असंच' ह्या कथेतील येसाच्या मुलाला भूक लागते. घरात खाण्यासाठी काहीच नसते. येसा सारखं खोटं बोलते. परंतु मुलासाठी तिला खूप वाईट वाटते. मुलगा घरातील हळकुंड भाजून खातो. येसाला रडू कोसळते. तेव्हा ती म्हणते, "देवा, ह्यापरीस

पटकीसारख्या एखाद्या रोगानं मारुन का, रं, टाकलं न्हाईस गरिबाला?... " (पृ. १०९) ह्या सर्व संवादावरुन माणदेशी स्त्रीच्या जीवनातील दु:ख प्रकर्षाने जाणवते.

माडगूळकरांच्या माणदेशी कथेत स्त्रीच्या जीवनातील असाहाय्यता जाणवते. बाळंतपण व्यवस्थित व्हावे, म्हणून चोरी करुन तुरुंगात आश्रय घ्यायचा आडमार्ग उरलेली 'ओझं'('उंबरठा' १९६०) मधील लाडाबाई; 'सीताराम एकनाथ' मधील सर्वबाजूंनी अडवल्या गेलेल्या विधवा सुंद्रा आणि परित्यक्ता कोंडा ह्या मायलेकी ('सीताराम एकनाथ' १९६६); वैधव्याने असाहाय्य बनलेल्या, एकत्र कुटुंबातील जाचाखाली भरडत राहिलेल्या, मुलीच्या लग्नासाठी लाचार बनलेल्या 'काकींच्या पाटल्या' ('सीताराम एकनाथ' १९६८) मधील काकी, तारुण्याच्या बहराने अस्वस्थ अशी विवाहित 'धार'('काळी आई'-१९६२) मधील शालिनी, स्त्रीचे मन असूनही स्त्रीपणाचे शारीरिक देणे न लाभलेली शापित 'गुणाआई'('काळी आई'-१९६२); स्त्रीच्या दु:खाची व एकाकीपणाची अशी विविध रुपे 'सर्व्हिस मोटार', 'गोकुळा', 'अनुभव', 'कमळी' ('काळी आई'- १९६२), 'काका'('गोष्टी घराकडील'-१९५९), 'लोणी आणि विस्तू'('रानमेवा'-१९६४) इ. कथांमधून पहावयास मिळतात. माणदेशातील ह्या स्त्रीचित्रणामधून माडगूळकरांच्या माणदेशी कथेतील स्त्रियांचे माणूसपण, जिवंतपण हिरावून घेतल्याचे निदर्शनास येते.

- माणदेशातील जाती - जातींमधील संघर्ष :

माणदेशातील ग्रामजीवन समजून घेण्यासाठी त्याठिकाणी असणारे जाती-जातींमधील संघर्ष पहावे लागतात. वेगवेगळ्या जातींमध्ये वेगवेगळे संबंध असतात. त्यात अल्पसंख्यांक आणि बहुसंख्यांक असा एक संबंध असतो. अल्पसंख्यांक लोकांची माणदेशात परवड होते. ह्यामध्ये व्यक्तींची भांडणे, पैशाचे व्यवहार, शेतीचे व्यवहार अशा अनेकविध जीवनाचे पैलू माडगूळकरांनी आपल्या कथात्मक साहित्यातून व्यक्त केलेले दिसतात. अस्पृश्यवर्ग हा माणदेशातील सामाजिकतेचा एक महत्त्वाचा घटक आहे. तरीही स्पृश्य समाज अस्पृश्य समाजावर स्वार्थापोटी कस अन्याय करतो, ह्याचे चित्रण 'उंबरठा' (१९६०) ह्या कथासंग्रहातील 'गोडेपाणी' ह्या कथेत आले आहे.

उन्हाळ्याच्या दिवसात महारवाड्यात तक्क्याच्या समोर बसून महारमंडळी पाण्याच्या गोष्टी बोलत बसलेली असतात. गावात सवर्णांना ज्या विहिरीचे पाणी असते, ती विहीर खाऱ्या पाण्याची असते. तरीही गावकरी दलितांना तेथील पाणी देत नसतात. त्यामुळे सवर्णांच्या

परवानगीने स्वतंत्र विहीर काढावी, ह्यासाठी विचारविनिमय करुन विहीर काढली जाते. त्याला गोडे पाणी लागते. महारांच्या विहिरीला गोडे पाणी लागल्याचे पाहून सवर्ण गावकऱ्यांची बुद्धी फिरते. ''मग, लेकांनू, तुमच्यावर फिर्याद केली पायजेल. दुसऱ्याची जागा दांडगाव्यानं घेऊन त्यात हीर काढली तुमी. ही काय मोगलाई हाय व्हय, रं? तुम्ही चढ झाला गावाला ?'' (पृ. २१) असा दम देऊन वाणी कोर्टात जाण्याची धमकी देतो. परवानगी देणारा येदू बकू पाटीलही बदलतो. महार लोक घाबरुन जातात. त्यांचा पुढारी येताळानाना ह्याच्या हे सर्व लक्षात येते. तो म्हणतो. ''गोडं पाणी लागून सगळा घोटाळा झाला... गावानं खारं पानी प्याचं, आन् महारवाड्यानं गोडं ! ही गोष्ट गावकऱ्यांना कशी बरी वाटंल ?'' (पृ. २२) शेवटी प्रकरण तडजोडीने मिटवतात. गोड्या पाण्याची विहीर सवर्णांच्या ताब्यात दिली जाते. मात्र त्या विहिरीतील पाणी महारांना दिले जात नाही. एखाद्या बाईने पाणी दिलेच, तर गावातल्या बायका म्हणतात, ''त्यांच्यावर उपकार करायचीसुद्धा सोय नाही. ! काय तरी, गं, बाई, मानसं !'' (पृ. २३) येथे माडगूळकरांनी माणदेशातील अस्पृश्य समाजावर होणाऱ्या अन्यायाचे विदारक चित्रण केले आहे.

'सीताराम एकनाथ' (१९६६) ह्या कथासंग्रहातील 'अखेर आकण्या घरी आला' ह्या कथेत कुलकर्ण्यांचा मुलगा आकण्याची कुरापत काढून त्याला मारतो. आकण्या न्याय मागण्यासाठी गावातील प्रतिष्ठित मंडळींपुढे जातो, तेव्हा सोनारबाबा म्हणतात, ''अरं, कशाचा न्याय आन् काय घेऊन बसलास्. आगळीक झाल्याशिवाय मारायला ते काय वेडे आहेत ? तुम्ही , लेको, काय तरी कुठं बोलता शहाणपणानं आणि मग मार खाता.''(पृ. १३०) ह्यावरुन गावकऱ्यांना ह्यांची सत्यता पडताळावी, असे वाटत नाही. ब्राह्मणाला निर्दोष मानून महाराचीच चूक मानून ते बोलत असतात. म्हणजेच अस्पृश्यांनी नेहमी हीनदीन होऊनच राहावे, अशी अपेक्षा वरच्या जातीतील लोकांची असलेली माणदेशात दिसते. 'गावाकडच्या गोष्टी' (१९५१) ह्या कथासंग्रहातील 'वहाणा' ह्या कथेत फाटलेले पायताण पांडाने शिवण्यास आणल्यावर गोपानाना उपरोधाने म्हणतो, '' कशाला आनलं जी, हे! '' ''कुत्र्यापुढं टाकून बघा, तेसुद्धा तोंड लावणार नाही ! '' असं तो म्हणतो. अस्पृश्यांच्या ह्या उद्गारामधून त्यांचे भयानक दारिद्र्याच जाणवते.

दोन व्यक्तींमधील भांडण हे दोन जातींमधील भांडणाच्या पातळीवर कसे जाते, ते ''गावाकडच्या गोष्टी'' (१९५१) ह्या कथासंग्रहातील 'आडिट' ह्या कथेत सांगितले आहे. ह्यातील गणा चलपते गोपा व्हलराला म्हणतो, '' व्हलरं माजलीत, जो कोणी मऱ्हाट्याच्या

पोटचा असंल, त्यानं व्हलरांना धडा द्यावा.'' (पृ. ११८) ह्या संवादावरुन माणदेशातील सामाजिक वास्तवाचे चित्रण समोर उभे राहते. वरच्या जातीची बरोबरी करण्यासारखे वागणे, हा ग्रामीण भागात गुन्हा ठरतो. गावकऱ्यांचा दलितांकडे बघण्याचा दृष्टिकोन ''उंबरठा'' (१९६०) ह्या कथासंग्रहातील 'खेळ' ह्या कथेतून व्यक्त झालेला आहे. तसेच बायकांची अब्रू घेण्यास चटावलेल्या पाटलाच्या भगवंताचे नाक कापणारी गाढवी सोनाराची लक्ष्मी ''वारी'' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'असलं लई बघितल्यात' ह्या कथेतून व्यक्त झाली आहे. माडगूळकरांनी सवर्ण विरुद्ध दलित असा संघर्षच आपल्या माणदेशी कथेतून मांडलेला नाही, तर खेडेगावतील जीवन हे सर्व जाती - जमातींवर अवलंबून असते, ह्या सर्वांतून ग्रामव्यवस्था आकाराला येते, हे ही स्पष्ट केलेले आहे. 'वडरवाडीच्या वस्तीत' 'विपरीत घडले नाही' ('हस्ताचा पाऊस'-१९५३), 'वारी'('वारी'-१९६२), 'वहाणा'('गावाकडच्या गोष्टी'-१९५१), 'पारधी', 'नंदीवाला'('जांभळाचे दिवस'-१९५७), 'गोविंदा कातकरी', 'भाऊ वैद' ('घरदार'-१९५९) ह्या अशाप्रकारच्या माणदेशी कथा आहेत.

### ४.४.३. माणदेशातील व्यक्तिंचे व्यक्तिचित्रण :

'माणदेशी माणसे' (१९४९) हा व्यक्तिचित्रणात्मक कथासंग्रह सर्वात महत्त्वाचा आहे. माणदेशाच्या मायभूमीत माडगूळकर ज्या पद्धतीचे जीवन जगले, ज्या लोकांनी त्यांना ओढ लावली, ज्यांनी त्यांचे आयुष्य घडवले; त्या व्यक्तींनीच त्यांना लेखनासाठी प्रवृत्त केले. ह्या कथासंग्रहांमध्ये प्रत्येक व्यक्तिरेखेबद्दलचा सडेतोडपणा, आपलेपणा, जिव्हाळा अवतरला आहे. ह्या व्यक्ती त्यांना परक्या नाहीत, तसेच ह्या व्यक्तींनाही ते परके नाहीत. म्हणूनच नामा मास्तर त्यांना ''रामराम, यंकापराव'' म्हणतो, तर तांबोळ्याची खाला 'यंकट', म्हणून हाका मारते. कथाकार स्वतः त्या व्यक्तिरेखेबरोबर एकरुप होतो. अन्नाला महाग झालेल्या धर्मा रामोशाबद्दल त्याच्या मनात कळवळा निर्माण होतो.' ह्या संदर्भात शिवाजी सावंत लिहितात,

'माणदेशी माणसातील' जालंदर ऊर्फ झेल्या आजही माझ्या मनातून हलता हलत नाही. बदली झाल्यामुळं माडगूळकरमास्तर (गुरुजी नव्हे) गाव सोडून जायला निघाला. झेल्या मास्तरला निरोप द्यायला वेशीपर्यंत आला. आता यंकाप मास्तराचे शब्दच सरले. हा माणदेशी मास्तर - लेखक -त्याहून अधिक माणदेशी माणूस - (पुढं लिहूच शकला नाही. तात्यांनी लिहिलंय - ''पिंपरीच्या झाडाखाली मी आणि

झेल्या गळ्यात गळा घालून रड रड रडलो.'')[२१] '' ह्यावरुन माडगूळकरांच्या कथेत माणदेश कसा आहे, हे लक्षात येते.

साहित्याला एक मानवमूल्य असते, हे माडगूळकरांनी ओळखले आहे. तमासगिरांचे खाजगी जीवन व्यक्त करताना गणा महार उत्तर देतो, जीवन हे फक्त जगायचं असतं, सोसायचं असतं, त्याविषयी तक्रार करुन उगीच स्वत:ला व इतरांना दु:खी कशाला करायचे ? 'माणदेशी माणसे' (१९४९) ह्या कथासंग्रहातील ''गणा महार'' ह्या कथेतील गणा महार म्हणतो, ''साहेब, आमा लोकांना तुमी बघावं तमाशाच्या थेटरात, बोर्डावर उभं राहिल्यावरच. त्याच बाकीचं काय बघू नये. मिठाई खावी पण मिठाईचा कारखाना कधी बघू नये.''(पृ. १२३) अशा कथांमधून दु:खाच्या छायेत वावरणाऱ्या माणदेशी माणसांमागे माडगूळकरांची लेखणी फिरत राहिलेली जाणवते. माडगूळकरांच्या कथेतील दु:ख हे माणसाच्या माणुसकीची सावली आहे. आपले दु:ख आपणच भोगले पाहिजे, हे त्यांना कळून चुकले आहे. ''माणदेशी माणसे'' (१९४९) ह्या कथासंग्रहातील 'मुलाण्याचा बकस' ह्या कथेतील बकस शेवटी म्हणतो, ''न्हाई, मी मुलाण्याचा बाबालालचा पोरगा. तुमाला ठावं असंल, नसंल, तुमी कशाला बघताय् ! मेला तो. लई दिस झालं. मा बी मेली. चांगली हुती. मला म्हनायची, 'बकस मेरा लाल है', म्हनायची 'तुझी शादी करायची' चांगली हुती पर मेली.'' (पृ. ४२) ह्या व्यक्तिचित्रणातील कारुण्य खरे आहे. दु:खाबद्दल ही माणसे आक्रस्ताळेपणा करीत नाहीत किंवा निराशही होत नाहीत. ह्याच कथासंग्रहातील 'रामा मैलकुली' ची अस्तुरी त्याच्या गरिबीच्या संसाराला कंटाळून निघून जाते. पण तिची विचारपूस करुन परत तिला घरी आणावी, तिच्या सांगण्याप्रमाणे गाव सोडून पैसे कमवायला जावे, ह्याला त्याची तयारी नसते. पहा: ''मी न्हाई केली वासपूस ! आपल्याजवळ ऱ्हान्याची तिंची जर विच्छा न्हाई, तर कशाला जोरा करायचा ? जाऊदेल म्हणालो, कुटं बी सुकात असली, म्हंजे झालं !'' (पृ. २६), 'वारी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'वारी' ह्या कथेतील अर्जुना विठोबाला म्हणतो, ''देवा, मी आत येनं खरं न्हवं. मी महार... ह्यो बाटलेला धी घिऊन देवळात कसं जावं. आपली वहिवाट कशी मोडावी ? पायरी कशी सोडावी ? '' (पृ. ८) 'बन्याबापू' सारख्या तालेवार ब्राह्मणावर जेव्हा संपूर्ण घर जळून जाण्याची वेळ येते, तेव्हा ''ठीक झालं, घुशी आणि ढेकूण फार झाले होते,'' असे म्हणून ते रानात रहायला जातात. ('माणदेशी माणसे' १९४९, पृ. ५४) ह्या सर्वांच्या पाठीमागे माडगूळकरांवर लहानपणी झालेले संस्कारच कारणीभूत आहेत. त्यांची आई त्यांना लहानपणी गोष्टी सांगत असे. त्या गोष्टीत माणसाला

भोगण्यास लागणारे दु:ख असावयाचे. त्याचाच त्यांच्या मनावर परिणाम झाल्याचे त्यांच्या कथेतून दिसते.

माडगूळकरांच्या कथेतील काही दु:खे ही माणदेशी सामाजिक परिस्थितीमुळे निर्माण झालेली दिसतात. आपल्यावर विनाकारण राग धरला व शिव्या दिल्या, म्हणून देवा सटवा महाराने देवी डॉक्टरवर जोडा उगारला. पण त्याला त्याबद्दल तुरुंगात जावे लागले. ('देवा सटवा महार') बाबालाल दरोडा पडूनही चोराला पकडायला जात नाही. कारण पंचायतीसमोर काही चालत नाही. तेव्हा आपले सरकारी यंत्रणेसमोरही काही चालणार नाही, ह्याची त्याला खात्री वाटते, ('काय सुदिक गेलं न्हाई'). जातिव्यवस्थेमधून निर्माण झालेली ही दु:खे आहेत. माणदेशातील ग्रामीण समाजात हे ठळकपणे पहावयास मिळते. दु:खाच्या जोडीला दारिद्रय आहे. मानवी दु:खाबद्दलची ही आपलेपणाची भावना स्वत: माडगूळकरांनी स्वीकारली असल्यामुळे त्यांच्या माणदेशाचे चित्रण करणाऱ्या कथात्मक साहित्यातील व्यक्तिदर्शनात कृत्रिमतेचे अवडंबर माजलेले दिसत नाही. ह्यासंदर्भात गंगाधर गाडगीळ म्हणतात, "त्यांचे सारे लिखाण हे मूक अश्रूंनी लिहिले आहे. तेथील दारिद्रय फड्या निवडुंगासारखे पसरलेले असून माडगूळकरांच्या साऱ्याच पात्रांच्या अंगावर ओरखडे उठलेले दिसतात. वाऱ्यापावसाविरुद्ध कोणी तक्रार करीत नाही, तशीच या दारिद्र्याविरुद्धही त्यांच्या कथेतील पात्रे तक्रार करीत नाहीत."[२२] जगण्याच्या प्रेरणेला अग्रहक्क दिल्यामुळेच त्यांच्या काही कथांमधून माणसे झगडताना दिसतात.

व्यंकटेश माडगूळकरांनी माडगूळच्या परिसरात आढळणाऱ्या लोकांचे दु:ख जवळून पाहिले, अनुभवले म्हणूनच त्याबद्दल ते आत्मीयतेने बोलताना दिसतात. त्यांच्या कथेतील पशुपक्षीसुद्धा माणदेशातील दु:खाचे साक्षीदार आहेत. हे दु:ख पशुपक्षांनाही आहे. बिचाऱ्या चिमण्या काडी काडी गोळा करुन घरटे बनवितात, तेथे मुंग्या लागतात. त्यातून माणदेशी दु:खाबद्दलची त्यांची जाणीव प्रकर्षाने व्यक्त होते. त्यांचे माणदेशी व्यक्तिदर्शन हृदयस्पर्शी असते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखा मोकळेपणाने आपले दु:ख वाचकांसमोर सादर करताना दिसतात. कथाकार येथे अलिप्त राहिलेला दिसतो. 'मला बी इस अन् आट झाली. पर तुमी झाला अम्मलदार आन आमी मातूर ऱ्हायलो हे असं. जलमभर असंच दळिद्री ऱ्हाऊन आमी मसणवाटंला जायचं' असे म्हणणारा 'रामा मैलकुली' (माणदेशी माणसं - १९४९, पृ. २७) किंवा "चुलत्यानं डागलंय्, खुरपी तापवून डाग दिल्यात. डागल्यावर येड लागलेलं माणूस बरं

हुतं, मी काय वेडा हाय का ? आं ?" (पृ. ४५) असे लहान मुलाप्रमाणे विचारणारा 'मुलाण्याचा बकस', त्यामुळेच मानवी स्वभावाबद्दलचे त्यांचे आकलन आश्चर्यकारक वाटते.

माडगूळकरांच्या बहुतेक कथांमधून आपल्याला भेटतात ती माणदेशी माणसं ! त्यांच्या सहजतेमुळे ती आपल्या मनात कायमची घर करुन बसतात. ह्यासंदर्भात गंगाधर गाडगीळ म्हणतात, "अशी माणसे भेटली की, शहरी माणसाला सुखावल्यासारखे वाटते. ती पात्रे निर्व्याज आहेत, निष्पाप आहेत. आपल्या पाठीवरचे ओझे ते त्यांच्या सहवासात खाली टाकू शकतात, काहीतरी हरवले होते ते मिळाले, असे त्याला वाटते आणि म्हणूनच माडगूळकरांची पात्रे इतकी लोकप्रिय झाली आहेत."[२३] त्यांच्या कथेतील विषय हे प्रामुख्याने माणसांशीच संबंधित असलेले दिसतात. त्यांच्या माणदेशी कथेतील व्यक्ती पोटासाठी धडपडणाऱ्या, दोनवेळच्या अन्नाला मुकणाऱ्या, पालापाचोळा खाऊन जगणाऱ्या दिसतात. 'धर्मा रामोशी' ('माणदेशी माणसे' - १९४९) हा म्हातारपण आल्यामुळे त्याच्याकडून कोणतेही काम होत नाही म्हणून पालापाचोळा खावा लागतो, हे कबूल करतो, 'असंच'('हस्ताचा पाऊस'- १९५३) ह्या कथेतील येसू महारणीचा मुलगा भुकेने वैतागून जेव्हा हळकुंडाचा तुकडा भाजून खातो, त्यावेळी ही भुकेची कळ अंत:करण हेलावून सोडते. व्यंकटेश माडगूळकर ह्यांच्या संपूर्ण कथासाहित्याचा विचार करता, 'माणूस' हाच त्याच्या केंद्रस्थानी आहे, हे प्रकर्षाने जाणवते.

## ४.४.४. माणदेशाचे आर्थिक चित्रण :

माडगूळकरांच्या माणदेशी कथेत ग्रामीण जीवनाचा अस्सलपणा पुरेपूर प्रत्ययास येतो. कथेतून चित्रित होणारे जीवन हे कृषिक्षेत्राशी, गावगाड्याशी निगडीत आहे. हा संपूर्ण परिसर माणदेशाचा आहे. फक्त पावसाळ्यात वाहणारी माणगंगा नदी आणि तिच्या भोवतीचा उघडा - उजाड माळरानांचा प्रदेश अशा परिस्थितीत जीवन जगणारी माणदेशी माणसे, माणदेशात पडणारा वारंवार दुष्काळ, ह्याचा परिणाम तेथील पीक - पाण्यावर आणि शेतीवर होणे अपरिहार्यच आहे. म्हणजेच माणदेशातील लोकांचा आर्थिक स्तर खालावलेला असणार, ह्याचीच जाणीव होते, 'उंबरठा'(१९६०) ह्या कथासंग्रहातील 'खेळ' ह्या कथेतील आर्थिकतेशी निगडीत पुढील चित्रण पहा : 'आज रोजगार द्या ,जी.' चलपत्याला उगीचच राग आला. तो म्हणाला, 'टोप्या, मी काय कुटं जात हुतो व्हय, रं, पठाणावाणी लगीच दारात आलास, ते ?' टोपा गयावया करुन म्हणाला, 'न्हाई, मालक घरात कायसुदीक न्हाई.

तुमच्यातलं दानं न्हेऊन दळू, तवा भाकरी मिळंल.' (पृ. ३९) ह्यावरुन माणदेशातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या खूपच मागास असलेला दिसून येतो.

माणदेशात सतत दुष्काळ पडत असल्यामुळे तेथील लोकांचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे असलेले दिसते. ह्याच परिस्थितीतून माणदेशात आर्थिकदृष्ट्या अविश्वास, फसवाफसवीचे अनेक प्रकार घडताना दिसून येतात. प्रतिकूलतेतून निर्माण होणारा संयमीपणा माणदेशी माणसांमध्ये स्पष्टपणे दिसून येतो. 'काळी आई' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'सर्व्हिस मोटार' ह्या कथेतून प्रतिकूलतेतून व्यक्त होणारा संयमीपणा पुढीलप्रमाणे : 'सगळ्या गावाप्रमाणेच त्यांच्या गरजा कमी होत्या. गावात पिकणारे धान्यधुन्य मिळत होतेच. बयत्याचे करडे हातघाण्यावर रगडले, म्हणजे तेल मिळत होते. मिरच्या होत्याच. गावात किराणा मालाचेदेखील दुकान नव्हते. मग पैसा लागतो कशाला ? येऊनजाऊन पैसा लागे, तो धडुत्याला. पण गावचा मोमीन जाड अटपळी काढीत असे. पैशाऐवजी त्याला ज्वारी-बाजरी घातली. तरी चालत होते.' (पृ. ३) ह्यावरुन माणदेशाचे आर्थिक चित्रण आपल्याला जाणवते.

माणदेशात ह्या प्रतिकूल परिस्थितीमुळे शिक्षण, व्यापार, उद्योगधंदे, वहातूक ह्या प्रत्येक क्षेत्रात मागासपणा निर्माण झाल्याचे दिसते. आर्थिकदृष्ट्या माणसाजवळ असणारे नियोजन माणदेशी माणसाजवळ असलेले दिसत नाही. कोठूनही थोडासा पैसा आल्यास तो चैनीच्या रुपात खर्च होताना दिसतो. 'गावाकडच्या गोष्टी' (१९५१) ह्या कथासंग्रहातील 'बोजा' ह्या कथेतील गणा आणि गरीब नेवरा ह्यांच्यातील पुढील संवाद पहा :

"अन्नाच्यान् खोटं न्हाई, गणा ! हातात अग्नी हाय. लई वडावड चाललीया माजी !"

"कंच्या गोष्टीची ?"

"पैक्याची - आन् दुसरी कंची ?"

"लबाड बोलतोस !"

"आत्ता ! तुज्या गळ्याच्यान् र, सुटली बोल -"

"खरं तर असू ने. पर घरची मानसं चांगली न्हाईत, गणा. म्हातारी अन् बायकू माजं रगत खात्यात !"

"ते कसं?"

"म्हातारी मालासाठी पैका घेती. बायकूची रहाणी बामणिणीवाणी खर्चाची. लोकांचं देणं लई झालंय् बग मला !"

"आं ?"

"व्हय, त्येनंच खाल्ल्यालं आन्न माज्या अंगी लागंना !" (पृ. ३)

ह्यावरुन माणदेशातील पुरुषांबरोबर तेथील स्त्रीसुद्धा आर्थिकदृष्ट्या अविचारी असल्याचेच दिसून येते.

माणदेशात सततच्या अवर्षणामुळे लोकांचे हाल होतात. जिराईत शेती असलेल्या लहान शेतकऱ्याचे पीक नाही, उत्पन्न नाही; मग जगण्याचाच प्रश्न निर्माण होतो. संपूर्ण परिस्थिती बिघडत जाते आणि पोट भरण्यासाठी, मोलमजुरी शोधत गाव सोडावे लागते. कामाच्या शोधात त्यांच्या जीवनाची शोकांतिका बनते, 'गोष्टी घराकडील' (१९५९) ह्या कथासंग्रहातील 'दादा' ह्या कथेत स्वत: कथाकार व्यंकटेश माडगूळकर ह्यांच्यावर आलेल्या आर्थिक अरिष्टाचे चित्रण अनेक ठिकाणी पहायला मिळते, ते असे :

"माडगुळला शेतवाडी होती. घरादार होते. पण कष्टाअभावी त्याची पडझड झाली होती. विहिरी पडल्या होत्या. जमिनीची नांगरट पाच-पाच वर्षांत झाली नव्हती. घराला पुढचे दार लावायचे राहून गेल्याने बामणाच्या वाड्यात लोक गुरे बांधत होते ! आणि आम्ही अन्नासाठी दाही दिशा फिरत होतो !" (पृ. ७८-७९) ह्या चित्रणावरुन माणदेशात राहणाऱ्या उच्चवर्णीय समाजातील लोकांचे आर्थिकदृष्ट्या हाल होत होते, हे लक्षात येते. ह्यावरुन माणदेशातील इतर अल्पसंख्य समाजातील लोकांची आर्थिक फरफट स्पष्टपणे नजरेसमोर उभी राहते. दारिद्र्य हे माणदेशी माणसांच्या मागे कायमचे लागल्याचे दिसून येते.

दळणवळणांच्या साधना-सुधारणाअभावी माणदेशातील ग्रामीण जीवन आर्थिकदृष्ट्या संकटात सापडल्याचे दिसून येते. पहा : "थोडे सोयीने घ्यायचे. आणा दोन आणे कमी असले, तरी मोटरवाला बेधडक आत बसलेल्या माणसाला खाली उतरवीत असे. चार आठ दिवस थांब, तुझे पैसे देईन, असे सांगितले, तरी त्याचा विश्वास बसत नसे. पुरा दाम जवळ असला, तरच बसणाराने बसावे, नाही तर आपले पैसे कमरेला लावून खुशाल चालत जावे. हातावर पोट असलेले लोक कधी मणपायली मागतात, तेव्हा गावात असे कोणी म्हणत नसे - की पहिले पैसे टाक आणि मग धान्य ने ! वेळ, माणूस ओळखावे लागते. पण मोटरवाला वेळ माणूस ओळखत नसे. पैसा टाका, हा त्याचा रामठेका असे. गावातील काही बलुतेदार मंडळी ... महार, मांग, लोहार - त्यांच्याकडे काय म्हणून पैसे मागायचे ? नडी अडीला त्यांच्याकडून कामे करुन घ्यायची आणि त्यांच्या पोटाला पुरवायचे. पण मोटरवाला बलुतेदारांनासुद्धा जुमानत नसे." ('वारी' - १९६२, 'नगरी' पृ. २१)

व्यंकटेश माडगूळकरांच्या माणदेशी आर्थिक चित्रणात सर्व जाती - धर्मांचे लोक आलेले दिसतात. बहिणा जोगतीण ही त्यातील एक होय. बहिणाचे एका पोलिसावर मन बसते. नाचायच्या कार्यक्रमात तो पोलिस बहिणाला दोन रुपये देतो. ती दोन रुपयाची नोट बहिणा प्रेमाची भेट म्हणून जिवापाड सांभाळत असते. परंतु परिस्थितीसमोर माणूस हतबल कसा ठरतो, ह्याविषयीचे आर्थिक चित्रण 'हस्ताचा पाऊस' (१९५३) ह्या कथासंग्रहातील 'विपरीत घडले नाही' ह्या कथेतून पुढीलप्रमाणे आलेले दिसते : ''महिना - सव्वा महिना उलटून गेला. बहिणाच्या घरातला दाणादुणा पार उडाला. त्या दिवशी तर एक कणही शिल्लक राहिला नाही. नामा हळूच बहिणाला म्हणाला,

'बहिणा, पैसं हायतं कांई ? जुंदळ्याचा कन् न्हाई आज घरात !'

बहिणा काही वेळ गप्प बसली आणि पुन्हा काही निश्चयाने एकदम उठली. खुंटीचे गोठोडे काढून तिने सोडले. नाचायच्या वेळी नेसायला ठेवलेल्या पातळाच्या घडीपोटी असलेली दोन रुपयांची तांबडी नोट काढून तिने नामाच्या हवाली केली,
''आन् जा जुंदळं.'' (पृ. ८६)

ह्या माणदेशी आर्थिक चित्रणावरून तेथील सर्वसामान्य लोकांचे जीवन हलाखीचे, मनाल चटका लावणारे असल्याचे निदर्शनास येते.

### ४.४.५.. माणदेशाचे आध्यात्मिक धार्मिक चित्रण :

व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या माणदेशी मातीशी इमान राखणारी 'माणदेशी माणसे' त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांसह जिवंत केलेली दिसतात. माणदेशात ज्या आध्यात्मिक व धार्मिक परंपरा व जतन केल्या जातात, त्यांचेही ठळक चित्रण माडगूळकरांच्या कथांमधून जाणवते. 'गावाकडच्या गोष्टी' (१९५१) ह्या कथासंग्रहातील 'मारुतराया' ह्या कथेत माणदेशात वानर ह्या प्राण्याला साक्षात देवाचा अवतार मानले जाते, ह्याचे पुढीलप्रमाणे चित्रण येते: ''भजनी मंडळीसहित पोरं रानांत गेली. रामनामाचा गजर करीत त्यांनी मोठ्या मानसन्मानानं वानराला ओढ्यात आणला आणि माणसासारखा जाळला ! नानांच्या जिवाला ही गोष्ट फार लागली. दुखण्यातून बरे झाल्यावर त्यांनी ज्या जागी वानराला मारला, त्या जागी एक दगडी चौथरा बांधला. आता भाविक लोक जातायेता त्याच्या पाया पडतात !'' (पृ. ३५) ह्यावरुन माणदेशातील लोक जुन्या आध्यात्मिक - धार्मिक संकल्पना भक्तिभावाने पाळताना दिसून येतात.

माणदेशातील प्रतिकूल परिस्थितीमुळे त्याठिकाणी धार्मिकता जोपासली जाते. त्यातूनच माणदेशात साधुसंत, बुवाबाजी असे प्रकार वाढलेले दिसून येतात. त्याठिकाणच्या परिस्थितीमुळे लोकांचा सहजासहजी अध्यात्मावर विश्वास बसतो. त्यातूनच साधुसंतांना महत्त्व प्राप्त होते. 'बाजार' (१९७७) ह्या कथासंग्रहातील 'आळ' ह्या कथेत आलेल्या पुढील आध्यात्मिक चित्रणावरुन संतांचा समतेचा दृष्टीकोण कसा असतो, हे स्पष्ट होते: "आबानानांनी विचारलं, "बोवा काही इटाळ नव्हता, तर ही अदावत आपण अंगावर का घेतली ? आमाला का खेटरलं न्हाई ? ह्या बयेला का खेटरलं नाही ?"

बोवा म्हणाले, "मला करुणा आली. मी नाही म्हणालो असतो, तर ह्या माऊलीची तुम्ही काय दशा केली असती ! किती विटंबना तिची झाली असती !" "बोवा, धन्य तुमची !" (पृ. ११०) ह्यावरुन पूर्वीच्या काळी संतांनी जे समाजप्रबोधनात्मक विचार मांडलेले आहेत, त्याच मार्गावरुन माणदेशातील बुवा जातात, हे लक्षात येते. त्यातून माणदेशातील संतांचा मानवता हा गुण दिसून येतो.

माणदेशात चालत आलेल्या परंपरा जतन करण्यात तेथील माणदेशी माणूस धन्यता मानताना दिसतो. दारिद्र्याला कंटाळून माणूस देवधर्माचा आधार घेतो. 'वारी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'बाबू म्हातऱ्याचा शेवट' ह्या कथेत माणदेशात पाळली जाणारी धार्मिकता पुढीलप्रमाणे दिसते: "दगडी पायऱ्यांवर सोटा टेकवून म्हातऱ्या तर चढला. देवळात अंधार येऊ लागला होता. आढ्याची घाट बडवून आत जाताच तो अधिक गडद वाटला. गुरवाने अजून दिवा लावला नव्हता. कोंदट श्वास घेत म्हातऱ्या जरा वेळ उभा राहिला. डोळ्याच्या बाहुल्या मोठ्या होताच त्याला दिसू लागले. शेंदराने माखलेला बलभीम रुईच्या पानांच्या माळा घालून उभा होता. म्हातऱ्याने त्याच्यापुढे डोके टेकले, अंगारा कपाळाला लावला. हळूहळू तो बाहेर आला." (पृ. ४१) माणदेशातील ह्या धार्मिकतेचे सूक्ष्म चित्रण तेथील लोक देवाचाराच्या नावाखाली पाळत असलेली धार्मिकता स्पष्ट करताना दिसून येतात. ह्यातूनच 'देव' ह्या संकल्पनेविषयीचा एक सात्त्विक भाव माणदेशी माणसांच्या मनामध्ये निर्माण झाल्याचे दिसून येते. 'गोष्टी घराकडील' (१९५९) ह्या कथासंग्रहातील 'देऊळ' ह्या कथेत माणदेशी खेड्यात 'मारुती' ह्या देवाविषयी असलेली धार्मिकता वेगळ्या रीतीने स्पष्ट झालेली दिसते. पहा : "रोज सकाळी मारुतीला पाणी घालणारी दहावीस मंडळी गावात आहेत. हे भक्तगण भल्या सकाळीच चंबू आणि धोतर घेऊन विहिरीवर जातात. हर गंगे, हर भागीरथी म्हणून विहिरीत उड्या घेतात. वाफा मारीत असलेले विहिरीचे कोमट पाणी चंबूत

घेऊन ओले धोतर गाळीत मारुतीच्या देवळाकडे येतात. गार पाण्याचा चंबू मारुतीच्या डोक्यावर ओततात. रोज वेगवेगळ्या तीर्थाचे नाही तरी विहिरीचे पाणी मारुतिरायाला स्नानासाठी मिळते." (पृ. ७१) ह्यावरुन माणदेशात जोपासली जाणारी धार्मिकता ठळकपणे दिसून येते. तसेच माणदेशात 'पोथी लावण्याचा' समारंभही महत्त्वाचा मानला जातो. माणदेशातीलच श्रीधरस्वामींचा हरिविजय, पांडवप्रताप लावला जातो. अशावेळी देवळात गर्दी होते. बायका, पुरुष, लहान मुले सर्वजण ऐकण्यासाठी येतात. गावातील महारमंडळी मंदिराच्या बाहेर बसून ती पोथी ऐकत असतात. ह्यावरुन माणदेशात जोपासली जाणारी आध्यात्मिकता व धार्मिकता ही परंपरावादी असल्याचे दिसून येते.

माणदेशात देव-देवतांचे प्रस्थ खूपच मोठे असल्याचे दिसून येते. देवाविषयी आपण काही वाईट बोलू नये, असा समज असल्याचे जाणवते. जर काही वाईट बोललो, वाईट कृत्य केले, तर आपल्या संपूर्ण कुटुंबाचा नाश होणार, अशी भीती असल्याचे जाणवते. ह्यातूनच देवासमोर कोणताही गुन्हा उघडीस येतो. असे दिसून येते. 'देऊळ' ह्या कथेत ह्याविषयी आलेले चित्रण पहा :

"देवळासमोर कुठला खटला यावा आणि पाटलाकडे कुठली फिर्याद जावी, याबद्दल काही नियम नाहीत; पण हा पोच सर्वांनाच असतो. रिपोर्ट, लेखी जबान्या, अटक, तुरुंग - असल्या उठाठेवी देवळापुढल्या कोर्टाला कराव्या लागत नाहीत. एखादा आरोपी फार खट असला, तर त्याला रामोशाकडून तालुक्याला पाठवण्याचा फार्स केला जातो. जेमतेम चार एक फर्लांग वाट चालल्यावर आरोपी कबूल होतो आणि परत फिरून देवळापुढची शिक्षा भोगतो." (पृ. ७२) ह्यावरुन ही धार्मिकता माणदेशी माणसांच्या रोमा-रोमात भिजलेली आहे, हेच निदर्शनास येते.

### ४.४.६. माणदेशाचे भाषिक चित्रण :

माडगूळकरांच्या कथेची लेखनशैली पाहता सरळपणा निर्माण करणारे निवेदन, रेखीवपणा, निसर्गाचे मोजक्या शब्दांमधील वर्णन ही वैशिष्ट्ये जाणवतात. त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा आपली मनोगते व्यक्त करीत असतात. "जांभळाचे दिवस" (१९५७) ह्या कथासंग्रहातील 'बाजारची वाट' ह्या कथेमधील वंचाची देवाने कूस उजवली नाही, म्हणून दु:ख व्यक्त करताना वंचा म्हणते, "आपल्या स्वरुपाची भटी ही अशी सुरेख साधून देवाने काय मिळवले असेल ? पोटी पोर नाही. आठ वर्षे झाली, तरी हे वांझपण फिटत नाही. सगळे उपाय

केले. औषधे खाल्ली. नवससायास केले. देवदेवऋषी केले. पण कशाचा काही गुण नाही असे करतां करतां ही नवती कोमेजून जायची. इतके दिवस आशा करण्यात घालवले, पुढचे दु:खीकष्टीपणांत घालवायचे." (पृ. १२७) "हस्ताचा पाऊस" (१९५३)ह्या कथासंग्रहातील 'त्याची गाय व्याली ' - मधील रामा आपल्या गाईबद्दलची स्वप्ने पुढीलप्रमाणे पहातो : "पुतळीच्या मागोमाग एक पांढरेफेक वासरु बागडू लागते. आईच्यापेक्षा सवाई देखणे. अति अवखळ. आईच्या कासेला ते अशा ढुशा मारते की पुतळी कावून जाते. पण तिची आपल्या लेकरावर माया असते. ते पिऊं लागले की ती त्याचे अंगन् अंग आपल्या खरबरीत जिभेने चाटून - पुसून घेते." (पृ. ११५) ह्यामध्ये एकप्रकारचा आंतरिक जिव्हाळा जाणवतो. माणदेशातील त्यांनी चित्रित केलेली सर्व माणसे ही हट्टी, सोशीक, साधी, दुराग्रही अशा एक ना अनेक स्वभावाचे पदर असलेली आहेत.

निवेदनशैलीतील सहजता ही मांडगूळकरांच्या आईवडिलांकडून त्यांच्याकडे आली आहे. ते जे लिहितात, त्यातील बरेचसे निवेदन हे आत्मचरित्रपर आहे. कारण माणदेशात स्वत: त्यांनी ते जीवन अनुभवलेले आहे. ते दु:खाने, कारुण्याने अंतर्मुख होतात. "सीताराम एकनाथ" (१९५१) ह्या कथासंग्रहातील 'कालगति' ही पट्ठे बापूरावांच्या आयुष्यावर आधारित अशी भावस्पर्शी कथा आहे. पहा. "हे नका परत करु, न्या तुम्हांकडे माझी आठवण म्हणून सांभाळा हे धन. माझ्यापाशी नाही राहणार. जाईल वाण्याघरी तेलामिठापायी... आणि हें बघा, एक मागणं आहे आपणांपाशी. शुद्र आहे, आपण हसाल... मला ब्राह्मणी पद्धतीनं केलेलं जेवण जेवायचं आहे... कित्येक वर्षे झाली ! तुमच्या कुटुंबाला सांगा, की एका महाराला गोडधोड खाण्याची इच्छा झाली आहे, म्हणून.... सांगाल ! कराल एवढं ? " (पृ. ३१) ह्यांमधील व्यथा ही संयत रुपाने अवतरते. तेथे कृत्रिमपणा, भंडकपणा नाही, हा सर्व माणदेशी वातावरणाचा परिणाम म्हणावा लागेल.

व्यंकटेश माडगूळकर हे प्रथमपुरुषी निवेदन स्वीकारतात. प्रथमपुरुषी निवेदन हे एखाद्या 'स्वगता' सारखे असते, हे आत्मनिवेदन कथेला काव्यात्म पातळीवर नेण्यास उपकारक ठरते. ह्यातून कथेची परिणामकारकता वाढते. आपणास कळत - नकळत ती व्यक्तीच आपले मन मोकळे करु लागते. "काळी आई" (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'सर्व्हिस मोटार' मधील मुलगा भोजा इजाप्पाला (बापाला) मनाला लागेल, असे बोलतो, तेव्हा इजाप्पा म्हणतो, "माझे काय आहे इथे ? भोजा, बाळा, अरे हे सगळे तुझेच आहे." (पृ. ७) माणदेशातील ग्रामीण माणसांची हृदये पारदर्शकपणे ते स्वत:च उघडू देतात.

● माडगूळकरांचे संवादलेखन :

व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेतील संवाद हे त्यांच्या कथेचे सहज दिसणारे अवर्णनीय लावण्य आहे. माणदेशी व्यक्तिस्वभावातील अनेक छटा ते सहजपणे टिपतात. "का बिघडलं जी आनली म्हणून ? आगीत जळूनच गेली असती की ? गहू आनलं ते गेलं खाऊन. खायाचा जिन्नस कुटला न्हातुया ? ही चार भांडी हैती. चांभारानं शिवलेली चालत असली, तर न्या जा बापडी. !" ("माणदेशी माणसे" १९४९, 'शिदा चांभार' पृ. ७४) ह्यातून माणदेशी चांभारचा बेरकी, मुर्दाड स्वभाव वर्णिला आहे. माणदेशी व्यक्तींच्या स्वभावातील, बोलण्यातील वेगवेगळे पैलू माडगूळकर प्रभावीपणे चित्रित करतात. "गावाकडच्या गोष्टी" (१९५१) ह्या कथासंग्रहातील 'फक्कड गोष्टी' मधील पाटील आणि वाणी ह्यांच्यातील संवाद पहा : 'लेका, मुक्या जनावराला चीड आली असती या गोष्टीची. आणि तू तर माणूस. असा मेल्या मनाचा का झालास ?' त्यावर वाणी खालच्या आवाजात म्हणाला, "इलाज नाही पाटील, मला काय कळत नाही का ? माझं रक्त तापत नाही का ? पण काय करावं, आपलेच दात आपलेच ओठ" (पृ. ९५) वाणिणीच्या बाहेरख्यालीपणाबद्दल पाटील बोलतो, तसेच दुबळा वाणी आपण काही करु शकत नाही, हे सहजपणे सांगताना दिसतो.

माणदेशातील माडगूळकरांच्या संवादाचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे तेथील व्यक्तींचे बोलणे हे वयपरत्त्वे बदलत जाताना दिसते. कारण लहानपणी काही समजत नसते, म्हणून आपण एकमेकांना अरे-तुरेची भाषा वापरतो. पण वय वाढल्यानंतर आपली भाषा बदलते. भावनांचा चढउतार ही बदलतो. "उंबरठा" (१९६०) ह्या कथासंग्रहातील 'घरापाठीमागची लोभा' ह्या कथेत अंगणात मेवा खाताना लोभा लहानपणी कथाकाराला चिडवत असे. त्यांच्याबरोबर रानात बोरं खायला जात असे. पण तिचे लग्न झाल्यानंतर त्यांची भेट होते, तेव्हाचे बोलणे मोठेपणाचे, जबाबदारीचे वाटते. म्हणजेच आपल्या सामाजिक, आर्थिक स्तराचे प्रतिबिंब कथेतून जाणवते. "गोष्टी घराकडील" (१९५९) ह्या कथासंग्रहातील 'बिटाकाका' ह्या व्यक्तीचे चित्रण करताना शब्दाशब्दांमधून त्यांचे व्यक्तिमत्त्व साकार होताना दिसते. "माझा बंदा रुपया आहे, लेका ! पोरीला काय करतोस ! किती वजन आहे ? " मी खाली मान घालून म्हणालो, "साडेचार पौंड". "आमचा गडी आठ पौंडाचा आहे !" हा संवाद माडगूळकरांच्या माणदेशी कथेचे बलस्थान म्हणावे लागेल. ह्या संवादावरुन त्यातील नाट्यमयता प्रकर्षाने जाणवते. ह्यासंदर्भात गो. गं. कुलकर्णी म्हणतात, "संवाद आणि कथेचा आशय या दोन गोष्टी सहजपणे एकमेकांमध्ये मिसळून गेल्यामुळे

त्यांच्या कथाकृतींना एक लावण्यमयी घाट प्राप्त होतो. कथेच्या आशयाच्या प्रवाहात योग्य ठिकाणी निसर्गतः फुलून आल्याप्रमाणे निवेदन आणि संवाद अवतरतात आणि त्यांच्या या सहज उद्रेकामुळे कथापुष्प फुलून येते."[२४] 'मायलेकराचा मळा'('हस्ताचा पाऊस'-१९५३), 'कोऱ्या कागदाची कहाणी'('उंबरठा'-१९६०), 'कालगति'('सीताराम एकनाथ'-१९६९), 'असलं लई बघितल्यात'('वारी'-१९६२), 'गोडेपाणी'('उंबरठा'-१९६०) इत्यादी कथांमधील संवाद ह्याच प्रकारचे आहेत.

- व्यंकटेश माडगूळकरांची प्रतिमासृष्टी :

माडगूळकरांनी कथेमध्ये माणसाचे वर्णन करताना पशुपक्ष्यांची प्रतिमाने व्यवस्थितपणे वापरलेली दिसतात. त्यांची प्रतिमासृष्टी ही खास माणदेशी असल्याचे निदर्शनास येते. 'हस्ताचा पाऊस'(१९५३) ह्या कथासंग्रहातील 'त्याची गाय व्याली' ह्या कथेत रामाची निराशा व्यक्त करताना माडगूळकर लिहितात, "पिकलेले कलिंगड हातातून सुटून फरशीवर पडावे, तसे त्याच्या काळजाचे झाले !" (पृ. ११९) ह्याच कथेत रंडक्या जिजाचे वर्णन पुढीलप्रमाणे येते : "पिकल्या बोरासारखी झोडपून खाल्ली. आणि नुसता पाला आणि डहाळ्यांचा खराटा राहिला आणि ते गुपचूप पसार झाले !" (पृ. १११) अशाप्रकारे माडगूळकरांनी माणदेशातील प्रतिमा कथावस्तूमध्ये वापरलेल्या दिसतात.

आत्माविष्काराची तळमळ ही लेखकाच्या वृत्तीत असल्यामुळे भाषेचा उपयोग हा अभावितपणे व उत्स्फूर्तपणे केला जातो. माडगूळकरांच्या प्रतिमाही अशाच आलेल्या दिसतात. "जांभळाचे दिवस" (१९५७) ह्या कथासंग्रहातील 'जांभळाचे दिवस' ह्या कथेतील तरुण चमनचे वर्णन कसे येते, पहाः "लहानपणापासूनच चमनची अंगकाठी शेवरीच्या झाडासारखी उंची आणि छेलकाठी होती. मकेच्या कणसासारखी कांती तिच्या अंगावर होती." (पृ. ११६) ह्यावरुन ही प्रतिमाने माणदेशी वातावरणाचा एक भाग बनल्यासारखी वाटतात.

माडगूळकरांच्या कथेत जीवनाच्या सर्व अंगांविषयी असणारे कुतूहल प्रकट होते. त्यामुळेच त्यांनी वापरलेल्या प्रतिमासृष्टीत नावीन्य आढळते. स्वतःचे अनुभव ते विशेष पद्धतीने व्यक्त करतात. म्हणून सामान्य वाचकालासुद्धा त्यांची प्रतिमासृष्टी रुचते, पटते. माडगूळकरांच्या काही प्रतिमा अशा :

✧ पारावर शाई ओतल्याप्रमाणे सावली पडलेली असते. ('पार', पृ. ५४)

- ✧ धोंड्यासारखा तो जागच्या जागी उभा राहिला ('बाबा रामोशाची कहाणी', पृ. ७१)
- ✧ पिसाळलेल्या लावेसारखी लक्ष्मी आता अल्लाच्या गाईसारखी झाली होती. ('वडारवाडीच्या वस्तीत', पृ. ३१)
- ✧ जिव्हारी बाण लागलेल्या डुकरागत रेकत भाव्या तोडल्या झाडागत खाली कोसळला. ('पडकं खोपट', पृ. ४७)
- ✧ वैशाखातील दुपार खंजिरासारखी तळपत होती ('बावा', पृ.१३७)
- ✧ पेंगणाऱ्या गाढवासारखा खाली मान घालून बापू काही वेळ उभा राहिला ('गावाकडं', पृ. १११)
- ✧ एखाद्या हिरव्यागार डेलियाच्या शेंड्यावर उमललेले गुलाबी फूल दिसावे, तशी ती महादेवाला दिसली. ('पंचाण्णव पौंडाची मुलगी', पृ.५२)

अशा अनेक माणदेशी प्रतिमा माडगूळकरांच्या कथेतून दिसून येतात. वरील सर्व विचारांकडे दृष्टी टाकली असता जाणवते की, माडगूळकर गंभीर झाले असले; तरी निराश झाले नाहीत. त्यांच्या ठायीची निर्मळ जीवनलालसा ही त्यांच्यातील कलात्वाचा एक अविभाज्य घटक आहे आणि तिच्या आविष्कारातील अपरिहार्यत्व आपणास त्यांच्या कथासृष्टीतून ठायी ठायी प्रत्ययास येते. ही गोष्ट त्यांच्या ललित सुंदरतेबरोबर हृदयंगमतेची आणि सुभग सौभाग्याबरोबर सामर्थ्यश्रेष्ठतेची जोड करुन देते, एवढे मात्र खरे. [२५]

- **व्यंकटेश माडगूळकरांची भाषाशैली :**

व्यंकटेश माडगूळकरांनी लहानपणापासून जे जे पाहिले, अनुभवले; त्याचा दृश्य परिणाम म्हणजे त्यांची माणदेशी भाषेतून लिहिलेली कथा होय. माणदेशी समाजातील सर्व जाणिवा त्यांनी आत्मसात केलेल्या आहेत. कथेसाठी त्यांनी नागर व ग्रामीण अशा दोन्ही भाषांचा वापर केल्याचे दिसते. त्यातही माणदेशातील भिन्नभिन्न जातींमधील त्यांच्या व्यवसायानुरुप भाषेची रुपे आलेली दिसतात. विशेष म्हणजे संवादासाठी माणदेशी बोलीचा उपयोग केलेला दिसतो. माडगूळकरांच्या माणदेशी भाषावापराचा आवाका मोठा आहे. त्यातून निश्चित व सूक्ष्म अर्थ व्यक्त करण्याचे त्यांचे सामर्थ्य तीव्रतेने जाणवते.भाषेतून आशयाची निर्मिती होते, ह्याची जाणीव त्यांच्या कथेतून होते.

प्रादेशिक लोकजीवनाचे अधिष्ठान वाङ्मयाला लाभणे, ही गोष्ट साधणे मोठे दुर्घट व अनेकांच्या विविध प्रयत्नांचे फळच असू शकेल. कारण हा काही केवळ चारदोन भाषेच्या

लकबी वापरुन 'वातावरण' निर्माण करण्याचा प्रश्न नाही. केवळ प्रादेशिक भूवर्णनांनी व पेहरावांच्या तपशिलांनी व्यक्तिरेखांना व कथांना नटविण्याचाही प्रयत्न नाही. कारण ह्याला फारसे प्रयास पडत नाहीत. ते एखाद्या चौकस प्रवाशालाही साधेल.[२६] ह्या कसोटीला व्यंकटेश माडगूळकरांचे लेखन उतरताना दिसते. माडगूळकरांची भाषा ही माणदेशी अंगभूत वैशिष्ट्ये घेऊनच आलेली आहे. त्यामुळेच ती वाचकांच्या हृदयापर्यंत जाऊन पोहोचते.

माडगूळकरांची भाषा ही खास सातारी वळणाची आहे. माणदेशी मातीत जन्मलेली माणसे जी भाषा बोलतात, तीच त्यांच्या कथेची भाषा असते. कारण त्यांची कथा ही माणसांवरच अवलंबून असते.त्यांच्या भाषेला कृत्रिमतेची आवड नाही. सामान्य माणसाप्रमाणे त्यांची भाषाही साधी, सामान्य वाटते. 'माणदेशी माणसे' (१९४९) ह्या एकाच कथासंग्रहात अनेक नमुन्याची माणसे आलेली दिसतात. 'रामा मैलकुली' ह्या कथेतील रामा मैलकुली कुणबीच भाषा बोलतो. पहा : "समजूत काडाय् जावं, तर म्हणायची, 'चल म्हमईला, गिरनीत काम कर आन् बक्कळ पैका मिळव. माजी हौस पुरव' मला काय आपला मुलूक सोडून जावं वाटंना." (पृ. २६) 'देवा सटवा महार' हा तराळकीचे काम करणारा. तो म्हणतो, "पाटलाचं काम येगळं. त्येंच्या खरकट्यावर जगलूया. ते दोन जोडं मारत्याली आन् पुना पोटाशीबी धरत्याल. पन कोन कुठला सायेब ? खुटीवला कावळा" (पृ. २४) माडगूळकरांच्या कथेतील त्या त्या व्यक्तीच्या मनातील भाव उत्कटपणे त्याच्याच शब्दातून व्यक्त करणारी भाषाशैली प्रकट होते. 'हे पाप कुठं फेडू' ह्या कथेतील उमाजी आपल्या रत्ना गाईला खूप मनापासून सांभाळतो. त्याला पाटील विचारतात, 'लेका उम्या, बरंच माजवलंसय की गायरु, बाटकी बांधलंयस का काय?' त्यावर उमाजी म्हणतो, 'न्हाई जी पाटील, पन वाईच अरवाळीच हाय पयल्यापासनं. पाखरु उडालं तरी बुजतयां.' (पृ. ४५) 'बन्याबापू' हा श्रीमंत माणूस त्याच्या बोलण्यातूनही हे प्रकट होते. "अरे, 'सुस्वागतम्, या,या सुस्वागतम्' काय खरं ना ? " असे शब्द ऐकू येतात. ह्यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, माडगूळकरांचा कटाक्ष व्यक्तिरेखांना स्वत: बोलू देण्यामध्ये असतो. व्यक्तिरेखा ह्या खास माणदेशातील असल्यामुळे माणदेशी बोली ही वेगळी वाटते. ह्यासंदर्भात ते स्वत: म्हणतात, "माझी पात्रे जिवंत होतात अन् आपोआप गोष्ट घडत जाते. ती स्वत: संवाद बोलतात. बोलता बोलता म्हाताऱ्या इजाप्पाचा खालचा ओठ कसा थरथरतो, हे मला स्पष्ट दिसते. गोष्ट मनात तयार होत नाही. टाक आणि कागद यांच्या मध्येच ती कुठेतरी तयार होते. लेखकाने स्वत: त्यांना डिक्टेट करायला सुरुवात केली की सगळंच विस्कटते. लेखकाची निर्मिती खलासच होते. लेखकांनी

त्या पात्रांना स्वत: वाढू दिले पाहिजे. गोष्ट आपोआप तयारे होते."[२७] म्हणजेच वेगवेगळ्या जातीजमातींचे लोक जी भाषा बोलतात, त्याचे माडगूळकरांनी बारकाईने निरीक्षण केल्याचे जाणवते. भटक्या लोकांच्या भाषेत आदरार्थी बोलणे नसते. 'तू घुबड खाल्लेस कंदी?' हा मिठू शिपायाने कथाकाराला विचारलेला साधा - सरळ प्रश्न आहे. अशारीतीने ब्राह्मणवर्गापासून ते भटक्या जमातीपर्यंतची विविध जातीजमातींची भाषा वापरुन माडगूळकरांनी माणदेशी कथात्मक साहित्य समृद्ध केल्याचे जाणवते.

माणदेशातील लोकांचे आचार-विचार बारकाईने हेरुन स्वत:च्या अनुभवाने माडगूळकरांनी कथालेखन केले. त्यात माणदेशी म्हणी व वाक्प्रचार ह्यांचा ही वापर त्यांनी केल्याचे स्पष्टपणे जाणवते. 'माळावर बोंबलायला पाटलाची परवानगी कशाला'("उंबरठा"- १९६०, 'गोडेपाणी' पृ. १८), 'मुलं देवाघरची फुलं'("उंबरठा"- १९६०,'ओझं' पृ. १३३), 'बोडकीला बाबाचा धाक काय रं ?'("काळी आई"- १९६२,'बळीची गोष्ट' पृ. ७९ ), 'बामनाघरी लिवणं आन् म्हाराघरी गानं'("माणदेशी माणसे" - १९४९, 'गणा महार' पृ. ११९), 'जात वडराची आणि अक्कड मालगुजराची'("हस्ताचा पाऊस"- १९५३, 'वडरवाडीच्या वस्तीत' पृ. ३२), 'बैल घोरं धनी मरं, आन् गाय घोरं घर भरं'("वारी"- १९६२, 'हे पाप कुठं फेडू' पृ. ५०), 'शीर सलामत तो पगड्या पचीस'("हस्ताचा पाऊस"- १९५३,'वसाण' पृ. ७१), 'नवऱ्यानं मारलं आणि पावसानं झोपडलं, तक्रार न्यायची कुणाकडं'("माणदेशी माणसे"-१९४९, 'गणा महार' पृ. १०८), इ. म्हणी व वाक्प्रचारांमुळे त्यांच्या माणदेशी भाषेला एक वजनदारपणा प्राप्त होतो आणि ही भाषा आपली आहे, असा भावानुभव वाचकांपर्यंत सहज पोहोचतो.

माणदेशातील निसर्गाचेही वर्णन माडगूळकरांनी आपल्या अल्पाक्षरी शैलीत आस्वादक्षम केलेले आहे. 'गोष्टी घराकडील'(१९५९) ह्या कथासंग्रहातील 'आमचा पाव' मध्ये घरच्या जमिनीचे वर्णन पुढीलप्रमाणे आले आहे. 'पहिले पाऊस होऊन गेले की, पावाच्या उजाड जमिनीत हिरवळ फुटे. हरळी, कुरडू, नागरमोथा अशा वनस्पती दिसू लागत. शेंदण्या; कडू इंद्रावणे, कडवंची यांचे वेल फुटू लागत. करडईसारखी दिसणारी पात्रंची अनाहूत भाजी आणि सराटा माजू लागे. कडवंच्या हा प्रकार थोडाफार कारल्यासारखा असतो. सराटा आणि पात्रा ह्याहि भाज्या चवीच्या बाबतीत कुठल्याहि पालेभाजीची बरोबरी करतील. फक्त, त्या न लावता रानात उगतवात म्हणून त्यांची किंमत नसते'(पृ. २३)'घरापाठीमागची लोभा'('उंबरठा' १९६०), 'लढत'('उंबरठा'), 'तळ्याची पाळी'('वारी'१९६२) ह्या

कथांमधून आलेले निसर्गाचे वर्णन माणदेशी भाषेत असल्याने ते प्रत्ययकारी वाटते. प्रादेशिक वळणाच्या कथांमध्ये अशा वर्णनातील बोलकेपणामुळे मोलाची भर पडते, ह्यात शंकाच नाही. ह्याविषयी स्वत: माडगूळकर म्हणतात, "माझ्या लेखनाची भाषा गुऱ्हाळावर बोलावून रस द्यावा, तशी लोकांनीच मला दिली आहे."[२८] ह्या सर्व तपशिलांवरुन माडगूळकरांनी मराठी भाषेचा अस्सल वाण, कमीत - कमी वाक्यात निसर्ग अगर व्यक्ती सजीव करण्याचे सामर्थ्य, बोलके संवाद, मुक्त निवेदन, वाचकाला खिळवून टाकणारे जीवनदर्शन; माणसे, समाज व त्यांच्या चालीरीती आणि दारिद्रयाचे चित्रण वैशिष्टपूर्ण लकबीने आणि ताकदीने आलेले दिसते. अशा विविध गुणांनी नटलेली कथा लिहून माणदेशी मराठी कथात्मक साहित्य समृद्ध केले, असेच म्हणावे लागते.

## ४.५. शंकरराव खरातांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण :

शंकरराव खरातांचा जन्म ११ जुलै १९२१ रोजी आटपाडी (ता. आटपाडी, जि. सांगली) येथे झाला. त्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. माणदेशाच्या परिसरात ते वाढले. वडील गावात गावकीचे काम करुन उदरनिर्वाह करीत होते. अशा परिस्थितीत त्यांचे प्राथमिक शिक्षण आटपाडी येथे, तर माध्यमिक शिक्षण औंध (जि. सातारा) येथे पूर्ण झाले. पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमधून ते बी.ए. झाले. नंतर एल.एल.बी.ची परीक्षा पास होऊन त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला.

शंकरराव खरात हे स्वतःच दलित समाजात जन्मले असल्यामुळे त्यांना तत्कालीन समाजस्थितीचे विदारक दृश्य अनुभवाने माहीत होते. अनेक वाईट प्रसंगांना त्यांना सामोर जावे लागले. त्यातूनच घरची सर्व जबाबदारी सांभाळत पस्तीस वर्षे त्यांनी वकिलीचा व्यवसाय केलेला दिसतो. त्यामुळे लेखनाला उशिरा सुरुवात झाल्याचे निदर्शनास येते. अस्पृश्यतेचे दाहक चटके त्यांनी प्रत्यक्ष सोसले असल्यामुळे त्यांच्या कथालेखनात दलित समाजविषयी अनुकंपा असल्याचे दिसून येते.

शंकरराव खरात हे माध्यमिक शिक्षण घेत असताना ते स्वत: 'कलोपासक मंडळ' नावाचे वाचनालय चालवीत असत. त्यातूनच त्यांना वाचनाची व लेखनाची आवड निर्माण झाल्याचे जाणवते. १९५४ ला ते "महाराष्ट्र शेड्युल्ड कास्ट फेडरेशन" चा संघटक सेक्रेटरी म्हणून नोकरीला लागले. दि. १० एप्रिल १९५५ रोजी त्यांचा विवाह झाला. पुढे १९५९ साली 'प्रबुद्ध भारत' ह्या साप्ताहिकाच्या कार्यकारी संपादकाचे काम ते पाहू लागले. ह्या पार्श्वभूमीवर

आधारित त्यांच्या साहित्याविषयीच्या कक्षा विस्तृत बनल्याचे जाणवते. ह्याच सुमारास म्हणजे १९५७ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये त्यांना डावलण्यात आले. त्यामुळे निराश मनाने ते लेखनाकडे वळल्याचे दिसते. ह्यासंदर्भात स्वत: खरात लिहितात, "कल्पनेच्या फांदीवर बसून लिहिलेली कथा कादंबरी मी जगलेल्या व भोगलेल्या माझ्या अनुभवांना पटत नव्हती. म्हणून मीच ठरविले की, दलितांच्या जीवनातील जिवंत अनुभव आपण कथा-कादंबरीच्या फॉर्ममधून लिहावेत. आपण अस्पृश्य, दलित म्हणून जगलेले, भोगलेले, अनुभवलेले, खरं जीवन लिहावं, ते वाचकांपुढं मांडावे - ठेवावे. म्हणजे वाचकांना दलितांचे, अस्पृश्यांचे खरे जीवन, त्यांच्या जीवनाचे अंतरंग त्यांना कळेल. याच अंतरीच्या उर्मीने, याच एकमेव स्फुर्तीने मी वाङ्मय साहित्याकडे वळलो. त्यासाठी मी लेखणी हातात घेतली."[२९] शंकरराव खरात हे जरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीकारी विचारांचे पाईक असले तरी आपण स्वत: ज्या जातीत जन्मला आलो, तेथील माणदेशी वातावरणामुळे व संस्कारामुळे जातीच्या रुढी, परंपरा ते नाकारु शकत नव्हते. म्हणूनच खरातांनी माणदेशी कथा वाङ्मयात 'जे पाहिले, जे भोगले ते सांगितले' अशी मवाळ भूमिका घेतल्याचे जाणवते.

'सत्तूची पडीक जमीन' नावाची खरातांची पहिली कथा 'नवयुग' च्या दिवाळी अंकात १९५६-५७ ला प्रकाशित झाली. त्यानंतर त्यांनी आपल्या गावातील बारा बलुतेदारांवरती 'नवयुग' मधून कथालेखन केले. ह्या सर्व कथा एकत्रित करुन त्यांचा 'बारा बलुतेदार' (१९५९) हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. 'नवयुग' मध्ये कथा लिहित असतानाच १९५७-५८ च्या 'नवयुग' च्या दिवाळी अंकात "माणूसकीची हाक"(१९५८) ही त्यांची पहिली कादंबरी प्रकाशित झाली. लेखनाबरोबरच त्यांना सामाजिक कार्याचीही आवड असलेली दिसून येते. आजपर्यंत खरातांचे अकरा कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'बारा बलुतेदार'(१९५९), 'तडीपार'(१९६१), 'सांगावा'(१९६२), 'टिटवीचा फेरा'(१९६३), 'सुटका' (१९६४), 'दौंडी'(१९६५), 'आडगावचं पाणी'(१९७०), 'गावशीव'(१९७०), 'मुलाखत'(१९७८), 'लिलाव' (१९८४), 'माझं नाव...?'(१९८७), ह्या सर्व कथासंग्रहांमधील कथांची संख्या १३८ भरते. त्यापैकी ९९ (नव्याण्णव) कथांमध्ये माणदेशाचे चित्रण आलेले दिसते.

शंकरराव खरातांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यकारिणी सदस्य; डायरेक्टर, बँक ऑफ इंडिया; डायरेक्टर, बँक ऑफ महाराष्ट्र; चेअरमन, रेल्वे सर्व्हिस कमिशन; मुंबई विद्यापीठाच्या विधीसभेचे सदस्य; बॅंक ऑफिसर्स सिलेक्शन कमिटीचे सदस्य अशा विविध

शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांमधून सन्मान प्राप्त झाले. शेवटी ह्या सर्व कार्याची पोहोच म्हणून महाराष्ट्र शासनाने त्यांची मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती केली. त्यांना वेगवेगळे पुरस्कारही प्राप्त झालेले दिसून येतात. 'अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात', 'सांगावा', 'तडीपार'ह्या पुस्तकांना सरकारी पारितोषिके मिळाली. १९८४ साली झालेल्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'चे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले. अशाप्रकारे खरातांना वेगवेगळ्या प्रकारचे पुरस्कार व मान-सन्मान मिळालेले दिसून येतात. अशा ह्या साहित्यिकाची प्राणज्योत ९ एप्रिल २००१ रोजी मालवली.

शंकरराव खरातांना दलित समाजातील महत्त्वाचे कथाकार म्हणून ओळखले जाते. आपल्या लिखाणातून त्यांनी माणदेशातील दलित व उपेक्षित समाजाची दु:खे, संघर्ष वास्तव रीतीने मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यांनी केवळ कथा- कादंबऱ्यातच आपली दृष्टी केंद्रीभूत केलेली नव्हती; तर राजकीय, सामाजिक विषयांवरही त्यांनी लेखन केलेले दिसून येते. खरातांच्या सुरुवातीच्या कथालेखनावर माडगूळकरांचा प्रभाव असल्याचे दिसते. खरातांनी स्वत: भोगलेले, पाहिलेले, अनुभवलेले दलितांचे जीवन हा त्यांच्या माणदेशी कथांचा विषय दिसून येतो. १९५९ पासून त्यांनी कथालेखनाला सुरुवात केली. म्हणजेच काळानुरुप पाहिल्यास दलित साहित्याच्या उदयापूर्वी त्यांनी कथालेखनाला सुरुवात केल्याचे दिसते. त्यांच्या कथालेखनात सवर्णांकडून दलितांवर होणारे अत्याचार, जातीय भेदाभेद, दलितांना भोगावी लागणारी दु:खे व त्यांना सहन करावे लागणारे अन्याय ह्या गोष्टी जाणवतात. म्हणजेच खरातांच्या सुरुवातीच्या माणदेशी कथेतील व्यक्तिरेखा ह्या अत्यंत सोशीक, संयमी असल्याच्या दिसतात. ह्या संदर्भात डॉ. निर्मलकुमार फडकुले ह्यांचे मत उद्बोधक वाटते. ते म्हणतात, "खेड्यात फुलणारा निसर्ग काही वेगळाच आहे. तिथल्या काट्याची बोच निराळी आहे, याची जाणीव शहरी वातावरणातील लेखकांना येऊ शकलेली नाही, त्याबद्दल त्यांना दोष देऊ नये. लेखक पांढरपेशा वर्गातला आणि वाचकही त्याच पठडीतला अशी अवस्था असल्यामुळे श्री. म. माटे यांच्या 'उपेक्षितांचे अंतरंग' या कथासंग्रहापर्यंत ग्रामीण जीवनाच्या संदर्भात कसलेच चित्र साहित्यात साकार झाले नाही. काही अस्पष्ट, अपूर्ण रेषा मात्र अधूनमधून उमटलेल्या दिसतात. ग्रामजीवन मराठी कथा-कादंबरीला तोपर्यंत अस्पृष्ट राहिले."[३०] म्हणून खरातांच्या कथेतून व्यक्त होणाऱ्या सामाजिक विषमतेच्या भावभावना वस्तुस्थितीला धरुनच आहेत, हे वास्तव स्वीकारावे लागते.

खरातांनी आपल्या कथालेखनामधून बारा बलुतेदारांच्या दबलेल्या भावभावनांना वाचा फोडण्याचे काम केले, हा त्यांच्या माणदेशी कथांचा विशेष म्हणावा लागेल. खरातांच्या 'बारा बलुतेदार' (१९५९) ह्या कथासंग्रहापासून ते 'सुटका'(१९६४) ह्या त्यांच्या कथासंग्रहापर्यंतच्या कथांवर व्यंकटेश माडगूळकरांची छाप जाणवते. खरातांच्या कथांमधून माणदेशाचे चित्रण विपुलतेने येते. गावगाड्याशी निगडीत असलेल्या माणदेशी कथा लिहून खरात पुढे आलेले दिसतात. त्यांच्या सुरुवातीच्या लेखनात दलित समाजावरील अन्याय - अत्याचाराचे चित्रण येते. एकंदरीत, शंकरराव खरातांनी दलितांच्या वेदनेचा, विद्रोहाचा आणि विश्वात्मक वृत्तीचा चित्रपटच निर्मिला आहे. बलुतेदारांच्या पिढीजात धंद्यातील दैन्य व भटक्या जमातीतील संस्कृतीचे मर्म त्यांना गवसले होते, असे दिसून येते. जे पोतराज, जोगतीण, कोल्हाटीण मराठी कथाविश्वाला अपरिचित होते. त्यांना खरातांनी प्रकाशमान केले. [३१]

शंकरराव खरातांच्या कथांमध्ये येणाऱ्या व्यक्तिरेखा दु:ख सहन करणाऱ्या, सोशीक असल्याचे निदर्शनास येते. परंतु दलित साहित्याच्या उदयानंतरच्या त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा विद्रोही स्वरुपाच्या असल्याचे जाणवते. दलितांचे दु:ख, त्यांना करावे लागणारे काम, त्यांचे आपापसातील हेवेदावे, भाऊबंदकी, भावकी - भावकीतील चुरस, अंधश्रद्धा ह्यांचे चित्रण त्यांच्या कथेत दिसते. कथेतील व्यक्तिरेखा आपल्या आजुबाजूच्या असल्यासारख्या वाटतात. त्यांच्या कथेची भाषा ही प्रसंगानुरुप बदलत जाणारी आहे. त्यामुळे खरातांची कथा अधिक कलात्मक व वास्तवपूर्ण झालेली आहे.

खरातांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळ ह्यांच्या संधिकाळात लेखन केलेले दिसते. त्यांना दलित कथाकाराबरोबरच ग्रामीण कथाकार म्हणूनही ओळखले जाते. ग्रामीण कथेसाठी अस्सल ग्रामीण जीवनदर्शनाची आवश्यकता असते. खरातांच्या कथेत माणदेशी ग्रामीण जीवनदर्शन ठळकपणे नजरेस पडते. खरातांनी हा अनुभव प्रत्यक्ष घेतलेला असल्यामुळे 'दौंडी' मधील रामा तराळ, 'वडार' मधील हणमा, 'एक संघर्ष' मधील गोपाळ खंडू, 'टिटवीचा फेरा' मधील भ्रामक समजुती , 'कमाई' मधील रामा येसकर ह्यांना खरातांनी स्वत: पाहिले, त्यांच्यात ते वाढले. त्यामुळे खरातांच्या लेखनात पीडित लोक आढळतात. ह्यावरुन खरातांची कथा ही ग्रामीण दलित कथा आहे, हे स्पष्ट होते. त्याचा आंतरिक आविष्कार हा ग्रामजीवनाशी व तेथील संस्कृतीशी निगडीत असतो. ह्याविषयी नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "शंकरराव खरातांचे लेखन प्रामुख्याने दलितांचे चित्रण करणारे असले, तरी हे दलित जीवन

ग्रामीण भागातील, ग्रामीण व्यवस्थेतील असते. त्यांचा पहिला कथासंग्रह 'बारा बलुतेदार' हा अनेक अर्थांनी लक्षणीय आहे. एका ग्रामीण विभागातील बलुतेदारांच्या दु:खाचे चित्रण या कथासंग्रहातून प्रकट होतेच; परंतु "बलुते - आलुते" व्यवस्था आणि "कारु - नारु" संबंध या दोन्ही बाबींची जाण शंकरराव खरातांनी अतिशय नेमकेपणाने प्रकट केली आहे. या ग्रामीण वास्तवात कुचंबणाऱ्या दलित जीवनाचे चित्रण त्यांनी केलेले असले, तरी त्यातून त्यांची ग्रामीण वास्तवावरची पकड किती पक्की आहे, हेच लक्षात येते. त्यांच्या "बारा बलुतेदार" या कथासंग्रहातील कथांमधून जसे ग्रामीण वास्तव प्रकट होते, त्याप्रमाणेच अगदी अलीकडच्या कथासंग्रहामधूनही ते होताना दिसते. त्यांची अगदी अलीकडची "तडफड" सारखी कथा ग्रामीण भागातील भोई समाजातच घडू शकेल. असे लक्षात येईल."[३२] ह्यावरुन खरातांनी आपल्या कथा आपल्या वास्तव जीवनाशी प्रामाणिक राहूनच लिहिलेल्या दिसतात. ग्रामीण जीवनातील सामाजिकतेचा विचार केल्यास, अस्पृश्यवर्ग हा त्या खेड्याचा एक अविभाज्य भाग असतो, हे लक्षात येते. खरातांच्या 'बारा बलुतेदार' (१९५९) ह्या कथासंग्रहातील कथा सकस व गुणवत्तापूर्ण वाटतात.

शंकरराव खरातांनी वयाच्या छत्तिसाव्या वर्षी (१९५६-५७) 'नवयुग' मासिकासाठी 'सत्तूची पडीक जमीन' नावाची माणदेशी कथा लिहिली. त्यानंतर त्यांनी खऱ्या अर्थाने लेखक म्हणून सुरुवात केलेली दिसते. खरातांच्या अगोदर श्री. म. माटे व व्यंकटेश माडगूळकर ह्यांनी दलित व भटक्या जमातीतील लोकांवर कथा लिहिल्या होत्या. परंतु खऱ्या अर्थाने त्या कथेत 'दलितपण' आलेले नव्हते. गावकुसाबाहेरील लोकांच्या वेदनेला मुख्य मानून त्यांच्या रुढी - परंपरा, अंधश्रद्धा, अज्ञान, दारिद्रय ह्यावर खरातांनी वास्तव लेखन सुरु केले. त्यांच्या कथेवर माणदेशी वातावरणाचा, संस्कृतीचा, भाषेचा, लोकजीवनाचा आणि प्रदेशाचा परिणाम झाल्याचे दिसून येते.

### ४.५.१. माणदेशाचे भौगोलिक चित्रण :

शंकरराव खरातांचे बालपण आटपाडी (जि. सांगली) येथे गेले. आटपाडी हा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. त्यामुळे साहजिकच त्याठिकाणी अंधश्रद्धा, बुवाबाजी, दारिद्रय, भूक ह्या बाबींचा सामना प्रत्येकाला करावा लागतो. ह्याच प्रादेशिक गोष्टींचा परिणाम खरातांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला दिसून येतो. त्यांच्या 'बारा बलुतेदार' (१९५९) ह्या कथासंग्रहातील 'माळेगावचा कोळी' ह्या कथेत माणदेशाचे आलेले चित्रण पुढीलप्रमाणे :

"सरत्या पावसात केलेला शाळूचा पेरा हातहात उगवून आला होता. कुठे कुठे बाटूक झाले होते. दुपारच्या उन्हात कोवळी ताटे माना टाकू लागली होती.

पाऊसकाळ गेला आणि माळेगावचे माळरान तापल्या उन्हात करपू लागले; रखरखीत भकभकीत दिसू लागले. तशाही स्थितीत कुठेतरी बोरी - बाभळीचे झुडूप दिसत होते. लांब, मैला - दीड मैलाच्या टप्प्याबाहेरील नदीकाठची झाडे व माळे सोडली, तर माळरानांत कुठेही झाड दिसत नव्हते.

मुळातच माळेगावला पाण्याचा कार ! पाऊसकाळ गेला की, गावचा भाकरओढा कोरडा ठणठणीत होतो व गावचे माणूस पाण्यावाचून बेजार होते. गावची म्हातारी माणसे बोलतात, 'ओढ्याला पाणी आले तर भाकर खाईपर्यंत टिकते व नंतर ओसरलेले दिसते.' यंदा गावचा ओढा कोरडा पडला होता. खडकांतल्या विहिरीतले पाणी तळाला गेले होते." (पृ. ६३)

ह्या माणदेशातील भौगोलिक स्थितीच्या वास्तवपूर्ण चित्रणातून त्याठिकाणचा रुक्ष निसर्ग समोर उभा राहतो. पाण्याशिवाय माणूसच काय, पण सृष्टीमधील कोणताही सजीव घटक जगू शकत नाही. त्याच घटकाची माणदेशातील कमतरता हीच माणदेशाचे वेगळेपण स्पष्ट करते. त्यामुळेच माणदेशातील माणसांचा स्वभाव संयमी, सोशीक बनल्याचे स्पष्ट जाणवते. संपूर्ण हलक्या प्रतीची माळाची जमीन तेथे असल्यामुळे आणि कमी पावसामुळे मेंढपाळ व्यवसाय तेथे चांगला चालत असल्याचे जाणवते. 'टिटवीचा फेरा' (१९६३) ह्या कथासंग्रहातील 'पंचायीत' ह्या कथेत ह्यासंदर्भात येणारे भौगोलिक चित्रण पुढीलप्रमाणे :

"यंदाच्या चावऱ्या गारठ्यानं माळवाडीतली धनगरं बेजार झाली होती. सांचं झांजड पडायच्या आत मेंढरं वाडग्यांत कोंडली की धनगरं मोकळी होत, आणि आपल्या घरादारांत शिरत. घराला तडक्या - दारं लावून आंत उबीला बसत. दिवसभर मेंढरामागं हिंडून दमलेली कुत्री गारठ्यांत मुटका होऊन उंबऱ्याच्या तोंडाला गरमीला बसत. कांही कुत्री उकिरड्यांत खोल डबरं उकरुन त्यांत हातपाय आखडून वाडग्याच्या तोंडाला बसत." (पृ. १२) ह्यावरुन माणदेशातील वेगळ्या वातावरणाची जाणीव होते. माणदेशात कडक उन्हाळा व त्याचबरोबर कडाक्याची थंडी असल्याची वास्तवपूर्ण जाणीव होते. ह्या भौगोलिक परिस्थितीत माणदेशात मेंढपाळाचा व्यवसाय चालत असल्याचे दिसून येते. अशा प्रतिकूल परिस्थितीत ह्या पाळीव प्राण्यांची अवस्थादेखील माणदेशातील गरीब, लाचार माणसासारखी झालेली दिसते.

'सांगावा' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'सांगावा' ह्या कथेत येणारे भौगोलिक चित्रण पुढीलप्रमाणे :

"दारात शेळी मान टाकून बसली होती. ती रवंथ करीत नव्हती. कालवड़ खोल पोटानं उभी होती. ती दाराकडं ओढ घेत होती. वाळकं कुत्रं दारातच मुटका होऊन गप्प पडलं होतं." (पृ. १) ह्या चित्रणावरुन माणदेशातील भौगोलिकता प्राण्यांच्या जीवनावर ही परिणाम करताना दिसून येते. कारण तेथे सततच्या दुष्काळामुळे प्राण्यांची वाईट अवस्था झाल्याचे दिसते आणि कडक उन्हामुळे माणसे हैराण झालेली दिसून येतात. 'आडगावाचं पाणी' (१९७०) ह्या कथासंग्रहातील 'स्पेशल रुम' ह्या कथेत चित्रित झालेला उन्हाळा पुढीलप्रमाणे :

"चैत्रमासी उन्हाळा. कडक ऊन घेतच मी एस्.टी.ने तालुक्याच्या ठिकाणी आलो. स्टँडवर उतरलो तेव्हा सात वाजले. उकाड्याचं काही विचारु नका ! भारी गदगदत होतं. अंगातून घाम निघत होता." (पृ.३१) ह्यावरुन माणदेशातील भौगोलिकतेचे दाहक स्वरुप समोर उभे राहते. ह्या परिस्थितीतून माणदेशातील लोकांची सुटका होणे, ही अशक्यप्राय गोष्ट वाटते. खरातांनी आपल्या रोचक अनुभवांनी माणदेशाचे वेगळेपण उठावदारपणे प्रकट केलेले दिसते. 'टिटवीचा फेरा' (१९६३) ह्या कथासंग्रहातील 'काळ' ह्या कथेत पुढीलप्रमाणे भौगोलिकतेचे अचूक चित्रण दिसते: " ... आमचा भागच कमी पावसाचा; उघड्या बोडक्या माळरानाचा. कुठं तरी जमिनीची काळी घडी दिसते. कुठं तरी भल्या मोठ्या टापूंत एखादी वस्ती दिसते. त्या वस्तीजवळ एखादं लिंब - बाभळीचं झाड दिसतं, आणि तळाला पाणी गेलेली विहीर खोल डोळ्यानं, सुकल्या चेहऱ्यानं ऑ SSS तोंड वासून बघते." (पृ. ७२)

एकंदरीत, खरातांच्या माणदेशी कथांमधून तो प्रदेश सजीव झाल्यासारखा वाटतो. त्यांच्या लेखनात थोडी अतिशोक्ती वाटत असली, तरी प्रत्यक्ष माणदेश त्यांनी अनुभवला असल्यामुळे कथेतून येणारे चित्रण त्या वातावरणासाठी योग्य आहे, असेच म्हणावे लागेल. ग्रामपातळीवरील सूक्ष्म वातावरणातून चित्रित केलेला माणदेश लक्ष वेधून घेणारा वाटतो. वास्तवपूर्ण वर्णन, त्यातील काव्यात्मकता आणि प्रभावी शब्दयोजना ह्यांनी कथानक प्रवाही बनून इष्ट परिणाम साधला जातो.

## ४.५.२. माणदेशाचे सामाजिक - सांस्कृतिक चित्रण :

शंकरराव खरातांनी माणदेशातील सर्व भटक्या जमातींचे वास्तवपूर्ण चित्रण केल्याचे दिसते. त्यांच्या 'बारा बलुतेदार' (१९५९) ह्या पहिल्याच कथासंग्रहात बलुतेदारांचे बकाल जीवन येते. त्यात प्रामुख्याने त्यांची पोटाची भूक व त्यासाठी करावा लागणारा संघर्ष असे चित्रण येते. माणदेश हा दुष्काळी भाग आहे. त्यामुळे दलितवर्गातील माणसांचे हाल होताना दिसतात. आपल्या समाजव्यवस्थेने घालून दिलेल्या परंपरेच्या अधीन राहूनच माणदेशातील हे लोक जीवन जगताना दिसतात. ह्याबद्दल दा. वि कुलकर्णी म्हणतात, "खरातांची ही सगळी पात्रसृष्टी पाहिल्यावर त्यांनी समाजाच्या अध:स्तराखाली कुचंबलेल्या माणसांचे मूकदु:ख किती परोपरीने उघड केले आहे, याची कल्पना येते."[३३] पोटासाठी वणवण भटकणाऱ्या व समाजव्यवस्थेने माणूसपण नाकारलेल्या माणसांच्या ह्या कथा आहेत. त्यांच्या 'बारा बलुतेदार' ह्या कथासंग्रहातील 'रामा महार' ह्या कथेत रामाला जोतीबा पाटलांकडून अपमानास्पद वागणूक मिळते. परंपरेने चालत आलेली कामे महार समाजातील लोकांनी केली पाहिजेत, असा दंडक ग्रामीण भागात असतो. त्याला वैतागून रामा म्हणतो, "केला ! जलम गेला कामानं, पन पोटभर आन मिळंना. अंगाला धडूतं लागंना अन् आज या कामापाय पोटचा गोळा मातीत घातला." (पृ.१३) ह्यावरुन माणदेशातील दलित जातीतील लोकांच्या भयानक परिस्थितीचे चित्र समोर येते. तसेच ह्याच कथेत रामा म्हणतो, "गुरंढोरं बरं की, म्हाराच्या जीवाला इसावा न्हाय." (पृ. ७) म्हणजेच माणदेशी खेड्यात ही जीवघेणी सामाजिक बलुतेदारी पद्धत चालू आहे. माणदेशातील ह्या पद्धतीमुळे तेथील बलुतेदारांचे जीवन उध्वस्त झाल्याचे दिसते.

माणदेशी बलुतेदारी पद्धतीत बलुतेदारांना पोटभर अन्न व अंगभर कपडे मिळत नाहीत. त्यांना सतत सामाजिक गुलामगिरीत जीवन जगावे लागते. 'बारा बलुतेदार' (१९५९) ह्या कथासंग्रहातील 'माळेगावचा कोळी' ह्या कथेत सावळाचा रेडा आजाराने मरतो. परंतु संशय मात्र तेथील महार समाजावर घेतला जातो. त्यावेळी गावातील हाणमा कारभारी सावळ्याला म्हणतो, "सावळ्या, म्हारांचं सागू नको ! चांगलं जनावर त्यांच्या डोळ्यात सलतं. जनावरावर म्हारांचं मन बसलं, की 'दावन' बसली म्हणून समजा !" (पृ. ६९) ह्यावरुन माणदेशातील ग्रामव्यवस्था दलित लोकांना छळणारी असल्याचे निदर्शनास येते.

माणदेशात जीवन जगणारे बहुतेक बलुतेदार हे सामाजिक व मानसिक गुलामगिरीत जीवन जगताना दिसतात. पोटासाठी त्यांना ही गुलामगिरी करावी लागते. त्यातही पोटासाठी

व्यवस्थित मिळत नाही. शिळ्या अन्नावर त्यांची बोळवण केली जाते. वर्षाच्या काठी त्यांना धान्याच्या रुपाने (बलुते) कामाचा मोबदला मिळतो. त्यातूनच अठरा विश्व दारिद्रय त्यांच्या वाट्याला येते. अशी सामाजिक सुलतानी संकटे पाठीवर घेऊन त्यांना जीवन जगावे लागते. 'बारा बलुतेदार' (१९५९) ह्या कथासंग्रहातील 'धनवडीचा न्हावी' ह्या कथेतील नाना गावातून पोटासाठी काहीतरी मिळेल, ह्या आशेने अनेकांच्या घरी जातो. परंतु प्रत्येकजण केस कापून घेतो, दाढी करुन घेतो आणि काहीही न देता परत पाठवितो. ह्याला वैतागून नानाची बायको नानाला म्हणते, "नांदणं करती तशी ही मागं साडंसाती ! ना धड अंगाला नीट धडूतं ! ना धड पोटाला पोटभर भाकरी ! लहान लहान पोरं पोटानं तरमळतात. या कारानं मीच हिरीत उडी घेती. मग बसा मागं. जगवा पोरं!" (पृ. ९३) ह्यातून माणदेशी बलुतेदारांच्या जीवघेण्या परिस्थितीचे विदारक चित्र समोर येते.

माणदेशात गावगाड्याच्या दुष्ट चक्रात अडकलेल्या बलुतेदारांच्या लाचारीचे चित्रण करणाऱ्या 'बंडा मांग', 'दामु गुरव', 'तात्या सुतार', 'आबा रामोशी', 'कोंडीबा कुंभार' ('बारा बलुतेदार'), 'सांगावा', 'डाव'('सांगावा'), 'वैदू'('तडीपार') ह्या कथा उदाहरणादाखल सांगता येतील. ह्यावरून माणदेशातील बलुतेदारांचे दुःख खरातांच्या कथांमधून व्यक्त झाल्याचे दिसते. ह्याबद्दल भालचंद्र फडके म्हणतात "ज्यांच्याजवळ सांगण्यासारखे पुष्कळ असते. त्याला जर प्रभावीपणे सांगता आले, तर त्याच्या अनुभवाचे सोने होते. मराठी कथेतून एका विशिष्ट जगातलेच अनुभव व्यक्त होत होते. अण्णाभाऊ साठे लिहीत, तेव्हा त्यांचे लेखन लक्ष वेधून घेई. असाच अनुभव श्री शंकरराव खरात यांचा पहिला कथासंग्रह 'बारा बलुतेदार'(१९५९) वाचला, तेव्हा आला."[३४]

- **माणदेशातील ग्रामव्यवस्थेच्या परंपरेचे बळी :**

माणदेशात आजही सरपंच, पाटील, कुलकर्णी ह्यांच्या जाचाला कंटाळून गाव सोडणारे लोक दिसतात. खरातांच्या कथेवर माणदेशी लोकजीवनाचा, वातावरणाचा, भाषेचा, संस्कृतीचा परिणाम जाणवतो. गुलामगिरीने अधोगतीला गेलेल्या समाजातील माणूस हा त्यांच्या माणदेशी कथेचा विषय आहे. खरातांच्या ह्या चित्रणाबद्दल दा. वि. कुलकर्णी म्हणतात, "महार, मांग, चांभार, वैदू, बेरड, कुणबी इत्यादी निम्न स्तरातील लोकांच्या गाडग्या-मडक्यांचा संसार, त्यांचा होणारा छळ, त्यांना सोसावे लागणारे दुःख या सर्वांचे चित्रण करुन त्यावर कोणतेही सुधारकी भाष्य न करता त्यांच्या कथेत या उपेक्षित वर्गाकडे

वाचकांचे लक्ष वेधले आहे, यात शंका नाही."[३५] ग्रामीण लोक हे तेथील नीती - नियमांनी बांधलेले असतात. त्यातून त्यांची सुटका होऊ शकत नाही. जे लोक परंपरा नाकारतात, त्यांना गाव वाळीत टाकते किंवा गावातून हाकलून लावले जाते. प्रसंगी त्यांना चोऱ्याही कराव्या लागतात.

खरातांच्या 'बारा बलुतेदार' (१९५९) ह्या कथासंग्रहातील 'आबा रामोशी' ह्या कथेत आबा आणि त्याची बहीण जया घरात असतात. जया तरुण असल्यामुळे अनेकांचा तिच्यावर डोळा असतो. परंतु आबाच्या धास्तीमुळे लोक घाबरतात. तेव्हा गावातील लोकांचे ऐकून फौजदार डाव टाकतो. जयावर बलात्काराचा प्रयत्न करतो. ह्याला गावातील पाटीलच कारणीभूत असतो. त्या संदर्भात आबा म्हणतो, "दादा, एक बात ध्यानात आली. हा फौजदार रामुसवाड्यात येतो. ततं दोन चांगल्या बाया न्हायत्या. त्येंच्या घरात हा धिंगामस्ती करतू. त्या बायांना म्या डाफरलू होतू खरा ! घातलं असंल त्ये बायांनी फौजदाराच्या कानावर !" (पृ.३५) ह्यातून माणदेशात उच्चवर्णीय समाजाकडून गुन्हेगार जमातीला कसे छळले जाते, ह्याचा प्रत्यय येतो. 'आडगावचं पाणी' (१९७०) ह्या कथासंग्रहातील 'गावाला ग्रामसेविका पाहिजे' ह्या कथेत खरातांनी माणदेशातील सामाजिक वास्तव उघड केलेले आहे. गावातील उच्चभ्रू माणसांच्या संकुचित मनाचे दर्शन ह्यात आहे. गावामध्ये ग्रामसेविका येणार म्हटल्यावर सरपंच, सर्व पंच, पाटील हे सर्व जण त्या बाईला आपल्या घरात ठेवण्यासाठी एकमेकांशी भांडतात. त्यावेळचा संवाद पहा : "कावो सरपंच ! गावाला कुणी अधिकारी आला, ह्यो तुमच्या घरी चा-पाणी ! कुणी फुडारी आला, तुमच्या घरी मुक्कामाला ! आता ही आली ती तुमच्या घरी ! आवो, पण आमची पाळी कवा इयाची ? बोला ! का उगं आमाला हात वर करायला पंच केलंय व्हय ? " (पृ. १३२) ह्यावरुन माणदेशातील ग्रामीण भागातील सरपंच, पाटील ह्यांची ढासळती नीतिमत्ता समोर येते. कोणतीही स्त्री म्हणजे उपभोगाची वस्तू, असाच समज ह्यातून जाणवतो. माणदेशातील माणसांची स्त्रियांकडे बघण्याची संकुचित वृत्ती ह्यातून स्पष्ट होते. अशा अनेक स्त्रिया ह्या विचारसरणीच्या बळी होतात, असाही सूर ह्यातून व्यक्त होतो.

माणदेशात दलित लोकांवरही अशाच प्रकारचे प्रसंग येत असल्याच्या खरातांच्या अनेक कथा दिसतात. 'आडगावचं पाणी'(१९७०) ह्या कथासंग्रहातील 'आडातलं भूत' ह्यामध्ये शाळेत दलित समाजातील मुले अभ्यासासाठी जातात. म्हणून गावकऱ्यांच्या दृष्टीने शाळा बाटली जाते. महारांच्या मुलांना शाळेतून हाकलले पाहिजे, ह्यासाठी गावातील सवर्ण

लोक युक्ती करतात. शाळेजवळील आडात मोठे दगड टाकून भुताची अफवा पसरवतात व शाळेतील महारांच्या मुलांना पळवून लावतात. हे सुद्धा परंपरेचे बळीच आहेत.

शंकरराव खरात हे स्वत: दलित असल्यामुळे आणि माणदेशातील सर्व परिस्थिती त्यांनी स्वत: अनुभवलेली असल्यामुळे उच्चवर्णीयांच्या दडपणाला बळी पडलेल्या, कारण नसताना परंपरेचे बळी झालेल्या लोकांच्या हृदयद्रावक कथा आकाराला आलेल्या आहेत. 'तात्या सुतार', 'बंडा मांग', 'केरु चांभार', 'दादू परीट', 'पांडू लोहार' ('बारा बलुतेदार'), 'वाटा'('सांगावा') ह्या अशा स्वरुपाच्या कथा आहेत. माणदेशातील उच्चवर्णीयांचा जाच, अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा ह्यामुळे सतत आपल्या मूक भावनांना दडपून त्यांच्या आहारी गेलेले माणदेशी लोक ह्या कथांमधून दिसतात.

- माणदेशी जीवनातील अन्यायग्रस्तस्ता :

माणदेश हा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. तेथे उच्चवर्णीय लोकांकडून खालच्या जातीतील लोकांवर अनेक प्रकारे अन्याय होताना दिसतात. सामान्य माणसांच्या व्यथा - वेदनांना वाचा फोडणे, हेच खरातांच्या माणदेशी कथेचे ध्येय दिसते. माणदेशातील सामान्य माणूस, विशेषत: दलित माणूस ह्याची अगतिकता खरातांनी व्यक्त केली आहे. माणदेशात वासनांध लोकांमुळे तरुण स्त्रियांना जीवनातून उठण्याची पाळी कशी येते व त्यामुळे त्या स्त्रियांच्या मुलांच्या जीवनात कशी भेसूरता निर्माण होते, ह्याचे चित्रण 'मुलाखत' (१९७८) ह्या कथासंग्रहातील 'बळी' ह्या कथेत आलेले आहे. 'लिलाव' (१९८४) ह्या कथासंग्रहातील 'जीवा' ह्या कथेतून भटक्या माणसाच्या जीवनात निर्माण होणारी अन्यायग्रस्तता व्यक्त झालेली आहे. सरकारी घर जीवाला मिळते. त्याबदल्यात गावातील गुंड जीवाकडे बकऱ्याची मागणी करतात. जीवा नकार देतो. तेव्हा गावातील गुंड प्रवृत्तीचे लोक जीवाला म्हणतात "च्यायला, आताच उलटलाय काय.....? मग कसं या घरात तुमी ऱ्हाताय त्येच बगतो." (पृ. १२३) ह्यावरुन त्याच्यावर होणारी अन्यायग्रस्तता स्पष्ट होते.

'आडगावचं पाणी'(१९७०) ह्या कथासंग्रहातील 'आडातलं भूत' ही कथा माणदेशातील अस्पृश्यतेचे दाहक अनुभव व्यक्त करणारी आहे. दलितांच्या झोपडीत अभ्यास होणार नाही म्हणून रायगावकर मास्तर काही दलित मुलांना शाळेत अभ्यासाची परवानगी देतात. गावातील सवर्ण लोकांना ही गोष्ट खटकते. सवर्ण लोक एक युक्ती करतात. आडात भूत आहे, अशी अफवा पसरवतात आणि संध्याकाळी शाळेची दारे मोठमोठ्याने ठोठावतात.

मुले भूत म्हणून घाबरुन घरी पळून जातात. पण ही खरी भुत नसतात. तर गावातील सवर्ण गुंडांनी दलित मुलांनी शाळा बाटवली म्हणून वापरलेली युक्ती असते, ही दलित मुलांना समजल्यावर ती म्हणतात, "अरे बापरे...! ते आडातलं भूतं कसलं, ही तर गावातली भुतं...!" (पृ. १०१) ह्यावरुन माणदेशातील दलित लोकांवर होणारा अन्याय स्पष्ट होतो. 'सांगावा'(१९६२) ह्या कथासंग्रहातील 'देवीचा कोप' ह्या कथेत मांग जातीचा धर्मामास्तर बाळेगावच्या शाळेत हजर होतो. जातिभेद पाळणारे गाव धर्माला झाडाखाली शाळा भरवण्यास भाग पाडते. एकेदिवशी धर्मा देवळात प्रवेश करतो. त्यामुळे गावात साथीचा रोग पसरला, अशी अफवा उठते. त्यावेळी एक गावकरी म्हणतो, "देवीचा उंबरा नव्या मास्तरानं ओलांडला... आयला बाट झाला, तवाच तिजा कोप वाडला..." (पृ. १३१) अशाप्रकारे भणंग जीवन माणदेशात दलितांना जगावे लागते.

माणदेशातील ग्रामीण जीवनात जातिभेदामुळे शिक्षणालासुद्धा किमंत नाही. ह्यामुळे स्वाभिमानाने जगू पाहणारे, पण अगतिक झालेले जीवनही खरातांच्या कथांमध्ये पहावयास मिळते. 'सुटका'('सुटका'-१९६४), 'पांडू लोहार'('बारा बलुतेदार'-१९५९), 'पंचनामा', 'तमाशा'('सांगावा'- १९६२), 'अश्रू'('मुलाखत'-१९७८) ह्या अशाप्रकारच्या कथा आहेत. ह्याबद्दल वासुदेव डहाके म्हणतात, "खरात नुसते अस्पृश्य व महार - मांगांच्या कथा सांगत बसत नाहीत, तर या विषयाला स्पर्श करीत करीत गावकुसातील व्यथांना मुखर करीत ती गावपातळीवरही संचार करते. ग्रामव्यवस्थेने नाडलेल्या, अस्तित्त्वहीन केलेल्या मानवसमुहाच्या वेदनेला आपल्या प्रतिभेचा स्पर्श करते. म्हणून ही कथा ग्रामीण बनता बनताच दलित कथाही बनते."[३६]

- माणदेशी अंधश्रद्धा आणि अगतिकता :

माणदेशी दलित समाजाला दारिद्र्याबरोबरच अंधश्रद्धेने ग्रासलेले दिसते. आपल्या पारंपरिक रुढी - परंपरा न सोडण्याची माणदेशातील दलितांची वृत्ती खरातांनी आपल्या कथांमधून दाखविलेली आहे. तसेच ह्यामधून निर्माण होणारी अगतिकताही त्यांच्या कथांमधून दिसून येते. अंधश्रद्धेने पछाडलेला, सवर्णांची हुकूमत आणि देवदेवतांच्या चुकीच्या समजुतीतून विशिष्ट माणसांवर शतकानुशतके लादलेले आनुवंशिक कर्तव्यकर्म ह्या बाबींमुळे माणदेशातील दलित समाजावर परागंदा होण्याची वेळ आलेली दिसून येते. ग्रामव्यवस्थेच्या

जाचक साखळीतून त्यांची सुटका नाही. अंगात देवी येणे, पोतराजाने गावाच्या शीवेवर देवीचा गाडा पोहोचविणे, अशी अंधश्रद्धेतून आलेली कामे त्याला करावी लागतात.

माणदेशातील अंधश्रद्धा ही दारिद्र्यापेक्षा भयानक वाटते. त्यातून जाणारे बळी, उठणारी वादळे, तरीही त्याच मार्गाने होणारा त्यांचा जीवनप्रवास हे सर्व बेचैन करणारे आहे. माणदेशातील सर्वसामान्य लोक खूप काबाडकष्ट करुन जीवन जगतात. क्वचित् प्रसंगी बळीही जातात. परंतु इमान सोडत नाहीत. 'तडीपार'(१९६१) ह्या कथासंग्रहातील 'डोंबारी' ह्या कथेतील चित्रा डोंबाऱ्याला त्याचा परंपरागत डोंबाऱ्याचा धंदा सोडण्याविषयी गावातील लोक सांगातात, तेव्हा तो म्हणतो, "बापा, आमचा डोंबाऱ्याचा खेळ वाडवडिलाचा सोडून कसं चालंल...? सोडला तर पोराला बायकू दियाची न्हाय जात...! पोरीला न्हवरा मिळायचा न्हाय...! "(पृ. ६२) ही अगतिकता ह्यातून व्यक्त होताना दिसते. 'सांगावा' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'तमाशा' ह्या कथेतील माणसे जगण्यासाठी उधार कपडे घेतात व तमाशा चालवतात. एकाएकी कापडवाला येतो आणि म्हणतो, "काय रं लेकानो... तोंड चुकवीत बिनघोरी फिरताय...? अंगावरच्या कपड्याची उधारी का तुमच्या बानं दियाची? आताच्या आता माजं पैकं टाका, न्हायतर सणंगच घेऊन जातो..." (पृ. ११७) ह्यातूनही माणदेशी जीवनातील शोषित जीव आणि हा सारा जुलूम सहन करीत चाललेली त्यांची जगण्याची अगतिकता मन बेचैन करणारी आहे. माणदेशातील पीडितांच्या व शोषितांच्या ह्या कथा आहेत. ह्याबद्दल शारदा देशमुख म्हणतात, "अकारण वर्णन कोठेच नाही, व्यक्तीच्या दु:खाच्या सीमा कितीही मोठ्या असल्या तरी अत्यंत भावविवश होऊन किंवा त्या दु:खाबरोबर वाहत जाऊन ते लिहित नाहीत. संयमाने एखाद्याच शब्दरेखेने ते आपले कार्य साधतात... व्यक्तीपरत्वे नव्हे, तर भावनेबरोबरही भाषेत मोहक बदल होतो."[३७] ह्यावरुन माणदेशातील वातावरणाचा परिणाम खरातांच्या कथालेखनावर झाल्याचे दिसून येतो.

माणदेशातील अंधश्रद्धा आणि अगतिकता ह्यांनी हे लोक सडून गेलेले आहेत. अज्ञान आणि दारिद्र्य ह्यांनी खचलेली ही मंडळी कमालीची देवभोळी आहेत. भूतबाधा, मंत्र-तंत्र ह्यावर त्यांचा विश्वास असलेला दिसतो. अशाप्रकारच्या 'मंदिर' ('दौंडी'), 'धाड', 'सांगावा', 'देवाचा कोप', 'नवस' (सांगावा), 'पोतराज' ('गावशीव') ह्या कथा सांगता येतील.

- **माणदेशातील समाजव्यवस्था व दारिद्र्याचे बळी :**

शंकरराव खरातांच्या कथेत गुलामगिरीत जीवन जगून अधोगती झालेला माणूस दिसतो. आपल्यावर अन्याय होत आहे, ह्याचीही जाणीव त्या माणसाला आहे. परंतु सामाजिक व पारंपारिक रुढींच्या साखळ्या ह्या माणसाला सोडू शकत नाहीत.म्हणूनच तो वाट्याला आलेले भोग निमूटपणे भोगतो. गावकीच्या चक्रात भरडला जाणारा बंडा मांग, निर्दयी फौजदाराच्या वासनेला बळी पडणाऱ्या जयासारख्या तरुण दलित स्त्रिया हे सर्व लोक एकाच समाजव्यवस्थेचे बळी आहेत. ह्या लोकांच्या अधोगतीस माणदेशी समाजव्यवस्थाच कारणीभूत ठरलेली आहे. ह्यासंदर्भात वा. ल. कुलकर्णी म्हणतात,"शंकरराव खरातांच्या कथांत स्त्री - पुरुष वावरत असले, तरी ते विशिष्ट जाती - जमातींचे प्रतिनिधी असतात. त्यांना त्यांचे असे खास व्यक्तिमत्त्व नसते. त्या कथा काही विशिष्ट स्त्री-पुरुषांच्या कथा नसतात; तर ते ज्यांचे प्रतिनिधी म्हणून आलेले असतात, त्या जाती-जमातींच्या कथा असतात. माणसांना माणुसकीचा विसर पडल्याने ह्या जाती-जमातीतील स्त्री - पुरुषांना पिढ्यान्पिढ्या, वर्षानुवर्षे भोगावे लागणारे मूकदु:ख खरातांच्या या प्रसंगचित्रातून व व्यक्तिचित्रातून एकसारखे प्रकट होताना दिसते."[३८]

खरातांनी माणदेशातील उपेक्षित व दुर्लक्षित माणसांवर प्रकाश टाकलेला आहे. माणदेशी ग्रामीण भागातील अनेक वर्षांपासून चालत आलेल्या रुढी - परंपरा व त्या परंपरांनी काही मानवसमुहावर लादलेली ठराविक कामे, त्यातून निर्माण झालेले पोटापाण्याचे प्रश्न, त्यातून जाणारे बळी ह्या चक्रात तेथील माणसांना जीवन जगावे लागते. अठरा पगड जातींच्या लोकांना ह्या समस्येला तोंड द्यावे लागते. समाजाकडून त्यांना कधीही चांगली वागणूक मिळत नाही. उन्हातान्हात सतत भटकंती करावी लागते. कसलेही अस्तित्त्व नसलेले जीवन जगावे लागते. 'तडीपार' (१९६१) ह्या कथासंग्रहातील 'भामटा' ह्या कथेत गंगाराम ह्या माकडवाल्याला वाईट परिस्थितीला सामोरे जाव लागते. कितीही प्रामाणिकपणे वागले, तरी समाज त्याला नावे ठेवतो, चोर ठरवतो व जीवन जगणे मुश्किल करुन टाकतो. त्याच्या बोलण्याकडेही कोणी लक्ष देत नाही. तो विषण्णतेने म्हणतो, "आमी कुणाच्या वाळल्या पाचोळ्यावर पाय देणार न्हाय... मग पोलीस इळामंदी पालावर का येतू....?" (पृ. १०६) किंवा "भामट्याचा गुन्हा पचवायचा आन् माकडवाले दानाला दियाचे... माकडासारख्या प्राण्याला आमी शिकवतो ! आमाला का कळत न्हाय पोलिसांचं." (पृ. १०७) ही माणदेशातील लोकांची व्यथा येथे प्रकट झाल्याचे दिसून येते. 'सांगावा' (१९६२) ह्या

कथासंग्रहातील 'कमाई' ह्या कथेत रामा येसकराला अण्णा इनामदार लाकडे फोडून घेतल्यावर म्हणतो, "अरे लेका, आम्हीच आता विकतचे दाणे खातो, अन् तुला कुठले देणार ?" (पृ. ४८) तेथेही तो दारिद्रयाचा बळीच झालेला दिसून येतो. 'सुटका' (१९६४) ह्या कथासंग्रहातील 'सुटका' ह्या कथेतील गणा हमाल आपल्या परिस्थितीने वैतागलेला असतो. अशात त्याचा मुलगा आजारी पडतो. औषधाविना तो मरतो. तेव्हा गणा वैतागाने म्हणतो, "देवा, बरं केलंस...! भार हालका झाला...सुटका झाली !" (पृ. १०८) अशा मन विषण्ण करणाऱ्या व्यक्तिरेखा खरातांच्या माणदेशी कथेतून दिसून येतात. 'दौंडी' (१९६५) ह्या कथासंग्रहातील 'बहिष्कार' ह्या कथेत नाना महार हा गावकामगार आहे. त्याला डॉ.आंबेडकरांच्या विचारसरणीने झपाटलेले आहे. माणसासारखे आपण वागावे, असे त्याला वाटते. पारंपरिक कामे आपण नाकारली पाहिजेत. ह्या विचाराने महारवाड्यात क्रांती होते. पण सर्वजण उपाशी मरतात. नाईलाजाने नाना परत अगतिकपणे आपल्या मुलाला तीच पारंपरिक कामे करावयास लावतो. ह्यावेळी कथाकार म्हणतो, "असं दाटल्या कंठानं बडबडत त्या पोरानं खराटा, टोकरी उचलली आणि ते वेगानं त्या संडासाच्या चरकातील नरकात उतरलं..." (पृ. १४१) येथे सामाजिक व्यवस्थेचे बळी माणदेशात आजही जातात, ह्याचा प्रत्यय येतो.

माणदेशातील दलितांच्या वेदनेचे प्रत्ययकारी चित्रण खरातांच्या कथेत आलेले आहे. माणदेशातील खेड्यात अद्यापही ही अवस्था पहावयास मिळते. 'पुरावा', 'पांडोबाचं इलेक्शन' ('लिलाव'), 'साहेब आपलाच शेरा पाहिजे' ('आडगावचं पाणी') ह्या कथांमधून हे दिसून येते.

- **माणदेशातील भुकेलेल्यांच्या व्यथा व पोलिसी अत्याचार :**

खरातांच्या माणदेशी कथेत सततच्या दुष्काळामुळे कंगाल बनलेल्या, अन्याय सहन करणाऱ्या लोकांच्या व्यथा दिसून येतात. हे लोक पोटासाठी शहराकडे जातात. फक्त दलित जातीत जन्म घेतलेले लोकच ह्याला सामोरे जातात, असे नाही. तर जे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत, अशा सर्वांना ह्या परिस्थितीला सामोरे जावे लागते. कुटुंब चालविण्यासाठी अनेकांना चोऱ्या कराव्या लागतात. त्यातून संपूर्ण कुटुंबच उध्वस्त होते. अशा माणदेशी व्यथा खरातांनी चित्रित केल्याचे दिसते. 'सुटका' (१९६४) ह्या कथासंग्रहातील 'पालखीचं दर्शन' ह्या कथेतील सुंद्रा ही गरीब स्त्री तिचा नवरा व्यसनी असल्याने व पाठीमागे पोरांचे लेंढार

सांभाळण्याची जबाबदारी असल्याने ती निरनिराळी सोंगे घेऊन चोऱ्या करते. कारण पालखीच्या गर्दीतच चोऱ्या करण्याची संधी असते. अनेकवेळा पकडली जाते. सुटून येते व म्हणते, "पण या पोरट्यांची पोटं जाळायची हायीत. त्यापायी तरी मला पालखीच्या दर्शनाला गेलं पाहिजे." (पृ. ९४) ही व्यथा सुन्न करणारी आहे. 'सुटका' (१९६४) ह्या कथासंग्रहातील 'बाभळीचे काटे' ह्या कथेतील नामदेव घरात आलेल्या पाहुण्यासमोर गरिबीचे प्रदर्शन नको म्हणून कपड्यांची चोरी करतो व पाहुण्यांसमोरच पोलीस त्याला पकडून नेतात व अत्याचार करतात. 'लिलाव'(१९८४) ह्या कथासंग्रहातील 'धंदा' ह्या कथेत माधव हा बी.एस्सी झालेला बेकार तरुण हातभट्टीच्या दारुचा धंदा करतो. त्याचे सर्व व्यवस्थित चाललेले असते एवढ्यात गावातील लोक पोलिसांना कळवतात. त्याला पकडून नेले जाते. सर्व उध्वस्त होते. पोलिस अत्याचार करतात. ह्यातून सामाजिक प्रश्नचिन्ह समोर उभे राहते. 'लिलाव' (१९८४) ह्या कथासंग्रहातील 'माझी विहीर' ह्या कथेतील नाना हा सर्वसामान्य माणूस आहे. त्याची विहीर व शेत डेपोसाठी सरकारी अधिकारी जप्त करतात. नानाला वेड लागते. निर्दयपणे त्याच्या भावभावनांची होळी केली जाते. 'बारा बलुतेदार' (१९५९) ह्या कथासंग्रहातील 'आबा रामोशी' ह्या कथेतील आबा हा आपल्या तरुण बहिणीबरोबर रहात असतो. आबाचा वडील शिरपा तुरुंगात असतो. रामोशी म्हणून आबाला चावडीवर हजेरीला जावे लागते. हजेरी बंद करावी म्हणून आबा पाटलाला विनंती करतो. पाटीलही फौजाराकडून हजेरी बंद करण्याचे वचन देतो. फौजदारासाठी दारु व बोकडाची व्यवस्था केली जाते. पण फौजदाराची नजर आबाच्या बहिणीवर असते. तो तिच्यावर बलात्काराचा प्रयत्न करतो. आबा बघतो व फौजादाराचा खून करतो. एवढ्यात तुरुंगातून सुटून आलेला शिरपा हे पाहतो. खुनाच्या आरोप स्वतःवर घेतो व तुरुंगाची वाट धरतो. व्यवस्थित जगू पाहणाऱ्या गुन्हेगार माणसाची ही पोलिसी अत्याचाराने होणारी ससेहोलपट हृदयाला पीळ पडणारी आहे.

खरातांच्या बहुतेक माणदेशी कथांमधील लोक परंपरेप्रमाणे परिस्थितीचे गुलाम आहेत. जातिनिहाय परंपरागत व्यवसायांमुळे हे माणदेशी लोक दुसरा धंदा करु शकत नाहीत. ह्याचा परिणाम त्यांच्या वाट्याला दारिद्र्य येते. ह्या दारिद्र्यातूनच माणदेशात जातीयता जोपासली जाते. ह्यासंदर्भात इंदुमती शेवडे म्हणतात, "तहानेने तडफडून बेशुद्ध पडलेल्या म्हाताऱ्याला पाहून त्याला पाणी पाजण्याऐवजी पळून गेलेला पुजारी (पाणी) ही कठोर अंतःकरणाची माणसे म्हणजे दलितांवर अन्याय उपेक्षा करणाऱ्या समाजाची प्रतिकेच."[३९] नाईलाजाने अशा प्रकारच्या उपहासाला व परिस्थितीला कंटाळून अनेकजण वाईट मार्गाला

लागतात, ह्याचे चित्रण 'खानावळीतला हिशेब'('आडगावचं पाणी'), 'धनवडीचा न्हावी'('बारा बलुतेदार'), 'नवस'('सांगावा'), 'उचल्या'('तडीपार') ह्या कथांमधून आलेले आहे.

● माणदेशातील दलित स्त्री :

सर्वसामान्यपणे स्त्रीला सामाजिक व कौटुंबिक जीवनात जास्त महत्त्व दिले जात नाही. माणदेशात हे प्रमाण थोडे जास्त वाटते. कारण सततचे दुष्काळ, भौतिक साधनांचा अभाव ह्यामुळे स्त्रीकडे एक उपभोगाचे साधन किंवा घर चालवणारे न बोलणारे यंत्र म्हणून पाहिले जाते. ह्याला परिस्थितीही कारणीभूत आहे. कारण माणदेशातील पुरुष पोटासाठी किंवा नोकरीसाठी शहरात जातो. त्यामुळे पर्यायाने माणदेशातील स्त्रीला गावात असणाऱ्या सवर्ण पुरुषाची शिकार व्हावे लागते. तसेच तिला कुत्सित वागणूक मिळते.

माणदेशातील ग्रामीण जीवनात दलित स्त्रीवरील अन्यायाने कळस गाठला आहे. सवर्णांच्या अत्याचाराला तिला बळी पडावे लागते. 'दौंडी' (१९६५) ह्या कथासंग्रहातील 'वासना' ह्या कथेतील अंजू ही विधवा महार समाजातील स्त्री आहे. मंदिराचा पुजारी तिला देऊळ झाडण्याचे काम देतो आणि एकदिवस तिच्यावर बलात्कार करतो. ह्याठिकाणी वासनेसमोर जात, विटाळ हे सर्व खोटे ठरते. 'टिटवीचा फेरा'(१९६३) ह्या कथासंग्रहातील 'आयना' ह्या कथेतील आयना ही सौंदर्यवान मुरळी असते. तिचा पुरेपूर उपभोग घेऊन तिला वाऱ्यावर सोडून दिले जाते आणि ती मुलांसह आत्महत्येस प्रवृत्त होते. म्हणजेच माणदेशात मुरळी ही उच्चभ्रू समाजातील लोकांच्या भोगवासनेची बळी असल्याचे दिसून येते. 'सांगावा' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'नवस' ह्या कथेतील सारजा ही अंधश्रद्धाळू स्त्री आहे. मरीआईला ती नवस बोलते. तो नवस फेडण्यासाठी तिचा नवरा तात्या हा नानाच्या खुराड्यातील कोंबडा चोरून आणतो. देवीला त्याचा बळी दिला जातो. नानाच्या लक्षात ही गोष्ट आल्यानंतर तात्याला पोलिसांच्या हवाली करण्यात येते. त्यावेळी सारजापरत नवस बोलते व म्हणते, "देवी मरीआय, माझ्या दाल्ल्याला ह्यातनं मोकळं कर....! पुढच्या साली मी तुला कोंबडा कापीन..." (पृ. ६०)

माणदेशावरील खरातांच्या कथेला अनेक पदर आहेत. त्यात स्त्रीचित्रण हे एक आहे. स्त्रियांमध्ये अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य, देवभोळेपणा ह्या गोष्टी मोठ्या प्रमाणावर दिसतात. माणुसकीने जगण्याचे सर्व मार्ग बंद होऊनही त्या माणुसकीची भीक मागत फिरताना दिसतात,

ह्याचे चित्रण 'धोंडाई देवरुषीण' ('टिटवीचा फेरा'), 'लागीर' ('सांगावा'), 'भानगड' ('सांगावा'), 'पालखीचं दर्शन', 'हेडी' ('सुटका'), 'टँ टँ' ('दौंडी'), 'बळी' ('मुलाखत') ह्या कथांमधून आलेले आहे.

● माणदेशातील स्त्री-पुरुषांना परिवर्तनाचा वेध :

दलित साहित्याच्या उदयापूर्वीचे खरातांचे कथासंग्रह पाहिले, तर त्यातील सर्व माणदेशी चित्रण हे अन्याय, अत्याचाराला बळी पडलेल्या सर्वसामान्य वर्गाचे असलेले दिसून येते. दलित साहित्याच्या उदयानंतरचे जे माणदेशी चित्रण करणारे कथासंग्रह आहेत, त्यामध्ये मात्र ह्या सर्वसामान्य दलितवर्गाला मुक्तीचे वेध लागले आहेत, असे दिसून येते. विशेषत: 'दौंडी' (१९६५) ह्या कथासंग्रहापासून रुढी-परंपरा ह्यांच्याविरुद्ध आवाज उठविणाऱ्या व्यक्तिरेखा दिसून येतात. कदाचित दलित साहित्याच्या उदयाचाही हा परिणाम असावा.

माणदेशातील सामाजिक रुढी-परंपरा, अंधश्रद्धा, अन्याय ह्यांच्याविरुद्ध उभी राहिलेली माणसे खरातांनी 'गावशींव' (१९७०) आणि 'माझे नांव' (१९८७) ह्या कथासंग्रहांमध्ये दाखविली आहेत. ह्यासंदर्भात वासुदेव डहाके म्हणतात, "दलित साहित्याच्या परिवर्तनशील अशा विद्रोही जाणिवेने खरातांच्या प्रतिभेलाही नावीन्य गवसले. त्यामुळे ग्रामीण जीवनातील प्रसंगचित्रे ऋजुतापूर्ण शैलीत चितारणारे खरात विद्रोही ठिणग्यांची बरसात करु पाहतात. त्याचे स्वरुप जहाल खदिरांगारासारखे नसले, तरी छिन्नी हातोड्यांच्या ठोक्यातून उठणाऱ्या तेजाचे ते रुप असते. अपार सामाजिक जाणिवेतून स्फुरलेले ते शब्दब्रम्ह असते. खरातांच्या कथेच्या वाटचालीतील तो एक महत्त्वपूर्ण टप्पा मानावा लागेल."[४०]

'तडीपार' (१९६१) ह्या कथासंग्रहातील 'भामटा' ह्या कथेत माणदेशातील गावकुसाबाहेरील लोकांना सतत त्रासाला सामोरे जावे लागते. त्यांच्यावर अन्याय केले जातात, तेव्हा ते म्हणतात, "ह्येचा आमी सूड घेऊ, तरच खऱ्या भामट्याच्या जातीचं हू....! आमाला मान्सातनं उटीवनारं ह्ये कोन....! त्यांचं हात-पायच तोडून मोकळं करु....!" (पृ. १२८) 'सांगावा' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'डाव' ही कथा संतू तराळावर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध पुकारलेल्या लढ्याची आहे. संतूला सरकारी जमीन मिळते. त्यात कष्ट करुन तो स्थिरस्थावर होतो. परंतु गावातील सवर्णांना ते पाहवत नाही. ते तलाठी व सर्कलच्या मनात संतूविरोधात भरवतात. तलाठी डाव टाकतो. संतू खवळतो आणि म्हणतो, " मी या जमिनीत रक्त आटवलं.... घाम गाळला... बगतो कोन ताबा घेतोय त्यो....!" (पृ.

५१), असे बोलून तो सर्कलच्या डोकीत कुदळ घालून त्याचा खून करतो व म्हणतो, " आता या जमिनीचा ताबा कोन घेत न्हाय....! आल्यालं पीक पदारात पाडून घ्या.... सुखानं खावा....!" (पृ. ५२) 'माझं नाव' (१९८७) ह्या कथासंग्रहातील 'खेड्यातील तिढा' ह्या कथेत एक मागासवर्गीय अधिकारी गावात तपासणीसाठी येतो. नावातील सारखेपणामुळे पंच त्याला आपल्याच जातीतील समजून घरी जेवणासाठी घेऊन जातात. आपण दलित समाजातील आहोत असे त्या अधिकाऱ्याकडून समल्यानंतर मात्र त्याला व्यवस्थित जेवणही दिले जात नाही. त्याची झोपण्याची व्यवस्था गोठ्यात केली जाते. तेव्हा तो म्हणतो, "मी काय जनावर आहे...? माझी इथे गोठ्यात झोपण्याची व्यवस्था केली. " (पृ. ७७) ह्या सर्व कथांमधून माणदेशातील दलितांचा संघर्ष, जातिव्यवस्थेविरुद्धचा विद्रोह आणि सर्व नाकारण्याची प्रवृत्ती दिसून येते.

माणदेशात ही अस्पृश्यता आजही काही प्रमाणात पहावयास मिळते. माणदेशातील सर्वसामान्य दलित समाज ह्याला प्रतिकार करताना दिसतो, अशा आशयाच्या 'योजना', 'म्हातारपणी बाटली', 'प्रो. वाघमाऱ्यांचं आव्हान' ('माझं नाव'), 'दादू परीट'('बारा बलुतेदार'), 'बहिष्कार'('दौंडी'), 'एक संघर्ष', 'फासेपारध्याचं पाल' ('आज इथं, उद्या तिथं') ह्या कथा सांगता येतील. ह्या सर्व कथांमधून माणदेशातील दलित समाजाला नवीन परिवर्तनाचे वेध लागले आहेत, हे दिसून येते.

### ४.५.३. माणदेशातील व्यक्तींचे व्यक्तिचित्रण :

शंकरराव खरातांचा जन्म माणदेशातील आटपाडीसारख्या दुष्काळी गावात झाला. तेथील अनुभवलेला परिसर त्यांच्या कथेतून चित्रित होत असला, तरी नेमका तेवढाच परिसर येत नाही. त्याचा आवाका मोठा आहे. परंतु विशिष्ट समाजस्तराचे, लोकजीवनाचे आणि पर्यायाने संस्कृतीचे ते त्यांच्या कथेतून प्रकटीकरण करतात, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ज्या माणसाच्या, समाजाच्या जाणिवा खरातांना प्रकट करावायाच्या असतात; तेव्हा त्या माणसांच्या व्यक्तिमत्त्वासह प्रकट होतात. ही माणसे धर्मभोळी आणि सोशीक आहेत, दैवाला दोष देणारी आहेत. बहिष्कृत माणसांच्या व्यथा - वेदना निमूट सोसतात. ती सामान्य माणसाचे जीवन सोशिकतेने जगताना दिसतात. ह्यावरुन त्यांना उपेक्षितांचे जीवनदर्शन घडवावयाचे आहे, असे दिसते. त्यामुळेच त्यांच्या व्यक्ती ह्या "प्रातिनिधिक स्वरुपाच्या टाईप म्हणून येतात. त्यांना त्यांचे खास व्यक्तिमत्त्व नसते," असे इंदुमती शेवडे म्हणतात. [४१]

शंकरराव खरातांच्या माणदेशी कथेतील व्यक्तींचा विचार करताना त्या व्यक्ती प्रातिनिधिक स्वरुपाच्या असल्याचे लक्षात येते. हे स्वरुप कोणत्याही एका समाजापुरते मर्यादित रहात नाही; तर दलित, भटक्या, निमभटक्या इ. अनेक जाती - जमाती आहेत, त्या सर्व येतात. ह्या व्यक्तींच्या दबलेल्या भाव-भावनांना, आकांक्षांना ते चित्रित करतात. 'तडीपार'(१९६१) ह्या कथासंग्रहातील 'कैकाडी' ह्या कथेत गाडेगावच्या मल्या कैकाड्याचे लग्न जमलेले असते. लग्नाचे तांदूळ देण्यासाठी तो पाहुण्यांकडे जातो. तेथून परत येत असताना खणगावच्या पोलिसांना त्याचा संशय येतो. चौकशी करुन त्याला अडकवून ठेवतात. लग्नाच्या दिवशीही त्याला सोडीत नाहीत. तो गजावर धडका घेतो. केवळ गुन्हेगार जमातीत जन्म घेतला, एवढाच त्याच गुन्हा असतो. परंतु पोलिसांच्या अन्यायापुढे तो हतबल होतो. ह्याचे चित्रण खरात असे करतात, "मल्या दामा कैकाड्याचा थोरला ल्योक - टवटवीत आंबाच्या बांडासारखा वाढला होता. त्याचे दंड - पिंड बापासारखेच मोठाड हाडाचे, रंग एकदम काळ्या कोळीसर रानपाखरासारखा. असा हा ऐन उमरीत आलेला गडी, एकट्या माणसाने आडरानात बघितल्यावर माणसाच्या मनात धसकी भरवत होता." (पृ. २४) ह्यामध्ये माणदेशातील भटक्या जातीतील लोकांना येणाऱ्या संकटाचे चित्रण आलेले दिसून येते. तसेच खास माणदेशी शब्दांचा वापरही कौशल्याने केलेला दिसून येतो.

आपल्या जुन्या ग्रामव्यवस्थेचे आधार म्हणजे सोनार, गुरव, लोहार, न्हावी, चांभार, महार, मांग, रामोशी, सुतार, कोळी,परीट हे आहेत. माणदेशातील ह्या बारा बलुतेदारांचे चित्रण खरातांनी अतिशय मार्मिकपणे त्यांच्या 'बारा बलुतेदार' (१९५९) ह्या कथासंग्रहात केलेले दिसते. 'आढळगावचा सोनार' ह्या कथेत सोनाराबद्दल किंवा कोणत्याही जमातीबद्दल माणदेशात चौकशी करण्याची पद्धत कशी आहे, त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे येते: "घाबरलेल्या सोनाराने पटापट डोळ्यांच्या पापण्यांची उघडझाप केली व कबुलीजबाब दिल्यागत तो म्हणाला, "होय. त्याचं नाव रघू!"
"बरं मग, तो कामाला कसा काय ?"
"चांगला, हुशार, कसबी कारागीर आहे तो. सांगाल तो डाग मनासारखा करतो."
"ठीक हाय. आमाला तो दावाल का? त्याच्याशी आम्हांला चार खाजगी गोष्टी बोलायच्या हायेत." पाटलाच्या या बोलाने सोनार अधिकच दचकला व बावचळल्यागत बोलला,
"आता नव्हं का तुमच्या पुढंच तो विडी आणायला गेला ! त्याला विडी चिलमीचा भारी शोक!"

"आसू द्या ! ठीक हाय. त्याला येऊ द्या. आमी बसतो. आमचं काम जरुरीचं आहे." (पृ. १२२-१२३) ह्या सोनाराच्या व्यक्तिचित्रणावरुन माणदेशातील बलुतेदारी पद्धतीची वास्तव जाणीव होते. ह्यासंदर्भात गंगाधर पानतावणे म्हणतात, "कथांतून व्यक्तिरेखाटन करताना लेखक व्यक्तीभोवती सतत पहारा करीत असल्याचे जाणवत रहाते."[४२]

खरातांनी माणदेशी व्यक्तिचित्रण घडविण्यासाठी बाह्यचित्रण आणि मनोचित्रण ह्यांचा वापर केलेला दिसतो. एखाद्या ओळीत त्या व्यक्तीचा बाह्य वेश, आकार, हालचाल, बोलणे इ. बाबींचा उल्लेख दिसतो. खरातांच्या व्यक्तिचित्रणात ग्रामीण समाजाच्या विविध थरातील व्यक्ती दिसून येतात. महारापासून इनामदारापर्यंत, तरुण विधवेपासून ते वयस्कर स्त्रीपर्यंत अशी विविध प्रकारची माणसे त्यांच्या माणदेशी कथासंग्रहात भेटतात. 'सांगावा'(१९६२) ह्या कथासंग्रहातील "माया" ह्या कथेतील वैदूची बायको पालं चार दिवस माळावर राहू द्यावी म्हणून गणपाच्या समोर आपले पोर ठेवते आणि म्हणते, "पाटील ! या तान्हया मुलाकडं बघ! आमाला हितं चार दिस राहू दे ! आम्ही तुम्हाला काय करणार न्हाय." (पृ. ७९) ह्यावरुन खरातांच्या माणदेशी कथासंग्रहातील व्यक्तिचित्रण हे गावगाड्यातील वेगवेगळे प्रश्न समोर उभे करताना दिसून येते. तसेच ते व्यक्तींच्या देह रुपाच्या वर्णनात फारसे न रमता त्यांच्या अंतरंगातील कारुण्य, त्वेष चित्रित करण्यावर अधिक लक्ष देतात, हे दिसून येते.

### ४.५.४. माणदेशाचे आर्थिक चित्रण :

शंकरराव खरातांनी ज्या वर्गाचे विशेषत: चित्रण केलेले आहे, तो वर्ग आर्थिकदृष्ट्या मागास असलेला दिसून येतो. खरातांची कथा ग्रामीण जीवनातील अन्न, न्याय आणि माणुसकी ह्यांना पारखे झालेल्या माणदेशी माणसांची आहे. "बारा बलुतेदार" (१९५९) ह्या कथासंग्रहातील "धनवडीचा न्हावी" ह्या कथेत नाना न्हावी संपूर्ण गावात हजामत करण्यासाठी फिरतो. परंतु त्याला कोणीच पैसे किंवा धान्य देत नाही, ह्याचे चित्रण असे येते : "नानाला पोटाला मिळेना. घरची चूल पेटेना. त्याच्या घरात काळ शिरला. दारात पुढच्या भिंतीला टेकून नाना चितागती होऊन गुडघ्यात मान घालून बसे. भाकरीपायी धाकटी पोरे आईजवळ किरकीर करीत. भाकरीविना पोरांचे हाल नानाच्या बायकोला बघवेनात. ती काळजीत बसे. तिचे डोळे पाण्याने भरत. डोळ्यातून आसवे गाळीत सुंद मनाने ती घरातील सांदीकोपऱ्यात टक लावून बघत बसे. तिला उदाशी सुटली. एके दिवशी भल्या पहाटे दीड वर्षाच्या पोराला घेऊन ती एकदम गडप झाली." ( पृ. ९४) माणदेशातील ह्या चित्रणावरुन

तेथील सर्वच बलुतेदारांना जीवन जगताना प्रत्यक्ष खूपच आर्थिक त्रास सहन करावा लागतो, हे वास्तव चित्रण समोर येते. ह्यासंदर्भात अंबादास माडगूळकर व सूर्यकांत खांडेकर म्हणतात, "बहुश: खरातांच्या कथाविश्वातील व्यक्ती दारिद्रयाने गांजलेल्या व सवर्ण हिंदूच्या अरेरावीने दबलेल्या अशी आहेत."[४३]

माणदेशात सतत दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे तेथील माणसांची मानसिकताही त्याच पद्धतीची बनल्यासारखी दिसते. "आडगावचं पाणी" (१९७०) ह्या कथासंग्रहातील 'स्पेशल रुम' ह्या कथेत एक चौदा - पंधरा वर्षाचा मुलगा साहेबी पोशाखातील माणसाला म्हणतो, "साहेब ! टांग्यात जाऊ नका ! जास्त पैसे पडतील. आज मला दिवसभर पोटाला काही मिळाले नाही. मी तुमची बॅग घेऊन येतो. !" (पृ. ३१) ह्यावरून माणदेशातील आर्थिक स्थितीचे हृदयद्रावक चित्र समोर उभे राहते. "टिटवीचा फेरा" (१९६३) ह्या कथासंग्रहातील 'काळ' ह्या कथेत दुष्काळामुळे गोरगरीब माणसांच्या संसाराची होणारी दारुण स्थिती चित्रित केलेली दिसून येते. मुळातच माणदेश हा कमी पावसाचा भाग, उघड्या माळरानाचा प्रदेश असा असल्यामुळे माणदेशी माणूस काबाडकष्ट करुन, पोटासाठी राबून बेजार झालेला दिसून येतो. पाऊसकाळात पाऊस नाही पडला, तर मजुरांना गाव सोडून जावे लागते. वटपळगांवात दाजी हा मजुर अशा आर्थिक विवंचनेत सापडलेला दिसतो. पहा : "दाजीला आता काम मिळेना. त्याची बायको धुरपा रोजगारविना बसू लागली, दाजी रानपाखरागत वरावरा मळ्यावस्तीवर फिरुन मोकळ्या पदरानं घरी येई. दारात दातपाय निखळल्यागत गप्पगप्प बसे, आणि पुढच्या काळजीत झुरत पडे. त्यातच आला काळ निभावून नेण्यासाठी गावचं माणूस जगायला जाऊ लागलं. गोरगरिबांच्या घराला दारं - तडक्या लागल्या. ती चारी वाटेनं चारी दिशेला पाखरात निघून गेली." (पृ. ७३)

खरातांच्या माणदेशी कथेत फक्त दलितवर्गातील लोकांचेच चित्रण दिसत नाही. तर अन्य गरीब लोकांचेही चित्रण आलेले दिसून येते. "सांगावा" (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'तमाशा' ह्या कथेत तमासगीर लोकांचे होणारे हाल, त्यांच्यावरील अत्याचार ह्याबाबी आर्थिक दृष्टिकोनातून महत्त्वाच्या वाटतात. गावातील प्रतिष्ठित लोक तमाशा पहाण्यासाठी जातात. वाटेतच त्यांना त्या तमाशाच्या पार्टीत आपल्याच गावातील लोक दिसतात. तेव्हा त्यांच्यातील संवाद पहा : "कुठलावं मालक ! आवं आम्ही मोकळंच हाय ! इक खायाला जवळ पैसा न्हाय !" (पृ. १२४) किंवा "लिलाव" (१९८४) ह्या कथासंग्रहातील 'लिलाव' ह्या कथेत गावातील मतदारांना पैसे देवून त्यांचे मत विकत घेण्याचा प्रयत्न पुढारी लोक

करतात, ते सर्व गरीब लोकांना दिसते व समजते. परंतु आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे ते काही बोलू शकत नाहीत. ह्यासंदर्भात सरपंचाला दादू म्हणतो, ‘‘काय करता, सरपंच ! आपल्या या पोटाच्या टुकड्यासाठी हे दिवस काढायचं ! आम्हाला बनेलपणा करुन काय पुढारी थोडचं व्हायचं हाय!’’ (पृ. ७१)

एकंदरीत, शंकरराव खरातांच्या माणदेशी कथासंग्रहात खालच्या स्तरातील लोकांचे चित्रण आलेले दिसून येते. माणसाला जीवन जगत असताना सर्व गोष्टींचे सोंग घेता येते. पण पैशाचे सोंग घेता येत नाही, ह्याची वास्तव जाणीव खरातांच्या माणदेशी कथाचित्रणातून होते. अशा स्वरुपाच्या ‘निधी’(‘आडगावचं पाणी’ - १९७०), ‘दिवसा अंधार होतो’(‘मुलाखत’ - १९७८) , ‘जीवा’ (‘लिलाव’ - १९८४), ‘जातीनं माती केली’(‘माझं नाव’ - १९८७) ह्या माणदेशी कथा सांगता येतील.

## ४.५.५ माणदेशाचे आध्यात्मिक - धार्मिक चित्रण :

शंकरराव खरातांच्या माणदेशी कथेतील आध्यात्मिक - धार्मिक चित्रण तपासताना प्रथम त्यांनी जे चित्रण केलेले आहे, ते मध्यमवर्गीय समाजाचे आणि दलित वर्गाचे ह्याची जाणीव ठेवावी लागते. हे दोन्ही वर्ग कृषिसंस्कृतीशी निगडीत असणारे वर्ग आहेत. माणदेशात सततच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे त्याठिकाणचे लोक अंधश्रद्धाळू व श्रद्धाळू असल्याचे लक्षात येते. आपल्यावरील अन्याय - अत्याचाराबद्दल माणसाला दोष देण्यापेक्षा ते दैवाला दोष देतात, देवाची अपकृपा समजातात. माणसांनी निर्माण केलेल्या संकटातून सुटताच देवाची कृपा समजतात, ‘‘बारा बलुतेदार’’ (१९५९) ह्या कथासंग्रहातील ‘केरु चांभार’ ह्या कथेतील केरु चांभार हा चिकाटीने आपला परंपरागत धंदा करणारा माणूस आहे. देवधर्म करणारा असल्यामुळे आपणाला कसलाही आजार होणार नाही. दुसऱ्याच्या मदतीला गेले पाहिजे. असे समजून दारावरती आलेल्या पंढरीच्या वारकऱ्याचे तो स्वागत करतो, त्याला झालेल्या साथीच्या आजारात त्याची सेवा करतो. तरीही तो वारकरी केरुच्या घरात दगावतो. केरुला देवीच्या रोगाची लागण होते. त्यात तोही मरतो. पण अधंश्रद्धेने वेडी झालेली त्याची बायको म्हणते, ‘‘ही जागाच खराब ! या जागेत माणसाचा वंश वाढत नाही.!’’ (पृ. ६२) अशा अंधश्रद्धेतूनच अनेक निष्पाप लोकांचे बळी जातात. ‘टिटवीचा फेरा’ (१९६३) ह्या कथासंग्रहातील ‘धोंडाई देवरुषीन’ ह्या कथेतून धोंडाईवर लोकांची श्रद्धा असल्याचे दिसून येते. ‘‘बायली ! या धोंडाईचं केवढं सत्पण ! देवीनं कय तिला चांगला हातगुण दिलाय !’’, असा

लोकांचा समज आहे. तरीही धोंडाई स्वतःच्या नातवाला वाचवू शकत नाही. देवालाच ती म्हणते, "देवा....! माज्या नशिबाला काय हे आणलंय ! माजं सोन्यासारखं पोरगं घेऊन गेलाच...!" (पृ. ७०-७१) हे सर्व माणदेशातील धार्मिकतेतून निर्माण होणाऱ्या अंधश्रद्धेचे बळी झालेले दिसून येतात.

माणदेशातील अनेक परंपरांना धार्मिकता - आध्यात्मिकता कारणीभूत असल्याचे जाणवते. "बारा बलुतेदार" (१९५९) ह्या कथासंग्रहातील 'दादू परीट' ह्या कथेत देवीला काहीतरी नवस बोलण्यास देवी आपल्याला पावते, आपले कल्याण होते, असा धार्मिकतेचा पगडा माणदेशी ग्रामीण समाजाच्या मनावर असल्याचे दिसते. कोंडाबाई परटीण ही देवीच्या मानाची मालकीण असते. ती देवीजवळ आपली व्यथा व्यक्त करताना म्हणते, "पाठीपोटी याकच मूल हाय. तेचं मन स्थिरावर न्हाय. कामउद्योगाला तेचा हात लागीना. मुलाचा गडी झाला. आता तेचं लगीन कंदी हुईल ? पोटपाणी कंदी पिकंल ? आमी दोघं थकलू, देवा." देवीचा भक्त हेल काढीत, पाय लटलटवीत कोंडाईला म्हणाला, "बाई, तुज्या मुलाचं यंदाच्या साली लगीन हुईल. तेचं पोटपाणी पिकंल. तेचा येल मांडवाला जाईल." थोडासा थांबून तो पुन्हा म्हणला, "म्हातारे , मातुर एक गोष्ट कर !"

"बोला, देवा !"

"तू ओल्या पडद्यानं येत्या मंगळवारच्या पुनवला मरीआईला जा. आठवड्याचा मंगळवार धर. हाटंल तुज्या मागची साडेसाती !"

"तुज्या बोलाला यास येऊ दे. म्होरच्या साली निवदनारळ करुन देवीची ओटी भरीन." (पृ. ७४-७५) ह्या चित्रणावरुन माणदेशातील धार्मिकता किती टोकाची आहे, हे स्पष्ट जाणवते."दामु गुरव" ह्या कथेतील दामू देवधर्म करणारा माणूस आहे. तो मंत्र - तंत्र करुन लोकांना वेगवेगळ्या संकटातून सोडवण्याचा प्रयत्न करतो. त्यासंदर्भात गावातील पंताला न बोलल्याबद्दल दामूचा राग येतो. तेव्हा, "पण म्हणत्याती देवधर्म घालणारी माणसं गिराण सुटल्यावर एक इळ कुणाशी बोलत नाहीत ! दामू आपला 'जंतर-मंतरवाला', तेला तो जपत असंल!" (पृ. १३२) ह्यावरुन माणदेशातील देवधर्म करणाऱ्या माणसांविषयी सर्वसामान्य समाजात आस्था असल्याचे दिसून येते. "सुटका" (१९६४) ह्या कथासंग्रहातील 'सुटका' ह्या कथेतील दरिद्री गणा हमाल वेळेवर पोराला औषध देऊ शकत नाही. आजारपणात पोरगा मरण पावतो. आपल्या दारिद्र्याशी सामना करण्यापेक्षा त्याचा आपल्यावरील भार हालका झाला, असे त्याला वाटते व वैतागून म्हणतो, "देवा, बरं केलंस ! भार हलका झाला. सुटका

झाली." (पृ. १०८) ह्यातून माणेदशी माणसांच्या मनात धार्मिकता हीच बाब घट्ट असल्याचे दिसून येते.

खरातांच्या माणदेशी कथेत कमालीची धार्मिकता दिसून येते. "सांगावा" (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'पाणी' ह्या कथेत तहानेने व्याकुळ झालेला सावळा लोहार झीट येऊन खाली पडतो. त्याच्या स्पर्शाने देवळाच्या पायऱ्या विटाळल्या म्हणून पुजारी पायऱ्यावरुन पाणी ओततो. वास्तविक पुजाऱ्याने सावळाला पिण्यासाठी पाणी न दिल्यामुळे तो बेशुद्ध पडलेला असतो. पायरीवरील पाणी अंगाखाली आल्यावरही सावळा उठत नाही. तो मेला की काय, असे समजून आपल्यावर काही यायला नको म्हणून पुजारी पळून जातो. सावध झाल्यावर आपले अंग भिजले कसे, एवढ्या उन्हात आपल्याला कुणी पाण्याची आंघोळ घातली, असे विचार त्याच्या मनात येतात. ही देवाची कृपा समजून तो भक्तिभावाने देवापुढे नतमस्तक होतो.

एकंदरीत, दारिद्रयामुळे, सामाजिक गुलामगिरीमुळे अज्ञानात वावरणारी ही माणसे अशा प्रकारे धार्मिकतेच्या व आध्यात्मिकतेच्या आहारी न गेली, तर नवल असे वाटते. अंधश्रद्धेपोटी शोकांतिका झालेल्या अनेक व्यक्तिरेखा खरातांनी रेखाटून दलित समाजातील अंधश्रद्धेवर धर्मभोळेपणावर प्रकाश टाकलेला दिसून येतो. अशाप्रकारच्या 'माळेगावचा कोळी'('बारा बलुतेदार'-१९५९), 'लागीर'('सांगावा'-१९६२), 'नवस'('सांगावा'-१९६२), 'गोसावी', 'पोतराज'('गावशीव'-१९७०) ह्या कथा सांगता येतील.

### ४.५.६. माणदेशाचे भाषिक चित्रण :

शंकरराव खरातांनी माणदेशी कथेसाठी नागरभाषा व ग्रामीण बोलीभाषा या दोहोंचा वापर केलेला दिसतो. प्रामुख्याने ते स्वत: जे जीवन जगले, अनुभवले व पाहिले; तेच त्यांनी माणदेशी कथेतून व्यक्त केले आहे. माणदेशातील कैकाडी, भराडी, रामोशी, फासेपारधी, माकडवाले, भामटे, उचले अशा गावकुसाबाहेर राहणाऱ्या लोकांच्या भाषेची त्यांच्या व्यवसायानुरुप वेगवेगळी रुपे त्यांच्या कथेतून पहावयास मिळतात. खरातांची भाषा ही निश्चितपणे वाचकांच्या हृदयापर्यंत जाऊन पोहोचते. ती त्यातील अस्सल माणदेशी संवादांमुळे होय. कृत्रिमता, आलंकारिकता त्यांच्या कथेत दिसत नाही. ह्यासंदर्भात अरुणा लोखंडे म्हणतात, "त्यांच्या कथेतील व्यक्तींनीच प्रादेशिक वातावरण अधिक जिवंत तथा कथेचा घाट व अंतरंग अगदी निराळे, वैशिष्ट्यपूर्ण बनविले आहे. त्यांच्या प्रभावी व्यक्तिचित्रणामुळे व

प्रादेशिक वातावरण निर्माण करण्याच्या सामर्थ्यामुळे त्यांची कथा वाचकांच्या मनाची पकड घेते.''[४४]

खरातांच्या 'टिटवीचा फेरा'(१९६३) ह्या कथासंग्रहातील वर्णने वातावरणनिर्मितीसाठी चांगली वाटतात. त्यांच्या 'काळ' ('टिटवीचा फेरा' १९६३) ह्या कथेतील पुढील वर्णन पहा : ''असं बोलताच तिला पेकटात मागून जोरात वहाणेची लाथ बसली व ती जागच्याजागी कोलमडली. ती रडू - ओरडू लागली. मुले कोंबडीच्या पिलागत तिला चिकटली व तीही रडू लागली.'' (पृ. ८०) खरात हे ग्रामीण जीवनातील वातावरण व ग्रामीण शब्दांची मांडणी कथेत चपखलपणे करताना दिसतात. 'सांगावा'(१९६२) ह्या कथासंग्रहातील 'कमाई' ह्या कथेत माणदेशातील थंडीचे चित्रण करताना ते म्हणतात, ''पौष महिना भारी थंडीचा. त्यात त्या दिवशी कडक गारठा पडला होता. थंडीच्या कडाक्यानं माणूस जागचं हालत नव्हतं. घरातून बाहेर तोंड काढवत नव्हतं.

थंडीत कुत्री मुटका होऊन बसली होती. दारातली जनावरं पार आकसून उभी होती. गाई वांगारल्या होत्या. बकरी - कोकरं माना मुरगाळून गपचिप बसली होती. रात्र उजाडत आली होती. फटफटीत झालं होतं. तरी माणूस बाहेर दिसत नव्हतं.'' (पृ.४२) 'सांगावा'(१९६२) ह्या कथासंग्रहातील 'पाणी' ह्या कथेतील उन्हाचे चित्रण पहा: ''वैशाखाचा भर... ऐन दुपार. रणरणते ऊन. वाटेच्या माणसाला चटाचट भाजत होते. झीट आणीत होते. सावळा लोहार पार ठकला होता. हातपाय वाळले होते. छातीचा पिंजरा झाला होता. तो आपल्या खोपटातून बाहेर पडला. डोळ्यांवर हाताचा पडदा धरुन नीट वरच्या अंगाला बघितले व मनाशीच पुटपुटला. 'इचि बायली ही ऊन का इगीन!''(पृ. १४१) ह्यावरुन माणदेशातील कडक थंडीचे चित्रण किंवा कडक उन्हाळ्याचे चित्रण करुन उत्तम वातावरणनिर्मिती खरातांनी केल्याचे निदर्शनास येते. 'दौंडी' (१९६५) ह्या कथासंग्रहातील 'पूजा' ह्या कथेतील एकाकी असणाऱ्या महारवाड्याचे जिवंत चित्रण त्यांनी पुढीलप्रमाणे केल्याचे दिसते : ''आता मांगोडा , व्हलारवाडा गप्प उभा होता. सुतकात घावल्यावाणी दिसत होता. कोपऱ्यावरल्या घराच्या वळचणीला एक कुत्रे ओंगाळवाणा आवाज काढून ओरडत होते.'' (पृ.४३) अशी वातावरणनिर्मिती 'रामा महार' ('बारा बलुतेदार'- १९५९), 'डोंबारी' ('तडीपार'- १९६१),'भानगड','तमाशा'('सांगावा'- १९६२), 'गस्त' ('टिटवीचा फेरा'- १९६३), 'पोतराज' ('गावशीव' - १९७०), 'लिलाव', 'जीवा'('लिलाव'-१९८४) अशा अनेक कथांमधून पहावयास मिळते.

खरातांच्या काही कथासंग्रहांमधून अस्सल माणदेशी भाषाशैलीचा प्रत्यय येतो. आपल्या व्यापक अनुभवाच्या जोरावर ग्रामीण साहित्याने न पाहिलेले माणदेशी विश्व त्यांनी शब्दबद्ध केले. गावकुसाबाहेरील माणदेशी भाषा त्यांनी आपल्या कथेतून व्यक्त केली. त्यांनी ग्रामीण कथेला दलित जीवनदर्शनाची जोड दिली. 'तडीपार'(१९६१) ह्या कथासंग्रहातील 'माया' ह्या कथेत वैदू समाजातील भाषा दिसते. ह्यातील गणपा शेतकरी वैदूला म्हणतो,

"का रं वैदू! एक गोष्ट बोलू का?"

"बोल की, मालका!"

"माजं काम केल्यावर तुज्या पोटाला दाणं घालीन बग!"

"पाटला !तू या मळ्याचा धनी हायेस! मी तुझ्यासाठी काय पण करीन!"

"खरंच करशील ?"

"तू बोल तरी!"

"बोलू ?"

"म्या न्हाय केलं, तर बग!"(पृ. ४७)

'सांगावा' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'नवस' ह्या कथेतील तात्या आपली बायको सारजा हिला सकाळी लवकर उठवताना म्हणतो,

"सारजे! जागी झालीच का ?"

"कावं! नव्हं का उठून बसलीय!"

"अगं, रात सरत आली. कोंबड्यानं पहिली बांग दिली! ऐकली नव्हं ?"

"आवं, ती तर ऐकून नव्हं का दचकून उठून बसलीय"

"अगं, मग येरवाळीच निवद भाकरी करायला लागल्यालं बरं!"

"आवं, तुमी म्हणता ती खरं. पण अजून लय रात हाय. कोंबड्यानं आताशा पहिली बांग दिली. अजून माणूस झोपेतच हाय.!"

"खरं म्हणतीच काय?"

"आवं, मला तरी रातभर कुठं झोप हाय. मी जागसूदच पडलीया नव्हं का! आता धाकटी पहाट झाली बगा!" (पृ. ५२)

अशापद्धतीची माणदेशी ग्रामीण संस्कृतीत नवरा-बायकोच्या संवादातून खरातांनी माणदेशी शैली समृद्धपणे चित्रित केलेली दिसून येते. ह्या भाषेतील ग्रामीण कसदारपणा व जिवंतपणाची रग वाचकांचे लक्ष वेधून घेते.

खरातांनी माणदेशातील दलितवर्ग सवर्णांना आदराने कसा बोलतो व त्यांच्याशी आदराने कसा वागतो, ह्याचेही अतिशय मार्मिक भाषिक वर्णन केलेले दिसून येते. "टिटवीचा फेरा" (१९६३) ह्या कथासंग्रहातील 'माग' ह्या कथेत भलत्याच वेळेला तात्याला झोपलेला बघून पाटील म्हणतात,

"का रं तात्या, ही काय झोपायची वेळ हाय?"
"दादा ! राती जरा जागरणच झालं बगा !"
"कंच्या रं धाइटीच्या कामाला गेला हुता ?"
"तसं काय न्हाय ! पण आपलं घरचं पोटापाण्याचंच !"
"बरं बरं !" असं म्हणून पाटील पुन्हा तात्याला बोलला, "आरं, आज हेंची काय बिलामत आलीय बघ ! ह्यास्नी वळकलंच नव्हं!"
"ओळकलं की ! काळ्या मळ्यांतलं पांडबा नव्हं का !"
"हेंच्या मळ्यात काय चोरट्यानं भानगड केलीय, तिकडं जायाचं हाय !"
"कसली वं....?" (पृ. २७-२८) ह्यावरुन माणदेशातील बलुतेदारी पद्धतीत प्रत्येकजण एकमेकांवर विसंबून असल्याचे दिसून येते.

शंकरराव खरातांनी काही ठिकाणी समाजमानस व्यक्त करण्यासाठी माणदेशी वाक्प्रचार व शब्दांचाही वापर केलेला दिसून येते. वास्तवाचा प्रत्यय करुन देण्यासाठी असे शब्द वापरणे अपरिहार्य असल्याचे दिसून येते. उदा. 'कुनाची करणी अन् म्हारावर भरनी'('बारा बलुतेदार' - पृ. ६९), 'खाण तशी माती'('आडगावचं पाणी' - पृ. ६) 'हातच्या बांगडीला आरसा कशाला ' ('आडगावचं पाणी'- पृ. ८० ) तसेच माणदेशी बोलीतील अनेक शब्दही संवादातून आलेले दिसतात. त्यात येळवकुत, जोसरा, तुमास्नी, येतूस, जातूस, पंडोस्तर, न्हाय, रंडकी बाय, खुराडा, हुता, माजा, दाल्ला, गॉड हाय, बा, हागवक इ. आहेत.

खरातांनी कथा निवेदनात एखादा प्रसंग चित्रित करताना विशिष्ट शब्दांचा पुन्हा पुन्हा वापर केलेला दिसून येतो. उदा.

'तोवर त्याच्या बायकोने रागाच्या हसाळाने पिते पोर तोडले अन्' (बेलदार)
'तोवर चटाक - पटाक असा जोड्याचा आवाज आला' ('बेलदार')

'मग बापाच्या बोलावर ध्यान देऊन ऐकत बसलेला धन्या विचार करुन बोलला' ('मांग गारुडी')
'धन्याच्या बोलावर चित्त देऊन रकमा म्हातारीने मिटलेले डोळे चटकन उघडले'('मांग गारुडी')
'चित्र्याच्या उलट्या बोलानं हवालदार चिडला' ('फासेपारधी')

ह्यावरुन खरातांनी माणदेशी बोलीतील शब्दांचा वापर करताना शैलीच्या दृष्टीने फारशी जाण दाखवलेली दिसत नाही, असे म्हणावे लागते.

## ४.६. द. ता. भोसल्यांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण :

द. ता. भोसले ह्यांचा जन्म ८ मे १९३६ रोजी 'सरकोली' (ता. पंढरपूर, जि. सोलापूर) ह्या गावी झाला. गरीब शेतकरी कुटुंबात जन्म झाल्यामुळे त्यांना लहानपणापासून दारिद्र्याचे चटके सोसावे लागले. त्यांचे प्राथमिक शिक्षण सरकोली येथे, तर माध्यमिक शिक्षण सांगोले येथे झाले. कॉलजचे शिक्षण सोलापूरच्या संगमेश्वर महाविद्यालयातून पूर्ण झाले. त्याठिकाणी अनेक मोठ्या व्यक्तींचा सहवास व संस्कार ह्यातून भोसले ह्यांच्या जीवनाला निश्चित दिशा प्राप्त झाल्याचे दिसते. कथाकार भोसले हे बी.ए. च्या पदवी परीक्षेत पुणे विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. एम.ए. चे शिक्षण त्यांनी पुणे विद्यापीठात पूर्ण केले.

जून १९६२ पासून रयत शिक्षण संस्थेच्या श्रीरामपूर (जि. अहमदनगर) येथील बोरावके महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून नोकरीस सुरुवात केली. १९९६ ला पंढरपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयामधून उपप्राचार्य म्हणून ते निवृत्त झाले. भोसले ह्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य नमूद करताना डॉ. पंडित टापरे म्हणतात, ''परिसर ग्रामीण असो वा शहरी, तेथील सांस्कृतिक जीवनावर सरांनी आपल्या कुशल अध्यापनाने व प्रभावी वक्तृत्वाने एक अमिट मुद्रा उमटवली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्या मित्र मंडळींशी मिस्किलपणे बोलत त्यांना कार्यप्रवृत्त करावायाचे.''[४५]

द.ता. भोसले ह्यांच्या प्रकाशित ग्रंथरुप साहित्यात पुढील लेखनाचा समावेश होतो. 'इथे फुलांना मरण जन्मता'(१९७४), 'मी आणि माझा बाप'(१९६९) ह्या दोन कादंबऱ्या; 'अन्न'(१९७१), 'पाळत'(१९७७), 'अगं अगं म्हशी'(१९८२), 'पाऊस'(१९८५), 'मनस्विनी'(१९९५) हे पाच कथासंग्रह; 'पार आणि शिवार'(१९८५), 'आठवणीतला

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

दिवस'(१९९५) हे दोन ललितगद्य लेखसंग्रह. तसेच चरित्र, समीक्षा, संपादन, स्फुट लेखन ह्या स्वरुपाचे लेखनही त्यांनी केले आहे. मात्र भोसले ह्यांना प्रामुख्याने ग्रामीण कथाकार म्हणूनच ओळखले जाते.

द. ता. भोसले ह्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती मिळाली होती. तसेच आगरकर, गडकरी, वा. गो. आपटे, राधाबाई परांजपे ही चार पारितोषिकेही मिळाली होती. एम.फिल., पीएच.डी. चे मार्गदर्शक म्हणून ते आजही काम करतात. दि.१४,१५,१६ मे १९८२ रोजी नेवासे जि. अहमदनगर, येथे झालेल्या चौथ्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे विभागीय अध्यक्षपद त्यांनी भूषविले. 'मनस्विनी'(१९९५) ह्या कथासंग्रहास १९९५ चा रोहमारे ट्रस्टचा उत्कृष्ट ग्रामीण लेखनाचा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला. तसेच शिवगिरिजा प्रतिष्ठान, कुर्डूवाडी ह्यांच्याकडून ५०००/- रु. चा पुरस्कार 'मनस्विनी' ह्या कथासंग्रहास मिळाला. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

द. ता. भोसले ह्यांच्या कथालेखनास खऱ्या अर्थाने १९६० ला सुरुवात झालेली दिसते. १९५९-६० साली 'रोहिणी' मासिकात त्यांची 'बेवारस' नावाची पहिली ग्रामीण कथा प्रकाशित झाली. त्यांचे एकूण पाच कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यातील सर्व कथांची संख्या ८० आहे. त्यापैकी माणदेशी चित्रण करणाऱ्या ४८ कथा आढळतात.

### ४.६.१. माणदेशाचे भौगोलिक चित्रण :

द. ता. भोसले ह्यांच्यावर सर्व माणदेशी संस्कार झालेले दिसून येतात. कारण लहानपणापासून आजपर्यंत भोसले हे माणदेशात स्थायिक आहेत. त्यामुळे साहजिक त्या प्रदेशाचे सर्व गुणधर्म त्यांच्या लेखनात उतरलेले दिसतात. त्यांच्या कथेत येणारे बाभूळ, लिंब, निवडुंग, माळरान, घोंगडी, मंदीर हे सर्व माणदेशातील विशिष्ट प्रादेशिक भूवैशिष्ट्ये सांगणारे पुरावे असल्याचे दिसून येते. त्यांच्या 'मनस्विनी' (१९९५) ह्या कथासंग्रहातील 'अभिषेक' ह्या कथेत माणदेशातील प्रदेशाचे चित्रण पुढीलप्रमाणे येते: ''ऊन वाढत होते. आभाळात ढगांनी गर्दी केली होती. झाडांची पाने मुर्च्छित होऊन माना टाकलेल्या पोरासारखी लोंबकळत होती. सूर्याची आग खालच्या कोरड्या रानावर कोसळत होती. झापाची सावली विरळ होत होत त्याला चटके देत होती. समोरच्या मूर्तीनेही या ऊन्हाचा ताप न सोसून डोळे मिटल्यासारखे झालेले होते.''(पृ. १४४) ह्यावरुन माणदेशात कडक ऊन्हामुळे निसर्गातील प्रत्येक घटक मरणासन्न अवस्थेला पोहोचल्याचे दिसून येते.

'अन्न' (१९७१) ह्या कथासंग्रहातील 'रवंथ' ह्या कथेत माणदेशातील सकाळच्या वेळी असणाऱ्या परिस्थितीचे चित्रण पुढीलप्रमाणे येते : "सकाळचा आठचा सुमार. भाद्रपदातील कोवळं आणि लोभस ऊन्ह तिनं बसल्या बसल्या लपेटून घेतलं होतं. शेजारच्या बांभळीच्या फांद्या वाऱ्याच्या मंद झुळकीबरोबर हालत होत्या. त्यांच्या सावल्यांची नक्षी अंगावर उठायची. तिनं रवंथ करायला सुरुवात केली. शेपटीनं पाठीवरच्या गोमाशा झटकल्या. डोळे खोल मंद अन् मिटल्यासारखे झाले." (पृ. १९) ह्यावरुन माणदेशातील भौगोलिकता इतर प्रदेशांपेक्षा वेगळी असल्याचे लक्षात येते. कारण त्याठिकाणी माणसांबरोबर प्राण्यांनासुद्धा जीवन जगताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्याचा परिणाम म्हणूनच म्हशीच्या अंगावर गोमाशा बसलेल्या दिसून येतात. किंवा डोळे खोल गेल्यासारखे दिसतात. कारण ज्या प्राण्याच्या अंगात ताकद कमी असते, त्याच प्राण्याच्या शरीरावर गोमाशा बसतात. ह्याला माणदेशातील भौगोलिकताच कारणीभूत असल्याचे दिसून येते.

द. ता. भोसले ह्यांच्या माणदेशी कथेतून खेडे आणि खेड्यातील शेतीशी निगडीत असणारे जीवन प्रभावीपणे चित्रित होते. माणदेशातील शेती, पाऊस, शेतकरी, शेतीचे पावसावर अवलंबून असणे, ह्या सर्वांचे प्रत्ययकारी चित्रण 'पाऊस' (१९८४) ह्या कथासंग्रहातील 'पाऊस' या कथेतून पुढीलप्रमाणे पहावयास मिळते. "कोसळणाऱ्या पावसाचा आज चौथा दिवस. पाऊस दिवस - रात्र गळतोय. जणू आभाळाला भोक पडलंय. त्यातच अधून-मधून गार वारा झोंबणारा. पडणाऱ्या पावसाला भुईसपाट करणारी हवा. ओलसर रान चिकचिक झालेलं. झाडं गुमान पावसाचा मार खात उभी. झाडांच्या खोबणीत गारठून गेलेले पक्षी पार आवाज हरवून बसलेले. पावसाच्या पाण्याबरोबर जमीन सपाट झालेली." (पृ. २) ह्यावरुन माणदेशात पाऊस पडायला सुरुवात झाली की, ती मोठ्याने पडतो व सगळीकडे नुकसान करुनच जातो. जमिनीवरील चांगली मातीही पाण्याबरोबर वाहून जाते. ह्यावरुन माणदेशात राहणाऱ्या माणसांना सतत भौगोलिक परिस्थितीशी टक्कर देतच जीवन जगावे लागत असल्याचे दिसून येते.

'अन्न'(१९७६) ह्या कथासंग्रहातील 'मोबदला' ह्या कथेत माणदेशाचे चित्रण असे येते : "दुपारचे चार वाजलेले. उन्हं मावळतीकडे कललेली. हवेत थोडासा उष्मा दाटलेला आणि वातावरणानं मौनाचं विरल वस्त्र पांघरलेलं. समोरच्या झाडावरील पक्षीच काय ते मौन दुभंगत. चुकार झुळूक एखाद्या डेरेदार झाडाला बिलगायची खरी; पण पानांना मनसोक्त गुदगुल्या करायची ताकत तिच्यात नसायची." (पृ. १) ह्यावरुन माणदेशातील कोणताही ऋतू

पाहिला, तरी त्या ऋतूमध्ये अनेक गोष्टींची कमतरता जाणवत असल्याचे दिसून येते. अशाप्रकारच्या 'विनवणी' ('पाऊस' - १९८४), 'शिकार'('मनस्विनी' - १९९५), 'येशा' ('अंग अगं म्हशी' - १९७८), 'वाढदिवस'('पाऊस' - १९८४) ह्या कथा उदाहरणादाखल सांगता येतील.

## ४.६.२. माणदेशाचे सामाजिक - सांस्कृतिक चित्रण :

द.ता. भोसले हे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील एक महत्त्वाचे माणदेशी ग्रामीण कथाकार म्हणून ओळखले जातात. समाजाच्या वास्तव जीवनचित्रणामुळे वाचकाला अंतर्मुख करण्याची किमया त्यांच्या कथांमध्ये दिसते. त्यांच्या ग्रामीण कथांमधून माणदेशी संस्कृती, सामाजिक बांधीलकी, वास्तवता, आशयानुरुप भाषाशैली आणि ग्रामीण संवादातून निर्माण होणारे विनोद ह्या गोष्टी प्रामुख्याने दिसून येतात. विशेषत: माणदेशातील लोकजीवन, संस्कृती, समस्या, भौगोलिक परिसर ह्यांचा परिणाम त्यांच्या कथालेखनावर जाणवतो. स्वातंत्र्योत्तर मराठी ग्रामीण कथालेखनात साचेबंद स्वरुपात ग्रामजीवन चित्रित झालेल दिसते. परंतु भोसले ह्यांच्या ग्रामीण कथांमध्ये हा साचेबंदपणा (बाई, बाटली, तमाशा, पळवापळवी, रंडीबाज, पारंपरिक वैर) दिसत नाही. माणदेशातील ग्रामीण संस्कृतीत झालेले बदल त्यांच्या कथासाहित्यातून ठळकपणे जाणवतात. भोसले ह्यांच्या माणदेशी कथावाङ्मयात व्यापक पातळीवरील प्रादेशिक आविष्कार साधलेला दिसतो.

ग्रामीण जीवनातील दु:खभोग व भूक हे दोन प्रश्न भोसले ह्यांनी हाताळलेले दिसतात. माणदेशातील दुष्काळग्रस्त वातावरणाचा परिणाम स्वत: भोसले ह्यांच्या जीवनावर झालेला दिसून येतो. घरच्या अठराविश्व दारिद्र्यामुळे लहानपणी त्यांना पोटासाठी संघर्ष करावा लागला. ह्यातूनच भोसले ह्यांच्या मनामध्ये भूक हा शाप आणि अन्न हे सर्वस्व असल्याची भावना निर्माण झाली. हे दु:खच त्यांच्या माणदेशी कथेवर वेदनेचा, उपेक्षेचा, असाहाय्यतेचा आणि दुर्बलतेचा ठसा उमटवते. भोसले हे स्वत: प्राध्यापक होण्यापूर्वी शेतमजुर होते. त्यामुळे त्यांच्या माणदेशी कथेत सामान्य शेतकरी, सालगडी, शेतमजुर ह्यांची संख्या जास्त दिसते. सुरुवातीच्या काळात ते स्वत:च मजुर होते. त्यामुळे आणि त्यावेळचे सर्व अनुभव सूक्ष्मपणे त्यांच्या मनात कोरलेले असल्यामुळे त्यांचया लिखाणाला वास्तवतेचे अधिष्ठान प्राप्त झालेले दिसते. भोसले ह्यांची कथा प्रादेशिकतेचे चित्रण करण्यापेक्षा माणसातील माणुसकी शोधण्याचा प्रयत्न करताना दिसते.

'अन्न'(१९७६) हा भोसले ह्यांचा पहिला माणदेशी कथासंग्रह आहे. त्याच्या शिर्षकावरुनच बराचसा आशय व्यक्त होतो. माणसाला जिवंत राहण्यासाठी अन्नाची गरज असते. ते मिळविण्यासाठी त्याला आयुष्यभर प्रयत्न करावे लागतात व अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. 'मोबदला'('अन्न' - १९७६) ह्या कथेतील भिकारणीला अन्नासाठी आपल्या शरीराचे दान द्यावे लागते. 'दान'('अन्न' - १९७६) ह्या कथेतील कुटुंबकर्ता कुटुंब पोसण्यासाठी अंगात रक्त नसताना रक्त देतो. त्याचे दोन रुपये मिळतात. त्याच्याकडे बघून तो जीव सोडतो. ह्यावरुन द. ता. भोसले. ह्यांच्या माणदेशी कथेत भुकेचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर चित्रित झालेला दिसतो.

- **माणदेशातील शोषितांची दुःखे :**

माणदेश हा सतत दुष्काळी भाग म्हणूनच ओळखला जातो. त्यामुळे माणदेशातील लोक पोटाचा प्रश्न सोडवण्यासाठी स्वतःचे गाव सोडून दुसऱ्या गावी जाऊन राहतात किंवा आपल्याच गावात राहून श्रीमंत लोकांकडून होणारे अत्याचार विनातक्रार सहन करत राहतात. जो भोग आपल्या नशिबी आहे, तो भोगून संपवला पाहिजे, अशी धारणा माणदेशातील सामान्य  लोकांची असलेली दिसते. कधी गरीब असल्यामुळे दुसऱ्याच्या वासनेचे बळी व्हावे लागते. 'पाऊस'(१९८४) ह्या कथासंग्रहातील 'बाजार' ह्या कथेतील चंपा एका मुलाची आई आहे. घरची गरिबी. चंपाची आई चंपाला कसेतरी सांभाळते. कारण चंपाचा नवरा घर सोडून निघून गेलेला असतो. चंपा देसायाच्या शेतात खुरपायला जाते. खुरपनाच्या एका दिवसाच्या रोजगाराबरोबर देसाई तिला दोन रुपये जास्त देतो. संध्याकाळी तिच्याकडून शारीरिक सुखाची अपेक्षा धरतो. परंतु चंपा त्याला तयार होत नाही. शेवटी संधी साधून बाजारावरुन परत येताना तिला एकटीला गाठून तो तिच्यावर बलात्कार करतो. देसाई तिच्या मुलाला शेवेचा पुडा देतो. ती भेदरलेल्या अवस्थेत घरी येते. मुलगा आनंदाने शेव खातो. परंतु तिला स्वतःची व्यथा उघडपणे सांगता येत नाही. म्हणजेच शोषित स्त्रियांना सामाजिक बंधनामुळे आपले दुःखसुद्धा व्यक्त करता येत नाही, ही माणदेशातील शोकांतिका दिसून येते. 'पाऊस'(१९८४) ह्या कथासंग्रहातील 'ऊन' ह्या कथेतील तात्या हा गरीब माणूस दुसऱ्याच्या शेतावर काम करत असतो. त्याची मालकीण सतत आपल्या मालकीणपणाचा तोरा तात्याला दाखवत असते. तात्याचा मुलगा काशा हा स्वयंपाकासाठी शेणी गोळा करत असतो. तेवढ्यात शेताची मालकीण तेथे येते व तात्याला म्हणते, ''गुरं तुमची हायती का आमची ? या रानावरची शेणी आमच्याच गुरांची हाय नव्हं ! का तुमी गुरं पैदा केलीत ? न इचारता शेणी न्हेता आन् वरती

बलामत म्हणताय . किती माजोरीपणा म्हणावा हा !" (पृ. १३४) ह्यावरुन माणदेशात सर्वसामान्य माणसाला अतिशय भयानक परिस्थितीला सामोरे जावे लागते, ह्याची प्रचिती येते. 'अगं अगं म्हशी' (१९७८) ह्या कथासंग्रहातील 'सुटका' ह्या कथेतील सखाराम हा गरीब माणूस एका श्रीमंत माणसाकडे सालगडी म्हणून कामाला असतो. मालक कधी गोड बोलून, कधी रागावून कामे करुन घेत असतो. एकेदिवशी सखारामची घरात अडचण निर्माण होते. त्याच्या बायकोचे दिवस भरत आलेले असतात. ती कधी बाळंत होईल, ह्याचा नेम नसतो. त्याचदिवशी मालकाच्या म्हशीचे दिवसही भरलेले असतात. सखारामचा जीव घराकडे ओढ घेतो व कोणलाही न सांगता तो वस्तीवरुन घरी निघून येतो. मालकाला हे समजल्यावर मालक सखारामाच्या घरी येतो व म्हणतो, "सक्या लेका, कवाचं हाकडं आलाया. सद्या वस्तीवर येयाच्या अगुदरच घरी आलास. ल्येका; तकडं म्हस आडलीया. मराची एकांदे येळ. या सद्याला काय कळतयां, आन् येतंया. जा, पैलं वस्तीवर जा. भडव्या, तुझ्या बानं अशी कामं केलती का कदी ? आताच्या आता निग. आन् सकाळच्या पारी सांगायला ये. ऊठ तू -" (पृ. ११८) ह्यावरुन माणदेशातील श्रीमंत लोक सर्वसामान्य माणसाच्या घरातील परिस्थिती न पाहता, त्याला रागावून त्याच्या भावनेशी खेळताना दिसतात. 'किंमत','दान'('अन्न'- १९७६), 'हट्ट','वसुली'('पाळत'- १९७७), 'वरात'('अगं अगं म्हशी'- १९८२), 'वाढदिवस', 'अनावर' ('पाऊस'- १९८४), 'ओझे' ('मनस्विनी'- १९९५) ह्या कथा माणदेशातील शोषितांचे दु:ख व्यक्त करणाऱ्या कथा म्हणून उदाहरणादाखल सांगता येतील.

- **माणदेशातील दुष्काळाचे चित्रण :**

माणदेशाला जणू काही दुष्काळाचा शापच आहे. माणदेशातील सर्व कथाकार ह्या दुष्काळाचा सामना करत माणदेश वास्तवतेने चित्रित करतात. दारिद्र्यामुळे गरीब माणसाला कोणत्याही प्रसंगाला धीराने तोंड द्यावे लागते. परंतु जीवनमरणाच्या बाबतीतही भोसल्यांचे विचार दुष्काळाशी जुळणारे आहेत, असे वाटते. जगण्यातील दु:ख त्याच्या वागण्यावरुन कळते. त्यामुळे माणूस मेल्यानंतर होणाऱ्या दु:खाला माणदेशात जास्त स्थान मिळत नाही. दुष्काळात जीवन जगणे म्हणजे दु:खी जीवनाचा शाप भोगणे, हे तत्त्वज्ञान माणदेशातील दुष्काळी प्रदेशात दिसते. परंतु असा विचार महाराष्ट्रातही सगळीकडे पहावयास मिळतो. म्हणून भोसले ह्यांच्या माणदेशी दुष्काळी कथा माणदेशाच्या बाहेरही नाते जोडताना दिसतात. 'पाऊस'(१९८४) ह्या कथासंग्रहातील 'जन्म' ह्या कथेतील गेना हा दुष्काळामुळे भिकाऱ्यात सालगडी म्हणून कामाला असतो. बाळंतपणात बायकोजवळ गेनाला थांबता येत नाही. तो

भिकाऱ्याच्या शेतात असतो. त्याला मनातून खूप दुःख होते. आपण आपल्या बायकोची काळजी घेतली पाहिजे, असे त्याला वाटत असते. बाळंतपणात त्याची बायको कौसा ही मरते. तो शेतातून पळत घरी येतो. तानूआत्या घरातून धावतच बाहेर येते आणि गेनाच्या गळ्यात पडून मोठ्यानं रडू लागते, "पोरा, आपली कौसा आपणाला सोडून गेली. शेवटपर्यंत तुझा जोसरा काढत हुती. संगं तुझ्या बाळाला घेऊन गेली. माजी गुणाची पोर देवानं का म्हणून नेली." (पृ. ६९) ह्यावरुन माणदेशात जीवन जगणे म्हणजे दुष्काळी जीवनाचा शाप असल्याचे दिसून येते. 'अन्न'(१९७६) ह्या कथासंग्रहातील 'अन्न' ह्या कथेतील किशावर दुष्काळामुळे ओकारीतून पडलेले अन्न खाण्याची वेळ येते. पोटभर खायला मिळाले नाही, तर माणसाची अवस्था भयानक होते. किशाची आजी किशाला झोपेत असतानाच सोडून जाते. किशा झोपेतून उठल्यानंतर समोरच्या व्यक्तीला म्हणतो, " आम्ही दोगंच. मला आय बा न्हाय. आमच्याकडं लय दांडगा दुसकाळ पडलाय. कायसुदिक मिळत न्हाय. म्या लोकांची सेरडंच् राकायचू. पर लोकांनी सेरडंच् इकुनशान टाकली. मग काय करायचं?" (पृ. १२२) ह्या चित्रणावरुन भोसले ह्यांच्या कथेतून व्यक्त होणाऱ्या माणदेशातील दुष्काळामुळे अनेक कुटुंबांची होणारी वाताहत व्यक्त झाल्याचे दिसून येते. ह्या स्वरुपाच्या 'बाजार', 'ढासळलेली भिंत', 'कोसळलेली' 'पाऊस'(१९८४), 'राज्यात दुष्काळ पडतो'('अगं अगं म्हशी' - १९७८), 'काटेरी आकाश' (मनस्विनी - १९९५) ह्या कथा उदाहरणादाखल सांगता येतील.

- पारंपरिक संकेतांना महत्त्व देणारी माणदेशी माणसे :

माणदेशामध्ये पारंपरिक रुढी - परंपरा ह्यांना मानणारा समाजाचा मोठा वर्ग दिसून येतो. कारण निसर्गच माणसाच्या मनावर ह्या गोष्टी बिंबवताना दिसतो. ग्रामीण भागात आधुनिकतेचा अभाव असल्यामुळे आपण करतो, तेच खरे, अशी विचारसरणी रुजलेली दिसते. माणदेशही ह्याला अपवाद नाही.

भोसले ह्यांच्या 'अन्न'(१९७६) ह्या कथासंग्रहातील 'लहरी विचार' ह्या कथेतील काशिनाथ आपल्या सर्व मित्रांना घेऊन लग्नासाठी मुलगी बघायला जातो. दाजिगा कमरमोडे ह्या अडाणी शेतकऱ्याची ती मुलगी असते. मुलं म्हणजे देवाघरची फुलं, असे मानणाऱ्या माणसांपैकी दाजिगा हा एक असतो. काशिनाथ त्याच्या घरी गेल्यानंतर गैरसमजातून दाजिगाला असे वाटते की, ही माणसे कुटुंबनियोजनाचे महत्त्व सांगण्यासाठी आली आहेत. म्हणून दाजिगा ह्या सर्वांकडे पाहून म्हणतो, "ल्येकानू, आलाच कशाला बोंबलायला

हिकडं?'' आयला, त्या सरकारलाबी याक खुळंच लागलाया. उठतं की पोरं कमी करा, पाळण लांबवा म्हणून माणसं धाडतं. अशानं मी काय आयकणार हाय? नव्हं मी म्हणतो काढली पोरं, तर सांभाळाला मी हायकी खंबीर ! घ्येला त्याची पंचाईत का म्हणूनी ? आमी चार पोरं काढू, न्हायीतर चवदा पोरं काढू. ह्येला का पंचाईत. आयला, माजी बायकू अद्याप कुरकुर करत नाही. ह्ये मातुर ऊठ सूठ बोंब मारत्यात.'' (पृ. १९) ह्यावरुन माणदेशात कुटुंबनियोजनाचे महत्त्व लोकांना पटलेले दिसत नाही. पर्यायाने घरातील खाणाऱ्या तोंडाची संख्या वाढते व सर्वांना दारिद्र्यातच जीवन जगावे लागते, ह्याची जाणीव होते. 'पाऊस'(१९८४) ह्या कथासंग्रहातील 'जहाज' ह्या कथेत दुसऱ्याच्या घरात मोलकरीण म्हणून काम करणारी जिजा आहे. तिच्या सांसारिक स्वप्नांचा चक्काचूर झालेला आहे. तिला मातृसुख मिळत नाही. तरीही ती पती म्हणजे परमेश्वर, असे मानत आलेली असते. अध्यात्माच्या वेडामुळे तिचा पती दाजी हा तिला सोडून गेलेला असतो. तरीही जिजा आपल्या मनातील आशा नष्ट करु शकत नाही. ती म्हणते, ''पाटलीण, जरा वाटीत तेल आन् दोन उदबत्त्या दे गं. देवळात कोन एक बाबा आलाय म्हंत्यात. जाऊन येते.'' (पृ. ९०-९१) ह्यावरुन पारंपरिक संकेतांना महत्त्व देणारा समाज माणदेशात असल्याचे दिसून येते. 'प्रवास'('अन्न'-१९७६), 'बाबा गोष्ट सांगा' ('पाळत' - १९७७) ह्याही अशास्वरुपाच्या कथा आहेत.

- **माणदेशी झोपडपट्टी जीवनाभोवती फिरणाऱ्या कथा :**

माणदेशात जातीच्या भिंती मजबूत असल्याची जाणीव अनेक कथांमधून होते. त्यातून त्या वस्तीत राहणाऱ्या लोकांच्या मनाचा वेध काही अंशी भोसले ह्यांनी आपल्या कथांमधून घेतलेला दिसून येतो. माणदेशात महार - मांग ह्या जातींमधील लोकांना आजही उच्चवर्णीयांच्या जाचाला बळी पडावे लागते. तरीही खालच्या जातीतील लोक उच्चवर्णीयांचे काम करण्यात धन्यता मानतात. आपली ह्यातून सुटका होणार नाही, अशी जणूकाही ह्या लोकांची समजूत असल्याचे निदर्शनास येते.

'पाऊस'(१९८४) ह्या कथासंग्रहातील 'वाढदिवस' ह्या कथेत गावातील श्रीमंत माणूस रावसाहेब ह्यांचा मुलगा वसंत ह्याचा वाढदिवस असतो. भागा महारणीचा मुलगा धर्मा हा शाळकरी मुलगा वसंताच्याच वयाचा असतो. पण रावसाहेब दुसरा माणूस नाही म्हणून धर्माला लाकडे फोडण्यास सांगतो. त्याला धड कुऱ्हाडसुद्धा उचलत नसते. परंतु पोटाला गोडधोड अन्न मिळेल, ह्या आशेने तो लाकडे फोडतो.मात्र धर्माला वाढदिवसाच्या दिवशी पोटाला काहीच

मिळत नाही. दुसऱ्या दिवशी धर्मा जातो, तेव्हा रावसाहेबांची मुलगी भामा त्याला जेवण वाढते. त्यावेळचे वर्णन, ''त्यानं खिशातलं फडकं काढलं. खाली अंथरलं. तिनं त्या फडक्यावर कालचा सकाळचा मसालेभात ओतला. उष्टा उरलेला साधा भात ओतला. आंबून गेलेली बटाट्याची भाजी वरुनच टाकली.'' (पृ १५७) ह्यावरुन माणदेशात विटलेलं अन्न हे महार - मांगांना मालकाने वाढलेला चांगला घास असतो, ह्याचा विदारक प्रत्यय येतो. अशाप्रकारच्या अन्नसेवनाने विषबाधा होते व अनेक गरिबांचा बळी ह्या माणदेशातील सामाजिक चौकटीत जातो, हेच प्रकर्षाने जाणवते. 'पाऊस'(१९८४) ह्या कथासंग्रहातील 'मागणी' ह्या कथेतील बंका महार हा परंपरेने चालत आलेला पोतराजाचा रिवाज पाळणारा माणूस आहे. गरिबी माणसाला लाचार बनवते. त्यामुळेच हे पारंपरिक रीतिरिवाज (पोतराज) खोटे आहेत, हे माहीत असूनही पोटासाठी ते करावे लागतात. त्याची मानसिक अवस्था कोणीही जाणून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. हा पोतराजाचा वेष परिधान करुन गावात फिरत असताना बजाबा धनगर त्याला म्हणतो, ''मगं पुन्नाच मीबी वाडीन. ल्येका, चार पोरं गोळा झाल्याती. देवाच्या नावानं पसाभर दाणं मागतुयास, आज देवाच्या नावानं जरा येळ नाचलं, तर तुज्या बापाची बाबळ बुडतीया? चुकार लेकाचे!'' (पृ. १६८) ह्यावरुन बंका महाराच्या जीवनाची होणारी शोकांतिका आपल्यासमोर उभी राहते. 'अगं अगं म्हशी'(१९७८) ह्या कथासंग्रहातील 'येशा' ह्या कथेत येशा हा मांग आहे. चोऱ्या करण्याची त्याला सवय असते. त्यामुळे त्याचा स्वभाव बेडर बनत जातो. हुशार असूनही तो शाळा शिकलेला नसतो. येशा हा कथाकाराचा मित्र असतो. कथाकार येशाला आपल्या संस्थेत शिपायाची नोकरी मिळवून देतो, असे म्हणतो; तेव्हा येशा म्हणतो, ''तुमच्या संस्थेत शिपायाला किती पगार मिळतो?'' ''मिळतात की तीनसे - साडेतीनशे. शिवाय आठवड्यातून एकदा सुट्टी !'' ह्यावर येशा कथाकाराला म्हणतो, ''मालक, माझ्या धंद्यात मी सातशे रुपये कमावतो. शिवाय आठवडाभर सुट्टीच. तुमच्याकडंचाच एकादा सिपाय द्या पाठवून मला.'' (पृ. ५४) ह्यावरुन माणदेशात दलितांचे उपक्षित जीवन जगणाऱ्या माणसांना प्रतिष्ठा - अप्रतिष्ठा ह्यातील फरकच समजत नाही, असे दिसते. कारण प्रतिष्ठित जीवन कसे असते, हेच त्यांना माहीत नाही. अशा पद्धतीच्या 'रात्र', 'मोबदला'('अन्न'- १९७६), 'कमाई'('मनस्विनी'- १९९५), 'प्रकाश पावले'('मनस्विनी'- १९९५) ह्या कथा आहेत.

● माणदेशातील व्यभिचार :

माणदेशात गरीब आणि श्रीमंत असा भेदभाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. त्यात पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्रीला कमी लेखण्याची प्रवृत्ती दिसते. ह्यातून स्त्रियांच्या दडपडलेल्या भावना वासनेच्या रुपाने बंड करतात व त्यांच्या व्यभिचाराला सुरुवात होते. तसेच एखाद्या माणसाची बायको त्याच्यापासून निघून गेली असेल किंवा मेली असेल, तर तो व्यभिचारास प्रवृत्त होताना दिसतो. 'पाळत'(१९७७) ह्या कथासंग्रहातील 'पाळत' ह्या कथेतील तात्यांची बायको मेलेली असते. तात्यांना एक मुलगा (भिक्या) असतो. तात्यांना शरीराची भूक स्वस्थ बसू देत नाही. त्यांच्या घरात स्वयंपाक करण्यासाठी येणाऱ्या तारा कासारणीबरोबर ते शारीरिक संबंध प्रस्थापित करतात. परंतु भिक्या हा तात्याशिवाय रहात नसतो. तात्यांना ताराशिवाय चैन पडत नाही. गावात सगळीकडे कुजबूज सुरु झाल्यावर भिक्या तात्यावर पाळत ठेवतो. तरीही तात्या त्याला चुकवून ताराच्या घरी जातात. त्यांचे प्रेम रंगात आलेले असतानाच भिक्या तेथे हजर होतो आणि सर्व काही बघतो व म्हणतो, "चालू द्या तुमचं ! मी काय न्हाय करत." त्यावर तात्या वैतागून भिक्याला म्हणतात, "न्हाय, तिच्या मांडीवरच झोप. उद्या तिला प्यायलाबी मागशील. आयला कटकट हाय बाबा या पोराची. एक मारावी वाटती भडव्याच्या थोबाडीत !"(पृ.७) 'अन्न'(१९७६) ह्या कथासंग्रहातील 'व्यवस्थित' ह्या कथेतील रघुनाथच्या आईला गरिबीमुळे धुणी - भांडी करावी लागतात. ज्याच्या घरात भांड्यासाठी ती जाते, तोच माणूस तिच्या असाहाय्यतेचा गैरफायदा घेऊन तिच्यावर बलात्कार करतो. हे वारंवार चालते. शेवटी रघुनाथच्या आईला दिवस जातात. शेजारचे रामभाऊ व त्यांची बायको हे दोघे रघुनाथला चांगले सांभाळीत असतात. रघुनाथच्या आईला दवाखान्यात भरती केले जाते. रघुनाथ बेचैन होतो. तेव्हा रामभाऊंची बायको रघुनाथला म्हणते, "रघु, तुला भाऊ झाला होता - झाला अन् गेला. त्यामुळं आईचं पोट दुखत होतं. बोलू नको कुठं... आत सारं व्यवस्थित करुन आलीया ती -" (पृ. ७६) 'अन्न'(१९७६) ह्या कथासंग्रहातील 'इसावा' ह्या कथेतील रकमी, राधा, पारु ह्या गरीब स्त्रिया आपापले नवरे आपल्यावर कसे प्रेम करतात, अशा गप्पा मारत बसलेल्या असतात. त्यातच बाहेरख्यालीपणाच्या गप्पा सुरु होतात. नवरा असताना दुसऱ्या पुरुषाबरोबर शारीरिक संबंध ठेवण्यात काही वाईट नाही. ह्या विचाराने त्या आपापल्या परीने समर्थन करीत असतात. तेवढ्यात गावातील पाटलिणीचा विषय निघतो. पाटलिणीची मुलगी पारु हिचे बाहेर संबंध असतात. त्यातून तिला दिवस गेलेले असतात. म्हणून गर्भपात करण्यात आलेला असतो.

पाटलीणही तरुणपणात असलेच धंदे करीत होती. तेवढ्यात पाटलीण तेथे येते व त्यांच्या गप्पा बंद होतात. पाटलिणीने विचारल्यानंतर रकमी म्हणते, "व्हय म्हणत होते.... पाटलीन गावाला हाय म्हणून गावाला शोभा हाय, लई देवमाणूस..." (पृ. १०२)

ह्या सर्व वर्णनावरुन माणदेशातील व्यभिचार ठळकपणाने समोर येतो. त्यात अन्नाच्या भुकेप्रमाणे शरीराची भूक भागविली पाहिजे, हा एक विचार दिसून येतो. तसेच गरिबीचा फायदा घेऊन स्त्रियांना वाममार्गाला लावण्यास प्रवृत्त केले जाते, हा दुसरा मार्ग दिसतो. तसेच दुसऱ्या पुरुषाबरोबर संबंध ठेवले, तर काही बिघडत नाही, हा अडाणीपणाचा कळसही व्यभिचाराच्या माध्यमातून भोसले ह्यांच्या माणदेशी कथांमधून दिसून येतो. 'मोबदला' ('अन्न'-१९७६), 'प्रौढशिक्षण', 'झोप'('अगं अगं म्हशी'- १९७८), 'विनवणी' ('पाऊस'- १९८४) ह्या अशाप्रकारच्या कथा म्हणून सांगता येतील.

- रुढी - परंपरा न पाळणारे लोक :

माणदेशात अलीकडे शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे काही अंशी सुशिक्षित तरुण नवीन विचारसरणी अनुसरताना दिसतात. मात्र माणदेशातील अडाणी लोकांच्या चांगुलपणाचा फायदा घेऊन काहीजण श्रीमंत व सुखी झाल्याची अनेक उदाहरणे पहावायास मिळतात. शिक्षणाच्या निमित्ताने अनेक तरुण शहरात जातात. परत आल्यानंतर त्यांना आपल्या मातृभूमीमधील रुढी - परंपरा विकृत स्वरुपाच्या वाटावयास लागतात. ह्यातूनच त्या न मानण्याकडे अलीकडील सुशिक्षित माणदेशी तरुणांचा कल दिसून येतो.

'अन्न'(१९७६) ह्या कथासंग्रहातील 'अगं अगं म्हशी' ह्या कथेतील नारायण हा शिकलेला तरुण आहे. घरातील सर्वजण निरक्षर आहेत, त्यामुळे गावात नारायणला मान असतो. गावच्या रुढी - परंपरेप्रमाणे शिक्षण संपल्यानंतर नारायणच्या लग्नाचा विषय निघतो. तेव्हा ग्रामीण भागात श्रीमंत बापाची एकुलती एक मुलगी करायची म्हणजे सर्वांना सुखाने राहता येईल, अस विचार असतो. परंतु नारायण कॉलेजमधील मुलगी अगोदरचं पसंत करुन आलेला असतो. तो सुशिक्षित असल्यामुळे त्याच्या विरोधात कोणीही बोलत नाही. त्यातून माणदेशात आई - वडिलांनी पसंत केलेल्या मुला - मुलीबरोबर लग्न करावयाचे, ही रुढी मागे पडत चालल्याचे दिसून येते. 'पाऊस'(१९८४) ह्या कथासंग्रहातील 'देवपूजा' ह्या माणदेशी कथेतून एक विदारक सत्य समोर येते. कोणतेही आई - बाप आपल्या म्हातारपणाचा आधार म्हणून मुलांना शिकवून मोठा करतात. त्याच्याकडे आशेने पाहतात. परंतु त्यांची निराशा होते.

श्रीधरपंत ह्यांना दोन मुले असतात. ते शहरात नोकरी करतात व तेथेच स्थायिक होतात. पण श्रीधरपंतांची अवस्था 'दैव देते आणि कर्म नेते' अशी होते. दोन्हीही मुले त्यांना सांभाळत नाहीत.कारण मुलांना कर्तव्याची जाणीव रहात नाही. त्यावेळी वैतागून श्रीधरपंत म्हणतात, "आम्ही इथं बेवारशी माणसासारखं हात-पाय खुरडत जगतोय. पण एकाला सवड होत नाही. ल्येकांनो, निदान तुमच्या आईसाठी तरी कर्तव्याची आठवण असू द्या. नालायक लेकाचे कुठले." (पृ. १४) ह्यावरुन माणदेशातील विदारक सत्यच समोर येते. माणदेशातील अनेक तरुण मुले आज घरापासून दूर जाऊन शहरात कायमची स्थायिक झालेली दिसून येतात. 'बाबूराव न्हावी' ('अगं अगं म्हशी'- १९७८) 'झुंज','भेट'('पाऊस'-१९८४), 'अभिषेक', 'वाटणी'('मनस्विनी'-१९९५) ह्या अशा स्वरुपाच्या कथा म्हणून सांगता येतील.

- माणदेशी स्त्रियांच्या जीवनाभोवती फिरणाऱ्या कथा :

ग्रामीण भागात पती - पत्नी ह्या दोघांवर संसार उभा असतो. ह्यातील एक खांब ढासळला, तर दुसऱ्याला किती वेदना होतात, ह्याची प्रचिती भोसले ह्यांच्या माणदेशी स्त्रियांच्या जीवनचित्रणातून येते. पुरुषाने कसेही वागले, तरी घरात त्याला विचारणारे कोणी नसते. परंतु स्त्रीने अविचाराने वागले, तर संपूर्ण समाजात तिची निंदानालस्ती होते. प्रसंगी तिला आपल्या घरापासून लांब जावे लागते. अशा ह्या सामाजिक बंधनामुळे माणदेशातील स्त्री ही पुरुषापेक्षा जास्त व्यावहारिक, समंजस, सोशीक असल्याचे जाणवते.

'पाऊस' (१९८४) ह्या कथासंग्रहातील 'निर्णय' ह्या कथेतील रकमा ह्या स्त्रीचा नवरा घर सोडून निघून जातो. पाठीमागे दोन मुले व म्हातारी ह्यांना सांभाळण्याची जबाबदारी तिच्यावर येते. त्यावेळी रकमाच्या कणखर मनाची प्रचिती येते. ती म्हणते, "मुळातच जर देवधर्माची ओढ होती, तर मला यात का अडकावून टाकलं ? पदरात या पोरी तरी का टाकल्या ? संसाराचा वीट आला म्हणावा, तर का येतात आठ - दहा महिन्यांनी? रात्रीला जवळ तरी मग का येतात ? जगाला तो बुवा वाटतो. रामीला तो सगळं सोडून टाकतो. दिवसभर हातात असलेली पोथी अंधार दाटताच हातातून गळून पडते." (पृ. १२३) ह्यासंदर्भात वासुदेव मुलाटे म्हणतात, "निर्णय सारख्या कथेत ग्रामीण स्त्रीच्या कर्तृत्वाचे एक वेगळे दर्शन घडते. नवरा काम करीत नाही. सासू, मुलं यांना पोसायचे असेल, जगवायचे असेल; तर पोटात राहिलेले मूल होऊ देता काम नये, हा तिने मनाने घेतलेला निर्णय संकटाशी झुंज घेण्याच्या तयारीने घेतलेला निर्णय आहे."[४६] 'अन्न' (१९७६) ह्या कथासंग्रहातील

'मोबदला' ह्या कथेतील एक श्रीमंत माणूस अनेक स्त्रिया उपभोगतो. माणदेशात शरीराच्या भुकेपेक्षा पोटाच्या भुकेला जास्त महत्त्व दिले जाते. स्त्रियांच्या अब्रूचे - श्रीमंतांकडून धिंडवडे निघतात. एक श्रीमंत एक भिकारणीवर बलात्कार करतो. समाजाला ती ओरडून सांगेल म्हणून तो घाबरतो. त्या भिकारणीला काहीही मागण्यास सांगतो. तेव्हा ती म्हणते, "शेट, मला पोटला द्या. पोट भरुन खायला द्या. दोन दिवसापासनं उपासी हाय, त्येनं पोरालाबी दूद येत न्हायी." (पृ ८) 'अन्न'(१९७६) ह्या कथासंग्रहातील 'करामत' ह्या कथेतील किष्णाबाई नावाच्या विधवा स्त्रीला दामू गंडवतो. कारण विधवा स्त्री म्हणजे गावाची भोगवस्तू, असा माणदेशात समज दिसतो. किष्णाबाई परिस्थितीचा अंदाज घेऊन त्याला तावडीत पकडून बदला घेण्याच्या विचारात असते. किष्णाबाई हे सगळे आपल्या सासूला सांगते. दामूने ठरविलेल्या ठिकाणी किष्णाबाई म्हणून तिची सासू जाते. ती त्याला चपलेने मारते व म्हणते, " माजी छबडी गं, माजी काकडी गं काय? तुला आला पटकीचा फेरा ! भडव्या, लोकाच्या बायका म्हंजी काय गावचं गायरान समजलास ? तुला कचा कचा खावंसं वाटतं व्हय. भाड्या, ये खा मला ! खा रं सुकाळीच्या !" (पृ. ८४) ह्यावरुन माणदेशातील स्त्रीच्या वाट्याला येणारे खडतर जीवन प्रकर्षाने समोर येते. 'भूक', 'रात्र' ('अन्न'-१९७६), 'दुःख' ('अगं अगं म्हशी'-१९७६),'पाऊस','बाजार','जहाज' ('पाऊस'-१९८४), 'मनस्विनी' ('मनस्विनी'-१९९५), ह्या अशाप्रकारच्या कथा म्हणून सांगता येतील.

## ४.६.३. माणदेशातील व्यक्तिंचे व्यक्तिचित्रण :

माणदेशच्या मातीतच भोसले हे जन्मले, वाढले त्या मातीतील माणसे त्यांना जशी भेटली, बोलली, जाणवली; तशी ती त्यांनी चित्रित केली. कोणत्याही माणसाचे व्यक्तिमत्त्व नुसते साधेसरळ असत नाही. माणसाच्या आवडी - निवडी, वृत्ती - प्रवृत्ती, आचार - विचार ह्या दृष्टीने ते गुंतागुंतीचे असते. स्वभाव वैशिष्ट्यांचे अनेक सांधे बेमालूमपणे एकात एक मिसळून ते एकसंध व्यक्तिमत्त्व बनलेले असते. भोसले ह्यांनी हे लक्षात घेऊनच माणदेशाच्या ग्रामीण जीवनाला आणि तेथील खेडुताना समर्थपणे उभे केल्याचे दिसून येते.

"पाळत" (१९७७) ह्या कथासंग्रहातील 'करामत' ह्या कथेत दामू हा शेतकरी विधवा किष्णाबाईला आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळेचे चित्रण असे येते पहा : "व्हय, किष्णा, तुजंबी बरुबर हाय, कारभारी म्हनल्यानं सुखावलेला दामू म्हणाला, 'ह्ये बग

किष्णा, तुजं माजं लगीन झालं नसलं, तरी मी तुला माजी घरधनीनच माननार आणि जंवर माज्या जिवात जीव हाये, तंवर तुला कश्श्याचं कायी कमी पडू द्येयाचा न्हायी.'

'मला तरी रंडकीला ही रोज एकाची दारं पुजायची गोडी हाय का?'

'किष्णा, तू रोजगार - बिजगार सोड आता आणि करायचाच असंल,तर माज्यात नुस्तं नावाला येत जा. तुझ्यासारखीनं रोजगार करनं. हाडं झिजवत मरण्यासाठी तुझा जल्म न्हाई. खरं नाय. किष्णा, तुझा कारभारी असता, तर तुला असं काम करु दिलं असतं का ?'

'न्हाई!'

'मग मी तरी तुला का करु दीन?'

'आता तुमीच भार घेतल्यावं मी तरी कशाला काळजी करु ?'

'काळजी करु नगं, किष्णा !' (पृ. १६-१७) ह्यावरुन माणदेशातील माणूस स्वतःच्या स्वार्थासाठी कसा वागतो, ह्याचे वास्तव चित्रण आल्याचे दिसून येते.

"अन्न" (१९७६) ह्या कथासंग्रहातील 'मोबदला' ह्या कथेत एक श्रीमंत माणूस आपल्या वासनेसाठी अनेक स्त्रियांना बरबाद करतो. अशाच एका भिकारणीवर त्याने अत्याचार केल्यावर ती भिकारीण त्या शेठजीला म्हणते, "शेट, मला पोटाला द्या. पोट भरुन खायला द्या. दोन दिवसापासनं उपासी हाय, त्येनं पोरालाबी दूद येत न्हायी." (पृ ८) ह्यावरुन माणदेशात गरीब स्त्रियांची परवड कशी होते, ह्याचे प्रातिनिधिक रुप म्हणून माणदेशातील भिकारणीचे व्यक्तिचित्र रेखाटल्याचे दिसून येते.

"अगं अगं म्हशी" (१९७८) ह्या कथासंग्रहातील 'येशा' ह्या कथेत येशा नावाच्या जन्माने दलित असलेल्या तरुणाचे व्यक्तिचित्रण पहावयास मिळते. चोऱ्या करण्याचा येशाला शौक असतो. तो ज्या चोऱ्या करतो त्या तशा फार मोठ्या नसतात, तर खाण्यापिण्याच्याच वस्तूंच्या तो चोऱ्या करतो. तो बुद्धीमान असूनही शाळा शिकणे त्याच्या वाट्याला आले नाही. पुढे येशा हा हातभट्टीचा दारुचा धंदा टाकतो. कथाकार त्याला काही काळानंतर शिपायाची नोकरी मिळवून देतो, असे म्हणतो. त्यावर येशा त्याला म्हणतो, "मालक, माझ्या धंद्यात मी सातशे रुपये कमावतो. शिवाय आठवडाभर सुट्टीच. तुमच्याकडंचाच एखादा सिपाय द्या पाठवून मला. माझ्या हातभट्टीच्या धंद्यात माणसं कमी पडत्यात. मी देतू तेवडा पगार त्याला !" (पृ. ५४) ह्यावरुन माणदेशात जीवन जगणाऱ्या ह्या येशाला प्रतिष्ठा - अप्रतिष्ठा ह्यातील फरक समजत नसल्याचे जाणवते. एकूणच त्याच्या जीवनाबद्दलच्या जाणिवा वेगळ्या आहेत, हे स्पष्ट होते. ह्याला तेथील सामाजिक, प्रादेशिक, सांस्कृतिक आणि आर्थिक

परिस्थिती कारणीभूत असल्याचे दिसून येते. ह्यासंदर्भात डॉ. मदन कुलकर्णी म्हणतात, "प्रादेशिक साहित्यातील पात्रांच्या वृत्ती - प्रवृत्तीवर तेथील स्थितीशील पारंपरिक जीवनाचा प्रभाव पडलेला असतो. त्यामुळेच त्यांच्या बदलत्या जीवन जाणिवांना तेथील पारंपरिक स्थितीगती म्हणजेच तेथील सामाजिकता, सांस्कृतिकता इत्यादी घटक जबाबदार असतात."[४७] म्हणून येशाचे व्यक्तिमत्त्व हे प्रदेश संस्कारातून घडल्याचे दिसून येते.

'अन्न'('अन्न'- १९७६), 'हट्ट'('पाळत'- १९७७), 'देवपूजा','भेट'('पाऊस'- १९८४), 'प्रकाश पावले', 'ओझे'('मनस्विनी'- १९९५) ह्या कथा अशास्वरुपाच्या म्हणून सांगता येतील.

## ४.६.४. माणदेशाचे आर्थिक चित्रण :

द. ता. भोसले ह्यांच्या कथेतून माणदेशी ग्रामीण जीवनातील, विशेषत: कृषिनिष्ठ, श्रमजीवी, दरिद्री आणि दलित माणसांच्या दु:खजड मनाचे चित्रण आल्याचे दिसून येते. कारण कथाकार भोसले हेच स्वत: कृषिनिष्ठ श्रमजीवी वर्गाचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. ग्रामजीवनातील सर्व समाजघटकांमधील व्यक्ती त्यांच्या कथेतून येतात. सततचे दुष्काळ, पाण्याची कमतरता, हवामानाची प्रतिकूलता ह्यातून जीवन जगणे म्हणजे खूप मोठी कसरत माणदेशी माणसाला करावी लागते आणि ही कसरत आर्थिक गोष्टींशी निगडित असल्याचे निदर्शनास येते.

"मनस्विनी" (११९५) ह्या कथासंग्रहातील 'पाणी' ह्या कथेत महार जातीतील भागू नावाच्या स्त्रीला जीवन जगताना करावी लागणारी आर्थिक ओढाताण पुढील संवादातून लक्षात येते: "दुसरी खेप केली, तर कामाला जायास उशीर होईल, या विचाराने दोघींनी पुन्हा पाण्याला जाण्याचा विचार रहित केला. झपाझपा आवरले. भाकरी थापल्या. धाकटी उठल्यावर गुळाचा खडा टाकून चहा कला. रकमानं पंधरा पैशाचं आणलेलं दूध घालून काळ्या पाण्याला तांबुसपणा आल्यावर तिघींनी मिळून चहा घेतला. भाकरी फडक्यात बांधल्या. तिखटाची भुकटी पाण्याने ओली केली आणि दोघीही कामावर गेल्या. धाकटीला बरोबर घेतले." (पृ. ११३) ह्या सर्व चित्रणावरुन माणदेशात पैसा नाही म्हणून अत्यंत निकृष्ट जीवन जगावे लागत असल्याचे दिसून येते.

"अन्न" (१९७६) ह्या कथासंग्रहातील 'अन्न' ह्या कथेत किश्या व त्याची आजी गावात दुष्काळ पडला म्हणून गाव सोडतात. माणदेशातील पळशी हे त्यांचे गाव आहे. आजी

व तो एका स्टँडवर उतरतात. तेथेच झोपतात. जवळ पैसे नसतात. किश्या झोपेत असतानाच आजी त्याला सोडून निघून जाते. किश्या झोपेतून उठून बघतो, तो शेजारी आजी नाही. तो अनेकांना विचारण्याचा प्रयत्न करतो. परंतु आजी सापडत नाही. एक चांगल्या मनाचा माणूस किश्याला म्हणतो, "आजी चहा आणायला गेली असेल" त्यावर किश्या म्हणतो, "च्या कुटली आनतीया वो ? पैसाच न्हाय आमच्याकडं ? दोन दिस झालं आमी दोगंबी उपाशी हाय."

'असं?'

'न्हाय म्हनायला काल एका टरकातला ऊस घेऊन खाल्ला थोडा थोडा -'

'आयला, काय दुसकाळबी पडलाया ! गावंच्या गावं ओस पडू लागली, बाबा. छ्या ! छ्या! काय खरं न्हायं !' (पृ. १२२-१२३) ह्यावरुन पैसे नाहीत म्हणून गाव सोडावे लागते, हे माणदेशातील वास्तव ठळकपणे प्रत्ययास येते.

'अन्न' (१९७६) ह्या कथासंग्रहातील 'दान' ह्या कथेत पैशासाठी वणवण फिरणाऱ्या एका गरीब माणसाला अंगात रक्त नसताना रक्त देण्याची पाळी येते. कारण रक्ताच्या मोबदल्यात पैसे मिळणार असतात. तो गरीब माणूस रक्त पंधरा रुपयाच्या मोबदल्यात देतो. परंतु त्याच्या हातावर दोनच रुपये ठेवले जातात. त्यावेळी, "त्यानं पाहिलं. आतून हरखून गेला. एकदम दोन रुपये... दोन रुपये...दोनशे पैसे ?... त्यानं नोट मुठीत ठेवली आणि कृतज्ञतेच्या भावनेने त्यानं देणाराकडं पाहिलं. सावरुन घेत तो म्हणाला, "तुला पंदरा रुपये देतो म्हटलं खरं, पण त्या किमतीचं रगात तरी देयाला पायजे ? तुला एवढं रुपसे बास झालं. जा खा काय तरी." (पृ. १०) म्हणजेच माणदेशात पैशासाठी माणूस सर्वस्व पणाला लावताना दिसून येतो.

'बाबूराव न्हावी'('अगं अगं म्हशी'- १९७८), 'पाऊस','जन्म', 'सुटका'('पाऊस'- १९८४), 'वाटणी','कमाई'('मनस्विनी'- १९९५) ह्या अशाप्रकारच्या कथा म्हणून सांगता येतील.

### ४.६.५. माणदेशाचे आध्यात्मिक धार्मिक चित्रण :

माणदेशातील प्रतिकूल परिस्थितीमुळे आणि कृषिसंस्कृतीमुळे बहुतेक लोकांचा कल अध्यात्माकडे असल्याचे दिसून येते. परंतु भोसले ह्यांनी माणदेशातील दुःखभोग आणि भूक हे दोन घटक आपल्या कथेतून मोठ्या प्रमाणावर हाताळलेले दिसतात. धार्मिकता व

आध्यात्मिकता ह्यांचे अपुरे चित्रण त्यांच्या माणदेशी कथेतून दिसून येते. 'पाऊस'(१९८४) ह्या कथासंग्रहातील "देवपूजा" ह्या कथेत श्रीधरपंत व कावेरी ह्यांचा धार्मिकतेकडे असणारा कल स्पष्टपणे जाणवतो. परंतु हा कलही परिस्थितीने निर्माण केल्यासारखा वाटतो. कारण श्रीधरपंतांची परिस्थिती अचानक ढासळते. पंतांची मुले शहरात नोकरी करतात. पण आई-वडिलांना पैसे पाठवित नाहीत. घर विकण्याची पाळी पंतांवर येते. त्यातूनच ते गावातील पाटलाकडे पूजेसाठी जायला सुरुवात करतात. म्हणजेच माणदेशातील बरीचशी धार्मिक प्रवृत्तींची मंडळी ही परिस्थितीने दगा दिल्यामुळे आध्यात्मिकतेकडे वळल्याचे दिसून येते.

'पाऊस'(१९८४) ह्या कथासंग्रहातील 'जहाज' ह्या कथेत जिजाई नावाची माणदेशी स्त्री ही नवरा म्हणजे परमेश्वर, असे मानत असते. दाजी हा जिजाईचा नवरा देवधर्म करीत फिरतो. पत्नीला नवऱ्याने सांभाळले पाहिजे, हा पतिधर्म तो विसरतो आणि उपभोगापुरतीच बायकोची गरज असल्यासारखे तो वागतो. गरज संपल्यावर तो निघून जातो. परत कधीतरी बुवा बनून मंदिरात येतो. तेव्हा जिजाई गावातील पाटलीणीला म्हणते, "पाटलीण, जरा वाटीत तेल आन् दोन उदबत्त्या दे गं. देवळात कोन एक बाबा आलाय म्हत्यांत. जाऊन येते." (पृ. ९०) ह्यावरुन माणदेशातील धार्मिकतेचे वास्तव स्वरुप दिसून येते.

### ४.६.६. माणदेशाचे भाषिक चित्रण :

भोसले ह्यांनी लिहिलेल्या अनेक कथांमध्ये माणदेशी बोलीभाषेचा वापर केलेला दिसतो. परंतु काही कथांमध्ये शहरी व ग्रामीण अशी दुहेरी भाषा पहावयास मिळते. तसेच माणदेशातील समाजाचे गुणविशेष ह्या भाषाशैलीतून प्रकट होताना दिसतात. 'अन्न'(१९७६) ह्या कथासंग्रहातील 'रात्र' ह्या कथेतील रामा सतत बायकोला मारतो. त्यातून पुरुषी अहंकारी प्रवृत्तीचे दर्शन पुढीलप्रमाणे घडते, "भवानीला लई मस्ती आलीया, मी काम काय करीत न्हाय बोंबलतीया. कामं काय हिच्या बापानं ठिवल्याती ? गेली चार दिवस कामासाठी फिरतोय. एक नालायक कामावर घेईना. मला तर काय बसावं वाटतं ? मी काम केलं म्हणून तर ह्ये पीठ तरी दिसतंया, ह्ये काय तिनं आणलंया ?" (पृ. ९७)

'पाळत'(१९७७) ह्या कथासंग्रहातील 'रजा' ह्या कथेतील राजाराम नोकरीवरुन रजेवर येतो. टांग्यात बसल्यानंतर तो आपल्या बायकोविषयी विचार करु लागतो. "हातातली सिगारेट न ओढताच संपत आली, तेव्हा तो भानावर आला. त्याने आजुबाजूला पाहिले. गाव आला होता. चार - दोन झाडं गावाला सावली देत होती. एका उतरणीच्या झाडाजवळ त्याने टांगा

उभा केला.'' (पृ. ९०) ह्यामध्ये राजारामाची भावविवशता परिणामकारकपणे साकार झालेली दिसते.

भोसले ह्यांची माणदेशी भाषाशैली कधीकधी काव्यात्म होताना दिसते. 'पाऊस'(१९८४) ह्या कथासंग्रहातील 'जहाज' ह्या कथेतील माणदेशी स्त्रीच्या मनातील भावना कशा संवेदनाक्षम व काव्यात्मतेचे रुप धारण करतात, ते पहा : ''पातळ झालेल्या शेणाचा थर जिजाई जमिनीवरुन फिरवीत होती, पाणी घालून ती तो अधिक पातळ थर जमिनीवरच्या शेणाने निपटून घेत होती. पाणी घातलेल्या शेणाचा एक दर्प खोलीत पसरला होता. जमिनीला एक फिक्कट प्रकारचा हिरवा रंग चढत होता. उजव्या हाताने जमिनीवर ती अर्धगोलाकार काढत काढत पिवळसर जमिनीला सौम्य हिरव्या रंगाचा शालू नेसवत होती. हात फिरत होता. ओल मुरत होती. रंग उरत होता.'' (पृ. ८६) ह्यातून जिजाई ही सामान्य स्त्री आपल्या मनातील भावनिक आंदोलने मनातील चिंतनातून व प्रत्यक्षात कामातून व्यक्त करीत असल्याचे दिसते. ह्या भाषेला कल्पनेची किनार असल्याचाही प्रत्यय येतो. ह्याविषयी अधिक निरीक्षण नोंदवताना वासुदेव मुलाटे म्हणतात, ''द. ता. भोसल्यांच्या कथेत निवेदन नागरी भाषेत येते. अर्थात् ही नागरी भाषा अगदीच शुद्ध स्वरुपाची व ग्रांथिक वळणाची नाही. तरीही ती नागरी सामान्य माणसाची भाषा आहे, असे जाणवते. त्यांच्या 'मागणी' या कथेची सुरुवात त्या दृष्टीने बघण्यासारखी आहे. ''तोंडावर घेतलेली वाकळ बंकानं जराशी बाजूला सारली. किलकिल्या डोळ्यांनी त्यानं झोपडीत गच्च दाटलेला अंधार बघितला आणि पुन्हा डोळे मिटून घेतले. मिटल्या डोळ्यांनीच त्याने मनातल्या मनात दिवस मोजले.''[४८]

- माणदेशातील विनोदी चित्रण :

माणदेशातील ग्रामीण विनोदही भोसले ह्यांच्या कथेत पहावयास मिळतो. ग्रामीण भागातील अज्ञान, बेरकीपणा, भाबडेपणा, जीवनातील विसंगती ह्यावर आधारित विनोद त्यांच्या कथेत आढळतात. शब्दनिष्ठ, प्रसंगनिष्ठ आणि स्वभावनिष्ठ असा त्यांचा विनोद असतो. शाब्दिक कोट्याही ते करतात. सध्या भोसले ह्यांच्या माणदेशी कथांना एकूण ग्रामीण कथांमध्ये मानाचे स्थान प्राप्त झाल्याचे दिसून येते. माणदेश हा सतत दुष्काळाच्या छायेखाली असणारा भाग आहे. येथील सामान्य माणसाला संपूर्ण जीवनात सुखाचे, आनंदाचे क्षण अतिशय कमी प्रमाणात अनुभवण्यास मिळतात, ह्यावर उपाय म्हणजे किमान आपल्या बोलण्यातून तरी आपण एकमेकांना खुष ठेवले पाहिजे, ह्याच भावनेतून माणदेशातील विनोद

भोसले ह्यांच्या साहित्यात येताना दिसतो. एकमेकाला दुखवून कायमचे समाजातून उठवयाचे, अशा स्वरूपाचा विनोद भोसले ह्यांच्या माणदेशी कथेत दिसत नाही. त्यांची कथा निखळ स्वरूपाचा कलात्मक आनंद प्राप्त करून देते व मानवी भाव-भावनांचा प्रादेशिकतेच्या पातळीवरील वेगळेपणाही त्यातून दिसून येतो.

'पाळत' (१९७७) ह्या कथासंग्रहातील 'पाळत' ह्या कथेत तात्यांच्या पाठीमागे भिक्या लागला आहे. एकमेकांच्या मागे पळून कंटाळल्यानंतर तात्या व भिक्या हॉटेलमध्ये पाणी पिण्यासाठी जातात. तेव्हा भिक्या तात्यांना म्हणतो, "धोतर फाटलं बघ मागं, फाटू दे. हितं फिटायची येळ आलीया माजी" (पृ. ९) ह्यामध्ये शब्दनिष्ठ विनोद आलेला आहे. 'फाटणे' व 'फिटणे' ह्या शब्दांमुळे हा विनोद निर्माण होतो. तसेच तो प्रादेशिक असल्याची जाणीव होते. 'पाळत' (१९७७) ह्या कथासंग्रहातील 'एका दाताची कहाणी' मध्ये टिल्या दिवाळसणासाठी पहिल्याच वेळी सासुरवाडीला जातो व फजिती करून घेतो, असे चित्रण आले आहे. जावई आलेला आहे म्हणून सासुबाई भरपूर खाऊ घालतात व त्यामुळे टिल्याची तब्बेत बिघडते, पोटात गॅस होतात. ह्या संदर्भातील चित्रण असे : "त्याच्याजवळ सासरे गेले, तर होणाऱ्या आवाजाने ते लटालटा कापू लागले. शिवाय मुलांना दिवाळसणात विनोदी मासिकांपेक्षाही खमंग व चांगले विनोद विषय मिळाल्याने त्यांची पोटभर करमणूक झाली."(पृ. १४३)

शब्दनिष्ठ विनोदाबरोबरच प्रसंगनिष्ठ विनोदही भोसले ह्यांच्या कथेत पहावयास मिळतो 'पाळत' (१९७७) ह्या कथासंग्रहातील 'पाळत' ह्या कथेत भिक्याला ताराच्या घरी आलेला पाहून तात्या रागावतात, "अरे, तू घरात झोपला होतास." त्यावर भिक्या म्हणतो, "मी फक्त झोपीचं सोंग घेतलं होतं." त्यावर तात्या त्याला घरी जाण्यास सांगतात, तर तो (भिक्या) विचारतो, "पण तू हितं काय करतुयाच सांग की !" तात्या चिडतात व म्हणतात, "मी श्यान खातुया. तुला पाहिजे?" ह्यावर भिक्या म्हणतो, "आता नगं. पुन्ना लागलं, तर हितचं येईन मी बी." (पृ.११) येथे शेण खाणे म्हणजे अनीतीने वागणे, हा अर्थ घेतला की प्रसंगनिष्ठ विनोद लक्षात येतो. 'पाळत' (१९७७) ह्या कथासंग्रहातील 'सोबत' ह्या कथेत पैलवान मंडळी एस.टी. मध्ये बसलेल्या तरूणीकडे प्रेमाने बघत असतात. ह्यासंदर्भात कथाकार म्हणतो, "ते दोघेही आपापली जाळी खरं म्हणजे पोतीच लावून टपून बसलेले होते."(पृ. ११६) ह्यातून पैलवानी मनोवृत्तीला साजेसा, पण त्यांच्या मनाला न पेलणारा विषय प्रसंगनिष्ठ विनोदातून साकार केला आहे, असे वाटते. पंडित टापरे ह्यासंदर्भात म्हणतात, "या कथांतून मानवी मनातील विविध वृत्ती-प्रवृत्तीचे दर्शन जसे घडते, तसेच

जीवनातील विसंगती, विरोध हेही ठळकपणे सामोरे येतात... या कथात अनेक ठिकाणी मानवाच्या अपूर्णतेचे दर्शन घडविणारी व्यंगचित्रेच लेखकाने काढली आहेत, असे म्हणावेसे वाटते. ही मर्यादा, ही अपूर्णता विनोदाच्या भरजरी लेण्याने विनटलेली आहे. येथे सांस्कृतिक, सामाजिक आणि कौटुंबिक जीवनातील विलक्षण ताणतणाव विनोदामुळे सुसह्य झालेले आहेत. भारतीय मनास पाप-पुण्याचे भान, समाधानी वृत्तीने राहावे, ही चांगलीच अंगवळणी पडलेली शिकवण, ह्यातून हे जीवन अगदी सहजपणे विनोदाच्या अंगाने फुलत जाते. हा विनोद खूप सादृश्य आहे. गतिमान निवेदनामुळे त्यास टोकदारपणा लाभतो. ग्रामीण जीवनातील व्यामिश्र, उत्कट आणि विविध अनुभवांचे दर्शन या कथा अगदी सहजतेने आणि कलात्मकतेने घडवितात."[४९] 'बेटा से बाप सवाई', 'लढत', 'मुलाखत'('अगं अगं म्हशी'-१९७८), 'बाबा,गोष्ट सांगा', 'मी भाषणाला जातो'('पाळत'-१९७७) ह्या अशा स्वरूपाच्या माणदेशी प्रादेशिकता व्यक्त करणाऱ्या विनोदी कथा म्हणून सांगता येतील.

## ४.७. उत्तम बंडू तुपे ह्यांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण :

उत्तम बंडू तुपे ह्यांच्या जन्माविषयी वेगवेगळी मते असलेली जाणवतात. काही अभ्यासकांच्या मते उत्तम तुपे ह्यांचा जन्म एनकूळ (ता. खटाव जि. सातारा) येथे झाला, तर काहींच्यामते उत्तम तुपे ह्यांचा जन्म अहमदनगर जिल्हातील श्रीगोंदे तालुक्यामध्ये बेलवंडी येथे १९४८ मध्ये झाला. त्यांच्या आई-वडिलांचे गाव एनकूळ असल्यामुळे असे मतभेद दिसून येतात. परंतु उत्तम तुपे ह्यांचा जन्म श्रीगोंदे तालुक्यातील बेलवंडी येथे झाला, ह्याविषयी तुपे ह्यांच्या आई सांगतात, "बरं का, तर गांधीबाबाला भटा-बामणांनी गोळ्या घातल्याची वार्ता आली. ह्याsss दंगल उडाल्याली. तवा आमचं बिऱ्हाड बेलवंडीला जगतापाच्या मळ्यात हुतं. दंगलीत होमकुंड पेटलेला. भटा बामणांची घरंदारं पार होरपळून निघत हुती. त्यात मला कळा उठाय लागलेल्या. ह्यो गुणाचा बाळ पोटात हुता न्हवं? आता कुठं पळायचं? उकिरड्यात इरागतीला म्हणून गेले, तिथंच ह्यो हिरा जन्माला आला."[५०]

उत्तम बंडू तुपे ह्यांचे सर्व बालपण गरिबीत गेले. कुटुंबातील सर्वजण वाख व दोरखंडाचे काम करीत होते. तुपे ह्यांचे कसेबसे तिसरीपर्यंत शिक्षण झाले. अधूनमधून तुपे ह्यांचे एनकूळ येथे येणे-जाणे असायचे, त्यातूनच त्यांच्यावर माणदेशी संस्कार झालेले दिसून येतात. त्यांनी शेतगडी, बिगारी, वॉचमन, बागमाळी, शिपाई अशी विविध स्वरूपाची कामे केलेली दिसतात. सध्या पुणे येथे महाराष्ट्र गव्हर्न्मेंट पुरातत्त्व अभिलेख खात्यामध्ये ते शिपाई

म्हणून नोकरी करतात. त्यांना वेगवेगळे पुरस्कार मिळाले आहेत. 'काट्यावरची पोटं' ह्या त्यांच्या आत्मकथनाला १९८२ मध्ये 'उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार', 'आंदण' ह्या कथासंग्रहास १९८८ मध्ये 'उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार', 'झुलवा' ह्या कादंबरीस १९८७ मध्ये 'वा. म. जोशी पारितोषिक', 'भस्म' ह्या कथेस १९९५ मध्ये सर्वोत्कृष्ट कथा म्हणून '३२ वे मराठी चित्रपट राज्य पारितोषिक', १९९९ मध्ये त्यांना 'सामाजिक समरसता पुरस्कार' मिळाला.

उत्तम तुपे हे जन्माने दलित असले, तरी त्यांची कथा ही प्रामुख्याने ग्रामीण कथा म्हणून ओळखली जाते. १९८० नंतर ग्रामीण जीवनात शैक्षणिक क्रांती होऊन सुशिक्षित बेकारांची संख्या वाढली. त्यातून शिक्षणाविषयी अनास्था निर्माण झालेली दिसते. माणदेशातील गावा-गावात सोसायट्या निघाल्या. नेत्यांना गोरगरिबांचे प्रश्न सोडविण्यासाठी वेळ नाही. नवीन यंत्रे, बँका आल्या. ह्यामधून विकास कमी, परंतु सार्वत्रिक भकासपण अधिक आलेले दिसते. ह्यामुळे माणदेशात वरचेवर दारिद्र्य, व्यसनाधीनता, लबाडी वाढल्याचे दिसते. ह्याचेच जिवंत चित्रण तुपे ह्यांच्या माणदेशी कथेमधून आल्याचे जाणवते. तसेच माणदेशातील शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदना त्यांच्या भावभावनांसह मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला दिसतो. खेड्यातील दलित समाज हा ग्रामीण समाजाचा एक भाग असतो, ह्याविषयी नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "ग्रामीण भागातील दलितांना केवळ जातीय पातळीवरील संघर्ष द्यावा लागतो, असे नाही ; तर संबंध ग्रामव्यवस्थेशी संघर्ष करावा लागतो. म्हणून अशा संघर्षाचे 'कुरुक्षेत्र' शेवटी ग्रामविभागाचे असते."[५१] ह्या विधानावरून तुपे ह्यांच्या माणदेशी कथेतील जाणिवा ह्या ग्रामीण जाणिवा आहेत, हे स्पष्ट होते.

उत्तम बंडू तुपे ह्याचे 'आंदण'(१९८६), 'पिंड'(१९८७), 'कोंबारा'(१९९१), 'माती आणि माणसं'(१९९३) हे चार कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यात एकूण साठ कथा आहेत. त्यापैकी फक्त सात कथा माणदेशी आहेत.

## ४.७.१. माणदेशाचे सामाजिक - सांस्कृतिक चित्रण :

तुपे ह्यांच्या कथांमधून शेतकरीवर्गाची होणारी दैन्यावस्था प्रकर्षाने जाणवते. त्याला शेतकऱ्यांचे अज्ञान कारणीभूत ठरते. ग्रामव्यवस्थेने निर्माण केलेली व्यवस्था ही शेतकऱ्याला छळणारी असते. 'आंदण' ह्या कथासंग्रहातील 'आदंण' ह्या कथेतील बाबल्या आपल्या शेतात विहीर पाडतो. पैसे नसल्यामुळे कर्ज काढतो. तेही पैसे संपल्यानंतर घरातील सर्व

सामान, गाय विकतो. बाबल्या आईला म्हणतो, "आये, मी तगई काढतोय." (पृ. ६७) तसेच बाबल्या आपल्या आईला आंदण मिळालेली बाळी ही खिल्लार गाय विकतो. माणदेशाचे स्पष्टपणे जाणवणारे वैशिष्ट्य म्हणजे त्याठिकाणी असलेली 'खिल्लारी जनावरे' हे होय. खिल्लार जनावर हे आपले माणदेशाशी नाते सांगताना दिसते. बाबल्या गाईच्या व्यापाऱ्यांना म्हणतो, "छ्या, छ्या, गाय जातवान हाय. माझी नड हाय म्हणताना आणलीया" (पृ.६८) 'कोंबारा' (१९९१) ह्या कथासंग्रहातील 'वण' ह्या कथेत मैना आणि मव्हण्या ह्यांची प्रेमकहाणी एकमेकांच्या जातीमुळे पूर्णत्वाला पोहोचत नाही, असे चित्रण येते. दोघांचाही सामाजिक स्तर वेगळा आहे. परंतु दोघांनी एकमेकांना वचने दिलेली असतात. मव्हण्याला वडुजला नेऊन सोडले जाते, तरीही हे प्रेमप्रकरण बंद होत नाही. मव्हण्या मैनाला लग्न कर म्हणून सांगतो, तेव्हा ती म्हणते,

"न्हाय मव्हण्या, आता पाड सरला,

वाण गेला. जगायचं आता फक्त मनासाठी.

अंगभर भोगलेल्या या वाणासाठी" (पृ. ६४) ह्यावरून माणदेशातील प्रेमचित्रण हे समाजाच्या चौकटी मोडून बाहेर पडू शकत नाही, हेच दिसून येते.

- माणदेशी भटक्या जमातीचे दुःख :

तुपे हे जरी मांग समाजातील असले, तरी त्यांना त्यांच्या वाखाच्या व्यवसायानिमित्त अनेक गावांमध्ये भटकंती करावी लागली होती. ह्या भटकंती दरम्यान त्यांना अनेक जातीमधील लोकांचा सहवास लाभला. तोच त्यांच्या माणदेशी कथेमध्ये दिसून येतो. 'आंदण' (१९८६) ह्या कथासंग्रहातील 'गुबूगुबू' ह्या कथेतील चंदन्या नंदीवाला त्यांच्याच जातीतील राजगिरीबरोबर लग्न करण्यास विरोध करतो. ह्याचा वचपा काढण्यासाठी राजगिरी नंदीला विषप्रयोग करते. कज्या नंदीवाल्याची बायको आपली मुलगी राजगिरी हिला समजावण्याचा प्रयत्न करते. "राजगीरे! आसं नगं करू गा. त्येन न्हाय पत्करलं तुला. आपून दुसरे घर बघू. आपला देव वंगाळ. देवालं असं भंडवू नको. त्यो वैऱ्याचं नि आपलंबी खवर करील बरं" (पृ. १६) ह्यावरून ह्या जमातीमधील अज्ञान, अमानुष प्रथा एखाद्या प्रसंगी कशा भीषण रूप धारण करतात, ते जाणवत राहते.

• माणदेशी स्त्रीचित्रण :

तुपे ह्यांच्या माणदेशी कथेत येणाऱ्या स्त्रिया ह्या स्वत:च दु:खाच्या गर्तेत अडकलेल्या दिसतात. ह्या स्त्रिया सामान्य वर्गातील असल्यामुळे त्यांना एकमेकांविषयी आपुलकी, माया असल्याचे दिसून येते. त्यांच्या स्त्री व्यक्तिरेखांच्या ठिकाणी अंधश्रद्धाही असल्याचे जाणवते. तसेच स्त्री हीच स्त्रीची शत्रू असल्याची जाणीव माणदेशातील परंपरांच्या अनुषंगाने होते.

'आंदण'(१९८६) ह्या कथासंग्रहातील 'पाल' ह्या कथेत जानकी ह्या स्त्रीने अंधश्रद्धेपोटी केलेल्या अनेक गोष्टी समोर येतात. सरळ मनाची अहिल्या ही जानकीची सून आहे. ग्रामीण परंपरेनुसार घरातील कोणतेही काम मनासारखे झाले नाही तर त्याचे खापर 'पांढऱ्या पायाची' म्हणून सुनेवर फोडले जाते. आनंदाच्या प्रसंगीसुध्दा सुनेला छळालाच सामोरे जावे लागते. एकेदिवशी शेतात भाजी घेताना अहिल्येला धन सापडते. त्यावेळी जानकी म्हणते, ''माझी तारा आज आली. घराला पा य लागला, तर हे मातीत दडलेलं धन घावलं.'' (पृ. ८८) म्हणजे आनंदाच्या प्रसंगीसुद्धा सुनेला पाल म्हणून हिणवणारी माणदेशी पारंपरिक सासू ह्या कथेत दिसून येते. 'आंदण' (१९८६) ह्या कथासंग्रहातील 'चिंबाडं' ह्या कथेत मंजा नावाच्या स्त्रीवर नवऱ्याकडून होणारा अन्याय चित्रित केला आहे. स्त्रीला स्वत:चा विचार न करता मरमर कष्ट करावे लागतात. मंजा ही सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतात व घरी राबत असते. कामात नवऱ्याकडून काही मदत मिळेल, अशी अपेक्षा तिची असते. किमान प्रेमाचे चार शद्ध बोलावेत. पण तेही नशिबात नसते. घर सारवण्यसाठी स्वत:च माती आणते. पहा: ''खाली भुईचा तवा चुलीवर ठेवल्यागत. वरनं उन्हाचा नुसता जाळ. पाण्यात बुडवून काढल्यागत अंग घामानं चिंब भिजलेले, बुड फुटलेल्या घमेल्यातनं झरतेली माती टकुरित पडतेली. माती घामानं भिजून घामाच्या पाण्यातनं मिसळून खाली गळ्यावर नि छातीवरनं खाली म्हणताना पुराच्या पाण्यानं आणलेला गाळ पूर ओसरल्यावर दुथडीला दिसावा, तसं मंजाच्या अंगावर ठेवन दिसत होती. तरी तिचं माती वाह्याचं काम एका सुरात चाललं होतं.'' (पृ.३८) ह्यातून माणदेशी स्त्रीच्या जीवनात येणारे कष्ट व दु:ख जाणवते. नवरा दारू पिऊन मारतो. तरीही मंजा शांत असते. येथे माणदेशातील स्त्रीचे प्रातिनिधिक रूप म्हणूनच मंजाकडे बघावे लागते.

### ४.७.२. माणदेशाचे भाषिक चित्रण:

उत्तम बंडू तुपे ह्यांची भाषाशैली सातारी वळणाची आहे. तुपे हे शैलीच्या बंधनात अडकलेले नाहीत. त्यांच्या लेखनावर काही साहित्यिक संस्कार होण्याची गरज जाणवते. कारण माणदेशातील सध्याच्या वास्तवाला स्पर्श करणारे साहित्यिक म्हणून तुपे ह्यांच्याकडे पाहिले जाते. ह्याविषयी अनिल बळेल म्हणतात, "उत्तमची भाषा ही उत्तमचीच भाषा आहे. अजून तरी ती शैलीच्या मोहात पडलेली नाही. पण या सुसाट लेखनाला कुठे तरी अंकुश हवा. या सुसाट लेखणाला अपघात होण्यापूर्वी कुणीतरी भानावर आणावे, असे उत्तमला स्वत:लाही वाटते तसा टीकाकार त्याला लाभायला हवा."[५२] माणदेशी ग्रामीण बोलीभाषेमध्ये तुपे ह्यांचे लेखन आहे. ग्रामीण लेखनात निवेदनाची भाषा कोणती असावी, ह्याविषयी श्रीराम गुंदेकर म्हणतात, "अनुभवाची अभिव्यक्ती करण्यासाठी लेखकाला जी भाषा अपरिहार्य वाटते, ती त्याने वापरावी. त्या भाषेत त्याची नैसर्गिक आणि स्वाभाविक रीतीने अभिव्यक्ती होऊ शकते."[५३]

'आंदण' (१९८६) ह्या कथासंग्रहातील 'गुबूगुबू' ह्या कथेतील चंदन्या नंदीवाला राजगिरीबरोबर लग्न करण्यास नकार देतो. राजगिरी सुडाने पेटते. नंदीला विषप्रयोग करते. चंदन्या मनातून कोसळतो. त्याला खूप दु:ख होते. "रात्रीच्या अंधारात पांढराफेक डोंगर उठल्यागत नंदी निवांत पसरला नि राजगिरी तिच्या पालापुढं बसून हसत होती. हे कायबी न्हाय, म्हणावं तुझं खवर केल्याबगार मी गप्प राहणारी नव्हं." (पृ.२३) ह्यावरून नंदीवाल्या समाजातील संघर्ष कसा जीवघेणा ठरतो, ते समजते.

ग्रामीण भागात लग्न समारंभ ही गोष्ट अतिशय महत्त्वाची मानली जाते. लग्नात ऐपत नसताना खर्च करावा लागतो. त्यात 'हुंडा' ह्या पद्धतीने माणदेशात अतिशय रौद्र रूप धारण केलेले दिसते. 'हुंडा' ह्या कथेत एक गरीब शेतमजुर आपल्या मुलीच्या लग्नासाठी पैसे कसे जमवतो, ह्याचे चित्रण आलेले आहे. शिल्लक पैसा हुंड्यासाठी जातो. लग्नात मानपानासाठी पैसे नाहीत म्हणून स्वत:चे रक्त देतो, ह्याचे मन विषण्ण करणारे चित्र पुढील संवादावरून उभे राहू शकते. "या परक्या माणसाचं रक्त काढायचं म्हणजे जबाबदारी कोण घेणार? तेव्हा या माणसाला हजार रूपये द्या," डॉक्टर म्हणाले.

'कसं नामी बोललास डागदारसाहेब' जिवबा

'ठीक देतो आमी."

'तसं न्हाय, आदी रूपय द्या माझ्या हातात. त्या बगार मी रगत देणार नाही.' त्यानं शंभराच्या धा नोटा डॉक्टराच्या हवाली केल्या. डॉक्टरानं जिवबाजवळ हवाली केल्या. जिवबा खाटेवर झोपला. रक्त तपासंल. जुळतंय म्हणताना डॉक्टरनं सुई लावली. एक फुगा जिवबाच्या हातात दिला. नि दाबाय सांगितलं. दुध पिळल्यागत लाल रगताची धार बाटलीत पडाय लागली.''(पृ. ५७) ह्या संवादावरून बोलीभाषेतील रांगडेपणा, जिवंतपणा, तसेच माणदेशी माणसाची परिस्थिती ह्या सर्वांचा बोध होतो.

एकंदरीत, उत्तम बंडू तुपे ह्यांच्या माणदेशी कथांमधून ग्रामीण शेतकरी, स्त्रिया, सालगडी, भटक्या जमाती ह्यांच्या जीवनातील दारिद्र्य व दु:ख, त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या हे सर्व पहावयास मिळते. तसेच माणदेशातील लोकांचे अज्ञान, अंधश्रद्धा, जुनाट परंपरा, त्यातून निर्माण होणारी मानसिक भीती, स्वत:च्या वाट्याला आलेले भोग निमूटपणाने सहन करण्याची रीत ह्या गोष्टी प्रकर्षाने माणदेशी निसर्गाचा व तेथील लोकजीवनाचा व्यापक परिणाम म्हणून आलेल्या दिसतात.

## ४.८. माणदेशातील अन्य कथाकारांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण :

माणदेशात अलीकडील काळात अनेक कथाकार उदयाला येत आहेत. त्यात माणदेशातील बदलत्या समाजजीवनाचे चित्रण, बदलत्या परिस्थितीत निर्माण होणाऱ्या अडचणी, त्यातून निर्माण होणारी अस्वस्थता ह्यांचे चित्रण त्यांच्या कथासंग्रहांमधून आलेले दिसते. कोणताही कथाकार हा आपल्या प्रदेशानुसार, त्याठिकाणच्या सांस्कृतिक परंपरेनुसार घडत असतो. आधुनिक काळातील माणदेशी कथाकार ह्याला अपवाद नाहीत. काळानुसार बदललेले वातावरण समजत असूनही ते बदलण्यासाठी साहित्यातून जी जागृती व्हावयास हवी, ती होताना दिसत नाही. प्रत्येकजण हतबल असल्यासारखा वाटतो. ह्याला कारण माणदेशातील नैसर्गिक परिस्थिती व त्या परिस्थितीने घडवलेला मानवी स्वभाव ह्या गोष्टी आहेत. म्हणून निसर्गापुढे माणदेशी माणूस हतबल होताना दिसतो, ह्याचे चित्रण भीमराव कुलकर्णी, म. गो. पाठक, नानासाहेब झोडगे, कृष्णा इंगोले, सयाजीराजे मोकाशी, रघुनाथ केंगार, अजित वलेकर, महादेव माने, रमेश जावीर, तानाजीराव वाघमारे व सुनिल दबडे ह्यांच्या कथासंग्रहांमधून होते.

भीमराव कुलकर्णी ह्यांच्या 'मुर्दाड'(१९६६) 'धाइस पोरे झालीच पाहिजेत'(१९६८) ह्या दोन माणदेशी कथासंग्रहांमधून माणूस नियतीपुढे कसा हतबल ठरतो, ह्याविषयीचे चित्रण

आलेले आहे. म. गो. पाठक ह्यांच्या 'झुंज'(१९६०), 'माणसाच्या मागावर' (१९६५), 'लागीर' (१९८४), 'अवलीया' (१९८५), ह्या चार कथासंग्रहांमधून माणदेशी माणसांचा बेडर स्वभाव, माणुसकी सांभाळण्याची प्रवृत्ती, निसर्गावर मात करण्याची माणसांच्या मनाची आधुनिक प्रवृत्ती, थोडीसी अंधश्रद्धा ह्याचे चित्रण आलेले दिसते. अजित वेलकर ह्यांचा 'गोतावळा'(१९८७) हा कथासंग्रह माणदेशातील माणुसकी शोधण्याचा प्रयत्न करतो. परंतु माणदेशी वातावरणाच्या मांडणीत तो व्यवस्थित उतरला आहे, असे वाटत नाही. कृष्णा इंगोले ह्यांच्या 'गावरंग'(१९९६) आणि 'गावजागर' (२००५) हे कथासंग्रह माणदेशाची खरी ओळख करून देणारे वाटतात. ह्यात माणदेशी बोलीचा वापर करून माणदेशातील माणसाला माणदेशी निसर्गापासून दूर करता येत नाही, हे माणदेशातील ग्रामजीवनातील वेगवेगळ्या घटकांच्या आधाराने चित्रित केलेले आहे. रमेश जावीर ह्यांच्या 'वाजाप'(१९९०) ह्या कथासंग्रहातून दलितवर्गातील अनेक लोकांच्या वेदना, दुःख माणदेशी पातळीवर मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. परंतु त्याचा म्हणावा तसा परिणाम जाणवत नाही. तानाजी वाघमारे ह्यांच्या 'धगाटा'(१९९९) ह्या कथासंग्रहातून जगण्याच्या इच्छेतून माणूस अज्ञान-दारिद्रयातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करतो. ही माणदेशी माणसाची जीवनलालसा निश्चिपणे वेगळेपणा दाखवते. सुनील दबडे ह्यांच्या 'हराटीची भुई' (२००१) ह्या कथासंग्रहात माणसातील कमी होत असलेली मांणुसकी, देवभोळेपणा व जातिभेद ह्यात रुतून बसलेल्या, तसेच अठराविश्व दारिद्रयात खितपत पडलेल्या साध्याभोळ्या माणसांच्या मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. 'माणदेशी कथा'(१९९०) ह्या प्राचार्य विश्वासराव देशमुख व प्रा. सयाजीराजे मोकाशी ह्यांनी संपादीत केलेल्या कथासंग्रहात नानासाहेब झोडगे ह्यांच्या 'हुरदं' ह्या कथेत माणदेशातील खालच्या जातीतील लोकांना सुधारण्याची संधी श्रीमंत लोक देत नाहीत, त्यांचा गोड बोलून काटा काढतात, ह्याचे मन विषण्ण करणारे चित्रण दिसून येते. सयाजीराजे मोकाशी ह्यांच्या 'झगडा' ह्या कथेत माणदेशातील परिस्थितीमुळे गरीब माणसांचा बळी जातो, त्यांना कोणीही वाली उरत नाही, ही वास्तव खंत व्यक्त केलेली दिसते, रघुनाथ केंगार ह्यांनी 'लिंब' ह्या कथेतून वास्तवाला स्पर्श करणारे माणदेशी चित्रण केले आहे. माणसातील माणुसकी शोधण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो.

एकंदरीत, माणदेशातील अन्य कथाकारांच्या कथेतील चित्रणातून माणदेशाच्या परिस्थितीचे वास्तव दर्शन तेथील माणसांच्या भावभावनासह, बोलीसह, घडून येते.

## ४.९. निष्कर्ष व निरीक्षणे :

- मराठी ग्रामीण कथेच्या पूर्वपीठिकेचा आढावा घेत असताना हरिभाऊंच्या 'काळ तर मोठा कठीण आला' ह्या कथेची नोंद घेणे गरजेचे वाटते.
- ग्रामीण जीवनाचे पहिले हुबेहुब चित्रण श्री. म. माटे ह्यांच्या कथेमधून घडते. म्हणून माटे हे ग्रामीण कथेचे जनक ठरतात.
- स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी कथेत माणदेशाचे चित्रण पहावयास मिळत नाही.
- माणदेशाचे सर्वप्रथम चित्रण ग. दि. माडगूळकरांच्या सामाजिक कवितेतून जाणवत असले तरी त्यात माणदशाचे सूक्ष्म अवलोकन जाणवत नाही. त्यामुळे माणदेशी कथेचे जनक व्यंकटेश माडगूळकर ठरतात. त्यांच्या 'माणदेशी माणसे' (१९४९) नंतर माणदेशी कथा विकसित झालेली दिसून येते. तसेच मराठी कथेतून माणदेशाचे चित्रण विपुलतेने व विविधतेने होऊ लागलेले दिसते.
- ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, द. ता. भोसले ह्यांनी माणदेशी कथाविश्व विस्तारित केले.
- ग्रामजीवनातील दुःख, दारिद्र्य, भूक, अत्याचार, मनोविश्लेषण ही ह्यांच्या कथांची वैशिष्ट्ये ठरतात.
- आज गुणात्मकतेबरोबर संख्यात्मकदृष्ट्या विचार केल्यास माणदेशी कथा स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणावर लिहिली जात असल्याचे दिसते.
- सामान्यपणे ग्रामीण कथाकारांच्या चार पिढ्या आपणासमोर येतात. पहिली पिढी - श्री. म. माटे.; दुसरी पिढी - ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर; तिसरी पिढी - शंकरराव खरात; चौथी पिढी - द.ता. भोसले, उत्तम बंडू तुपे.
- गदिमांच्या कथेतील संघर्ष माणदेशी संस्कारामुळे उदात्ततेत पर्यवसित होतो.
- व्यंकटेश माडगूळकरांची कथा अस्सल ग्रामीण व्यक्तिप्रधान असल्याने केवळ व्यक्तीच नव्हे, तर त्यापाठीमागील माणदेशातील निसर्गही व्यक्ती बनून त्यांच्या कथेत येतो.

- शंकरराव खरातांच्या कथेतून बारा बलुतेदारांच्या, तसेच उपेक्षितांच्या दबलेल्या भावभावनांना वाचा फोडण्याचे काम झालेले असले, तरी त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग त्यांच्या कथेतून दिसत नाही.
- द. ता. भोसले ह्यांना ग्रामव्यवस्थेचे नेमके आकलन असल्याचे दिसते. उत्तम बंडू तुपे व अन्य कथाकार ह्यांनी माणदेशातील बदलत्या जीवनाचा वेध घेऊन त्याचे चिंत्रण आपल्या कथेतून केले आहे.

एकंदरीत, मराठी कथेतील माणदेशाच्या चित्रणाने एकूणच ग्रामीण व दलित कथेमध्ये भर पडलेली आहे व त्यामुळे मराठी कथाविश्व समृद्ध व संपन्न होण्यास हातभार लागलेला आहे.

## ४.१०. समारोप :

मराठी कथेतील माणदेशाच्या चित्रणाचा विचार करता, मादेशातील ग्रामीण वास्तव, समूहजीवन, अत्याचार, स्त्रीजीवन, भुकेचा प्रश्न, अंधश्रद्धा, प्राणिसृष्टी, निसर्ग हे त्यातील महत्त्वाचे घटक दिसतात. अस्सल ग्रामीण संवेदनशीलता असलेले श्रेष्ठ ग्रामीण माणदेशी कथाकार म्हणून व्यंकटेश माडगूळकरांचा विचार करावा लागतो. सामाजिकता हा मराठी कथेतील माणदेशी चित्रणाचा गाभा दिसून येतो.

शंकरराव खरातांनी ग्रामीण कथेतील नियतीवाद, दैववाद, प्रारब्ध हया बाबींना फाटा देऊन ते परिवर्तनाचे दूत बनले, हे नाकबूल करून चालणार नाही. त्यांची कथा ग्रामीण व दलित कथेचा दुवा म्हणावी लागेल. कारण ती ग्रामीण कथेशी नाते सांगत दलित कथेशी एकरूप झाली.

थोडक्यात, मराठी कथेतील माणदेशाच्या चित्रणामुळे महाराष्ट्रातील एक सर्व दृष्टीने उपेक्षित, दुर्लक्षित, मागासलेला प्रदेश समोर ठळकपणाने आला. त्याचा अप्रत्यक्ष परिणाम ग्रामीण कथेच्या विकासामध्ये झाला.

आता ह्यापुढील पाचव्या प्रकरणामध्ये आपण मराठी कादंबरीतील माणदेशाचे चित्रण अभ्यासणार आहोत.

---- ❖ ❖ ❖ ----

## ४.११. संदर्भसूची :


| | | | |
|---|---|---|---|
| १. | पहा: चव्हाण शिवाजीराव, | : | 'मराठी ग्रामीण कथा : आशयाचे स्वरूप व मर्यादा', 'अभिरूची', बडोदा, व. २१, अं.३, मे-जून १९७९, पृ.११. |
| २. | पहा: शेवडे इंदुमती, | : | 'मराठी कथा : उद्‌गम आणि विकास', सोमैय्या पब्लिकेशन्स्, मुंबई, प्रथमावृत्ती : १९७३, पृ. ५०९. |
| ३. | चोरघडे वामनराव, | : | प्रस्तावना, 'तुपाचा नंदादीप' (कथासंग्रह), ग. दि. माडगूळकर, विदर्भ-मराठवाडा बुक कं. पुणे, प्रथमावृत्ती: १९६६, पृ. ११. |
| ४. | माडगूळकर ग. दि., | : | 'बांधावरच्या बाभळी', कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, प्रथमावृत्ती: १९६३, पृ.४६. |
| ५. | माडगूळकर ग. दि., | : | 'मोहरलेला कडुनिंब'(कथा), 'मंतरलेले दिवस' (कथासंग्रह), साधना प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती : १९६२, पृ.३५. |
| ६. | | : | तत्रैव, पृ.३५. |
| ७. | पवार दया, | : | 'मराठी साहित्यातील दलितांचे प्रतिबिंब', 'मनोहर' (साप्ता.), पुणे, २० नोव्हेंबर १९७७, पृ.२२. |
| ८. | माडगूळकर ग. दि., | : | 'काशीयात्रा' (कथा), 'थोरली पाती'(कथासंग्रह), कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, प्रथमावृत्ती : १९६३, पृ.१०२. |
| ९. | यादव आनंद, | : | 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती : १९७९, पृ. ८४-८५. |

१०. राजाध्यक्ष मं. वि., : प्रस्तावना, 'लपलेला ओघ'(कथासंग्रह), माडगूळकर ग. दि., कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, प्रथमावृत्ती : १९५२, पृ.१०.

११. माडगूळकर ग. दि., : 'माणूस अखेर माणूस आहे'(कथा), 'थोरली पाती' (कथासंग्रह), कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, प्रथमावृत्ती : १९६३, पृ.१.

१२. भावे पु. भा., : प्रस्तावना, 'थोरली पाती'(कथासंग्रह), माडगूळकर ग. दि., कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, प्रथमावृत्ती : १९६३, पृ.२४.

१३. राजाध्यक्ष मं. वि., : उनि., पृ.९.

१४. भावे पु. भा., : उनि., पृ. १०.

१५. : तत्रैव, पृ.२३.

१६. : तत्रैव, तृ. २९.

१७. गोखले अरविंद (संपा.), : 'व्यंकटेश माडगूळकर यांची कथा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती :१९६४, पृ.१३.

१८. जोशी प्र. न., : 'मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास', प्रसाद प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती :१९७९, पृ.४३२.

१९. जाधव रा. ग., : 'अश्वत्थाची गंभीर सळसळ', नवभारत, वाई, फेब्रुवारी १९८३, पृ.३.

२०. पुंडलिक विद्याधर, : 'संमेलनाध्यक्ष व्यंकटेश माडगूळकरांची मुलाखत', 'ललित', मुंबई, फेब्रुवारी १९८३, पृ.४४.

२१. सावंत शिवाजी, : 'कवडसे', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती : २००३, पृ. ५९- ६०.

२२. गाडगीळ गंगाधर, : 'खडक आणि पाणी', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती : १९६०, पृ.२५७.

२३. : तत्रैव, पृ.२५३.

२४. कुलकर्णी गो. गं, : 'साहित्य:दलित व ललित', नूतन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती :१९७७, पृ.४३.

२५. पहा : कुलकर्णी गो. गं., : उनि., पृ.५३.

२६. पहा : बेडेकर दि. के., : 'विचारयात्रा', लोकवाङ्मयगृह, मुंबई, प्रथमावृत्ती : १९७५, पृ.१६८.

२७. माडगूळकर व्यंकटेश, : 'संकल्प एक एकर पिकाचा', प्रवास : एका लेखकाचा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती : १९९४, पृ.१६१.

२८. माडगूळकर व्यंकटेश, : 'माझी वाङ्मयीन भूमिका', 'मराठवाडा', औरंगाबाद, ४ फेब्रुवारी १९८३, पृ.३.

२९. खरात शंकरराव, : 'तराळ - अंतराळ', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती :१९८१, पृ.४३८.

३०. फडकुले निर्मलकुमार, : 'काही रंग, काही रेषा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती : १९८६, पृ.२९ व ३१.

३१. पहा : गजभिये अनिल, : 'दलित कथा : वाटा आणि वळणे', 'अस्मितादर्श' औरंगाबाद, दिवाळी अंक १९८६, व. १९, अं.३, पृ.११३-१४.

३२. कोत्तापल्ले नागनाथ, : 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती :१९८५, पृ.६१.

३३. कुलकर्णी दा. वि., : 'मराठी कथा : स्वरूप आणि आस्वाद', स्वाध्याय प्रकाशन , पुणे, प्रथमावृत्ती : १९७६, पृ.३९८.

३४. फडके भालचंद्र, : 'दलित साहित्य : वेदना व विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती : १९७७, पृ.१८७.

३५. कुलकर्णी दा. वि., : उनि., पृ. ३९८.

३६. डहाके वासुदेव, : 'शंकरराव खरात : व्यक्ती आणि वाङ्मय'(मान्यताप्राप्त पीएच. डी. प्रबंध), नागपूर विद्यापीठ, नागपूर, सादर वर्ष :१९९०, पृ.१४१.

३७. देशमुख शारदा, : 'सांगावा', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे, ऑगष्ट : १९६३, पृ. ३०

३८. कुलकर्णी वा. ल., : 'वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती :१९५९, पृ.४३.

३९. शेवडे इंदुमती, : 'मराठी कथा : उगम आणि विकास', सोमैय्या पब्लिकेशन्स, मुंबई, सुधारित आवृत्ती :१९८२, पृ.३५३.

४०. डहाके वासुदेव, : उनि., पृ. १९०.

४१. पहा : शेवडे इंदुमती, : उनि., पृ. ३५५.

४२. पानतावणे गंगाधर, : 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे', विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती :१९७६, पृ.१५९.

४३. माडगूळकर अंबादास, खांडेकर सूर्यकांत, : 'मराठी ग्रामीण कथा,' ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती :१९६७, पृ.३२.

४४. लोखंडे अरुणा , : 'शंकरराव खरातांचे कथाविश्व', अस्मितादर्श, औरंगाबाद, जून १९६९, पृ. ४७.

४५. टापरे पंडित, : 'दैनिक संचार', सोलापूर, २३ जुलै १९९५, पृ. ५.

४६. मुलाटे वासुदेव, : 'ग्रामीण कथा: स्वरुप आणि विकास', स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती : १९९२ पृ. २२६.

४७. कुलकर्णी मदन, : 'मराठी प्रादेशिक कांदबरी : तंत्र आणि स्वरुप', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती : १६ जून १९८४, पृ. ११५.

४८. : तत्रैव , पृ. २६८.

४९. टापरे पंडित, : 'ग्रंथ परीक्षण 'पाळत' (कथासंग्रह)', 'नवभारत', वाई, सप्टेंबर १९७८, पृ. ५७.

५०. तुपे उत्तम बंडू, : 'काट्यावरची पोटं', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती : १९८२, पृ. ८.

५१. कोत्तापल्ले नागनाथ, : उनि., पृ. १५.

५२. बळेल अनिल, : 'वस्तीवरचा दादा होता होता कादंबरीकार झालो,' 'ललित', मुंबई, एप्रिल १९८८, पृ. ७०.

५३. गुंदेकर श्रीराम, : 'ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती : १९९९, पृ. ९.